म. ग्रं. सं. ठाणे.
विषय भू-प्रवास
सं. क्र. ७४६

REFBK-0026751
REFBK-0026751

# गिरीदुर्ग आम्हा सगेसोयरे

लेखक

तु. वि. जाधव

REFBK-0026751

REFBK-0026751

वरदा बुक्स

'वरदा', सेनापती बापट मार्ग, पुणे - १६

- **मुद्रक व प्रकाशक –**
  ह. अ. भावे (वरदा बुक्स)
  ३९७/१, सेनापती बापट मार्ग,
  पुणे – ४११०१६

- **मुद्रण स्थळ –** स्मिता प्रिंटर्स
  (प्रमोद वि. बापट)
  १०१९, सदाशिव पेठ,
  पुणे - ४११०३०



- **© तु. वि. जाधव**
  'गोवावाला सदन', ब्राह्मणवाडा,
  न्या. छगला मार्ग, विलेपार्ले (पूर्व)
  सहार – मुंबई - ४०००९९



- **मुखपृष्ठ –** श्री. वसंत सहस्रबुद्धे
  व श्री. तु. वि. जाधव

- **मुखपृष्ठावरील छायाचित्र –**
  'दि नेचर लव्हर्स'
  मालाड – मुंबई.

- **किंमत –** रुपये ऐंशी मात्र
  (रुपये ८०=००)

- **टाईपसेटींग :**
  आशय टाईपसेटर्स्
  २६६, शनिवार पेठ
  पुणे ३०

- **प्रकाशन क्रमांक - ५१८**

- **पुस्तकातील कृष्ण-धवल छायाचित्रे –**
  श्री. तु. वि. जाधव / श्री. राजेंद्र बोरसे / हिरा पंडित / श्री. संतोष बडे
  बाळ राऊळ / श्री. प्रजापति बोधणे / दि नेचर लव्हर्स
  श्री. सुरेश परांजपे / श्री. प्र. के. घाणेकर / श्री. मनोहर गांगल

- **प्रकाशन तिथी :** रविवार दि. २३ ऑगस्ट १९९२.
  'गिरीदुर्ग आम्हा सगेसोयरे' – ह्या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ रविवार दि. २३ ऑगस्ट १९९२ रोजी सकाळी ११ वा. मा. दीनानाथ मंगेशकर नाट्य मंदिरात, मा. शिवशाहीर श्री. बाबासाहेब पुरंदरे यांचे हस्ते संपन्न झाला.

तुझ्या भुकेला वरी नाचली
आणि कणी कोंडा ।
वहाण पायी अंगी कांबळी
उशाखाली धोंडा ॥

≈ राम गणेश गडकरी ≈

माझ्या सर्वज्ञात नि अज्ञात
दुःखिबंधुभगिनींच्या चरणी
सादर सस्नेह अर्पण......

~ तु. वि. जाधव ~

# मान्यवरांचे आशीर्वाद ! शुभेच्छा !! अभिनंदन !!!

आपली श्रीशिवाजीमहाराजांवरील भक्ती पाहून आनंद वाटला. महाराजांची शक्ती व ईश्वराची कृपा आपल्यावर राहावी हीच शुभकामना. कळावे. नमस्कार.

– लता मंगेशकर •

रायगड प्रदक्षिणेचा तुमचा साहसी तरुणांचा वृत्तान्त वाचला. अभिनंदन, साहसाबद्दल आणि सुंदर लेखनाबद्दल...! हिरकणी कडा सुखरूपपणानं उतरल्याबद्दल तुमचे आणि प्रजापती बोधणेचे मनःपूर्वक अभिनंदन...! दुर्ग लिंगाणावर तीनशे वर्षांनंतर तुम्ही आरोहण केल्याची वार्ता वाचून परम संतोष जाहला. किल्ले रायगडावरून मशालीचा इशारा, माझा मित्र बाबुराव फणसळकर याने केला हे वाचून विशेष आनंद वाटला. याउपरी अशी मनाची उभारी वाढविणारी साहसे तुमच्या आणि तुमच्या मित्रांच्या हातून घडत राहोत ही शुभेच्छा. साहसी वीर पार्ल्याचे आहेत याचा मला खास अभिमान वाटतो हे लिहायला नकोच...!

– पु. ल. देशपांडे •

भले भले! शक्य असते तर पायी सोन्याचा तोडा लेवविला असता... खरोखरी गर्व वाटावा असे कृत्य तुम्ही केलेत. शाब्बास जाधव! याबद्दल तुमचे कौतुक कसे करावे ते ध्यानी येईनासे झाले आहे. तुम्हास कौतुकाने न्याहाळावयाचे आहे... तुमची धन्य आहे रे बाबा! क्षण समोर उभा नसतो तेव्हा मनुष्य बेभानपणे स्वतःस झोकून देतो. यात तर खरे पौरुष आहे... अपूर्व तर केलेतच, लेखही बहु सरस झाला आहे. तुम्हास लेखनकळा चांगली जमली आहे.

– गो. नी. दाण्डेकर •

आपण किल्ले लिंगाणा या गडाच्या शिखरावर जाऊन आल्याचे वाचून आनंद झाला. आपण आपल्या सहकाऱ्यांनिशी एक फार उत्तम उपक्रम केला याबद्दल आपले व आपल्या मित्रांचे मन:पूर्वक अभिनंदन! आपण वृत्तपत्रात यासंबंधात लिहिलेला लेखही मी वाचला. मला आवडला व अधिकच आनंद वाटला. आपण असेच उपक्रम चालू ठेवावेत हीच नम्र विनंती...!

- बाबासाहेब पुरंदरे ●

हॉलिडे हायकर्स क्लबने लिंगाणाच्या सुळक्यावर चढण्याचा विक्रम केला हे वाचून बरे वाटले. आपणा तरुण मंडळींचे कौतुक! असेच विक्रम करीत चला. भवानीकड्यावरील तुमचा दुसरा विक्रम समजून आला व तुमच्या होतकरूपणाविषयीचा विश्वास वाढला. तुमच्याकडून असे विक्रम सदैव सुरक्षित होत राहोत ही इच्छा! कळावे!

- सेतुमाधवराव पगडी ●

हॉलिडे हायकर्स क्लबच्या १४ सदस्यांनी दुर्ग लिंगाणावरील तीनशे फूट उंचीचा सुळका पादाक्रांत केल्याचे वृत्त वाचून मला आनंद व अभिमान वाटला. आपल्या देशाच्या भावी काळाचा उत्कर्ष आपल्याच हाती आहे. या विजयाच्या वीरश्रीने यापुढील आपण योजलेली साहसे सफल होतील असा विश्वास वाटतो. त्यासाठी आपणास उदंड आरोग्य व बळ लाभावे एवढीच जगन्नियंत्याकडे मन:पूर्वक प्रार्थना आहे. सदैव विजयी व्हावे. आपल्या प्रस्तुत विजयी साहसाची माहिती गेल्या आठवड्यात वृत्तपत्रात वाचली होती. आज त्या साहसाच्या भागीदाराचे दस्तूरखुद्द पत्र आल्यामुळे फारच आनंद झाला. 'साहसे श्रीः प्रतिवसति' हे सुभाषित ध्यानात ठेवा. येथे 'श्री' चा अर्थ भाग्य असा आहे. केवळ द्रव्य असा नाही.

- न. र. फाटक ●

● ○ ●

# परिसस्पर्श...

**ओम नमो जि गणनायेका। सर्वसिद्धिफलदायेका।**
**अज्ञानभ्रांतिछेदका। बोधरुपा॥**
**चंडमुंडभंडासुरखंडिणी आई जगदम्बेला...**
**उद्दंडदंड महिषासुरमर्दिनी माते दुर्गेला...**
**शिरसाष्टांग दण्डवत घालून...**
**नवनवोन्मेषशालिनी... चातुर्यकलाकामिनी...**
**अभिनववाग्विलासिनी... वीणावादिनी... विश्वमोहिनी...**

महाराष्ट्र शारदेच्या चरणी विनम्र अभिवादन करून... अर्धोन्मीलित नेत्रांनी हे माझं पहिलं वहिलं शब्दपुष्प भक्तिभावे वाहाताना अष्ट सात्त्विक भाव जागृत होत आहेत...!

महाराष्ट्राचं लाडकं व्यक्तिमत्त्व श्री. पु. ल. देशपांडे, स्वरमाऊली लता मंगेशकर, दुर्गमहर्षी गो. नी. दाण्डेकर, शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे, थोर इतिहास संशोधक न. र. फाटक नि सेतुमाधवराव पगडी या समस्त मान्यवरांनी, माझे पत्रद्वारे आशीर्वादपर अभिष्ट चिंतिले... त्या प्रेमपत्रांतील शब्दफुलांचा सुगंध आजही माझ्या मनी दरवळतो आहे... यापरतं भाग्य नाही...!

'दुर्ग मातोश्री'च्या खलबतखान्यात, एका सदिच्छा भेटीसमयी, दस्तुरखुद्द मा. श्री. बाळासाहेब ठाकरे यांनी, सौ. मीनाताई, राजश्री मनोहरजी जोशी नि प्रमोदजी नवलकर यांच्या उपस्थितीत माझं त्रिवार अभिनंदन करून 'हिरकणी वीर' हे सहा अक्षरी नाव मला इनाम दिलं... तद्नंतर प्रथमेश कला केंद्रानं आयोजित केलेल्या एका जाहीर सत्कार-समारंभात, स्वत:च्या गळ्यातील पुष्पहार त्यांनी माझ्या गळ्यात घालून 'हिरकणी वीर' या नावे शिक्कामोर्तब केलं... अजूनही तो हार मी जपून ठेवलाय्... निर्माल्य झाले असले तरी त्यातील सुगंध आजही स्फूर्तिदायक आहे...!

तशी नाट्यसृष्टीशी माझी जवळीक...! गेल्या पंधरा वर्षांत या कलाक्षेत्रात अनेक नाती जोडली गेली नि कित्येक जडली गेली... पैकी सर्वश्री प्रभाकर पणशीकर, चित्तरंजन कोल्हटकर, मोहन वाघ नि डॉ. काशीनाथ घाणेकर ही

प्रमुख...! हे चौघेही मराठी रंगभूमीवरील अनभिषिक्त सम्राट... यांनी नेहमीच शाबासकीची थाप माझ्या पाठी मारली...! डॉ. घाणेकरांविषयी किती नि काय लिहू...? डॉक्टर म्हणजे एक माणूसवेडा कलावंत...! 'राजा रविवर्मा' या नाटकाच्या अभिवाचन प्रसंगी त्यांनी दिलेलं तोंडी अभिवचन आजही डोळ्यात पाणी उभं करतं... याक्षणी ते असते तर...? मजसारख्या सर्वसामान्याच्या कलाकृतीला मनस्वी दाद देणारा एक थोर कलावंत... आता फक्त आठवण राहिली...!

'सुयोग' या नाट्यसंस्थेचे चालक, पालक नि मालक श्री. सुधीर भट नि श्री. गोपाल अलगेरी हे तसे उदार मनोवृत्तीचे नाट्यनिर्माते... सादेला दाद देणारे... हाताला हात देणारे...! या कामी त्यांचं सहकार्य तसं अविस्मरणीय...!

मुंबईचे माजी महापौर नि विद्यमान आमदार डॉ. रमेश प्रभू यांचं यामागील प्रोत्साहन सदैव स्मरणात राहील असं...!

दीडखणी खोलीचा वाडा... ऐतिहासिक व्याधीनं ग्रासलेली गृहलक्ष्मी... एखाद्या गडाचा खूबलढा बुरुज ढासळावा तशी आर्थिक समस्या समूळ कोलमडलेली... त्या बुरुजाची जुजबी डागडुजी करण्यात काही वर्षे खर्ची पडलेली... त्या रखरखीतपणावर त्या माऊलीनं आपल्या पदराची साऊली धरलेली... तशाही परिस्थितीत तिनं या माझ्या दुर्गयात्रेस कधीच मोर्चेबंदी केली नाही... उलट चढाईवर निघताना कडसरीच्या बटव्यातली तीनचार नाणी तिनं माझ्या हाती टेकली...!

ज्यांच्या सहवासामुळं ही निसर्गयात्रा शब्दबद्ध झाली नि फळीफुली बहरून आली त्या दुर्गनिष्ठांच्या मांदियाळीत मजसवे असणारे दुर्गबंधू सर्वश्री सोमनाथ समेळ, प्रा. प्र. के. घाणेकर, निनाद बेडेकर, डॉ. दिनेश रांगणेकर, प्रा. अनंतराव चांदेकर, बाबुराव काळसेकर, प्रभाकर केसकर, सुरेश परांजपे, रवीन्द्र भावे, सुहास हळणकर, प्रभाकर भावे, संजय रांगणेकर, रणवीर सिंग, हिरा पंडित, विलास जोशी, नरेन् शेट्ये, श्रीकांत फणसळकर, सदा आगाशे, विवेक गोरे, अनिल पटवर्धन, श्याम जांबोटकर, प्रजापती बोधणे, विनय दवे, अजित गोखले, सुधीर गांगल, प्रकाश तेंडुलकर, किरण समर्थ, संदीप तळपदे, श्रीनिवासन कृष्णमूर्ती, बोरसेबंधू, कुलकर्णी बंधू, व्यास कुटुंबीय, नाबर परिवार आणि कै. संतोष गुजर...! किती नावं सांगू? सारी नामावली लिहू म्हटल्यास ती शतकोत्तरी होईल...!

संतोष गुजर! खरा लिंगाणावीर! एक दिस भरदुपारी, दुर्ग लिंगाणावरील त्या उत्ताल सुळक्याच्या डोयी एकटाच चढून गेला... त्या शिवलिंगाच्या माथी भगवा फडफडला... मातीचा कण नि कण थरथरला... आणि मग, उरी शिवभक्ती

नि पाठी शिवशक्ती घेऊन गेलेला संतोष विजयी मुद्रेनं प्रसन्न स्मित करीत उतरताना दोन हजार फूट खोल दरीत कोसळला... ! आजही त्याच्या सहवासातील सुवास हृदयीचा हुंकार होतो... हुंदका होऊन गळी दाटून येतो... !

पुण्याच्या 'वरदा बुक्स'चे श्री. ह. अ. भावे नि पार्ल्याचे श्री. प्रभाकर भावे या मित्रद्वयींनी, हे सारं विखुरलेलं लेखन पुस्तकरूपानं छापण्याची संधी दिली हे माझं महत्‌भाग्य... ! आयुष्यात येणारी सुवर्णसंधी आपल्या हाती नसते पण त्या संधीचं सुवर्ण करणं फक्त आपल्याच हाती असतं तसं काहीसं हे घडलंय्... !

पार्ले टिळक विद्यालय, मा. दीनानाथ मंगेशकर नाट्यमंदिर, लोकमान्य सेवा संघ, गोमंतक सेवा संघ, महिला संघ, उत्कर्ष मंडळ, हॉलिडे हायकर्स क्लब, नेचर लव्हर्स, जनसेवा समिती, जीवन रेस्टॉरंटचे जोगळेकर बंधू, जवाहर बुक डेपोचे भोगले बंधू, नामजोशी बंधू, श्री. व सौ. नीला रवींद्र भिडे, विजय जाजू, गजानन म्हात्रे, बाबुराव नरवणे, वासुदेवराव बर्वे, मधुकर केळुसकर, सुहास हळणकर, शशीकांत गानू, बाबुराव फणसळकर या सर्व पार्लेकर सुहृदांचे सहकार्य अतिशय मोलाचे... !

या लेखमालेतील बहुतेक सर्व लेख–लोकसत्ता, महाराष्ट्र टाईम्स, नवशक्ती, मुंबई सकाळ, नवाकाळ, सामना, श्री, पर्यटन, मार्मिक, जिद्द इत्यादी पत्रांतून पूर्वीच प्रसिद्ध झाले आहेत याची नोंद इथं घेणं अत्यावश्यक... !

- या समस्त मान्यवरांस हा माझा पहिलावहिला मानाचा मुजरा... त्यांस वाहिलेली ही एकवीस तोफांची सलामी... !

अनेक शिवभक्तांनी आपल्या सिद्धहस्त लेखणीनं शिवदुर्गांचं सौंदर्य प्रभावीपणं रेखाटलं आहे. या शिवसागरावरील सेतुबंधनात माझा वाटा फक्त खारकुंडीचा... आणि म्हणूनच समग्र शिवसमर्थ साहित्यातील काही भागाचं या पुस्तकी, प्रतिबिंब उमटलं आहे... ! हे पुस्तक म्हणजे त्या भव्यदिव्य वाङ्मयवृक्षावरील सळसळत्या हजारो पर्णभारातील नुकतेच अंकुरलेले एक नाजूक कोवळं पान... पानांचा स्पर्श पानाला व्हायचाच... !

या शब्दयात्रेत काही ठिकाणी पुनरुक्ती झालेली आढळेल. पुनरुक्ती केल्यानं विषय मनावर चांगलाच ठसतो-बिंबतो म्हणूनच ती द्विरुक्ती आहे.

वास्तविक हे वय डोंगरचढाईचं नसून डोंगर 'उतराई'चं आहे... ! गेली वीस वर्षे ज्या पर्वतशिखरांनी आपल्या अंगाखांद्यावर मला स्वच्छंद वृत्तीनं बागडू दिलं... इतिहासप्रेम जागृत केलं नि लेखनास प्रवृत्त केलं त्यामुळं शिवस्पर्श, दुर्गस्पर्श नि निसर्गस्पर्श या त्रिवेणी संगमात मी अक्षरशः अंतर्बाह्य न्हाऊन निघालो... ! पुढं या त्रयीचं चिंतन करता करता 'गिरीभ्रमण' या शब्दाचा खोल

सखोल अर्थ ध्यानी येऊ लागला... !

गिरीभ्रमण करताना पावलोपावली निसर्ग आपला सोबती असतो... त्याच्या सौंदर्याचं डोळसपणं सूक्ष्म निरिक्षण करून, त्यातील बारकावे अभ्यासूवृत्तीनं हेरून नि त्याच्याशी श्रद्धापूर्वक मन्मनी तादात्म्य पावून त्यातील एखाददुसरा मनाजोगा छंद निष्ठापूर्वक उरीपोटी जोपासणं... आयुष्याची लयबद्धता साधण्यासाठी छंदाशी खेळण्याचा छंद लावून घेणं हेच एकमेव गिरीभ्रमणातील अंतिम ध्येय आहे असं माझं स्पष्ट नि प्रामाणिक मत आहे.

निसर्गाविषयी ओढ नि जवळीक साधणारी... शारीरिक, मानसिक नि बौद्धिक विकास करणारी, गिरीभ्रमण ही एक जालीम 'मात्रा' आहे... ! गिरीभ्रमण म्हणजे एखादी 'जत्रा' नसून ती एक प्रसन्नमयी 'आनंदयात्रा' आहे... ! सह्याद्रीकार जोगळेकर म्हणतात - 'या आनंदयात्रेत आपण अनेक तीर्थस्थळांना नि धारातीर्थांना भेट देऊन सह्यगिरीची मनोमन महापूजा बांधत असतो... सह्याद्रीची पूजा ही मातृभूमीची पूजा... ! भारतमातेची पूजा... ! महादेवाची नि महाशक्तीची मंदिरं आपल्या शिरी धारण करणारी शिखरं ही सह्याद्रीच्या पावित्र्याची प्रतिकं... ! त्यांचे दर्शन हे सह्याद्रीच्या पावित्र्याचे पूजन... ! गडकोटांचे दर्शन हे सह्याद्रीच्या स्वातंत्र्यप्रेरकतेचे पूजन... ! लेण्यांचे दर्शन हे सह्याद्रीच्या संस्कृतीचे पूजन... ! आणि पाटपाणी व पाणवीज यांचे दर्शन हे सह्याद्रीच्या आदिशक्तीचे पूजन... !

गिरीभ्रमणात प्रस्तरारोहण हे ओघानेच येते. हा जीवघेणा खेळ... ही तारेवरील कसरत... हे तलवारीच्या धारेवरून चालणे... हे सारं कशासाठी ? याचं उत्तर मला जे भावलं ते असं - 'तात सह्याद्रीच्या अंगाखांद्यावर उभी असलेली गिरीशिखरे हे स्वातंत्र्यदेवतेचे गगनचुंबी प्रासाद... ! शिवरायांनी या साऱ्यांस अंगडं-टोपडं घालून सजवलं नि त्या पाषाण-शिल्पांचं नामकरण केलं 'दुर्ग'... ! याच दुर्गशिखरांनी अवघ्या मराठ्यांस स्वातंत्र्याचे पाठ दिले... स्वराज्याचे मंत्र दिले... ! गनिमाची प्रथम चाहूल लागली ती याच शिखरांना... प्रसंगी सकलांस सावधानतेचा इशारा दिला तो याच शिखरांनी... नि परकीय आक्रमणापासून स्वराज्याचं रक्षण केलं तेही याच शिखरांनी... ! आणि म्हणूनच हे त्यांच्या उरीचं गुपित जाणून घेण्यासाठी ही जीवघेणी धडपड... !

या जीवघेण्या चढाईच्या लढाईत, घोरपडीच्या चिकाटीनं नि वाघाच्या हिंमतीनं आपण विजयी होतो आणि शेवटी ही विजययात्रा आनंददायी होते... रुपेरी वार्धक्याला सोनेरी तारुण्य प्रदान करते... जीवनाला नवचैतन्याची शिदोरी पुरवते... नि निसर्गाच्या सौंदर्यमहोत्सवातील क्षणचित्रे टिपण्यास सहाय्यभूत ठरते... !

ऋतुराज वसंताच्या मनहारी चैत्रपालवीपासून शिशिरातल्या भिरभिरत्या

पतझडीपर्यंतच्या ऋतुचक्रात सहा ऋतुंचे सहा अनुपम्य सौंदर्यसोहळे... बहुरुपी, बहुरंगी, बहुढंगी निसर्गानं दिलेली ही सारी अवर्णनीय रुप-रस-रंग-गंध-स्पर्श यांची अतुलनीय देणगी...! निसर्गानं मुक्तहस्तानं उधळलेलं हे सारं सौंदर्य एखाद्या गडावर उंच कड्याच्या माथी उभं राहून सश्रद्ध डोळेभरी न्याहाळण्यात - त्या सृष्टीचं लावण्य या दृष्टीनं टिपून घेण्यात एक अनोखा आनंद असतो...! त्या अनुपम्य सुखसोहळ्याचं - त्या आनंददायी अनुभूतीचं वर्णन करणं केवळ शब्दातीत... यावेळी निसर्गाशी साधणारा संवाद 'शब्देविण संवादिजे' असाच असतो...! ही सिद्धी ज्याला पूर्णत: प्राप्त झाली तो खरा भाग्यवंत...!

'या लावण्यमहोत्सवातील सौंदर्यचित्रे शब्दबद्ध करण्याची ईश्वरदत्त प्रतिभा ज्या सिद्धहस्त लेखकांच्या लेखणीत आहे त्यातील शतांशदेखील मजपाशी नाही. निसर्गाच्या या चित्रलिपीचे रहस्य उलगडणारे, कलात्मक आस्वाद घेणारे सौंदर्यासक्त मन मजपाशी नाही. ज्या उपमा त्या भाग्यवंतांच्या तोंडी शोभल्या त्या माझ्या जिभेला पेलवणार नाहीत. जे प्रासादिक सर्वांगसुंदर अलंकार विनासायास ज्यांच्या हाती सहज आले ते मला शोधूनही सापडणार नाहीत...!'

जे शब्दसृष्टीचे ईश्वर नि नाना शब्दरत्नांचे सागर आहेत त्या भाषाप्रभूंच्या शब्दसामर्थ्याविषयी काय बोलावे...? आमच्या मंगेश पाडगावकरांच्या शब्दात सांगावंसं वाटतं...

'आपण भाषा वापरतो; ते भाषेत भिजून येतात!<br>
आपलं वाक्य सांगून संपतं; ते वाक्यात रुजून येतात!<br>
आपल्याकडे भाषा असते सुरवंट होऊन आलेली;<br>
त्यांच्याकडे पंख फुटून फुलपाखरू झालेली...!

असा परिसस्पर्श लाभावा हीच तुळजाभवानी, आई जगदंबेचरणी प्रार्थना...!

बहुत काय लिहिणे? सेवकाचे अगत्य असो द्यावे. ही विज्ञापना... राजते लेखनावधि:॥

- तु. वि. जाधव ●

'गोवावाला सदन', ब्राह्मणवाडा,<br>
न्या. छगला मार्ग, विलेपार्ले (पूर्व)<br>
सहार, मुंबई - ४०० ०९९

श्रीशिवराज्य शके ३१९<br>
शिवराज्याभिषेक दिन<br>
जेष्ठ शुद्ध १३, शनिवार

●○●

# – अनुक्रमणिका –

पृष्ठे


| | | |
|---|---|---|
| ☐ | मान्यवरांचे आशीर्वाद ! शुभेच्छा !! अभिनंदन !!! | पाच ते सहा |
| ☐ | परिसस्पर्श - (मनोगत) | सात ते अकरा |
| ☐ | **प्रकरण क्रमांक** | |
| | १ - रायगड प्रदक्षिणेची नवलाई | १ ते १० |
| | २ - एक चित्तथरारक साहस | १२ ते २५ |
| | ३ - वाटचाल रसाळगडाची | २६ ते ३३ |
| | ४ - बरखा बहार | ३४ ते ३९ |
| | ५ - अंगारयात्रा | ४१ ते ४७ |
| | ६ - तीनशे वर्षांनंतर पुन्हा दुर्ग 'लिंगाणा'वर चढाई | ४८ ते ५७ |
| | ७ - दुर्ग कर्नाळा | ५८ ते ६५ |
| | ८ - किल्ले माणिकगडावरील रात्र ! | ६६ ते ७० |
| | ९ - भवानी कडा : ७०० फूट उंचीचे आव्हान | ७१ ते ७५ |
| | १० - पाचूच्या हिरव्या माहेरी | ७६ ते ८० |
| | ११ - वाघ दरवाजा | ८२ ते ८७ |
| | १२ - दुर्गत्रिकूट | ८८ ते ९७ |
| | १३ - हिरकणी कडा : एक बेभान उतरणे | ९८ ते १०४ |
| | १४ - शिखरसम्राज्ञी कळसूबाई | १०५ ते ११० |
| | १५ - रायगडी चढावे पाच वाटांनी | १११ ते ११६ |
| | १६ - वर्षाधारांतून गिरीदुर्गदर्शन | ११८ ते १२४ |
| | १७ - उत्ताल कड्याच्या गर्भातून | १२५ ते १३४ |
| | १८ - पावनयात्रा पावनखिंडीची ! | १३५ ते १४३ |
| | १९ - सती गोदावरी | १४४ ते १५२ |
| | २० - चांदणे शिंपलेली रायगड प्रदक्षिणा | १५३ ते १५८ |
| | २१ - आनंदाचे डोही आनंद तरंग | १५९ ते १८० |

■ पूर्ण छायाचित्रांची पाने – ११ – ४० – ८१ – ११७


●○●

# १ रायगड प्रदक्षिणेची नवलाई



प्रदक्षिणार्थी

छाया - राजेंद्र बोरसे

*राजधानीसाठी किल्ले रायगडचीच निवड छत्रपतींनी का केली या प्रश्नाचं उत्तर रायगडास तळातून संपूर्ण प्रदक्षिणा घातल्याखेरीज ध्यानी येणार नाही.*

ह्या अवघ्या सह्याद्रीमंडळी राजधानीसाठी सुयोग्य असा गड घारीच्या तीक्ष्ण नजरेनं न्याहळत असतानाच शिवराय शहाजीराजांसवे रायगडास प्रदक्षिणा घातल्यावर मनी संतोष पावले... 'राजा खासा जावोनी पाहता, गड बहुतच चखोट... चौतर्फा गडाचे कडे तासिल्याप्रमाणे दीड गाव उंच... पर्जन्यकाली कडियावर गवत उगवत नाही... धोंडा ताशीव एकच आहे... ऐसे देखोनी बोलिले 'तख्तास जागा गड हाच करावा.'

ह्या अवघ्या अफाट देशी परचक्राचे सावट पसरलेलं... चहूदिशी

वावटळ उफाळलेली... अत्याचाराच्या नि जुलुमाच्या निर्घृण टाचेखाली सारा मुलुख अक्षरश: भरडला गेलेला... उगवत्या स्वराज्याच्या नरडीचा घोट घेऊ पाहणारा रक्तपिपासू औरंग्यापापी आपल्या अतुल सैन्यबळासह मूठभर हिंदवी स्वराज्य गिळंकृत करण्याची वेडी लालसा मनी चघळत बसलेला...! अशा ह्या प्रतिकूल परिस्थितीत प्रतिकारास पुरेसं शिबंदीबळ ठायी नसतानादेखील हा निश्चयाचा महामेरू म्हणतो आहे, 'तख्तास जागा गड हाच करावा'! केवढा हा जबरदस्त आत्मविश्वास! केवढी ही अलौकिक दूरदृष्टी!

तीनशेव्या शिवपुण्यतिथीच्या निमित्ते रायगड प्रदक्षिणेची कल्पना गेल्या श्रावणात माझ्या मनी अंकुरली. माझे मित्र राजश्री सोमनाथ समेळ यांच्या भगिरथ प्रयत्नानं ती फळीफुली बहरली... नि सरकार दरबारी मोठ्या इतमामानं ती मान्यता पावली!

## स्वातंत्र्य मंदिराचा छबिना

कोकणात ग्रामदेवतेच्या उत्सवप्रसंगी टाळमृदंगाचे ध्वनीसवे, 'चांगभले'च्या गजरात, 'ग्यानबा तुकाराम'च्या नामस्मरणानं नाचत वाजत गाजत दिंड्यापताकांनी युक्त असा भाविकमेळा मंदिराभोवती 'सबेना' घालतो तद्वत सबेना आम्ही रायगडाभोवती घातला! रायगड हेदेखील एक स्वातंत्र्यमंदिर आहे. एकेकाळी वैभवानं परिमळलेल्या विजयी जल्लोषात याच मंदिरी एक शिवकल्याण स्वातंत्र्यसूर्य आपल्या अतुल शौर्यानं तळपला. स्वार्थातून नि:स्वार्थ, भीरूतेतून धैर्य नि शून्यातून स्वराज्य उभं करणाऱ्या या पुण्यश्लोक नृपाळाचं मनोमनी पुण्यस्मरण करून नि त्यानं घालून दिलेल्या आदर्शांचे धडे गिरवीत ही पदयात्रा आम्ही पूर्ण केली. त्या प्रौढप्रतापी पुरंदरास एक आगळी वेगळी उचित अशी आदरांजली वाहिली!

तीस मार्च सकाळ. चितद्वारापाशी पाचशेवर भाविक मावळमेळा एकत्रित झाला आहे. मधोमध जरिपटका मोठ्या डौलानं फडफडतो आहे. विजयी घोषणांनी सारं आकाश दुमदुमून गेलं आहे.

आजतागायत लक्षलक्ष लोक रायगडावर येऊन गेले. त्यातील काहींनी कधीकाळी अशी प्रदक्षिणा घातली असेल. पण एवढ्या मोठ्या संख्येनं परिक्रमा करण्याची ही पहिलीच घटना!

कल्पनाच मोठी अभिनव नि रोमहर्षक! ह्या अरण्यप्रवासानं ध्यानी येणार आहे गडाचं अभेद्यत्व नि दुर्गमत्व! मनी ठसणार आहे उत्तुंग बेलाग कड्यांचं रांगडेपण! नि अंतरी स्फुरणार आहे शिवरायांची साहसवृत्ती!!

पहिल्या तुकडीतले शेसव्वाशे गडी पहिल्या टप्प्यावर रायनाक स्मारकापाशी विसावले आहेत. टकमकाचं काळंसावळं गावरान स्वरूप डोळीयात साठवून घेताहेत... टकमकीचं खरं रौद्ररम्य रूप वरून नेटकं ध्यानी येत नाही. ते या इथं त्याच्या पायथ्याशी उभं राहून डोळेभरी न्याहाळावं. छाती दडपून टाकणारा हा बावीसशे फूट उंचीचा सरळसोट कडा असा आकाशावेरी घुसला आहे. स्वराज्यातील अखेरचं मृत्युदंडाचं शासन ह्या इथून कडेलोटानं होत असे. अशा या उत्तान कड्याविषयी आपले शिवशाहीर म्हणतात, 'या इथून चढण्याची हिंमत फक्त वाऱ्याच्या झोताला नि उतरण्याचे धाडस फक्त पाण्याच्या धारेलाच होईल'!

### मोकळरानातील प्रवास

टकमक ते भवानी कड्यापर्यन्तची अंदाजे चार पाच कि.मी. ची वाट मोकळरानातून धावली आहे. वाटेशेजारी उभे आहेत आपल्या फांद्यांचे हात पसरून सावली धरणारे आम्रवृक्ष, फणस, साग, आईन, किंजळ, औदुम्बर, जांभुळ, बाहवा अशी कितीतरी प्रकारची वृक्षराजी.. वाघोली खिंडीच्या पायाशी एका खळग्यात आहे पाण्याचा साठा... मुबलक नसला तरी तहान भागविण्याइतपत पुरेसा आहे. या पाण्यावर चौतर्फा हिरव्या झाडावळीनं सावली धरलेली... पहिली तुकडी काही वेळेपूर्वीच इथं डेरेदाखल झालेली. पोटभर पाणी पिऊन पुन्हा ताजीतवानी फुललेली!

ताजेतवाने झालेले उमद्या हिंमतीचे गडी मनाची उभारी कायम राखून खिंडीचा चढ चढताहेत... चढ आहे अंदाजे हजार फूट... वाट आहे आडवळणाची... आडव्या तिडव्या पसरलेल्या असंख्य ढोर वाटांच्या गुंत्यातून नेमकी पावटी शोधीत रमत गमत चढावं लागतं गच्च दच्च झाडावळीच्या जंजाळातून नि सुरम्य अशा शीतल छायेखालील अडगळी काट्याकुट्यातून!

वनी रानगंध घमघमतो आहे. मनी एक अनामिक सुगंध दरवळतो आहे. समोर भवानीचा तुंग कडा उत्तुंग उभा आहे. गतवर्षी हा कडा आम्ही जिंकला नि आजतागायत गुप्त राहिलेल्या एका चोरवाटेचा शोध लावला. शिवकालात हा कडा एक मावळा चढून गेल्याची नि छत्रपतींनी त्याला गौरविल्याची आख्यायिका अजूनही रायगड खोऱ्यात रूढ आहे.

### शिवप्रेम नतमस्तक झाले!

दोरीच्या सहाय्यानं खिंडीची निसरती घसरंड उतरताना आपण नेहमीपेक्षा काहीतरी वेगळं केल्याचा आनंद प्रत्येकाच्या मुखावर ओसंडतो

आहे. ही बिकट वाट वहिवाटीत नसताना अडगळीच्या दाटीतून हाती काठी घेऊन साठी उलटलेल्या नि पायाच्या वाटीतील टाके ढिले झालेल्या वृद्ध प्रदक्षिणार्थींच्या मनाची उभारी पाहून माझं सारं शिवप्रेम नतमस्तक झालं. नि शैलेष दळवीच्या बालवयाची चिकाटी पाहून मन केवळ कौतुकानं भरून आलं!

खालच्या मोकळ मैदानी हाती जरिपटका घेऊन अग्रणी असलेला शामू जांबोटकर नि त्याच्या पाठोपाठ वळणावळणानं चालणारी बोटाच्या पेराएवढी दिसणारी माणसं, मुंगीओळीनं चालताना इथून दिसणारे ते विहंगम दृष्य मोठं नामांकित आहे. भान हरपून टाकणारं आहे...! खालून एक थंडगार वाऱ्याची झुळुक येते. नि सर्वांग मोहरून जाते...!

शेवटी खिंडीत उभे असलेले सर्वश्री सोमनाथ समेळ, हिरा पंडित, प्रा. प्र. के. घाणेकर, सुरेश भटकळ नि मी उतरण्याच्या तयारीत आहोत. आमच्या पाचांच्या चमूत उल्लेखनीय व्यक्तिमत्त्व आहे भटकळांचं. पाणीदार बदामी डोळ्यांचा, धुतल्या तांदळासारखा स्वच्छ दिसणारा नि मनापासून भटकंतीची आवड असलेला हा भटकळ नावाचा माणूस आपल्या पोटाचा भूगोल सावरीत नि इतिहास मिरवीत मुंगीपावलानं उतरतो आहे.

दुपार वयात आली आहे. ती मनस्वी तापली आहे. सर्वांगी चटचटू लागली आहे. समोर काळकाईचा डोंगर दिसतो आहे. त्याला खेटून पोटल्याचा डोंगूर उभा आहे. त्याच्या पायाशी भगवा ध्वज फडफडतो आहे. उरलेला पाच एक कि.मी. चा पल्ला तासाभरात पुरा करणे आहे.

ज्याच्या शौर्य-धैर्य-चातुर्यानं सह्याद्रीची मान उंचावली, ज्याच्या शुभ्रधवल चारित्र्यानं महाराष्ट्राची अस्मिता जागली, ज्याच्या पावन वास्तव्यानं नि मृत्यूनं रायगडची गणना महाराष्ट्रातील तीर्थक्षेत्रांच्या मांदियाळीत झाली अशा या तीर्थक्षेत्री आज सप्तसरितांचे जळकुंभ चढणार आहेत, त्या श्रीमानयोग्याच्या समाधीस न्हाऊ घालण्यासाठी गडगंगाधारकांची एकच दाटी उसळणार आहे. चित्तद्वारापाशी त्या दाटीस उरभेट मिठी मारण्याकरिता महाद्वाराच्या शिरी उभं राहून उरी उसळणारी भक्ती शक्तिनुसार ओंजळीत साठवून शुभ्रफुलांच्या रूपानं ती त्याजवर उधळायची आहे...

## पूर्ण झालेला नवस

काल सकाळी प्रतापगडी आईच्या गाभाऱ्यात उभा होतो. ओंजळभर चाफ्याची फुलं चरणी वाहिली. त्यातली तीन मस्तकी धरली नि विनवलं,

'आई', लेकरांच्या पाठी उभी रहा. ह्या चम्पक पुष्पांच्या मंगल स्पर्शानं पावन झालेल्या तीन हजार शुभ्र फुलांचा वर्षाव आम्ही आमच्या प्रदक्षिणेतर्फे महाद्वारी गडगंगाधारकांवर करू.

बख्खल दगडधोंडींनी खडबडलेली काळकाईची खिंड ओलांडल्यावर भाजलेल्या तरव्यातून धूळ खात पळणारी वाट थेट पाचाडपावेतो जाऊन ठेपली आहे.

काही वयस्क यात्री काळकाईच्या खिंडीत विसावले आहेत. काही मागंपुढं रेंगाळत आहेत. तरुण रक्ताचे नि उमद्या दिलाचे असे केव्हाच चितद्वारापाशी पोचले आहेत.

अशी ही खाचखळग्यांची, काट्याकुट्यांची, उन्हातापाची, तहानभुकेची पर्वा न करता केवळ श्रद्धेपोटी अंदाजे पंधरा कि.मी. घेऱ्याची ही परिक्रमा रानवाटेनं शिवकालानंतर प्रथमच दुर्गयात्रिकांनी पूर्ण केलेली. काही खूणगाठी मनाशी सांधणारी.. तुळशीवृंदावनास प्रदक्षिणा घातल्यावर मनी एक सात्विक आनंद फुलवणारी...!

दुपारी अडीचच्या सुमारास थकलाभागला धापावलेला मी, पाचाडला तुकाराम शेडग्यांचे अंगणीं कसाबसा येऊन थडकलो...! सारं अंगण चहूअंगी शिवभक्तांनी फुलून गेलेलं...!
समोर शेडग्यांच्या माजघरी बाबासाहेब पुरंदरे दिसले... समीप गेलो. मुजरा केला... सादाला दाद देता म्हणाले - 'जाधवराव! गडावर येताहात ना...? सुमित्राराजे आपली वाट पाहताहेत...!' आदब राखून होकार दिला नि अंगणाच्या बांधोलीवर बसलेल्या वीणा देवशी 'गोनीदां' विषयी चौकशी करता ती म्हणाली - 'आप्पा तर केव्हाच चितूद्वाराकडं कूच झाले...!'

दुपारी चारचा सुमार! चितूद्वारापाशी साडेतीनशे जळकुंभधारी भाविकांचा मेळा जमलेला...! उत्तरेस साल्हेरी अहिवंतापासून कावेरी तीरापर्यंतची तीनशे गडांवरील जळं इथं एकत्र झालेली...! यात विशेष म्हणजे प्रतापगडावरील जळकुंभाची कावड स्कंधी लेवून पुजारी हडप तिथून एथपावेतो पायी चालत आलेले...!

त्यातच सप्तसरिता, सप्तसागर नि तीर्थक्षेत्रींचे तीर्थकुंभं...! अगदी गोकर्ण, महाबळेश्वर, शैलमल्लिकार्जुन नि रामेश्वर इथपावेतोचे...! त्यामाजी चितोड नि एकलिंगजींचं तीर्थोदक...! नि विशेष नवल असे की या सर्व तीर्थकुंभांच्या मांदियाळीत सिंधूचा सलीलकुंभदेखील अवतरलेला...!

भगवे झेंडे... घडेचौघडे... केशरी दिंड्यापताका... टाळमृदंगे...

गि. आ. --- २

शिंगे-रणशिंगे. . कर्णे-सुकर्णे... ढोलताशे... लेझिमझांजे... किती नि काय...!

नाद-निनाद...!

ध्वनी-प्रतिध्वनी...!

घोष-उद्घोष...!

कल्लोळ-हलकल्लोळ...!

**दमामे चौघडे वाजती। धडके भांड्याचे गाजती।**
**फौजा भक्तांच्या साजती ठायीं ठायीं ॥**
**माहीं मोर्तबें निशाणे। मेघडंब्रे सूर्यापाने।**
**दिंड्या पताका निशाणे। विंजणे कुंचे ॥**
**काहाळा कर्णे बुरुंग बाके। नाना ध्वनि गगन झाके।**
**बहु वाद्यांचे धबके। परोपरी ॥**

अशी ही केशरमिश्रित महाप्रचंड दुर्गआनंदयात्रा राजांच्या नावाचा उद्घोष करीत गडाकडे लोटत असलेली...!

गो. नी. दांडेकर नि बाबांच्या मागोमाग 'जय भवानी जय शिवराय' असा जयजयकार करीत त्या सश्रद्धांचा तो भव्य मेळा गड चढू लागलेला...!

असंख्य भगव्या ठिपक्यांनी रायगडाची वाटवळणं भरून गेलेली...! महाराष्ट्रीय लोकसंस्कृतीचा एक प्रमुख प्रवाह वाद्यांच्या निनादात नि शिवनामाच्या गजरात राजधानीची वाटचाल करीत असलेला..! तीन शतकानंतर आज या विज्ञानयुगातही पंढरीस जाणाऱ्या लक्षलक्ष वारकऱ्यांप्रमाणं हे गडकरी कुठल्याशा अनामिक ओढीनं गड चढत असलेले..!

सारंच भगवंमय...! लालसर-तांबूस गुलाबी छटा ल्यालेलं..! केशरीया रंगानं फुललेलं...!

दृष्य तर मोठं नेत्रसुखद...! तांबडट-भगव्या फुलांनी डवरलेला एखादा पलाशवृक्ष सामोरा उभा दिसावा तसं...! एखाद्या स्थितप्रज्ञ योग्याच्या अंगाखांद्यावरून रुळणाऱ्या भगव्या अधरीयाप्रमाणं...! ध्यानस्थ बसलेल्या योगीराज शिवशंकराच्या कंठी लपटलेल्या भगव्या नागराजाप्रमाणं...!

मेळा महाद्वारापाशी पोचला नि कुणाच्याही ध्यानीमनीस्वप्नी नसता त्या जयविजय बुरुजांच्या भव्य माथ्यावरून, आमच्या हिरा पंडित नि विलास जोशी या जोडगोळीनं त्या अवघ्या शिवभक्तांवर तीन हजार फुलांचा मुक्त वर्षाव केला..! अनपेक्षितपणं झालेल्या त्या पुष्पवृष्टीनं साऱ्यांची काया रोमावली...!

अग्रभागी असलेल्या त्या दोन ज्येष्ठ-श्रेष्ठ शिवभक्तांनी आपले

दोन्ही हात उंचावून त्या वृष्टीचं मनस्वी स्वागत केलं. . नि अवघ्यांच्या मुखातून उत्स्फूर्तपणे फुटलेल्या त्या विजयी घोषणेनं पुनश्च एकवार सारं आकाश दुमदुमून गेलं...!

रात्री दीडच्या सुमार! गड चांदण्यात न्हातो आहे...! तीनशे टपोऱ्या मोगऱ्याच्या शुभ्रधवल फुलांनी भरलेली टोकरी डोयी लेवून मी, माझा पत्रकार मित्र कपिल पाटील याजसवे गड चढतो आहे... आम्हासवे आहेत शाहीर साबळे नि त्यांचं पथक...!

आज सकाळपासून ही वाट शिवनिष्ठांनी अखंड वाहते आहे... महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेली ही लोकगंगा शिवगंगेच्या दर्शनासाठी ओढाळ मनानं, तहानभुकेची पर्वा न करता ही कष्टप्रद चढण आनंदानं चढते आहे...!

ही मोहिनी त्या यशवंताची...कीर्तीवंताची... सामर्थ्यवंताची...!
ही ओढ त्या वरदवंताची... पुण्यवंताची...नीतीवंताची...!
हे प्रेम त्या नरपतीचे... हयपतीचे... गजपतीचे...!
ही श्रद्धा त्या गडपतीची... जळपतीची... भूपतीची...!

आज चैत्र शुद्ध पौर्णिमा...! आकाशाच्या घुमटातून लक्षलक्ष अमृतधारांचा अखंड अभिषेक या शिवतीर्थावर होतो आहे...! मी शिवसमाधीपाशी बसलो आहे...!

राजसभेत 'रात्र शाहीरांची' रंगली आहे... गाजते आहे... गरजते आहे...! संबळ कडकडते आहे... टिपरी तडतडते आहे... थाप डफावर पडते आहे...! जगदीश्वर मंदिरी मृदंग घुमतो आहे... वीणेची तार झंकारते आहे... टाळचिपळ्यांच्या सुरेल सुरांबरोबर मुरलीचा सुमधुर गोड ध्वनी त्यामाजी मिसळतो आहे...! सारा आसमंत शिवगीतानं भारलेला आहे...! मनी येतं -

**'मृदंग मोठा सुमधुर बोले मंजुळ वीणा अन् मुरली।**
**थाप डफाची कडकडता परि बाही माझी फुरफुरली।।'**

या मंदिरी या कैलासपती शिवाचं नामस्मरण तर त्या राजमंदिरी त्या सह्याद्रिपती शिवाचं पुण्यस्मरण...!

**'घंटा घंटा शंख भेरी। डफडी पावे वाजांतरी।**
**भाट गर्जती नगारी परोपरी।।**

रम्य सुरम्य पहाट! सकाळी चारची शुभमंगल घटिका...! समस्तांचा विधीयुक्त अभिषेक होण्याआधी शिवसमाधीवर सर्वप्रथम तीनशे मोगरी फुलांचा 'पुष्पाभिषेक' करण्याचा माझा संकल्प सिद्धीस गेला... बरे

वाटले... पहिलावहिला मानाचा मुजरा करण्याचं सद्‌भाग्य मला लाभलं... कृतार्थ झालो... तृप्त झालो...!

शिवसमाधीच्या दर्शनासाठी सूर्योदयापूर्वीच रीघ लागली तसा उठलो नि जगदीश्वराच्या प्रांगणात रंगलेल्या आफळे गुरुजींच्या कीर्तनी रंगलो...!

**उदंड उजळिल्या दीपिका। नामघोष करतालिका।**
**कित्येक आईका आईका शब्द येती॥**
**ताळ मृदंग उपांग। ब्रह्मविणे चटक्या चंग।**
**तानमाने माजे रंग। हरिकथेचा॥**
**उदंड यात्रेकरू आले। रंगी हरिदास मिळाले।**
**श्रोते वक्ते कथा चाले। भगवंताची॥**
**नाना पुष्पे माळा तुरे। पाहो जाता भडस पुरे।**
**रंग स्वर्गीचा उतरे। ठायी ठायी॥**
**गंधे सुगंधे केशरे। उदंड उधळली धुशरे।**
**जगदांतरे हरिहरे। वस्ती केली॥**
**रंगमाला नीलांजने। तेथे वस्ती केली मर्ने।**
**दिवस उगवता सुमनें। कोमाइली॥**

कीर्तनास रंगत चढली... नि गडगंगाधारकांनी आणलेल्या जळकुंभांची शोभायात्रा समाधीपाशी येऊन ठाकली...!
त्या साडेतीनशे कलशांमाजी पहिला मान तुळजापूरचा नि शेवटी रायगडावरील गंगासागराचा...!

दुर्गजळाभिषेक सोहळ्यात प्रा. प्र. के. घाणेकर यांजसवे सहभागी झालो. मंत्रघोषात विधीयुक्त एकेक कुंभ शिवसमाधीवर रिता होऊ लागला...! शेवटचा कुंभ गंगासागरातल्या त्या पवित्र जळाचा... तो रिता झाला नि मजसमवेत उभ्या असलेल्या आप्पासाहेबांना हुंदका अनावर झाला...! आता याउपरी काहीही करण्याजोगं शिल्लक राहिलं नाही असा भाव त्यांच्या मुद्रेवर प्रकटला...!

त्या साडेतीनशे पवित्र जळांचं 'तीर्थोदक' घेतलं नि भवती जेवढं टिपता येणं शक्य होतं तेवढं या नजरेनं टिपून घेतलं...!
आमच्या नागपूरच्या विजयराव देशमुखांचा 'शककर्ते शिवराय' हा प्रथम शिवखंड शिवरायांच्या पालखीतून वाजतगाजत शिवसमाधीकडे समर्पण समारंभासाठी चालला...

**रथ देवाचा वोढिला। यात्रकरां निरोप जाला।**
**पुढे जायाचा गलबला। ठायी ठायी॥**

असा तो प्रकाशन सोहळा नि सुमित्राराजे भोसले यांनी शिवसमाधीवर केलेला सुवर्णमुद्रांचा अभिषेक याचि देही याचि डोळा पाहिला नि श्रीमंत छत्रपती सातारकर नि शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या दुर्गदिंडीत सहभागी झालो... !

**उदंड मनुष्यांची थाटे। दिसताती लखलखाटे।**
**एकमेकासी बोभाटे। बोलाविती ।।**

अशा या रंगभरल्या दिंडीत रंगलो...दंगलो... नि देहभान हरपून नाचलो... ! शिवकालात हरवून गेलो...शिवमय होऊन गेलो... !

अंगी वारं भरावं तसं झालं...त्या वाऱ्यानं त्रासलं...ग्रासलं...पुरतं झपाटलं... ! दिंडी वाजतगाजत बाजारपेठेच्या मध्यभागी आली नि पोलिससंरक्षकांचं कडं तोडून बेभानपणं पुढं सरकली...पुढं सरकली नि होळीच्या माळावर, मा. इंदिरा गांधींना घेऊन उतरणारे हेलिकॉप्टर नि पेठेच्या कोपऱ्यात उभी असलेली जीप पाहताक्षणीच अंगी भिणलेल्या त्या 'वाऱ्यानं' अंग सोडलं... !

पेठेच्या भिंतीवर उभा ठाकलो. पूर्वेकडून लिंगाणा डोकावताना दिसला...संतोष गुजरची स्मृती जागृत झाली...वाटलं, याक्षणी तो इथं असता तर... !

मनी म्हटलं - आमचा हा गुजर खरोखरी प्रतापराव गुजरांच्या 'कुळी'तला... ! शिवभारतातील बहुतेक झुंजामाजी त्या प्रतापरावाची समशेर विद्युल्लतेप्रमाणं तळपली नि शेवटी त्या प्रतापकेसरीनं नेसरीची खिंड पावन केली... !

आमचा हा गुजरदेखील तसा कमालीचा साक्षेपी... नि अंतरीचा संतोषी... ! कुठल्या 'भुतानं' झपाटलं कोण जाणे... !

एक दिवस तो एकटाच बेभानपणं त्या सुळक्यास भिडला... !

सुदैवानं जिंकला...विजयी झाला... नि परतीच्या समयी त्या शिवाच्या पायी स्वतःच्या प्राणांचं बिल्वपत्र वाहून नि आसूदाचं अर्घ्य अर्पून कायमचा निघून गेला... !

गड आला पण सिंह गेला... !
लिंगाणा जिंकला पण संतोष गेला... !

आजच्या महाराष्ट्र टाइम्समध्ये प्रभाकर भावे यांचा एक लेख आलेला... श्रद्धांजलीयुक्त सुलेख... सुरेख उतरलेला... समस्तांस भावलेला... ! वाचीत होतो. वाचता वाचता समारंभ संपल्याची खबर आली. हरळी झाली. नौबत झडली... !

समारंभ संपला... महाप्रसादाचा समय जवळ येऊन ठेपला...

नि जनलोकांचा लोंढा राजांगणी धावला...!

**खिरापतीची वाटणी। तेथे जाहली दाटणी।**
**पैस नाही राजांगणी। दाटी झाली॥**

मदारी मेहतरच्या समाधीपाशी उभा राहून दाटीवाटीनं गड उतरणाऱ्या त्या ऐंशी हजार लोकांचा लोंढा पाहून मनी म्हटलं - यामाजी किती जणांच्या मनी ही शिवस्मृती कायमची बिंबली जाईल...? किती जणांच्या अंतरी ही दिव्य ज्योत चिरकाल तेवत राहील...? थकलेभागले सारे आपापल्या घरी जातील...शीणोट्यानं गाढ झोपी जातील...नि ताजेतवाने होऊन पुनश्च आपापल्या उद्योगात रमून जातील...!

जगरहाटी ही अशीच आहे...अशीच राहणार...!

हा शिवउत्साह चिरकाल टिकणारा नव्हे...!

**'जन पळभर म्हणतील हाय हाय।**
**मी जाता राहील कार्य काय॥**

शेवटी हेच चिरकाल टिकणारं सत्य...!

कालच्या प्रदक्षिणेचं नि आजच्या या दिव्यानंदाचं सारं श्रेय शिरी मिरवीत असता उरी एकच उद्देश्य गिरवीत आहे. आखलेल्या ठराविक चाकोरीबद्ध जीवनपथावरून, वीतभर पोटाची टीचभर खळगी भरण्यासाठी घड्याळाच्या काट्यासवे धावणाऱ्या नि भोगविलास एवढीच जीवनाची इतिकर्तव्यता मानणाऱ्या आमच्यासारख्या पुरुषोत्तमांच्या मनी निदान या निमित्तानं तरी शिवशक्ती अंकुरली जावी नि पुढंमागं केव्हातरी ती, देव, देश नि धर्म या त्रयींसाठी उपयोगी पडावी...!

'नवशक्ती'
४/५/१९८०

● ○ ●



'प्रस्तरारोहण'

छाया - हिरा पंडित

# २ एक चित्तथरारक साहस

पनवेलच्या राजमार्गावर दुर्ग कर्नाळ्यावरील त्या सुळक्याच्या समोरच काही अंतरावर एका प्रशस्त कातळावर आम्ही तिघेच अगदी ऐसपैस बसलो आहोत... मी तर चक्क आडवाच झालो आहे. दोन्ही हातांची उशी करून... दुमडलेल्या पायावर पाय रेलून...! दृष्टी खिळली आहे त्या समोरच्या नागव्या टेंभ्यावर... तो बेलाग उत्तुंग कडा उन्हात नखशिखांत न्हाऊन निघाला आहे. निरीक्षण चाललं आहे मुळापासून शेंड्यापर्यंत... मनी येतं हा सुळका म्हणजे टेहळणीचा एक मध्यबिंदू...! तर मग पूर्वी दररोज सांजसकाळ जागता पहारा करण्यासाठी पहारेकरी याच्या माथ्यावर चढत असावेत. हे अगदी नि:संशय. एक धाडसी विचार येतो. यावर आपल्याला चढता येईल का? मग किलकिली नजर शोधू लागते आपले भक्ष्य. एखाद्या घारीसारखी. नेमकं कुठून जाता येईल? कसं जाता येईल? किती वेळ लागेल? चढल्यास उतरता येईल का? - छे! छे! हे तर अशक्य! अगदी त्रिवार अशक्य! हे झालं एक अचरट साहस. असं साहस कुणी कदापीही करू नये. ह्या अविचाराचा विचार करायला मन धजतच नाही. मन मोठं अचपळ. ते केव्हाच पळालं असतं दूर. अगदी फार फार दूर. तीनशे वर्षे मागे. शिवकालीन राजवटीत. भरकटत भटकत असतं इथं तिथं. घुटमळत-थबकत असतं पावलोपावली. उलटीत असतं भराभर इतिहासाची पानं. शोधीत असतं काहीतरी सत्य एखाद्या भ्रमिष्टासारखं. खरं म्हणजे काळाच्या उदरात लपलेलं एखादं सत्य असतं मोठं. पण पुरावेच मिळतात खोटे. आपल्या पूर्वजांची कर्तृत्वं असतात पर्वताएवढी भव्य दिव्य. पण त्यावरची वक्तृत्वच असतात ठेंगणीठुसळ. इतिहासकालीन मौल्यवान वस्तू असतात अशाच इथंच कुठंतरी आपल्या अवतीभवती गंज खात पडलेल्या. पण आपण मात्र शोधीत असतो हजारो मैल दूर. कारण उपलब्ध असलेले कागदपत्री पुरावे केव्हाच जाळले गेलेले असतात एका दुष्ट भावनेने, एखाद्या धर्मांध धार्मिकाकडून. हे ऐकून आपल्या

तळपायाची तिडिक मस्तकाला जाऊन भिडते आणि आपण नुसतेच हाय खाऊन मोकळे होतो. हा आपला स्वभाव. हे आपले इतिहासप्रेम. मग घाईघाईनं भरवली जातात उपलब्ध असलेल्या मौल्यवान वस्तूंची प्रदर्शनं. मग मोठ्या अभिमानानं 'हीच ती भवानी तलवार' समजून घेतो आपण तिची दर्शनं. मग मधूनच कोणीतरी सर्वांना आश्चर्याचा धक्का देत घेऊन येतो शिवरायांच्या अस्थिंचे कलश. मग टाळमृदंगाच्या गजरात, तुताऱ्यांच्या ललकारीत, आणि वाद्यांच्या गर्जनेत निघते त्याची एक शाही प्रचंड भव्य मिरवणूक. त्यातून आसमंत छेदीत नि सूर्यमण्डळ भेदीत निघते एक बुलंद खणखणीत घोषणा - 'क्षत्रियकुलावतंस, गोब्राह्मणप्रतिपालक, सिंहासनाधिश्वर, राजाधिराज, हिंदूपदपातशहा, श्री छत्रपति शिवाजी महाराज की जय-' उसळत्या रक्ताला चिरीत पोहोचतात हे शब्द हृदयीच्या तळापर्यंत. बाहू स्फुरण पावतात. अभिमानाने छात्या उंचावतात. आणि साश्रुपूर्ण नयनांनी माना तुकतात तेवढ्या पुरत्याच. हे असतं एक उसनं अवसान, त्याच वेळेपुरतं. हा असतो एक उत्स्फूर्त अभिमान, त्याच दिवसापुरता. मग दुसऱ्या दिवशी हे सगळं आपण विसरून जातो आणि आपापल्या उद्योगाला लागतो. मग संशोधनं राहतात दूर आणि स्वार्थाला येतो पूर. वा रे अभिमान! वा रे इतिहासप्रेम! वा रे शिवभक्ती! शिवप्रभूंच्या चरण स्पर्शानं पावन झालेले गड - की ज्यावर त्यांनी आपल्या प्राणापलीकडं प्रेम केलं ते गड आज कित्येक वर्षे उन्हापावसाचे, थंडीवाऱ्याचे तडाखे खात काळाशी झुंजता झुंजता झिजले आहेत, झिजत आहेत. 'गड' हे आपल्या पूर्वजांचा एक अमूल्य ठेवा. तो आपण आपल्या प्राणापलीकडं जतन करायला हवा. हे प्रत्येकास पटतं. पण त्यांच्या जीर्णोद्धाराच्या कल्पनेलाच नसतो नूर. प्रत्येक गडावरील हरेक चिऱ्यांतून निघतो आहे झिजण्याचा धूर. आणि इथं मात्र स्वार्थाला आला आहे महापूर. आणि आपण मात्र स्वार्थातून नि:स्वार्थ आणि भिरुतेतून धैर्य निर्माण करणाऱ्या ह्या महापुरुषाचे भव्य पुतळे गल्लोगल्ली, नाक्यानाक्यावर अमाप पैसा खर्च करून उभे करतो आहोत. आणि वर्षातून फक्त शिवजयंतीलाच त्यावर त्यांच्या जयजयकारात फुले उधळीत आहोत. पुन्हा वर्षभर विश्रांती. पुन्हा शिवजयंती. हे असेच आज तीनशे वर्षे चालत आलेलं आहे. अजून हे असंच किती वर्षे चालणार?

हे सगळं करणं आपल्या एकट्याच्या ताकदीपलीकडचं आहे. हे मनाला पुरेपूर कळतं. आणि मग वणवण भटकणारं ते पुनश्च ताळ्यावर

येतं आणि बसतं एका कोपऱ्यात एखाद्या पाखरासारखं डोळे मिटून. गंभीरपणं इतिहासाचा आढावा घेत, तर्कवितर्कांचा गुंता सोडवीत. ह्या इथंच अगदी याच कातळावर महाराज उभे असले पाहिजेत. ह्या इथूनच त्यांना तो दिव्य साक्षात्कार झाला असला पाहिजे. याच काळ्या कुळकुळीत कातळावरून त्यांनी तो अनुभवला असला पाहिजे. कोणेकाळी यवनांच्या सत्तेखाली असताना पारतंत्र्याचा उबग आलेला हा सुळका अंतर्यामी जळत स्वातंत्र्याची सुखस्वप्नं डोळे मिटून पहात शांत उभा असेल. पुढंमागं कोणेकाळी शिवरायांची पाऊले या गडावर पडली असतील. पहिलं सुकुमार पाऊल द्वारी पडताक्षणीच मुजरे झाले असतील. नगारे झडले असतील. रणशिंगांची ललकारी गगनाला जाऊन भिडली असेल. 'हर हर महादेव'च्या गर्जनेनं सारा आसमंत दुमदुमून गेला असेल. त्या ओळखीच्या गर्जनेनं एक अनामिक गोड संवेदना ह्या सुळक्याच्या सर्वांगातून चमकून गेली असेल. झांपले डोळे किंचित किलकिले करून त्यानं समोर पाहिला असेल निश्चयाचा महामेरू श्रीमंत योगी. मनात आनंदाची कारंजी फुलली असतील. दोघांची क्षणभर दृष्टादृष्ट झाली असेल. तो सह्याद्रीचा सिंह डोळे भरभरून साठवला असेल यानं आपल्या दिठीत. हा भीमकाय शरीराचा बेलाग कडा महाराजांना एखाद्या योग्यासारखा वाटला असेल. बराच वेळ राजे अक्षरश: भान हरपून तो पाहात राहिले असतील आपल्या पाणीदार दृष्टीनं एकटक. या सुळक्यात त्यांना झालं असेल शिवलिंगाचं दर्शन. हुंदका गळ्याशी दाटून आला असेल हृदयीचा हुंकार होऊन. तो उमाळा त्यांनी तसाच गिळून टाकला असेल कुणालाही न दिसता. भरल्या डोळ्यांनी घेतलं असेल दर्शन त्यांनी ह्या शिवलिंगाचं. आणि मग ते एक दीर्घ श्वास सोडून माघारे वळून म्हणाले असतील - "पंत! सकल पृथ्वी ईश्वरे निर्मियेली. हेही ईश्वरी कर्तुक. ऐसे दर्शन अवघ्या सह्यगिरी आम्हासि अजून घडियेले नाही. हे पाहोन आम्हासि बहोत संतोष जाहला". - आणि म्हणूनच कदाचित् या गडावर मंदिर बांधले गेले नसावे.

असल्या कितीतरी तर्कवितर्कांनी भांबावून जातो. आत जबरदस्त कालवाकालव होते. इतक्यात कसल्यातरी कोलाहलाने तंद्रीतून जागा होतो नि एक दीर्घ उसासा टाकून उठून बसतो.

समोरच्या आडवाटेनं किल्ल्याकडे येणाऱ्या काही तरुण मंडळींचं एक टोळकं. त्यातल्या एकाच्या डोक्यावर तर चक्क तानाजी मालुसऱ्यांच्या पगडीसारखं दिसणारं एक भलंमोठं दोरखंडाचं वेटोळं अगदी तिरप्या

ऐटीत व्यवस्थित खोचून बसविलेलं. त्यातले काहीजण खुद्द शिरढोणचे. आणि बाकीचे आजूबाजूच्या वस्तीतले गोमे सोमे. नमस्कार-चमत्कार झाले. नाव-गाव, नोकरीधंदा, 'कोण्या निमित्ते एवढ्या दुरुन येणे केलेत' इत्यादी सुरुवातीचं औपचारिक संभाषण संपताच मी लगेच मुद्यालाच हात घालीत म्हटलं,

"डोंगरावर चढणारसं दिसतंय् ?"

"होय तर, म्हणूनच तर ही दोरी आणलीय् बरोबर."

"दोरीनं कसं चढणार ?"

शंभर फूट उंचीवरील एका ठेंगण्या ठुसक्या झाडाकडं अंगुलीनिर्देश करून एकानं म्हटलं.

"त्या झाडाला बांधून."

"पण, ती बांधण्यासाठी सुरुवातीस चढणार कोण ?"

"हा आमचा विष्णू."

विष्णू! विष्णू हे तर एक मोठं प्रकरणच आहे. ती एक वल्ली आहे. तो एक अवलिया आहे. हे एक इब्लिस कार्ट. आचरट धाडसं करण्यात याचा हुकमी एक्का. किरकोळ हडकुळ्या काठीचं, काळंसावळं, साडेपाच फूट उंचीचं ते एक मराठमोळा गावरान रूप. उजव्या हाताच्या आंगठ्याचं नख दाताताळी कुरतडत आमच्यासमोर निष्पाप वृत्तीनं उभं राहिलेलं. त्या विशीतल्या रांगड्या तरुणाकडे मी तर आश्चर्यानं पाहातच राहिलो. 'थोडावेळ तो इथं तिथं घुटमळला आणि दोरीचं वेटोळं पाठीशी बांधून तो सरळ त्या सुळक्याकडे निघाला. काही क्षण तो तिथंच थांबला. सुळक्यावर डोकं टेकवलं नि पुन्हा उचललं. आणि - आणि काय आश्चर्य! मी तर श्वास रोधून पाहातच राहिलो. एखाद्या झाडाखाली असलेला वानर वनराजाच्या एकाच डरकाळीनं भयकंपित होऊन सरसर झाडावर चढून फांद्यांचा आधार घेत एका दमातच तो थेट शेंड्यापर्यंत जाऊन पोचावा तसा हा त्याचा शेपूट गळालेला वंशज तो शंभरफुटी बेलाग कडा हा हा म्हणता चढला आणि त्या झाडाच्या बुंध्याशी जाऊन विश्रांती घेत बसला. कसा चढला. किती वेळात चढला हे काहीच कळलं : आपण तर बुवा अगदी थक्कच होऊन गेलो. आ वासून पाहा ऽलो. त्यानं दोरीचं एक टोक झाडाला करकचून बांधलं. सुटणार याची दोनतीनदा खात्री करून घेतली. आणि ते गुंडाळं अलगद एका घसरंडीवरून खाली सोडून दिलं. डोळ्याचं पातं लवतं न लवतं तोच त्याचं दुसरं टोक खालच्या झाडाच्या शेंड्याजवळ

येऊन आपटलं नि स्थिर झालं. आणि मग तो शंभरफुटी लांबलचक दोरखंड हवेबरोबर हेलकावे खाऊ लागला. आता रस्ता सोपा झाला. मोकळा झाला, अगदी चकाचौक साफ झाला. आता कुणीही जावं. हिंमत बांधावी. घ्यावं देवाचं नाव. आणि खेळावा एखाद्दुसरा डाव.

आता-आता मात्र माझ्याच्यानं रहावेना. उठताउठताच बुवांना म्हटलं, "चला बुवा! चढायचंय ना?"

माझ्याबरोबर आलेल्या दोघांपैकी एक चिपळूणचे तुकाराम मोरे. वयानं माझ्यापेक्षा मोठा पण नात्यानं भाचा. हा माणूस माळकरी. वारकरी संप्रदायातील मानकरी. एखाद्वेळ जन्मदात्या आईला मुकेल पण आषाढी कार्तिकीची वारी चुकवणार नाही. अशा या भाविक बुवांना "चला बुवा! चढायचं ना?" या माझ्या अनपेक्षित प्रश्नानं विस्मयाचा धक्काच बसला.

"बुवा, चढायचंय् ना? उशीर होतोय्."

"छे! आपण नाय् ब्यॉ!"

"मग, मी एकटाच जातो."

"कुठं? छ्याट्! " ते एकदमच कडाडले. "हे-हे तुमचं आपलं काहीतरीच मामा. हा झाला आक्रीताचा कळस. बरं, याला काही काळवेळ. त्यातून हा सोसाट्याचा वारा! सगळेच दिवस काही सारखेच नसतात, मी माझ्या जबाबदारीवर तुम्हाला इथं आणलंय्. उद्या काही कमीजास्त झालं तर मला फासावर जावं लागेल. चला बघू आपण घरी जाऊ. ताई वाट बघत असेल. मामी वाटेला डोळे लावून बसली असेल."

आली का पंचाईत. प्रकरण हाताबाहेर जाणार आणि आपण अपयशी ठरणार असं दिसू लागताच मग मोठ्या आपुलकीनं आंजारीत गोंजारीत, त्यांच्याच सांप्रदायिक भाषेत त्यांच्याशी बोललो तर हा हळव्या मनाचा माणूस निश्चितच वळेल अशी ठाम समजूत करून थोडासा गांभीर्याचा आव आणून म्हटलं, "बुवा, तसा काही मी इतक्यात कोसळून मरत नाही. माझ्या हातावरची आयुष्यरेषाच ह्या कड्यासारखी सरळसोट, मधे कुठेच तुटलेली नाही. आयुष्याच्या ह्या बळकट दोरीला त्या दुसऱ्या दोरीचा आधार असताना भ्यायचं काहीच कारण नाही."

**'येणे सुखे रुचे एकांताचा वास। नाही गुणदोष अंगा येत।**
**आकाश मंडप पृथ्वी आसन। रमे तेथे मन क्रीडा करूं।**
**तुका म्हणे होय मनासि संवाद। आपुलाचि वाद आपणासी।**

या तुकोबांच्या अभंगाची प्रचीती - या पवित्र अनुभवाचा शतांश

तरी वर अनुभवता येईल म्हणून मी वर चढतोय्. आणि याहून महत्त्वाचं म्हणजे - 'मी हा कडा चढणार' - हा अहंभाव मी धरीतच नाही. हे धारिष्ट मी करीत नाही. मी काय करणार? तो माझ्याकडून हे साहस करवून घेतोय्. मात्र पांडुरंगी दृढ श्रद्धा ठेवूनच चढतोय्. 'देह जावो अथवा राहो। पांडुरंगी दृढ भावो।''' इत्यादी. इत्यादी.

होय नाही करता करता शेवटी मोठ्या मुष्किलीनं अन् कष्टानं ते म्हणाले,

''बघा बुवा! तुमची इच्छाच आहे तर - तर जा पण सांभाळून.''

''पण मग तुमचं काय?''

''आपल्याला बुवा नाही ते जमायचं. माझ्या पायांना कापरं आहे.''

''ठीक आहे. तुम्ही जावळीतल्या मोऱ्यांचे वंशज. भित्रे अन् पळपुटे. आमच्या प्रतिबिंबाच्या नुसत्या कल्पनेनं मोंगलांचे घोडेसुद्धा पाणी प्यायला भ्यायचे.'' आणि मग त्या गंभीर वातावरणात एकदमच खसखस पिकली.

तोपर्यंत 'HIGH CLIMBING COURSE' पूर्ण केलेली डोंबिवलीची काही तरुण तरुणी पाच पंचवीस फूट दोरीच्या आधाराने वर चढत होती. पायातल्या चपला काढल्या नि एकवार बुवांकडे पाहून पाठ फिरवून निघालो. वळताना त्यांनी उच्चारलेले अस्पष्ट शब्द माझ्या कानावर पडले, ''मामा, पायातलं बळ आणि हातातली घळ सोडू नका''-

उगवतीकडं लांबलचक फांद्यांचे हात पसरून कड्याला अगदी खेटूनच उभं असलेलं एक पायरीचं का कसलं तरी झाड. तळाच्या कपारीतून वर आलेलं. कड्याचा आधार घेत वाढलेलं. उंची अंदाजे पंधरा फूट. चढण्याचा मार्ग हाच. पण अति दुर्गम.

कड्याजवळ गेलो आणि काही क्षण उभा राहिलो. क्षणभर डोळे मिटले. कड्यावर डोकं टेकवलं. त्यावरच्या धुळीचं एक बोट मस्तकी टेकलं. नमस्कार केला. आणि डावा पाय झाडाच्या बेचकात ठेवला. झाडाचा आधार घेत तिसऱ्या बेचकापर्यंत पोहोचलो. आणि तिथून उजवा पाय कड्यावर टेकला. तो पक्का रोवला, शरीर समतोल केलं. आणि मग दोन्ही हात कड्याला लावले. खोबणीत दोन्ही हातांची बोटं नीट खोवून उजव्या पायाच्या तळव्याला एक जोराचा नेट दिला आणि नीट तोल सावरीत पुढं झेपावलो. इथं झाडाचा आधार तुटला. ही एक काळ्या कुळकुळीत कातळाची दहा फूट उंचीची घसरंड. झाडाच्या तळापर्यंत उभार होत गेलेली. कातळाच्या वरील सपाट भागावर चढण्यासाठी फक्त एकच मार्ग. पायाचा अंगठा मावेल एवढं, मूठभर

पक्क्या मातीच्या आधारानं उतरंडीच्या खरखरीत भागाला चिकटलेलं एक गवताचं ढिसूळ. एक गवताच्या मुळांची बुंधडी. हा बेभरवशाचा आधार. त्यातून रुपयाएवढा त्याचा आकार. इथून चढायचं म्हणजे शरीर हलकं करावं लागणार. उरला सुरला भार कुठल्या तरी एकाच बाजूला पेलावा लागणार. वरचे कंगोरे बोटांनी नीट चाचपले. त्यातून बोटं निसटणार नाहीत याची पक्की खात्री करून घेतली. आणि मग कंगोऱ्यांच्या अगदी तळापर्यंत बोटं खुपसून त्याचा आधार घेत डाव्या पायाचा अंगठा हलकाच त्या ढिसूळावर टेकला. आणि उजवा पाय हळूहळू वरवर सरकवीत त्याचा तळवा वरच्या सपाटीला लावला. आणि अंग पेलीत एक जोराचा नेट देऊन वर चढलो.

इथून पन्नास फुटावर छाती उंचावून उभा असलेला एक पंचवीस तीस फूट उंचीचा उभार कडा. एक उंच अशी ताडकाची भिंत. तिच्या पायथ्यापासून तो थेट माझ्या पायापर्यंत घसरत आलेली घसरगुंडीसारखी एक अति दुर्गम उतरंड. वर बांधलेल्या दोरीचं टोक अगदी इथपर्यंत येऊन पोहोचलेलं. दोरीच्या आधारानं एकमेकांना मदतीचा हात देत चढणाऱ्या काही तरुणांपैकी दोघेजण थेट त्या भिंतीशी जाऊन बसलेले. दोरीच्या आधारानं वरपर्यंत चढणं तितकसं काही कठीण नाही. तर मग आपण दोरीशिवाय चढलो तर! चढता येईल का? काय हरकत आहे! तर मग ठरलंच. निश्चिंतपणं अगदी निश्चित जायचं ठरलं. उभ्याउभ्याच वाट हेरली. कंगोरे पाहून ठेवले. खोबणी लक्षात ठेवल्या नि वाकलो. चतुष्पाद प्राण्यासारखा चढू लागलो. अजून ऊन काही तितकंसं तापलेलं नाही. झुळुझुळु वाहणाऱ्या वाऱ्याची सुसाटगिरी मात्र तीव्रतेनं जाणवू लागली आहे. मधूनच घोंघावत येणारा एखादा वाऱ्याचा झोत सर्वांगाला एक जबरदस्त तडाखा लावून समोरच्या भिंतीवर जाऊन आदळतो आहे. शरीराचा तोल जातो आहे. मोठ्या प्रयासानं तो सावरीत कंगोऱ्यांच्या आधारानं, खोबणींच्या आसऱ्यानं, एखाद्या मुळकुंडीला हात देत, निश्चित केलेल्या जागी क्षणिक विश्रांती घेत आणि ठराविक भागी अंग पेलीत-खोलगटी ओलांडीत चढत चढत अल्पावधीतच कड्याच्या पायथ्याला जाऊन भिडलो. भिंतीशी पोहोचलो नि सहज मागे वळून पाहिलं. तो काय! दोरीच्या आधारानं चढणारी सर्वच्या सर्व मंडळी माझ्याकडं आश्चर्यानं पहात अगदी पुतळ्यासारखी स्थिरावलेली. थोडंसं बरं वाटलं. कौतुकभरल्या नजरा आपल्याकडं पाहू लागल्या म्हणजे प्रत्येकाला असंच वाटतं.

त्या भिंतीची उजवी बाजू साधारण खोलगट, खडबडीत, उथळ आणि ठिसूळ. पावसाळ्यात वरून खाली उतरणारे पावसाचं पाणी कदाचित् इथूनच खाली उडी घेत असावं. वरती चढण्यासाठी ही एकच वाट. खडकाचा आधार घेत घेत उभा राहिलो. पूर्वीप्रमाणेच वाट हेरली. महत्त्वाच्या जागा टिपून ठेवल्या. अंदाज घेतला. आणि खडकातून खाली लोंबणाऱ्या एका जाड मुळीला हात घातला. हाताला लागणाऱ्या प्रत्येक आधाराची प्रथम खात्री करीत, आसऱ्यांचा भरवसा घेत, प्रसंगी छातीपोट खडकाला टेकवीत, उभ्याउभ्याच लपकत लपकत, शरीराचा संपूर्ण भार हातावर पेलीत, ते वर उचलीत, हळूहळू सरकत, सरपटत दोरी बांधलेल्या झाडाखाली जाऊन टेकलो.

आता मी शंभरफूट उंचीवर ऐन भिंतीच्या माथ्यावर उभा आहे. अजून पन्नासएक फूट तरी चढायचं आहे. घोंघावणाऱ्या वाऱ्याची गती आता फारच वाढली आहे. आधाराशिवाय उभं राहणं जवळजवळ मुष्किल होऊन बसलंय्. आजूबाजूची खडकाळ जागा. त्यावर सुपाएवढाली ठिसूळशी भुसभुशीत खवलं. इथूनच एका कपारीतून वरती आलेलं एक ठेंगणंठुसकं झाड. मातीशिवाय जगलेलं. अशाही स्थितीत तग धरून उभं राहिलेलं. त्यामागे असलाच एक खरखरीत उभा खडक. प्रचंड मोठ्या शिलाखंडासारखा. सलग आणि ठणक. त्यातून बाहेर आलेला टेंगळासारखा एक भलामोठा दगड. गणपतीच्या पोटासारखा गोल गरगरीत. त्या पोटावर तिरपं चिकटलेलं हे झाड. गणपतीच्या पोटावर रुळणाऱ्या जानव्यासारखं. पोटाची उंची अंदाजे सातआठ फूट. त्यामुळं वरती चढण्यास फारच मोठा अडथळा निर्माण झालेला. एक वाकडी झुकलेली फांदी दोन्ही हाताच्या मुठीत गच्च पकडून आणि तिच्या बेचकात पायांचा आडवा तीठा घट्ट आवळून चक्क माकडासारखं लोंबकळत, हळूहळू शरीर वर उचलून, त्या फांदीला बिलगून आणि सारी शक्ती मनगटात एकवटून गर्रकन् हे शरीर वरती उचलावं तेव्हाच कुठं हे धड वरती जाऊन गणपतीच्या आडव्या छातीवर कोसळणार. आणि मग इथून मात्र सारी चिकाटी, सारं बळ, सारं धाडस, सारा संयम आणि सारं सारं कौशल्य पणाला लावूनच प्रयत्नांची पराकाष्ठा करीत चढावं लागतं. ही एक प्रचंड मोठी खडकाची दरड अगदी लांबसडक. आठएक फूट उंचीची. सरळ मावळतीकडं अर्धगोलाकार होत गेलेली. हिच्या सर्वांगावर लहानमोठी दगडाची टेंगळं. एखाद्या माणसाच्या शरीराच्या एकाच भागावर असणाऱ्या लहानमोठ्या चामखिळांसारखी, पुंजक्यासारखी. त्या चामखिळांवर

भुसभुशीत खवलं चिकटलेली. चिपकलेली. दरडीच्या पायथ्यालगत-तिचा पायथाच चिरीत गेलेली एखाद्या खळीसारखी, जेमतेम एकफूट रुंदीची, दगडी गोट्यांनी खडबडलेली मुरमाट अरुंद चिंचोळी अशी वाट. ह्या भिंतीला चक्क छातीपोट गच्च चिकटवून, हाताच्या पंजांनी त्यावरील खवलांचा आधार घेत जवळजवळ पंचवीसएक फूट उभ्याउभ्याच सरकावं लागतं. एखादी पाल भिंतीवर चढता चढता थांबावी अन् बाजूला बसलेली माशी पकडण्यासाठी ती तशीच उभ्याउभ्या हळुवारपणं आडवी सरकावी तसं.

थोडा वेळ विश्रांती घेतली. विचार केला. आणि मग निश्चित ठरवलं की आता आपण इथूनच आल्या वाटेनं खाली उतरावं. आपली हार मोठ्या शरमेनं कबूल करावी नि निघून जावं. हे सगळं बेभरवशाचं प्रकरण. ही एक तारेवरची कसरत. ही तरून जाणं - ती पार करणं आपल्या ताकदीपलीकडचं आहे हे कळूनसुद्धा काही वेळ तडफडत जळफळत बसून राहिलो. थोड्या वेळानं उतरण्याच्या तयारीला लागलो नि एकवार त्या रस्त्याकडं पाहिलं. तो काय! देवच पावला! त्याच वाटेनं हळूहळू सरकत माझ्याकडेच येत असलेला विष्णू मला दिसला. उतरणीवर टाकलेलं पाऊल झटकन् मागे घेतलं आणि वळलो. तो कसा येतोय्. कुठच्या आधारांना जवळ करतोय्. कुठं कुठं थांबतोय्. हे सगळं नीट पाहून ठेवलं नि तो येईपर्यंत तसाच निरीक्षण करीत उभा राहिलो.

"नमस्कार विष्णुबुवा!"

"रामराम".

"आता, इथून वाट कुठली?"

"ह्याच वाटेनं जा".

एवढं बोलून तो लपकन् झाडाच्या फांदीला लोंबकळला आणि सरड्यासारखा सर्रकन् खाली उतरला. त्याच्या ह्या एकाच वाक्यानं आणि कृतीनं मी तर बुवा अगदी आश्चर्यानं वेडा होऊन गेलो.

थोड्या वेळानं भिंतीजवळ जाऊन उभा राहिलो. दृष्टीच्या टप्प्यात येणारी वाट पुन्हा पुन्हा हेरली आणि सरकलो. डाव्या हाताचा पंजा एका खवलावर ठेवला. पाचही बोटं त्याच्या बाजूनं आत खोवली. उजव्या हातानं एका दगडाचं टोक धरलं. पाय फाकून दोन्ही पावलं त्या घळीत भक्कम रोवली आणि आडव्या झोपलेल्या त्या दरडीला छाती भिडवली. खवलांच्या आधारानं पायाखालची वाट पावलांनीच

चाचपीत हळूहळू लपकत लपकत दहाएक फूट सरकलो आणि थांबलो. इथून पाचएक फूट ताशीव दरड. मधोमध एक घळ. आणि दोनच बोटांची जागा असलेले काही कंगोरे. डाव्या हाताची चार बोटं घळीत खुपसली. उजव्या हाताचा पंजा हळूहळू सरकवीत जवळ केला. त्याला आधार दिला. मुंगीपावलानं तीनएक फूट पुढं सरकलो आणि - आणि दच्चदिशी थबकलो. हबका बसल्यागत. इतक्यात - हे एक घारीचं घरटं. खाली जाडंभरडं गवत. त्यावर बारीक गवत. वर मऊ गवताची शय्या. आणि त्यावर अंड्यांच्या कवचाचे तुकडे. घारीची अंडी नागाला फारच आवडतात असं ऐकलं होतं. तुकड्यांच्या आतील बाजूस असलेला एक गिळगिळीत ओलसरपणा पाहून नागदेव नुकतेच आपला 'ब्रेकफास्ट' आटोपून निघून गेले असावेत हे अगदी निःसंशय. - इतक्यात माझ्याकडं नजर रोखून 'चींऽचींऽ' करीत वायुवेगानं झेपावणारी एक घार माझ्याकडेच येत असलेली मला दिसली. किंचित खाली वाकलो. उंचावलेली मान कासवासारखी आत ओढली. इतक्यात ती फडफडली नि डोक्याला बोचकारून सूयूऽऽदिशी तिरप्या मानेनं तीरासारखी निघून गेली. सर्वांग थरथरू लागलं. कापरं भरल्यागत झालं. हातापायातलं अवसान साफ गळून गेलं. उजव्या पायाखालचा धोंडा सर्ररऽऽकन् बसणीवरून निसटला आणि डाव्या पायाच्या घोट्याच्या हाडावर येऊन आदळला. एक जबरदस्त कळ मस्तकात जाऊन भिडली. गरगरल्यागत झालं. डोळ्यापुढं अंधारी आली. आणि शरीराचा तोल सुटला. जीवाच्या भितीनं त्याही स्थितीत मरगळलेल्या अवस्थेत खाली बसलो. दगडांचा आधार घेतला. आणि भिंतीला डोकं टेकवलं. पुढं मग काय झालं? कसं झालं! कसा बसलो? कुठं बसलो? हे थोडा वेळ अगदी काही काहीच कळलं नाही. ग्लानीतून शुद्धीवर आल्यावर समजलं की मी एका खोलगट भागात डोकं भिंतीला टेकवून दोन्ही पाय खाली सोडून आरामखुर्चीत बसल्यागत पडलो आहे. देव तारी त्याला कोण मारी?

इथली वाट थोडीशी रुंदावलेली. खालच्या बाजूस दगडांचा आधार असलेली. बसण्यापुरतीच पण थोडीशी ऐसपैस लांबलेली वाट. इथून सव्वाशे फूट उंचीचा उभार कडा. मधूनमधून लवणं घेत अन् कुठं कुठं पोट फुगवून सरळ तळापर्यंत जाऊन पोहोचलेला. आता इथून मात्र पुढची वाट म्हणण्यासारखी तितकीशी काही कठीण नाही. रुंदावलेल्या वाटेनं थोडंसं सुखात पण पूर्वीसारखंच जपून जावं लागतं. ही वाट संपली की एक खोलगट खोबण. तीत लहानमोठ्या दगडी गोट्यांचा

गि. आ. --- ३

अस्ताव्यस्त पसरलेला ढिगारा. त्यापुढं मुरमाटीचं एक घसरतं टेप. त्यावर भुसभुशीत माती. तीत रुतलेले तीनचार भलेमोठे दगडी गोल गोटे. आणि इथून मग पंधराएक फुटावर माथा. दगडांचा ढिगारा ओलांडला. टेपापाशी आलो आणि चढू लागलो. तो काय आश्चर्य! पाऊल टेकताक्षणीच पायाखालची माती सरकू लागली. पाय रोवता येईना की माती हाताला आधार देईना. दोन फूट वर चढलो की एक फूट खाली घसरावं लागे. आली का पंचाईत! ह्याही स्थितीत हसू फुटलं. मोठी गम्मत वाटली. शाळेत असताना गणिताच्या मास्तरांनी (डी. बी. जोशी) एकदा एक गमतीचं गणित घातलेलं आठवलं. 'एक पाल भिंतीवर चढताना दोन फूट वर चढते नि एक फूट खाली घसरते. तर सतरा फूट उंचीची भिंत चढण्यासाठी तिला कितीवेळा घसरावं लागेल?' कसं कसं अर्धअधिक अंतर चढलो नि एका गोट्यावर बसलो. बसलो नि लगेच बुडाला इंगळी डसल्यागत ताड्कन् उठलो नि उठता उठताच हात खाली टेकून स्वत:ला सावरलं. तो दगड तीनचार फूट तसाच मातीसकट खाली सरकला आणि स्थिरावला. अजून दोन तीन फूट तो तसाच खाली जाता तर...? उतरताना या दगडाला स्पर्शच काय पण याकडं ढुंकूनदेखील बघायचं नाही अशी शपथपूर्वक भीष्मप्रतिज्ञा घेऊनच वर चढलो.

घुमटासारखा याचा माथा...माथी सुकलेल्या खाजेरी गवताची शय्या... वर थोडीशी सपाटी... सपाटीच्या मध्यभागी एक इंग्रजी 'वाय' अक्षराच्या आकाराचा लाकडी पण मजबूत खुंट जमिनीत भक्कम पुरलेला...! या खुंटापर्यंत पोचायचं म्हणजे झोपलेल्या गवताचाच आधार घेत सावकाशपणं वर चढायचं... गवत कमालीचं गुळगुळीत... बसताक्षणीच घसरगुंडीवरून घसरण्याचा आनंद अनुभवता येतो... दोन्ही हाताच्या मुठीत गवताचे झुंबे धरून वर चढलो नि उभा राहिलो...!

सुळक्याचा माथा थोडासा मागं झुकलेला... माथ्याला चिकटलेलं एक कातळाचं टेंगूळ आणखीनच एखाद्या चामखीळासारखं पुढं सरकलेलं... उभारीशी नव्वद अंशाचा कोन करून... इमारतीच्या एखाद्या सज्जासारखं...! त्याखाली एक लवण. छज्ज्याच्या छतापासून खाली वळलेलं. आणि लवणात छताला लागूनच एक भलं मोठं पोळं लोंबकळत असलेलं. या छज्ज्यावर गोगलगाईच्या गतीनं उतरावं. पळभर टेकून क्षणभरच खाली पाहावं आणि झट्कन् दृष्टी वळवून आल्या वाटेनं तसंच परतावं. या भागावर टेकताक्षणीच आग्यामाश्यांचं गुणगुणणं अगदी स्पष्ट ऐकू

येतं. इथं जास्त वेळ बसू नये आणि सारखं सारखं खाली पाहू नये. सारखं पाहिल्यानं चक्करल्यागत होऊन झुकांडी जाण्याचा संभव अधिक. अधिक वेळ बसल्यास गुणगुणणाऱ्या काही माशा घोंघावत वरती येतात आणि आपला कार्यभाग उरकून जातात. कदाचित् आपल्या पायरवानं त्यांना आपली चाहूल लागत असावी. इथं जाण्याचं धाडस मात्र कोणीही कदापिही करू नये.

ही एवढ्या उंचावरली पोळी इकडचे ठाकरी जमातीतले लोक रात्रीचे वेळी काढतात असं विष्णूनं मला सांगितलं. ती कशी काढतात याचं चित्तथरारक वर्णन जेव्हा त्यानं मला ऐकवलं तेव्हा मी तर बुवा कमालीचा थक्कच होऊन गेलो. अवाक् होऊन पाहातच राहिलो. हातभर लांबीच्या बांबूच्या दांडेल्या घेऊन रानवेलीच्या सहाय्यानं एक भक्कमशी मजबूत शिडी तयार केली जाते. तिचा एक शेव वरच्या खुंटाला करकचून बांधून पुन्हा तो एका मोठ्ठ्या दगडाला चारपाच फेरे लपेटून घट्ट बांधला जातो. मग तिची दुसरी बाजू पोळ्याच्या दिशेनं हळूहळू खाली सोडली जाते. आणि मग वरून सर्वांगाला घोंघडी लपेटून ठिकठिकाणी जागोजागी ती सुतळीनं घट्ट बांधून कमरेला आकडी कोयता लटकावून एकजण त्या काळ्याकभिन्न काळोखातूनच हळूहळू शिडीच्या आधारानं खाली उतरतो. फुटाफुटावर गाठी बांधलेली अशीच एक दोरी त्याच्या कमरेला गच्च बांधून तिचं दुसरं टोक वरच्याच आधारांना जोडलेलं असतं. कदाचित् आयत्यावेळी मधेच जर शिडीनं दगा दिलाच तर आधार म्हणून बांधलेली, बुडत्याला काडीचा आधार हा हेतू. शिडीवरून खाली उतरताक्षणीच अंधारामुळं नेमकं कुठचं पोळं हे सुरुवातीला काही वेळ कळतच नाही. रात्र काळोखी. कडा काजळी. अन् पोळंही बिब्ब्यासारखं. पण अगोदरच अंदाज बांधलेले असतात. अंतर नजरेनं हेरलेलं असतं. बरोब्बर मोजलेलं असतं. कुठचा भाग कुठं किती हातावर हे अगदी काटेकोरपणं टिपलेलं असतं. पोळ्यासमोर येताच लगेच उजवा हात कोयत्याच्या मुठीवर पडतो. डाव्या हाताच्या मुठीत दांडेली घट्ट पकडली जाते. आणि लोंबकळत हेलकावत त्या धारदार तीक्ष्ण कोयत्याचे तीक्ष्ण वार सपासप त्या पोळ्यावर आडवे तिडवे बसतात. काही क्षणातच त्या पोळ्याचे भले भले लपके, अगोदरच पायथ्याशी आंथरुण ठेवलेल्या गवताच्या जाडशा आंथरणीवर नेमके जाऊन कोसळतात. मग क्षणाचाही विलंब न लावता त्या गच्च अंधारातून तो सरसर वर माथ्यावर येतो. आणि लगेच हातपाय पोटाशी बांधून

अन् डोकं छातीत खुपसून पालथा झोपून जातो. आणि मग त्या रात्रीच्या भयाण शांततेत क्रोधाने भडकलेल्या माशांची घोंघावण अंगावर काटा उभा करते. जवळजवळ सगळ्याच माशा पळून जातात. पण त्यातल्या काही मात्र त्यांची राहुटी उध्वस्त करणाऱ्याचा अगदी शेवटपर्यंत पाठलाग करतात. घोंगडीला जाऊन चिकटतात. डसतात. आपल्या बारीक सुयांची तीक्ष्ण अग्रं घोंगडीच्या छिद्रांतून आत खुपसतात. तोपर्यंत पायथ्याशी असणारे गडीदेखील अंगावर घोंगड्या लपेटून लांबवर कुठंतरी एखाद्या घळीत वा कपारीत दडी मारून बसलेले असतात. हे सगळं स्थिरस्थावर होईपर्यंत मध्यान्ह केव्हाच उलटून गेलेली असते. राती पसापसा भाताची पेज वरपून आलेले हे ठाकरी कोंबडसादी च्यायच्या पाण्याचा गरम गरम घोंट घशाखाली ओतायला मधाच्या हंड्या भरभरून घरी परतलेले असतात.

अतर्क्य! अतर्क्य! खरंच अतर्क्य. ह्या त्यांच्या चित्तथरारक साहसापुढं माझं धाडस म्हणजे काहीच नव्हे. वीतभर पोटाची टीचभर खळगी भरण्यासाठी काळोखाच्या साम्राज्यात आणि तशातही पाचशेएक फूट उंचीच्या खोल उभारीत मृत्यूच्या कराल दाढेतून चक्क त्याच्या उघड्या जबड्यात स्वत:चे शरीर मोठ्या हिंमतीनं, आत्मविश्वासानं आणि निश्चयानं बिनधास्त फेकून देऊन केवळ एका बेभरवशाच्या शिडीचा आधार घेत लोंबकळत, हेलकावत, प्रसंगी शरीर विद्रूप करणाऱ्या हजारो आग्यामाश्यांच्या राहुटीवर एकट्यानं हल्ला चढविणं हे येरागबाळाचे काम नोहे. धन्य ते ठाकरी. धन्य त्यांची माता. धन्य त्यांची कुळी.

ह्या एवढ्या उंचावरची एक निशाणी म्हणून त्या खुंटाच्या सालीचा एक तुकडा, तिथलीच मुठभर माती आणि शिडीला आधार देणाऱ्या दगडाचा एक छोटासा कपचा खिशात टाकला नि निघालो. चढताना चढलो खरा पण उतरताना जन्मदात्रीचं दूध आठवलं. खाली आलो पोटभर घटाघटा पाणी प्यालो आणि थोडावेळ विश्रांती घेऊन उठलो. शिरढोणहून आलेल्या एका तरुणासमोर जाऊन खिशातलं एक नावाचं कार्ड काढून त्याच्या हातात देत म्हटलं, "न विसरता पत्र पाठवा"
"अवश्य अवश्य! पण मग तुम्ही कधी येणार आमच्या गावी?"
"तुमच्या शिरढोणच्या पवित्र भूमीला ज्या दिवशी हे पाय लागतील तो सुदिन." आणि मग तो एकदमच गंभीर झाला. मग मीही काही न बोलता तसाच वळलो आणि चालू लागलो.

हा शिरढोणचा चंद्रकांत फडके. क्रांतिकारक फडक्यांचा एक जवळचा

नातेवाईक.

निष्पर्ण वृक्षाजवळ आलो नि सहज मागे वळून पाहिलं. 'गन्स ऑफ नॅवरोन' या इंग्रजी चित्रपटातला तो पहाड चढण्याच्या प्रसंगाचा एक दुरून दाखविलेला 'शॉट' आठवला. एखाद्या काळ्याकुट्ट डांबरी पिंपावर पांढरे डोंगळे चढताना दिसावेत तसं ते दृष्य दिसत होतं.

*(सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. गो. नी. दाण्डेकर यांची 'जैत रे जैत' ही कादंबरी इथल्या या सत्य घटनेवर आधारित आहे. 'जैत रे जैत' हा मराठी चित्रपटदेखील याच कादंबरीवर आधारित आहे.)*

● ○ ●

# ३ वाटचाल रसाळगडाची



गहिरा रसाळगड

छाया - तु. वि. जाधव

*निसर्ग आणि माणसं यांचा वेध घेत जाणारं, ऐसपैस गप्पाटप्पांनी रंगलेलं हे एक रसीलं सहल वर्णन.*

यशवंतराव मोऱ्यांना मी अगोदरच पत्र टाकलेलं. ठरलेल्या वेळेत ते येऊन खेडला थांबलेले. कशेडीचा नागमोडी वळणाचा घाट उतरून खेड स्थानकावर पोहोचलो नि तिथं खेड ते आंबवली एस्.टी. त बसलो. एस्.टी.नं खेड सोडलं नि गोव्याकडं जाणारा मुख्य राजमार्ग ओलांडून ती पूर्वेला आंबवली घाटाकडं जाणाऱ्या रस्त्याला लागली. अर्ध्यापाऊण तासात नानावले स्थानी उतरलो नि दक्षिणेकडे जाणाऱ्या पायवाटेनं चालू लागलो. अर्धाएक फर्लांग चालून जातो न जातो तोच एकाएकी न कळतच पावलं थबकली. समोर दूरवर दिसला रसाळगडचा दक्षिणकडा नि त्यावरील ते बुलंद दारूकोठार. मनी आलं, आताच जावं नि आजची पिठोरी चांदणीरात्र गडावरच काढावी. पण इथून

रसाळगड साडेतीन कोस म्हणजे जवळजवळ सातआठ मैल. त्यातून आदल्या रात्रीचं जाग्रण नि प्रवासाचा शीण. आणि याहून महत्त्वाचं म्हणजे 'आजची रात्र आमच्याच घरी काढायची' असं मोऱ्यांनी अगोदरच ठरवून टाकलेलं.

जगबुडी नदीजवळ आलो. चुळा भरल्या नि किनारी उंबराच्या झाडाखाली थोडा वेळ विसावलो. उंबर म्हणजे औदुंबर. याखाली दत्तगुरूंचा वास. म्हणून हे झाड देवत्व पावलेलं. गडाचे दरवाजे बहुधा उंबराच्या फळ्यांचे तयार केलेले असत. हल्ला झाला असता हत्यारांचे आघात बोथट होत पण ह्या फळ्या काही मोडत नसत. नदीच्या दुतर्फा तर अनेक जातीची झुडपं नि झाडोरी. लव्हाळ्यांची तर गणतीच नाही. विनम्र लव्हाळ्यांविषयी तुकोबांनी म्हटलंय्, 'महापुरे झाडे जाती तेथे लव्हाळी राहती...!' पण इथं चटकन् डोळ्यात भरणारी वनस्पती म्हणजे दर्भ...प्रत्येक धर्मकृत्याच्या आरंभी दर्भाचं पवित्रक घातल्याशिवाय ते पार पडायचं नाही...!

देवघर गावच्या वेशीत पाऊल ठेवताच एक अनामिक संवेदना सर्वांगातून वीजेगत चमकून गेली... एक सात्विक रोमावळी सर्वांगी फुलून आली... या पंचक्रोशीतल्या अनेक गावांपैकी देवघर नामे ग्राम एका अलौकिक सुखानंदानं लौकिकलेलं... त्याचा सुगंध चहूदिशी दरवळलेला...! संत गाडगेबाबांचे एक साक्षात्कारी पट्टशिष्य संत गोधडे महाराज इथं आले नि आडरानात वसलेल्या या मृतवत् गावी एक नवचैतन्य निर्माण झालं...! रुक्षावलेल्या ओसाड भूमीत भावभक्तीचे मळे फुलले... आळसावलेल्या घराघरातून हरिनामाचे गजर घुमले. ज्ञानतुकयाची अभंगवाणी टाळमृदंगासवे अहर्निश दुमदुमू लागली...! त्यानं लोकजागृती झाली... समस्तांनी अहंकार पदतळी घातला... परस्परांच्या पायी डोयी विनम्र झाली.. हरिरंगणी नाचता नाचता चित्ते पावन झाली... नि मग 'चांगभलं' च्या उत्साहपूर्ण विजयी घोषणेत भागवत धर्माची भगवी पताका रसाळगडावरील दीपमाळेसमोर मोठ्या डौलानं फडफडू लागली...!

या शिष्योत्तमानं इथं एक विठ्ठलाचं राऊळ बांधलं नि अवघ्या पंचक्रोशीत दुसरं पंढरपूर वसवलं...! प्रत्येक कार्तिकी एकादशीला इथं एक मोठी यात्रा भरते... या आध्यात्मिक वातावरणात नि त्या महात्म्याच्या सान्निध्यात राहिलेल्या नि आनंदाचे डोही आनंद तरंग अनुभविणाऱ्यांपैकी यशवंतराव मोरे हे एक...!

साडेसहा फूट उंचीचा हा मिलिटरीतला सेवानिवृत्त माणूस. इकडं 'येसू खोत' या नावानं ओळखला जाणारा. गावाच्या एकीसाठी अहर्निश झटणारा. आवाज कसा खणखणीत! शब्दोच्चार कसे स्पष्ट! अशा या खोतांच्या घरी माझं मनस्वी अगत्यानं, आदरानं नि आनंदानं स्वागत झालं. मोठ्या आस्थेनं विचारपूस झाली. गरमगरम पाणी आंघोळीला मिळालं. त्यांच्या गृहलक्ष्मीनं अगोदरच सारी तयारी करून ठेवलेली. त्या माऊलीच्या हातचं रुचकर अन्न मुखी लागलं नि फार फार बरं वाटलं.

दुसऱ्या दिवशी सकाळी कोंबडसादी उठलो नि झुंजूमुंजू लागताक्षणीच निघालो. आमच्याबरोबर तिसरे एक सद्‌गृहस्थ पेणचे सुरेश जाधव. हा माणूस कमालीचा मितभाषी, कष्टाळू नि सुस्त झिरम्या. पण डोंगर चढायचं म्हटलं की यांच्या अंगी कसं काय वारं भरतं न कळे. सगळी सूत्रं खोतांकडे. अर्थातच आघाडीची बाजू त्यांनी सांभाळली. पिछाडीला जाधवराव नि मधे मी. असं हे आमचं त्रिकूट एका आडरानात घुसलं नि आडवाटेनं चालू लागलं. वाट तितकीशी काही दुर्घट नाही. ही एक काटेरी ढोरवाट. ढोरांच्या पायआपटीनं फुटलेली. ओल्या सुक्या पाचोळ्यानं माखलेली. बख्खळ दगडधोंड्यांनी खडबडलेली.

इकडे सागाची लागवड भरपूर प्रमाणात फोफावलेली. प्रत्येक शेताची सरहद्द दर्शविणाऱ्या कुसवाला नि हरेक चोंढ्याच्या ब्रांधोलीला अगदी खेटूनच एका सरळ रेषेत लहान मोठी सागाची झाडं उभी असलेली.

आडवळणानं तरुतळी पडलेला पाचोळा तुडवीत एका माळरानात घुसतो नि पायवाटेनं चालू लागतो. वाट तशी सरळ सोपी सपाटीची. येण्याजाण्यानं मळलेली. दुतर्फा झाडी असलेली. झाडीवर खाजकुयली नि तांबडेलाल डोळे वटारून बघणाऱ्या इवल्या इवल्या गुंजा. आपली काळीशार बुबुळं चहूबाजूस रोखलेल्या. लग्नकार्यात वधूवरांची बाशिंगं सजविण्यासाठी ह्या गुंजांचा फार मोठा उपयोग. धनगर-कातकरी बायका तर यांचे अलंकार करून अंगावर घालतात. शरीरशृंगार करतात. गुंजांनी शरीरशृंगार करावा तर खाजकुयलीनं शरीराचा अंगार व्हावा. किती तरी उपयुक्त झाडांची ओळख करवून घेता घेता एका मोकळ्या सपाट जागी भल्या मोठ्या फणसाखाली येऊन विसावलो आहोत. अगदी शपथपूर्वक खरं सांगतो - या फणसाच्या बुंध्यापासून शेंड्यापर्यंत जवळजवळ शेदोनशे लहानमोठे फणस लागलेलं हे झाड पाहून मी तर विस्मयानं अगदी थक्कच होऊन गेलो. बाह्यांगी काटे नि अंतरी रसाळ मधुर

गऱ्यांचे साठे असलेल्या या अमृतवृक्षाविषयी शेख महंमदानं म्हटलंय्.

**'फणसाअंगी काटे। आत अमृताचे साठे।।'**

आज सकाळपासूनच आभाळ अभ्राच्छादित आहे. अधून मधून एखादुसरा पावसाळी ढग रेंगाळत पुढं पुढं सरकताना दिसतो आहे. पावसाची एखाददुसरी सर येण्याचा संभव आहे. दूरवर दिसणारे डोंगर धुक्याची दुलई पायापर्यंत फेकून झोपेतून उठल्यागत दिसताहेत. वातावरण कोंदटलेलं असलं तरी दंवाच्या अभिषेकानं अवघी वनश्री प्रसन्न झालेली दिसते आहे.

आणि मग पानतंबाखूची चंची सोडता सोडता खोत सांगू लागतात, पंचक्रोशीत घडलेल्या काही साहसकथा. दिवसाढवळ्या मोठ्या हिंमतीनं, वाघाच्या काळजानं-वाघबिळात शिरून वाघाची शिकार करणारे दोन भाऊ... लहानग्या तान्हुल्याला अर्धवट गिळणाऱ्या अजगराला जबड्यापासून पोटापर्यंत आपल्या धारदार विळ्यानं चराचरा कापून पोटच्या गोळ्याला मृत्यूच्या जबड्यातून जिवंत बाहेर काढणारी ती वीरमाता... नि एका अपरात्री गुरांच्या गोठ्यात शिरणाऱ्या वाघाला एका धनगरानं मुसळानं ठार मारीपर्यंत त्या ढाण्या वाघाची शेपूट आपल्या दोन्ही हातांच्या मुठीत गच्च पकडून त्याला तसूभरही पुढं न सरकू देणारी त्याची ती घरधनीण... धन्य त्यांचं शौर्य... धन्य त्यांची कुळी... 'धन्य त्यांची तया माय प्रसवली'!

धनगरवाड्याशी येऊन पोहोचलो आहोत. शेतभाजणीसाठी 'शेणकी'तून शेणकूट काढून मोकळ्या जागी वाळत टाकणाऱ्या नि झाडांखालची पातेरी गोळा करणाऱ्या धनगरांच्या बायका आम्हाला पाहून आपापसात कुजबुजताहेत. 'कवल' तोडणारे 'बापये' आमच्याकडं आश्चर्यानं पाहाताहेत. नि नागडी उघडी पोरं शेंबूड भुरकीत बकऱ्यांच्या लेंड्या खतासाठी जमवता-जमवता बिथरलेली दिसताहेत. हे त्यांना करावंच लागतं. करणंच भाग असतं काहीना काही...! त्याशिवाय काळी आई जेवू घालायची नाही... पोटातला डोंब कोंबाशिवाय थंड व्हायचा नाही... भुकेची झोंबी लोंबीशिवाय थांबायची नाही...!

धनगरांची केंबळांनी झांपलेली घरं. पुढती शेणानं सारवलेलं अंगण. मागील दारी परस. परसाला काटेरी कुंपण. मध्यभागी फोफावलेल्या केळी नि बाजूलाच शेवग्याचं झाड.

बाबू धनगराच्या झोपडीसमोर उभं राहताच अगत्यानं घोंगडी आंथरून 'या' म्हटलं जातं. टेकताक्षणीच पाण्याचे भरलेले तीन तांबे येतात

नि अल्पावधीत 'च्यायचे तीन कोप'देखील. हे असलं 'अगत्य' अजूनही या असल्या खेडेगावातच पाहायला मिळतं. शहरी जीवनातून ते केव्हांचंच लुप्त झालं आहे.

धनगर ही आदिवासी नि भटकती जमात. गावातील बारा बलुतेदारांपैकी एक. खिशानं फकीर पण मनानं अमीर. घरी दारिद्र्य फार पण दूधदुभतं अपार.

बाबू धनगराच्या घरापासून रसाळगड अगदी स्पष्ट दिसतो. इथून एकदोन फर्लांग चालून समोरचं टेपाड चढून वर गेलं की समोर उभा राहतो गडाचा पश्चिमकडा. एखाद्या तपस्व्यासारखा. ब्रह्मानंदी टाळी लागल्यागत अचल, शांत नि गंभीर. त्याचं हे गूढ गहिरेपण पाहून मन गांभीर्यानं भरून येतं नि काही क्षण एकटक पाहात राहावंसं वाटतं.

तसं पाहिलं तर रसाळगड तिकोनी. दोन टोकं दक्षिणोत्तर तर तिसरं टोक निमुळतं होत पूर्वेकडं गेलेलं. एका टेकडीवजा पर्वतराईत घुसलेलं. दक्षिण टोकाच्या पायथ्याशी काहीशा उंचीवर एकदोन मेटे. मेटे म्हणजे किल्ल्याखालची पहाऱ्याची ठिकाणं. त्यांच्यामधूनच पायथ्यापासून थेट तटापर्यंत कोनाच चिरीत गेलेली एक घळ. सहसा कुणाच्या लक्षात न येणारी. जवळून देखील न दिसणारी. त्या घळीकडं अंगुलीनिर्देश करीत खोत म्हणाले, "हीच ती चोरवाट. याच वाटेनं गडावरच्या देवळातल्या सोन्याच्या मूर्ती चोरीला गेल्या नि नाहक एका भोळ्याभाबड्या धनगरिणीला प्राणास मुकावं लागलं-" इतकं बोलून खोत काहीसं गंभीर झाले, एकदमच विषण्ण झाल्यासारखे दिसले.

डाव्या बाजूस एक प्रचंड उतरती घसरंड. तिच्या तळाशी गच्च रान नि उजव्या हातास अंदाजे तीनशेएक फूट उंचीचा उभार कडा. कातळाचे थरावर थर, प्रचंड शीलाखंडांच्या घड्यावर घड्या नि अधूनमधून ठिसूळ राखाडी रंगाचा खडक. असा हा संमिश्र कडा वरपासून खालपर्यंत तुटलेला. कड्याच्या पोटाखालून नि दरीच्या माथ्यावरून पायथ्यालगतच असलेल्या अरुंद वाटेनं चालू लागतो. दोन टेपाच्या मधली एक छोटीशी खिंड ओलांडून वर येतो नि एक[illegible] अंधारून येतं वरती काळ्याकुट्ट मेघांची दाटी होते. किंचितसं गरजतं नि सळसळत झुळझुळणाऱ्या वाऱ्याच्या सुरावर नाचू लागतात धारांची नुपुरं. एक गोड संमिश्र ध्वनी अंतर्बाह्य चाटून जातो... स्पर्शून जातो... आसमंत धुरकट होतो... धुळीचा कण नि कण थरथरतो... अवघी धरणी जलधारांच्या अभिषेकानं पुनित होते...

आणि मग 'मातीच्या गंधानं भरला गगनाचा गाभारा-'!

गडाच्या बहुतांशी सगळ्याच पायऱ्या तुटलेल्या. दरवाजे मात्र दोन. पैकी दुसरा दरवाजा दोन वळणांच्या काही ठराविक अंतरावर बांधलेला. सहजासहजी पहिल्या दरवाजापासून न दिसणारा. दोन्ही दरवाजांच्या दो बाजूस बुरूज. बुरूज म्हणजे तटाला अधिक मजबुती येण्यासाठी त्याला जोडलेली व बाहेरून गोलाकार असलेली भिंत. बुरूज म्हणजे पहाऱ्याची जागा. बहुधा पहारेकरी बुरूजांच्या आतील बाजूसच राहायचे. दाराच्या आतील बाजूस अर्गळ्याची जागा. अर्गळा म्हणजे बंद दरवाज्याला आतून लावण्यासाठी केलेला मजबूत अडसर. दाराचे वर देवडीवजा भाग. त्यावर चढण्यासाठी असलेल्या पायऱ्या बहुतांशी ढासळलेल्या. बुरूजाला लागूनच असलेल्या तटाच्या भिंतीला आतील भागास देवल्या व जंग्या. जंगी म्हणजे पायथ्याशी चाललेल्या हालचालीवर बारीक नजर ठेवण्यासाठी आणि तिथं आलेल्या शत्रूला बंदुकीच्या गोळीनं नेमका टिपण्यासाठी खालच्या बाजूस तिरके असणारे तटाला ठेवलेले छिद्र. शत्रू केव्हा हल्ला चढवील व राक्षसी साहस करून 'सुलतानढवा' करील, म्हणजेच चढाई करण्याचा प्रसंग गुदरवील याचा काही नेम नसे. म्हणून ही किल्ला बांधतानाच घेतलेली खबरदारी.

गडाच्या ऐन माथ्यावर येतो. वारं प्यालेल्या वासरागत धावत सुटतो नि उत्तर टोकावर जाऊन उभा राहतो. दोन्ही हात कमरेवर आहेत. श्वास रोधला आहे... दिठी सुखावली आहे... दृष्टीच्या टप्प्यात येणारा भवताल निरखण्याची मौज लुटतो आहे. उत्तरेकडचा सुमारगड, त्याच्या पलीकडून डोकावणारा महिपतगड, दक्षिणेकडचा वासोटा, पश्चिमेकडचा पालगड, पूर्वेला दक्षिणोत्तर पसरलेला आंबवली घाट नि त्याच्या पायथ्यालगतच उत्तर-पश्चिम सर्पाकृती पहुडलेली माता जगबुडी...! सुस्त रोडावलेली...! कित्येक लहानुगल्या खेड्यापाड्यांना दुतर्फा कुशीत घेऊन उब देणारी...! पावसाळ्यात दुथडी तुडुंब भरून वाहणारी...! रौद्ररूपधारिणी... जीवनसुखदायिनी...!

तटातटानं चालतो आहोत. कुठल्याही गडावर जे जे काही आवश्यक नि महत्त्वाचं असावं लागतं ते सगळं काही याही गडावर असलेलं. तट, बुरूज, शिबंदीच्या घरट्यांचे चौथरे, हवालदार कारखानवीसांचे वाडे, खलबत करण्याची गुप्त जागा, सदर, गुप्तवाटा, चोरवाटा, भुयारं, स्मशानभूमी, पाणटाकी आणि 'जकीऱ्याची जागा.' जकीरा म्हणजे युद्धसामुग्री किंवा लढाऊ वस्तूंचा साठा. असं बहुत काही असलेलं. काही काळाच्या

सामर्थ्यापुढं नामशेष झालेलं... त्याच्या उदरात गडप झालेलं...

मधोमध ग्रामदेवता वाघाईचं कौलारू मंदीर. मंदिरासमोर दीपमाळ. पुढील बाजूस ध्वजस्तंभ नि खालील अंगास जत्रेतील ढोलकाठीची चौकट. देवळाच्या उजव्या हातास मुबलक पाण्याचे दोन हौद. हौदांच्या वरील अंगास तटबंदीनं मजबूत असलेला बालेकिल्ला. बालेकिल्ल्यात खासा किल्लेदाराच्या मकानाचे भग्न अवशेष नि किल्ल्याच्या बरोबर समोर उगवतीकडं असलेलं ते बुलंद दारूकोठार. नि याहून महत्त्वाचं म्हणजे लहान मोठ्या मिळून चौदा तोफा इतस्ततः धूळ खात पडलेल्या. कित्येक वर्षे उन्हापावसाशी झगडत असलेल्या. इंग्रज-पोर्तुगीजांकडून खरेदी केलेल्या नि प्रत्येकीवर घडणीच्या तारखा घालून ठेवलेल्या. (वर राजकिरीटाचं रेखांकित चिन्ह. खाली 'पी' हे अक्षर नि त्याखाली तारीख कोरून ठेवलेली.)

मंदिरात आलो नि गाभाऱ्यात देवीसमोर जाऊन उभा राहिलो. फार फार बरं वाटलं. सात फूट उंचीच्या अखंड दगडी खांबावर टेकलेल्या लाकडी छतातलं कोरीव काम बघण्याजोगं. त्यातली कलाकुसर वाखाणण्याजोगी. छताखाली वाघावर बसलेली आई वाघाईची मूर्ती. डाव्या बाजूस झोलाई नि उजव्या हातास बहिरोबा. बहिरोबा म्हणजे भैरव. भैरव म्हणजे शंकराचा दुसरा गण.

इथला पुजारी मऱ्हाठा. कमालीचा बोलका. नाव धोंडू जानू सकपाळ. ऐंशी वर्षांचा जख्खड म्हातारा.

खोत बोरीच्या झाडावर चढले आहेत. फांदोऱ्या गदागदा हलताहेत. टपकणारी पिवळधमक गोल गरगरीत बोरं टिपण्यात जाधवराव मशगूल झाले आहेत. ही संधी साधून मी हळूच बाजूला होतो. काटेरी जाळी झुडपात शिरून बालेकिल्ल्यात शिरतो नि एका चौथऱ्याच्या जोत्यावर जाऊन बसतो. मनी येतं, इथल्या एका जरी पत्थराला जीभ फुटली तर काय बहार होईल नाही! मघापासून मी ज्या संधीची वाट पाहात होतो ती सुवर्णसंधी आता मला लाभली आहे. आपण आपलेच होण्याची... आपण आपल्यालाच गवसण्याची.. स्वतःनं स्वतःशीच बोलण्याची! त्या नीरव शांततेत त्या निखळ एकांतात हरवून जातो... भूतकाळात गढून जातो... मनसोक्त डुबून जातो... बुडून जातो...

पूर्वेकडील टोकाजवळून खांबटाक्याकडं जाणारी वाट अतिशय दुर्गम. टिचभर रुंदीची. अवघड निसरटीची. हा एक घसाराच. वाटेवर मनस्वी बोचणारे खडे साठलेले. पाऊल ठेवताक्षणीच घसरेल की काय असे

भय! या वाटेनं जाणं म्हणजे एक कसरतच. एक परीक्षाच.

हे एक प्रसिद्ध खांबटाकं. पन्नास फूट लांबीरुंदीचं. कड्याच्या ऐन गर्भातच कोरलेलं. आत चार खांब सोडलेले. डाव्या बाजूच्या भिंतीत गणपतीची मूर्ती नि बाजूलाच उंचावलेल्या सोंडेचा हत्ती कोरलेला. टाक्यातलं पाणी एवढं स्वच्छ नि नितळ की तळभाग डोळे मिटून पाहावा एवढा पारदर्शक. पाणी प्यायला एवढं हलकं, रुचकर, पाचक नि थंडगार की पिताक्षणीच सिंहगडच्या देवटाक्याची आठवण व्हावी.

आज रानडुकराची सार्वजनिक पारध आहे. पारध म्हणजे शिकार. हळ्या-हरळ्यांनी सारं रान कसं दुमदुमून गेलं आहे. पंचक्रोशीतले जवळजवळ शे-दोनशे गडी आज सकाळपासूनच रान उठवीत आहेत. अजून जनावर काही उठत नाही. मोक्याची ठिकाणं नि आडवाटा अडवून चारपाच जणांचं एकेक टोळकं हाती बरचे भाले घेऊन उन्हातच ताटकळत उभे आहेत. ऊन आता चढू लागलं आहे. सपाटून तापू लागलं आहे. अंगाला चटचटू लागलं आहे. मधूनच एखादी थंडगार झुळूक सर्वांगावर गारव्याचा सुखद शिडकाव करते. तेवढ्यापुरतंच बरं वाटतं. त्या निळसर हिरव्या रानात एखाद्-दुसरा पांगारा उन्हाच्या काहिलीत नखशिखांत जळतो आहे. नि भगवी वस्त्रे परिधान करून सर्वसंगपरित्याग केलेल्या एखाद्या बौद्ध भिक्षुकासारखा भासणारा पलाशवृक्ष मध्येच कुठंतरी स्थितप्रज्ञासारखा उभा असलेला दिसतो आहे.

कड्याच्या पोटाखालून वाघबिळाजवळ येतो. इतक्यात दूरवर घाटाच्या पायथ्याशी उसळलेल्या धुळीकडं तर्जनी दाखवीत जाधवराव म्हणतात-
"खोत! ते पाहा घोडेस्वार येताहेत-"

-"आता रे कुठले बाबा घोडेस्वार! खेडहून सुटलेली ती दीडची एस्.टी. या जवळच पायथ्याशी असलेल्या अस्थानाला येते आहे-"

लोकसत्ता - १७/८/१९७५

● ○ ●

# ४ बरखा बहार



राजगडचा बालेकिल्ला

छाया - राजेंद्र बोरसे

भर पावसात दुर्गयात्रा म्हणजे एक अनोखा आनंद...! या दिवसात निसर्ग पोपटी लावण्यानं बहरलेला असतो... ग्रीष्मात आग ओकणाऱ्या काळ्याकभिन्न पत्थरालादेखील यावेळी पाझर फुटलेला असतो... असंख्य मेघमाला शतसहस्र धारांनी सह्याद्रीच्या उरी-शिरी अविरत बरसत असतात. चार महिने सतत चाललेल्या या त्याच्या महास्नानाचं स्नानोदक त्याच्या अंगा-खांद्यावरून उड्या घेत हिरव्या रंगाच्या शीतल छायेखालून खळाळत धावत असतं. जणू सुस्नात होताना एका अनामिक बेहोषीत सह्याद्री खळखळून हसत असतो...

मार्गासनी मागं टाकतो. गुंजवणी नदी ओलांडतो नि रिमझिमत्या सोनवेळी माळरानातून चालू लागतो.

## श्रवणीय सुरावट

पिवळीधमक सोनफुलं लेवून माहेरच्या ओढीनं सजलेल्या पाऊलवाटा... दुतर्फा हरित तृणाच्या मखमाली गालीच्यावर विखुरलेला पाणीदार मोत्यांचा चमकदार कशिदा... अधूनमधून रंगीबेरंगी रानफुलांनी रेखाटलेली सुरेख नक्षीदार वेलबुट्टी... दूरवर उपड्या ठेवल्या कवडीगत दिसणाऱ्या ठेंगण्याठुसक्या टेकड्या... त्यावर चरणारी इवली इवली गुरंढोरं... जांगल्यांनी घातलेला 'ढोऽऽ'... त्याला मिळणाऱ्या प्रतिसादानं घुमलेली रानवनं... ही रानगीतांची घुमरावट नि त्यातच अलगुजाच्या मंजुळ स्वरांची सुरावट... हे दृश्य जसं नामांकित तशी ही सुरावटही श्रवणीय...!

भोवताली दूऽऽरवर दिसणाऱ्या क्षितिजटेकल्या डोंगरमाथ्यावरून उड्या घेणारे पाणलोट... इथून फेसाळ दुग्धधारेपरी इवले इवले भासणारे... जणू मातेला वात्सल्याचा पान्हा फुटला आहे. या भूमातेच्या स्तनाग्रातून पाझरणाऱ्या शुभ्रधवल दुधाच्या शतसहस्र धारांनी अनंतकोटी जीवांची क्षुधा भागते... तृषा शमते...

खरं म्हणजे हे दिवस भातलावणीचे. पण भातलावणी केव्हाच आटोपली आहे. कसलेल्या मातीतून भाताचे 'आवे' भरघोस फोफावले आहेत. नाचणी आवटण्याचं काम मात्र जोरात सुरू आहे. डोई इरली अडकवून डोंगर उतरणीवर ओणव्यानं नाचणीची रोपं आवटणारी काळ्या आईची लेकरं... बैलाच्या ताकदीनं औत ओढणारी बाया माणसं...! औताला जोडलेल्या जोखडाच्या एका बाजूस बैल नि दुसऱ्या बाजूस घरधनीण...! अंगावरची चिरगुटं जागोजागी फाटलेली. कोसळणाऱ्या पावसात ती ओलीचिंब झालेली. नेट देताना होणारे कष्ट... बैलाच्या ताकदीशी बरोबरी करताना जाणारा तोल नि तशातच 'गरवारपण'...! या देशीच्या भूमिपुत्रांचं हे दैन्य...! उरीपोटी जोपासलेलं स्वप्न साकार होण्याची वेळ येऊन ठेपली असतानादेखील एका अंकुरासाठी दुसऱ्या अंकुराची महापूजा...!

## रौद्ररम्य शृंगार

विषण्ण मनानं चोर दरवाजाची दुर्घट चढण चढू लागतो. पिसाट वाऱ्याच्या धुमश्चक्रीतून - बोचणाऱ्या तीक्ष्ण धारांचे वार सर्वांगावर झेलीत नि गडद धुक्याचा रोमांचकारी वेढा फोडीत निसरत्या शेवाळी वाटेनं उभा डोंगर चढून जाणं म्हणजे एक 'थ्रिलच'...! ही झुंज देता देता निसर्गाचे नानाविध अंतरंग अगदी डोळेभरी न्याहाळतो आहे. शुभ्र धुक्याच्या मलमली आवरणातून गंध धुन्द समीरासवे हळुवारपणं

रिमझिमत येणारी रेशीम सरींची झिरझिरीत ओढणी... सचैल स्नान करता हिरवा साज ल्यालेली नि आपल्या फांद्यांचे हात पसरून एका स्वप्नील कैफात डुलणारी गिर्रेबाज झाडंझुडपं... सर्वांगी तेल माखून उभे असलेले भीमकाय शरीराचे बेलाग उत्तुंग कडे पवित्र्यात उभे राहून कुस्तीचे आव्हान स्वीकारणारे काळेकभिन्न रामोशीच जसे...! 'आ' वासून सुस्त पहुडलेल्या आक्राळ विक्राळ खोल दऱ्यांच्या जबड्यातून उसळणाऱ्या नि या भयासुर भीमकाय शरीराच्या छाताडावर आदळणाऱ्या अजस्त्र धुक्याच्या लाटा... सह्याद्रीचं ऊरफाट खिदळणे नि त्यातच वरून ऐकू येणारा कृष्णवर्णी मेघांचा धीरगंभीर ध्वनी...! असा हा एकंदरीत निसर्गाचा भव्य दिव्य रौद्ररम्य शृंगार...! ग्रीष्माचा अंगार ज्यानं सर्वांगी झेलला आहे त्यालाच या शृंगाराचा खराखुरा अर्थ उमगेल.

विरक्त असलेल्या समर्थांचं मनदेखील या भव्य सृष्टिसौंदर्याने हरखून गेलं.

**'सरस रम्य रसाळ वनांतरा। हरित रंग सुरंग दिसे बरा।**
**दिसतसे रमणीय वसुंधरा। नूतन पल्लव हा तरु साजिरा।।'**

हे त्यांचं 'वर्षाकालीन वनश्री' काव्य जेवढं वाचनीय तेवढंच श्रवणीय. गिरिकंदरातून खळाळत वाहणाऱ्या जलप्रपातांना पाहून तर त्या विजनवासी रामदासांच्या मुखातून शब्दगंगाच खळाळत वाहू लागली.

**गिरीचे मस्तकी गंगा।**
**तेथूनी चालली बळे।**
**धबाबा लोटल्या धारा।**
**धबाबा तोय आदळे।**
**गर्जतो मेघ तो सिंधू।**
**ध्वनी कल्लोळ उठिला।**
**कड्यासी आदळे धारा।**
**वात आवर्त होतसे।**
**तुषार उठती रेणू।**
**सीत मिश्रित धुकटे।**
**दराच तुटला मोठा।**
**झाडखंड परोपरी।**

पद्मावती राऊळात येऊन थडकतो. थोडा वेळ विसावतो. ओल्याचं सुकं करून घेतो नि बालेकिल्ल्याच्या दिशेनं दौडू लागतो. राजगडचा बालेकिल्ला नि संजीवनी माची हे राजगडचं खरं राजवैभव. वक्ररेषांकित

धावणाऱ्या संजीवनीत तिचं सौन्दर्य सामावलं आहे. तर बालेकिल्ल्याचं सामर्थ्य त्याच्या दुर्गमतेत आहे. नराचा नारायण होण्यासाठी फार मोठी साधना करावी लागते. पण नराचा वानर करण्याची किमया राजगडच्या बालेकिल्ल्यास अगदी लीलया साध्य झाली आहे हे अगदी निर्विवाद.

## सुगंधी स्मरण

मुळात चढण अति दुर्गम असलेली. वरून संतत धार झरत असलेली. वाटेवर इंच-इंच शेवाळीचा थर साठलेला. त्यावरून खळाळ धावत सुटलेला. त्यातच प्रवाहासवे घरंगळत येणाऱ्या लहान-मोठ्या असंख्य खड्यांचा संच चहूअंगी असा काही विखुरलेला की, दहादा विचार करून उचललेलं पाऊल पुढं टेकावं. पण ही अशीच, हीच वाट शिवकालापासूनच वहिवाटीत आहे तर मग, ती मायलेकरं याच वाटेनं अनेकदा चढली-उतरली असतील. आत्ता, या क्षणी आम्ही ज्या ज्या खोबणींचा आधार घेतो आहोत ना, त्या प्रत्येक खोबणीला त्या राजमातेचा नि त्या श्रीमान योग्याचा हस्तस्पर्श झाला आहे... एक अनामिक संवेदना सर्वांगातून विजेगत चमकून जाते... त्या सुगंधी स्मरणानं मन केवळ भरून येतं...!

बालेकिल्ल्याच्या माथी जाऊन उभं रहावं. जमिनीचा एखादा तुकडा अवकाशात उंच भिरकावला जावा नि त्या अधांतरी तरंगणाऱ्या तुकड्यावर आपण अलगद उभं असावं असं वाटल्याखेरीज रहात नाही. भवताल गडद धुक्यानं वेढला आहे. दहा फुटांवरचंदेखील दिसत नाही. भन्नाट वारा सर्वांगी झोंबतो आहे... धारांच्या सुया सर्वांगी बोचताहेत... त्यांचा होणारा आडवा तिडवा मारा अगदी असह्य होतो आहे. पिसाट वाऱ्याची सुसाटगिरी क्षणभरदेखील स्थिर उभं राहू देत नाही. अशा या कमालीच्या कठीण अवस्थेत निसर्गाचं तांडवनृत्य न्याहाळीत छत्रपतींच्या राहत्या वाड्याच्या, पडक्या भिंतीचा आधार घेऊन कसेबसे उभे आहोत.

तेरड्याच्या नि सोनफुलीच्या पिवळ्याजर्द फुलांनी बालेकिल्ल्याचा माथा बहरला आहे. अधूनमधून गडद धुक्याचं पटल विरल होतं आहे. पडक्या वाड्याचे विखुरलेले अवशेष क्षणोक्षणी मनाला कमालीचा चटका लावून जाताहेत. आज जवळजवळ साडेतीनशे वर्षे या देशीच्या साऱ्या सानथोरांनी ज्याच्या चरित्राचं नि चारित्र्याचं गुणगान गाऊन ज्याचा आदर्श आपल्या दृष्टिसमोर सतत तेवत ठेवला त्या युगपुरुषाच्या राहत्या वाड्याची ही दुर्दशा...? स्वराज्य स्थापनेत संरक्षणात्मक आश्रय देणाऱ्या या असल्या बुलंद दुर्गांचा विध्वंस पाहून चक्क उघड्या डोळ्यांनी

गि. आ. --- ४

त्या दुर्गाधिपतींचा जयजयकार...? त्या कैलासपतीवर अढळ श्रद्धा असलेल्या ह्या सह्याद्रीपतीनं मोठ्या भक्तिभावानं बांधलेल्या शिवमंदिराच्या ढासळलेल्या कोनाड्यात व्हिस्कीच्या रिकाम्या बाटल्या फेकूनही शिवाजी महाराज की जय...? स्वराज्यावर कल्पांताची कुऱ्हाड कोसळली असता या अटीतटीच्या समरप्रसंगी ज्या सदरेत कित्येक रात्री विचार-विनिमय करण्यात घालविल्या त्या सदरेच्या पडक्या भिंतीवर चक्क विष्ठा करून नि उखळलेल्या चौथऱ्यावर उकडलेल्या अंड्यांची कवचं नि सिगारेटची थोटकं फेकूनही संकटसमयी त्या धीरोदात्ताचं पुण्यस्मरण? गडांवर जीवापाड प्रेम करणाऱ्या त्या दुर्गाधिपतींचा हा अवमान की सन्मान...? स्वार्थातून नि:स्वार्थ नि भीरुतेतून धैर्य निर्माण करणाऱ्या त्या धीरोदात्ताचा हा आदर की अनादर...?

## अजोड बांधकाम

खिन्नसुन्न मनानं सुवेळा संजीवनी पाहता पाहता भारावलेल्या हिरा पंडितने विचारलेल्या शंकेचं निरसन करतो. राजगडचं बांधकाम केवळ अजोड. पाहता क्षणी दाताखाली अंगुली जावी एवढं भव्य नि दिव्य. आपल्यासारख्या सामान्यांनी केवळ कवतिक करावं पण भल्या भल्या स्थापत्यविशारदांचा, स्वतंत्र अभ्यासाचा विषय होऊन बसावा असं हे बांधकाम केवळ अजोड यात तिळमात्र शंका नाही. अत्याधुनिक साधनसामग्री उपलब्ध नसतानादेखील त्याकाळी हा एवढा प्रचंड उद्योग ज्यानं आरंभिला तो केवढा असीम कर्तृत्ववान असेल? गडावर अपार प्रेम करणाऱ्या त्या दुर्गप्रेमी नृपाळानं असे अनेक गड अंगडेटोपडे घालून सजविले. हे सारं करताना किल्ल्याचं महत्त्वही त्यानं इतरांस सांगितलं. - "जैसा कुळंबी शेतात माळा घालून शेत राखतो असे किले राज्यास रक्षक आहेती. तारवास खिळे मारून बळकट करितात तशी राज्यास बळकटी किल्ल्यांची आहे." त्या नृपतीला लागलेल्या ह्या एका वेड्या छंदापायी कोषागारं रिकामी होऊ लागली तेव्हा मोरोपंत पेशवे नि विसाजीपंत मुजुमदार या दोघांनी एक तक्रार नोंदविली. त्यावर छत्रपतींनी दिलेलं उत्तर मोठं मार्मिक आहे. तक्रारीचं निरसन करताना महाराज म्हणतात - "आपणास धर्मस्थापना व राज्यसंपादन करणे, सर्वांस अन्न लावून शत्रुप्रदेश न होय ते किल्ल्यामुळे होते. सर्वांचा निर्वाह आणि दिल्लींद्रासारिखा शत्रू उरावर आहे, तो आला तरी नवे जुने तीनशे साठ किल्ले हजरतीस आहेती. एकेक किल्ला वर्ष-वर्ष लढला तरी तीनशे साठ वर्षे पाहिजेत."

या युक्तीची सत्यता कसाला लावण्याची पाळी दुर्दैवानं महाराष्ट्रावर आली. १६८३ ते १७०७ पर्यंतच्या काळात मोंगल-मराठा संघर्षात या किल्ल्यांनी बजावलेली ऐतिहासिक कामगिरी शिवप्रभूंच्या दुर्गप्रेमाची यथार्थता पटविण्यास पुरेशी आहे. राजकारणी धुरंधरांच्या अंगी अत्यावश्यक असावी लागणारी दूरदृष्टी छत्रपतींच्या ठायी होती हे कोणी नाकारू शकेल काय ?

- रविवार दि. १ जुलै १९७८, महाराष्ट्र टाईम्स

● ○ ●



नाणेघाटाचा प्रवेशमार्ग

छाया - संतोष वडे

# ५ अंगारयात्रा

होळी पौर्णिमेचा दिवस...! वेळ भर दुपारची...! वेळूच्यां करंडी डालग्यात कोंबड्या कोंबाव्यात तशी माणसं यश्टीत कोंबलेली...! चेंगराचेंगरीत घामानं चिम्ब भिजलेली...! अवघ्या कलकलाटी हायूहूय करून त्रागलेली...!

भरधाव धावणाऱ्या यश्टीनं तासाभरात भर वैशाख-वणव्यात वैशाखरे गावी पोचतो... यश्टीतून पायउतार होतो... नाणेतळे ओलांडून आडरानात घुसतो नि उन्हाच्या भर कडाक्यात बैलगाडीच्या कच्च्या सडकेनं चालू लागतो...!

रणरणीत उन्हाची टळटळीत दुपार...! नजर भाजणारी रखरखीत उन्हावळ...! चहूअंगी अंगार ओकणारी... अवघी झाडावळ करपवून टाकणारी... अंतर्बाह्य काहिली करणारी...! पानढाळीचे दिवस... सावली शोधणारी झाडं...! अंगावरील पर्णभार झटकून उघडीबोडकी दिसणारी वृक्षावली चहूअंगी वरखालून होरपळत असलेली...वरून कळाकळा ओकणाऱ्या आगीत सर्वांगी जळत असलेली...! शेतभाजणीच्या राबासाठी भूमिपुत्रांनी त्या वृक्षावलीचे सारे अवयव छाटलेले... सर्वांगी विद्रूप दिसणारे घाव असह्य झालेले.. परोपकारासाठी वाळवी लागल्यागत ते सारे वृक्षराज चंदनाप्रमाणं झिजून झिजून वठलेले...! देहाचे सांगाडे होऊन तग धरून उभे असलेले हे वृक्षराज पावसाळ्यात कसे भरलेले नि भारलेले दिसतात...! या दिसात अंगार पिणाऱ्या वनश्रीच्या अंगाप्रत्यंगातून पावसात मात्र शृंगार ओसंडताना दिसतो...! उष्म्याच्या गडद काहिलीत आपल्या फांदोऱ्यांचे पंख पसरून थकल्याभागल्या पांथस्थांना सुखावली देणारे हे वृक्ष याक्षणी तसे दक्ष असतात पण रुक्ष वाटतात... अंगाराचे भक्ष्य ठरतात... आपलं लक्षं वेधून घेतात...!

वनखात्याचा जंगलभाग मात्र हरितक्रांतीनं सजलेला... अधूनमधून एखाद्दुसरा पलाशवृक्ष रक्तरंजित क्रांतीनं पेटलेला... त्या अग्निपंखांवर रानपाखरांचा एक थवा भिरभिरत असलेला...!

उर्जेच्या भट्टीत तापून... तावून सुलाखून अधिकाधिक काळा

पडत चाललेला सह्याद्री...! भेगाळलेली नि उसासणारी तृषार्त भूमी...! वायुलहरीसवे येणाऱ्या उष्ण झळा नि दूरवर नजरेला भूल पाडणारी मृगजळं. आकाशाच्या पालथ्या कढईखाली धगधगणाऱ्या भट्टीत होरपळणारं सारं चराचर विश्व...!

समोर इथूनतिथून उभी असलेली सह्याद्रीची एक भलीमोठी काळीकभिन्न कातळरांग...! उत्तुंग... बेलाग... नि दुर्गम...! जणू सह्याद्रीचा कणाच...! नजरेसमोर मान तुकवलेल्या नागफणी टोकागत उभा दिसणारा भीमकाय शरीराचा तो अजस्त्र कडा नि त्यापल्याडून हळुवारपणं डोकावणारा तो दुर्ग जीवधन...! हे असले कडे समोर खडे दिसले की, त्यांच्या अंगाखांद्यावर सहजगत्या बागडणाऱ्या... गनिमांच्या वाटा बंद करणाऱ्या... नि स्वराज्याचं रक्षण करणाऱ्या त्या इमानी... निष्ठावंत मावळ्यांचं कवतिक मनी दाटून येतं...! छातीची ढाल करून नि:स्वार्थी स्वामीनिष्ठा मनोमनी पुजणाऱ्या त्या मराठ्यांची शौर्यगाथा नि या सामोऱ्या, छाती रुंदावून ताठ मानेनं उभ्या असलेल्या कड्याचं रांगडेपण पाहिलं की नकळत मनीच्या गाभाऱ्यात शब्द घुमू लागतात-

**'उसळणाऱ्या लाटांकडून पिसाळलेली आयाळ घ्यावी**
**नि सह्याद्रीच्या कड्यांकडून छातीसारखी ढाल घ्यावी...!'**

सह्याद्रीच्या या शिखरसुळक्यांचं विस्मयानं थक्क करणारं एक आगळंवेगळं रूप दिसतं... बारकाव्यानं निरीक्षिलं नि डोळेभरी न्याहाळलं म्हणजे हे बलदंड लोहपुरुष आपल्या माना तुकवल्यागत भासतात... आत्ता याक्षणी समोर आदरानं झुकलेल्या त्या कड्याचा माथा पाहून, सह्याद्रीविषयी कुठंतरी पुराणांतरी वाचलेली एक गंमतीदार दंतकथा आठवली...! फारा फारा वर्षांपूर्वी म्हणे कोणे एके काळी, सह्याद्रीची उंचीदेखील उत्तुंग हिमालयाप्रमाणं आकाशाला भिडलेली होती... दररोज उष:काली आपल्या सात घोड्यांच्या सोनेरी रथातून आनंदयात्रेला निघणाऱ्या भगवान सूर्यनारायणाला या सह्याद्रीच्या पर्वतशिखरांचा अडथळा होत असे. विचारांती त्या दिनकरानं, गिरिशिखरांचे जे आध्यात्मिक गुरुवर्य अगस्तीमुनी यांचेकडं याविषयीची रीतसर तक्रार नोंदवली नि त्यांचा सल्ला विचारला. रास्त तक्रार ऐकून तो महामुनी तात सह्याद्रीकडं जायला निघाला. मुनीवर्य आपल्याकडं येतंहेत हे पाहताच सह्याद्रीच्या समस्त शिखरांनी, त्यांना आदर दाखविण्यासाठी म्हणून आपापल्या माना खाली तुकवल्या... त्यावेळी त्यांच्या समीप येऊन अगस्तीनं म्हटलं - "शिष्यगण हो! तुमचे क्षेमकुशल असो...! येतो मी...! मात्र,

मी पुनश्च येईपर्यंत तुम्ही आता ज्या स्थितीत आहात त्याच स्थितीत निश्चल रहा...! तथास्तु...!'' इतकं बोलून अगस्ती जे निघून गेले ते आजतागायत परतलेच नाहीत. सह्यकडे मात्र अजूनही त्यांची वाट पाहात माना तुकवलेल्या अवस्थेतच आहेत...!

सह्याद्रीमंडलात तशा घाटवाटा पुष्कळ...! काही प्राचीन तर काही अर्वाचीन...! पण या समस्त घाटांपैकी सातवाहनकालीन मुद्दामून बांधून काढलेला नाणेघाट हा अतिशय जुना...! अगदी दोन हजार वर्षे जुना...! कोकणातून वरचढ घाटमाथी जाण्याचा अगदी जवळचा मार्ग...! या नाणेघाटाच्या माथ्यापासून पायापावेतो चढउताराचा मार्ग मजबूत दगडधोंडींनी पक्का बांधून काढलेला... जागोजागीचा उभार खडक उभा तासून काढलेला.. उभार चढउतार त्रासदायक होऊ नये म्हणून सोपा मार्ग नागमोडी वळणांनी जिथंतिथं वळवलेला..,! अदमासे पाचशे मीटर उंचीच्या या दुर्गम डोंगरकड्यातून सुगम केलेला हा मार्ग अजूनही सातवाहनांची महती गात अखंड वाहतो आहे...!

सातवाहन कुल हे महाराष्ट्रातील अति''.चीन व ज्ञात राजकुल...! इ. स. पूर्व पहिलं शतक ते इ. स. तिसऱ्या शतकाचा मध्य... अशी अदमासे चार साडेचारशे वर्षे हे राजघराणं राज्य करीत होतं. सातवाहन हे मूळचे मराठी...! वैदिकधर्मीय व सहिष्णुवृत्तीचे राजे...! त्यांचा उदय पैठणात झाला. पैठणचं पूर्वीचं नाव प्रतिष्ठान...! हीच या राजकुलाची राजधानी...! तथापि तद्नंतर हे राजघराणं आंध्रप्रदेशात गेलं नि तिथंच स्थायिक झालं. राजा सिमूक हा या कुलाचा आद्य प्रजापती...! पुढं त्याच्याच कुळी सातकर्णी हा राजा नि नागनिका ही राजमहिषी झाली... या कालखंडात महाराष्ट्राच्या जडणघडणीत या कुलाचा फार महत्त्वाचा नि सिंहाचा वाटा आहे...!

शिवकाल हा महाराष्ट्राच्यो स्वातंत्र्यमंदिराचा कळस तर गौतमीपुत्र सातकर्णीचा अतुलनीय पराक्रम हा या यशोमंदिराचा पाया...! महाराष्ट्रावर सुमारे चार शतकं स्थिरावलेलं मुसलमानी साम्राज्य, शिवरायांनी आपल्या शौर्यधैर्यचातुर्यानं नामशेष केलं नि स्वराज्याची स्थापना केली. तद्वत सातवाहन राजा गौतमीपुत्र सातकर्णी यानं शक, यवन नि पल्हव या परकीय शत्रूंचा नायनाट करून महाराष्ट्राला त्यांच्या आक्रमणापासून मुक्त केलं नि स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवली...!

पुढं ही मुहूर्तमेढ 'प्रतिपश्चंद्रलेखेव वर्धिष्णु' झाली...! नासिक हे सातवाहनकालीन फार मोठं व्यापारी केंद्र होतं. येथील बौध्दकालीन

लेण्यांमधील क्रमांक तीनच्या शिलालेखात, गौतमीपुत्र सातकर्णीनं अकरा प्रदेश जिंकून महाराष्ट्र संस्कृती नर्मदेपर्यंत पोचविल्याची नोंद केली आहे...!

या प्रजाहितदक्ष नृपाळानं ठिकठिकाणी जनकल्याण साधलं आहे...! जुन्नरच्या उत्तरेला तीसबत्तीस कि. मी. अंतरावर या राजकुलानं बांधून काढलेला नाणेघाट हा पूर्वीचा व्यापारी मार्ग...! या व्यापारी मार्गाची मूळ निर्मिती सातवाहनांचीच...! नालासोपारा-कल्याण-जुन्नर ते पैठण असा हा राजमार्ग...! नाणेघाट म्हणजे नालासोपारा-कल्याण अशा बंदरांचा जुन्नरशी जोडलेला दुवाच...! व्यापार-उदीम करणाऱ्या व्यापाऱ्यांस, या मार्गावर जिथं शक्य झालं तिथं सह्याद्रीच्या उरीपोटी गुहाघरं खोदून पाणपोईचीदेखील व्यवस्था केली गेली होती. ती आजही पाहावयास मिळते...!

नाणेघाटाचा पायथा कल्याणपासून डांबरी सडकेनं चौसष्ठ कि.मी. नि माथा जुन्नरपासून फक्त बत्तीस कि.मी. अंतरावर आहे. या प्राचीन मार्गाच्या तोंडाशी संरक्षक पहारेकरी आहे दुर्ग जीवधन...! संपूर्ण नाणेघाटाची संरक्षक फळी बनलीय् एकूण चार किल्ल्यांची... शिवनेरी, हडसर, चावंड नि जीवधन...!

खेटून बसलेल्या दोन आवळ्याजावळ्या कड्यांमधून पोखरलेली खुद्द नाणेघाटाची नळी आहे साठ मीटर लांब नि जागोजागी दोन ते पाच मीटर रुंदारुंद...! ऐन नळीच्या मुखाशी आहे एक दगडी रांजण...! तो आवर्जून पाहण्याजोगा...! अदमासे चार फूट व्यासाचा नि पाच फूट उंचीचा हा भलामोठा रांजण. ही पूर्वीची कॅशबॉक्स...! जकातकर रूपानं यात तत्कालीन कार्षापण नावाची नाणी टाकली जात असत म्हणून या घाटाचं नाव नाणेघाट असं पडलं असावं...!

नळीच्या तोंडाशी घाटाच्या ऐन माथ्यावर गुहाघरं आहेत... पाणटाकी आहेत... पैकी एका ऐसपैस मोकळ्याचाकळ्या गणेशगुंफेत आहेत काही प्रतिमांचे फक्त अवशेष...! त्या प्रतिमांचा क्रम असा - राजा सिमुक, देवी नायनिका, राजा सातकर्णी, राजकुमार वेदिश्री नि सतीश्री, नायनिकेचा पिता महारठी गणकयिरो...! आज त्यांपैकी काही मूर्तींचे फक्त पायच शिल्लक असलेले दिसतात...! पायांखाली नामपट्टीकाही आहेत... शिवाय शेजारील भिंतीवर ब्राह्मीलिपीतील कोरलेला शिलालेख अतिशय महत्त्वाचा...!

या लेखारंभी - धर्म, इंद्र, संकर्षण, वासुदेव, चंद्रसूर्य, वरुण, यम, कुबेर, कार्तिकेय, या वैदिक नि पौराणिक देवतांना नमन केले आहे...! पतिनिधनानंतर नायनिकेचा पुत्र वेदिश्री गादीवर असताना हा

लेख कोरला गेला असावा... कारण प्रस्तुत लेखात पुढं - 'वेदिसिरिस रमो' असे शब्द आहेत... नंतर वीरस, सूरस, अप्रतिहसचक्कस आणि दखिनापथपतितो (म्हणजे-आंध्र-कर्नाटक नि महाराष्ट्र मिळून एकछत्री राज्याचा अधिपती) इत्यादी वेदिश्रीची विशेषणे आली आहेत. राणी नायनिकेनं केलेल्या यज्ञांची नावे या लेखी सापडतात.. ती अशी- अश्वमेध, राजसूय, आग्न्यधेय, अन्वारम्भणीय, गवामयन, भगालदशराम, आप्तोर्याम, अंगिरसामयन, गर्गभिराम, अंगिरसभिराम, छंदोगपवमानभिराम, त्रयोदशराम, दशराम... इत्यादी!

या सर्व यज्ञांच्या वेळी ब्राह्मणांस अनेक गावे, हत्ती, घोडे, गायी तसेच लक्षावधी कार्षापण नावाची तत्कालीन नाणी दानदक्षिणेखातर दिली गेली असं त्या शिलालेखी नमूद करून ठेवलंय्... !

ही सारी इतिहासवजा माहिती आठवत आठवत नाणेघाटाचा उभा चढ चढतो आहोत... दिवस मावळतीला झुकला आहे... रंगांच्या विविध छटांनी पश्चिमेला रंग चढला आहे... संधिप्रकाशात एका शेवरीच्या तरुतळी विसावलो आहोत... मजसवे आहेत प्रभाकर मंत्री नि रवींद्र भावे...! रवींद्र भावे हा शिवसमर्थ चरित्रानं भारावलेला... व्यवसायानं सिव्हिल इंजिनियर पण छंद मात्र सह्याद्रीच्या अंगाखांद्यावरून बागडण्याचा...! पाठी पाठपिशवी नि हाती कॅमेरा घेऊन हा केव्हाही घरून निसटतो नि सह्यगिरीची दऱ्याखोरी भटकत असतो... जे जे रौद्ररम्य दिसेल ते ते नजरेनं नि कॅमेरानं टिपून घेतो...! दुसरा प्रभाकर मंत्री...! यांचा मूळ पिंड चित्रकाराचा...! प्रभाकर मंत्री म्हणजे कलाक्षेत्रातील प्रचंड माहितीनं भरलेलं कलाभांडार...! त्यानं नुसतं बोलत रहावं नि आपण फक्त कानी जीव एकवटून ऐकत रहावं... अखंड मिष्ठास वक्तृत्वाचा अक्षय झराच...!

ही वाटदेखील दोन हजार वर्षांपासून अशीच अक्षय वाहत आली आहे... मनी येतं, कोण कोण चढले असतील या वाटेनं...? कोण कोण उतरले असतील या मार्गानं...? कधी फंदफितुरी करणारे स्वार्थी गुन्हेगार तर कधी तळहाती शीर घेऊन लढणारे नि:स्वार्थी शिलेदार...! कधी व्यापारउदीम करणाऱ्या लमाणांचे तांडे तर कधी बौध्दभिक्षुकांचे संघ...! कधी दरोडेखोरांच्या टोळ्या... कधी यात्रेकरूंचे जथे... कधी प्रवाशांचे चमू तर कधी बंदुकींच्या कडेकोट बंदोबस्ती खजिन्याच्या संदूका...आणि-आणि कदाचित्, कल्याणच्या सुभेदाराचा 'खजिना' चढला असेल तोही याच वाटेनं...!

मनीं असंख्यं विचारांची प्रश्नावली गुंफीत अखेर तब्बल साताठ तासांची पायपीट करून रात्रौ आठच्या सुमारास गणेशगुंफेत येऊन डेरेदाखल झालो...!

गुंफेच्या पुढील ओसरीवर विसावलो आहोत... कुंडातील थंडगार पाण्यानं सर्वांग धुतल्यामुळं दिसाभराचा शिणोटा काहीसा उणावला आहे... दुपारी हा दुर्घट घाट चढताना घामानं चिम्ब भिजलो होतो... आत्ता याक्षणी धवल दुधाच्या धारांत सचैल न्हातो आहोत...!

वर आकाशाच्या गोल घुमटात इत:स्तत: विखुरलेले तारकापुंज... त्या महाप्रचंड घुमटाच्या चाळणीतून हळुवारपणं झिरपणारं शुभ्रधवल चांदणं भुईवर सांडलेलं... समोर पसरलेल्या अथांग भूमंडली, जागोजागी काजव्याप्रमाणं लुकलुकणारी असंख्य दिव्यांची टिंबावली... खवळलेल्या सागराला स्पर्श करून सह्याद्रीला भिडणारा पश्चिमवारा... नि उत्तरेस अढळपदी विराजमान दिसणारा ध्रुवतारा...! झाडांची कुजबुज नाही की पक्ष्यांचं हितगुज नाही... एवढी नि:शब्द शांतता...! ब्रह्मानंदी टाळी लागावी एवढी नीरव शांतता नि निखळ एकांत...!

इतक्यात ध्यानीमनी नसताना अचानक, एखाद्या काळोखभरल्या झाडावळीत काजव्यांची दिलखेचक रोषणाई फुलावी तद्वत् त्या धुसर भरल्या सुदूर प्रदेशी अग्निज्योतींची दीपावली प्रज्वलित झाली...! रात्रीच्या गर्भाला जणू अग्निपंख फुटले...! खेडोपाडीच्या, गावोगावीच्या नि नगरवस्तीतल्या साऱ्या होळ्या एकापाठोपाठ एक हारीनं पेटल्या...! या इथून एवढ्या उंचावरून इवल्या इवल्या ज्योतीएवढाल्या दिसणाऱ्या... अंधुकभरल्या सुधूरवटीं गाभाऱ्यात दुरून दिसणाऱ्या समईतील ज्योतींप्रमाणं...!

दृष्य तर मोठं विलोभनीय आहे... नेत्रज्योतींनी प्राणज्योती टिपून घेण्याजोगं आहे... डोळीयांच्या शिंपल्यात साठवून ठेवण्याजोगं आहे...! एकाचवेळी एकाच ठिकाणाहून याचि देही याचि डोळा पाहिलेली ती अग्नियात्रा केवळ अपूर्व नि चिरस्मरणीय...! अधूनमधून आयुष्यात केव्हातरी असले हे सोनेरी क्षण येतात नि सारं जीवनच कसं मंत्रागत भारून जातात...! यावेळी समर्थ रामदासांच्या उक्तीत थोडासा बदल करून म्हणावंसं वाटतं-

**'दास डोंगरी राहतो**
**यात्रा अग्निची पाहतो'**

तो समोरचा अग्निउत्सव पाहाता पाहाता मनी आलं... याच दिवसात पलाशवृक्ष लालभडकमिश्रित केशरिया रंगानं फुलतो... गच्चदच्च


रानीवनी असा हा फुलांनी बहरलेला-डवरलेला पळस डोळेभरी न्याहळण्यात एक अनोखा आनंद असतो...! पळस म्हणजे रानीवनी दिवसाढवळ्या आग ओकणाऱ्या तेज:पुंज मशालीच... आगडोंबांतून फुललेले अग्निकोंब... अग्निफुलं... जणू त्यागाची अग्निज्वालाच...! इंग्रजीत याला 'फ्लेम् ऑफ दी फॉरेस्ट' असं म्हटलं जातं. कालिदास आपल्या ऋतुसंहारात म्हणतो- 'वनी फुललेल्या अग्निसारख्या लाल फुलांनी पलाशवृक्ष लवलेले आहेत. त्यामुळं भूमी तांबडे वस्त्र परिधान केलेल्या एखाद्या नववधूप्रमाणं दिसते आहे...!' गाथासप्तशतीतदेखील या वृक्षाचा उल्लेख सापडतो. गाथासप्तशती हा ग्रंथ सातवाहनकालीन... महाराष्ट्री-प्राकृतात रचलेला आद्यकाव्यग्रंथ... त्यातील एका गाथेत म्हटलंय्- 'पोपटाच्या चोचीप्रमाणं लालभडक अशा पलाशवृक्षांनी पृथ्वी शोभायमान झाली आहे... जणू बुध्दाच्या चरणांशी वंदन करण्यासाठी लोटांगण घालणाऱ्या भिक्षुसंघासारखं हे दृष्य दिसतं...!'

दिवसा तांबडं वस्त्र परिधान करून नववधूप्रमाणं भासणारी ही भूमी आता मात्र चंद्रकळा नेसून रोमरोमी फुललेल्या अग्निज्योतींमुळं लजवंती दिसते आहे...! अगणित चंद्रज्योतींनी उजळलेल्या नि चंद्राचं बिलोरी झुंबर लटकलेल्या आभाळाच्या गाभाऱ्याखाली चाललेल्या त्या अग्निउत्सवापुढं मी नतमस्तक झालो...! पेटत्या दुपारच्या अंगारयात्रेची सांगता या अशा अग्निउत्सवानं आनंददायी ठरली... फळीफुली बहरून आली...!

● ○ ●

भू-प्रवास
दा. क्र. ७४६
२६७५५

## ६ तीनशे वर्षांनंतर पुन्हा दुर्ग 'लिंगाणा'वर चढाई



'दुर्ग लिंगाणा'

छाया - तु. वि. जाधव

*सोमवार दि. २५ डिसेम्बर १९७८ रोजी शिवतीर्थ किल्ले रायगडासमोरच्या दुर्ग लिंगाणावरील तीनशे फूट उंचीचा उत्ताल टेंभा, आज जवळजवळ तीनशे वर्षांनंतर प्रथमच चढून जाण्याचा विक्रम एकूण चौदा तरुण गिर्यारोहकांनी केला...! दुपारी बारा वाजता त्या बेलाग सुळक्याच्या माथी पहिलं पाऊल टेकताच त्या शिवलिंगास अचानक लागलेला वणवा... नि तदनंतर रात्रभर चहूअंगी भडकलेल्या अग्निनारायणाचं ते आकांडतांडव... त्यातच रात्रीच्या मिट्ट काळोखात रायगडावरून दिलेला मशालीचा शिवकालीन इशारा...! कड्याच्या गर्भातील अंधाऱ्या कुबट गुहेत तब्बल वीस तास जीवाच्या आकांतानं चीडीचूप अडकून पडलेले गिर्यारोहक... नि दुसऱ्या दिवशी मृत्यूच्या त्या कराल दाढेतून सुदैवानं सहीसलामत झालेली त्यांची सुटका...! त्या अविस्मरणीय भटकंतीचं हे एक चित्तथरारक शब्दांकन...!*

शिवतीर्थ किल्ले रायगड चहूअंगी असंख्य पर्वतशिखरांनी नि उत्तुंग बेलाग कड्यांनी वेढला आहे. उत्तरपूर्व दिशी तर ही निसर्गनिर्मित तटबंदी अधिकच भक्कम नि बुलंद ठरली आहे. या दुर्गम, अभेद्य नि अजिंक्य वेढ्यात उत्तरपूर्वेच्या नेमक्या कोनाड्यात भोवतालच्या डोंगरदाटीतून एक सुळका मस्तक उंचावून उभा आहे छाती रुंदावून एखाद्या पोलादी पुरुषासारखा. उभा आहे राजधानीकडे येणाऱ्या घाटावर नजर रोखून रातदिस खडा पहारा करणाऱ्या एखाद्या बरखंदागत... !

रायगडच्या उत्तरेकडील काळनदीच्या तीरी वसलेले वाघेरी नामे ग्राम मागे टाकून पाणेगाव ओलांडले की नदीला येऊन मिळणारा एक भला मोठा रुंद ओढा लागतो... हा दगडाळ ओढा पार केला की समोरच्या डोंगरातून पुढे आलेल्या एका टेपाच्या चढणीस प्रारंभ होतो... जवळजवळ निम्मा अधिक चढ चढून गेल्यावर लागते गडाखालील वस्ती... हिचे नाव लिंगाणामाची...

इथपासूनची वाट अतिशय दुर्गम आहे... वाट अशी नाहीच... मुरमाटीचा चक्क घसाराच... असा हा अदमासे हजार एक फूट उंचीचा अवघड घसारा मोठ्या प्रयासाने कसाबसा चढून गेले की आपण गडाच्या तटाखालील खडकाच्या भिंतीजवळ येऊन थडकतो... पन्नासपाऊणशे फूट उंचीच्या या भिंतीच्या ऐन गर्भात कोरलेली एक भली मोठी गुहा नि इथूनच शंभरएक पावलांवर खोदलेलं पाण्याचं एक टाकं... इथून पुढचा मार्ग मात्र अत्यंत अवघड... पुढची दुर्गम वाट उभार कड्याच्या पोटाखालून टोकदार खडकाच्या धारदार खवलींचा धोका पत्करीत नि अस्ताव्यस्त पसरलेल्या बख्खळ दगडधोंडी ओलांडीत थेट वर चढणाऱ्या पायऱ्यांपर्यंत येऊन पोहोचली आहे... साताठ पायऱ्या चढलो की ध्यानी येतं वरचा दगडी जीना साफच तुटलेला आहे... शेजारीच उगवलेल्या एका उंबराच्या झाडाचा आधार... कड्याला छातीपोट भिडवून एक अर्धचंद्राकृती वळसा... उखळलेल्या दगडी पायऱ्यांचा जीवघेणा चढ... नि पुढं अंगावर आलेल्या कड्याच्या कपारीतून वर चढलेली निसरती अरुंदवजा वाट... या साऱ्या अडचणींतून मोठ्या मुष्किलीनं मार्ग काढीत मुंगीपावलांनी आस्तेकदम वर आले की आपण २९६९ फूट उंचीवरील २५०० चौ. फूट क्षेत्रफळ असलेल्या किल्ल्याच्या ऐन पठारावर येऊन ठेपतो.

साक्षात शिवलिंग... अजिंक्य नि उत्तुंग. चहूअंगी मुद्दामहून तासल्यागत भासणारं... पाहताक्षणीच देहभान हरपायला लावणारं... आकाशावेरी गेलेलं

हे दोनशे फूट उंचीचं सरळसोट शिवलिंग आज कित्येक वर्षं उन्हापावसाचे नि थंडीवाऱ्याचे जबरदस्त तडाखे खात इथे ताठपणे उभे आहे...!

या लिंगाकार सुळक्याच्या पायथ्याशी दर्शनीभागीच त्याच्या ऐन गर्भाशयात कांगारूच्या पोटपिशवीसारख्या दिसणाऱ्या दोन प्रशस्त गुहा आहेत. हीच शिवकाली कैदी ठेवण्याची मुख्य जागा...!

सह्याद्रीच्या माथी भूषणावह ठरलेले हे किल्ले केव्हा बांधले गेले हे ठरवायला या कोठ्या-गुहा-टाक्यांचे खोदकाम हे एक मोठे नामांकित प्रमाण... प्रत्येक किल्ल्यावर पाण्याचा साठा नि धान्यकोठारे काळ्याकभिन्न कातळात पोखरलेली दिसतात... ज्या गडावर हे दोन्ही प्रकार आढळतात तो किल्ला हजारो वर्षं जुना... त्यातून अवतीभवतीच्या डोंगरकपारीत जर बौद्धकालीन लेणी असतील तर हे प्रमाण अगदी वज्रलेप... अस्तु! तर या लिंगाकार टेंब्याच्या समोरील मोकळ्याचाकळ्या जागी जननी सोमईचे मूळ स्थान, पश्चिमेस जीभेसारख्या लांबुडक्या सपाटीवर जीभीचा पहारा... निगडीचा पहारा... दोनचार दगडी चौथरे नि मागील अंगास कड्याच्या कुशीत घुसलेलं थंडगार पाण्याचे एक सुबकसं टाकं... यापलीकडं इथं नाव घेण्याजोगे काहीही अस्तित्वात नाही. इतिहासाने नोंदलेले पहाऱ्याचा बुरूज, टप्प्याचा बुरूज, हौद, सदर, सरकारवाडा, प्रवेशद्वार नि १७१७ मध्ये राजबंदी ठेवण्यास बांधलेली नवी कोठी इत्यादी सारं सारं काही जमीनदोस्त झाले आहे... काळाच्या उदरी गडप झाले आहे.

दुर्ग लिंगाणा हे शिवकाली मुद्दामहून दुरुस्त करवून घेतलेलं रायगडचं कारागृह... शिवप्रभूंनी रायगड घेतल्यावर लिंगाणा हस्तगत केला... त्यास तटबुरूजांनी बंदिस्त केला... अंगडंटोपरं घालून सजवला... नि नामकरण केलं दुर्ग लिंगाणा...! मोऱ्यांचा पराभव केल्यानंतर महाराजांनी हा किल्ला बांधला... असा उल्लेख ९१ कलमी बखरीत आढळतो...!

दुर्ग लिंगाणा हा रायगडचा पूरक... महसूलाचा एक सलग भाग... इथले वार्षिक उत्सव, दुरुस्ती, डागडुजी, शाकारणी, राखण, गस्त, शिबंदी, कामकाज, व्यवस्था इत्यादींच्या जमाखर्चाचा अंतर्भाव पूर्वी रायगडच्या जमाखर्चात होत असे...!

इ.स. १७०७ पर्यंत रायगड व त्याचा परिसर येथील मोंगली अधिकारी या नात्यानं राजा शिवसिंग हा कारभार पहात होता. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर शाहूराजे सुटून आले. स्वराज्याचे कायदेशीर मालक झाले. पण नंतर अनेक राजकीय आपत्तींशी झुंजता-झुंजता विविध उद्योगात

गुंतलेल्या शाहूंना या राजधानीकडे लक्ष देण्यास १७३३ साल उजाडलं. याच सालच्या डिसेंबर महिन्यात आनंदराव सुमंत यांचेमार्फत शिद्दी-मराठे यांच्यात झालेल्या तहानं रायगड तालुका मराठ्यांकडं आला. तब्बल पंचवीस वर्ष सतत धुमसत असलेले हे शिद्दी-मराठे प्रकरण शेवटी या करारानं मिटलं नि छत्रपतींच्या वतीनं पोतनीस कारभारी झाले. पुढं माधवराव पेशव्यांना रायगड तालुक्याची सनद मिळाली नि नारायणराव पेशव्यांच्या कारकिर्दीत दि. २७ फेब्रुवारी १७७४ रोजी पोतनीसांच्या येसजी चांदेलकर या हवालदारानं लिंगाणा पेशव्यांच्या (आप्पाजी हरीच्या) ताब्यात सोपविला. तद्नंतर १८१८ साली रायगड पडला नि लगेच हे शिवकालीन कारागृह कर्नल प्रॉथरच्या विजयी सैन्यास बिनविरोध शरण गेलं. कित्येक वर्षे राजकैद्यांच्या सुखदुःखाशी समरस झालेला हा स्वराज्याचा राखणदार अखेर इंग्रजांचा राजबंदी ठरला!

रायगड प्रेमिकांनी रायगड चहूअंगी पहावा; अगदी डोळेभरी न्याहाळावा. पण दुर्ग लिंगाणावरून रायगड पाहिल्याशिवाय रायगड पूर्ण पाहिल्याचं समाधान मिळत नाही हे अगदी निर्विवाद! डग्लसनं आपल्या 'बुक ऑफ बॉम्बे' मध्ये म्हटलं आहे - 'रायगडचे अचूक नि स्पष्ट दर्शन तोरणा किल्ल्यावरून होते पण तसं पाहिलं तर लिंगाणावरून रायगड चांगलाच दृष्टिक्षेपात येतो. तोरण्यावरून रायगडचे उध्वस्त अवशेष दिसत नाहीत पण इथून मात्र ते स्पष्ट दिसतात. रायगडचे अभेद्यत्व नि दुर्गमत्व या इथून चट्दिशी ध्यानी येतं. टकमक ते भवानी टोकापर्यंतचा जवळ-जवळ तीन मैल लांबीचा नि दोन हजार फूट उंचीचा एका सरळ दोरीत तुटलेला काळाकभिन्न कडा फक्त या इथूनच एका दृष्टिक्षेपात दिसू शकतो. इथून रायगड कसा दिसतो? भवतीच्या डोंगरदाटीत दबा धरून बसलेल्या एखाद्या वाघासारखा! त्यास पहावे सकाळी - सकाळच्या कोवळ्या सोनेरी किरणांचा मस्तकी अभिषेक होताना, विजयी मुद्रेनं प्रसन्न स्मित करताना. त्यास पहावे दुपारी, वरून मस्तकी कळाकळा आग सांडताना, चहूअंगी क्रोधानं खदिरांगारासारिखा उसळताना. त्यास पहावे सायंकाळी-, सायंकाळच्या उधळलेल्या केशरी रंगाच्या धुरसट संधिप्रकाशात एका अनामिक वेदनेने व्याकुळ होताना... नि त्यास पहावे चांदण्या रात्री-, या इथल्या काळोखभरल्या खोल गहिऱ्या कारागृही एका रात्री मुक्काम करून चांदण्यात सचैल न्हात असलेला रायगड, हरवलेल्या अनुपम्य सुखाचे सुगंधी स्मरण करीत विषण्णतेनं पहुडलेला रायगड, नि एखाद्या तपस्व्यासारखा ब्रह्मानंदी टाळी लागल्यागत दिसणारा

रायगड! पुष्कळ काही सांगून जातो. मनीचं सारं बोलून जातो.

चांदण्या रात्री गड भटकण्यात एक अनोखा आनंद असतो. एक सुखदसा थरार असतो. एखाद्या निर्जन स्थळी नीरव शांततेत नि एकांती बसून तादात्म्य पावलं की अशावेळी गड बोलका होतो. भरभरून बोलू लागतो. फार फार गूढ बोलतो. अगदी तळवटातलं बोलतो ते ऐकावे. जीव कानी एकवटून... ऐकावे मनाचे कान करून. एकदा का असा सुखसंवाद साधला की मग आपण आपले नसतो. सर्वस्वी गडाचे होऊन जातो. अन् मग दुसऱ्या दिवशी गड सोडताना एक अनामिक हुरहूर लागते. मनी दाटून येते. पावलं जडावतात. इथून जाऊच नये असं वाटू लागतं. पण ते जमणार कसं? आमच्या तात्यासाहेब केळकरांनी सांगून ठेवलंय - 'इतिहासाच्या पर्वतशिखरांवर ताजी हवा घेत सदैव रहाता येत नाही. राहून चालतही नाही. वर्षाचे बारा मास या पर्वतशिखरांच्या माथी घालवता आले नि खालच्या जाचातून मुक्त होता आले तर ते कुणासही हवेच आहे. पण ते जमणार कसे?'

अशा या दुर्ग लिंगाणावरील त्या भव्यदिव्य नि सरळसोट उभ्या असलेल्या शिवलिंगापुढं एक दिस सारेच उभे ठाकलो...! हे एक बेजोड आव्हान आहे...! या महादेवाच्या मस्तकावरील गंगेचं दर्शन घेणारा एखादा भगीरथ हे बेजोड आव्हान स्वीकारू शकेल काय...? अशी दवंडी गेली कित्येक वर्षे ऐकत होतो...! अनेक नामवंत गिर्यारोहकांनी कित्येक वेळा हे आव्हान स्वीकारून हाय खाल्लेली... हे त्यांचं अपयश धुऊन काढण्याचं सद्भाग्य विलेपार्ले येथील 'हॉलिडे हायकर्स क्लब'च्या चौदा सदस्यांच्या पदरी पडलं... ही आम्हास अभिमानास्पद गोष्ट...!

या शिवलिंगाच्या नेमक्या मागील बाजूस एकूण आठ गुहा आहेत. गतवर्षी रणवीर सिंग या पट्टीच्या गिर्यारोहकासवे या तपस्व्यास थोडंबहुत चाचपताना या गुहांचा शोध प्रथमच लागलेला... कड्याच्या ऐन गर्भात कोरलेली पाणटाकी नि या गुहांकडं जाण्याचा मार्ग अत्यंत अवघड नि बिकट... चिंचोळ्या अरुंद वाटेनं... कड्याच्या कुशीतून अंग घाशीत... अक्षरश: जीव मुठीत धरून या शिवलिंगास फर्लांगभर लांबीची प्रदक्षिणा घालावी नि शेवटी दोनशे फूट उंचीचा उभार कडा जीवाच्या करारावर चढून जावा तेव्हा कुठं आपण या गुहांपाशी येऊन पोहोचतो...!

दुसऱ्या दिवशी सकाळी भल्या पहाटे भन्नाट वाऱ्याशी झुंज देत... मुंगीपावलानं तसू तसू अंतर कापीत चढतो आहोत... उरी शिवभक्ती दरवळते आहे... पाठी शिवशक्ती उभी आहे... अंग पेलून

तोल सावरता सावरता पावलागणिक आईचं दूध आठवतं आहे... पायांचा थरकाप होतो आहे... चुकून इंचभर जरी पाऊल सरलं तर सरळ दोन हजार फूट खोल काळदरीत अलगद भिरकावले जाऊ... मनाची पाल चुकचुकते... आतला एक ठोका चुकतो...! आणि अशा या कमालीच्या कठीण अवस्थेत दुपारी बाराच्या ठोक्याला आज तब्बल तीनशे वर्षांनंतर प्रथमच मानवाचं पहिलं पाऊल त्या सुळक्याच्या माथी ठेवता क्षणीच पुढं दिसतो दुर्गराज रायगड...! रायगड हा एक प्रचंड लोहचुम्बक आहे...! रायगडदर्शन होताक्षणीच सारा शिणोटा क्षणार्धात विरघळून जातो... एका नव्या पिसाटवाऱ्याची सुसाट झुळूक रायगडावरून येते नि आम्हा सर्वांची शरीरं अलगद मोहरून जाते...!

वीस-एक माणसं ऐसपैस बसू शकतील एवढा याचा माथा... इथून रायगडावरील जगदीश्वर मंदिर, शिवप्रभूंची समाधी नि नगारखाना अगदी स्पष्ट दिसू शकतात. पूर्वेकडील राजगड, त्याच्या त्या दोन आवळ्याजावळ्या माच्या (संजीवनी नि सुवेळा) नि अलिकडचा तोरणा चांगलाच दृष्टिक्षेपात येतो...!

एकही ऐतिहासिक अवशेष शिल्लक नसलेल्या या अजिंक्य शिवलिंगाच्या माथी पहिलावहिला मानवी पदस्पर्श होताच - शिवसमाधीचा भंग करणाऱ्या कामदेवास भस्मसात करणारा तो महामुनी योगीराज आम्हावरदेखील खदिरांगारासारिखा भडकला...! अचानक मशालीची एक ठिणगी त्या भुरट्या वाळीव गवतावर पडली नि नकळत केव्हाची धुमसत राहिली, ते काहीकाळ त्या आनंदाच्या बेहोषीत ध्यानीच आलं नाही...

मी अन् मजसवे असलेले तेरा सवंगडी उभे आहोत तेहतीसशे फूट उंचीवर...! दुर्ग लिंगाणाच्या ऐन माथ्यावर...! आज फारा दिवसांचं स्वप्न साकार झालं आहे...! हा एक अभिमानास्पद अपूर्व विक्रम आहे...! डोयी सूर्य तळपतो आहे... भन्नाट वारा पिसं भरल्यागत चौखूर उधळतो आहे... समोर रायगड उभा आहे... रायगड या नावात एक विलक्षण चैतन्य आहे... त्यावर विराजमान झालेल्या जगदीश्वर मंदिरात साकडं घातलं गेलं आहे...!

आमचं आरोहण यशस्वी होण्यासाठी पूर्वनियोजित कार्यक्रमानुसार आत्ता या क्षणी जगदीश्वरावर सहस्र बिल्वपत्रांची अभिषेकधारा चालू आहे... मंत्रघोष गाभाऱ्यात घुमतो आहे... घंटांचा नि शंखांचा संमिश्र ध्वनी भवतीच्या वातावरणी निनादतो आहे...! आमच्यातर्फे तिथं त्या

गि. आ. --- ५

रायगड! पुष्कळ काही सांगून जातो. मनीचं सारं बोलून जातो.

चांदण्या रात्री गड भटकण्यात एक अनोखा आनंद असतो. एक सुखदसा थरार असतो. एखाद्या निर्जन स्थळी नीरव शांततेत नि एकांती बसून तादात्म्य पावलं की अशावेळी गड बोलका होतो. भरभरून बोलू लागतो. फार फार गूढ बोलतो. अगदी तळवटातलं बोलतो ते ऐकावे. जीव कानी एकवटून... ऐकावे मनाचे कान करून. एकदा का असा सुखसंवाद साधला की मग आपण आपले नसतो. सर्वस्वी गडाचे होऊन जातो. अन् मग दुसऱ्या दिवशी गड सोडताना एक अनामिक हुरहूर लागते. मनी दाटून येते. पावलं जडावतात. इथून जाऊच नये असं वाटू लागतं. पण ते जमणार कसं? आमच्या तात्यासाहेब केळकरांनी सांगून ठेवलंय - 'इतिहासाच्या पर्वतशिखरांवर ताजी हवा घेत सदैव रहाता येत नाही. राहून चालतही नाही. वर्षाचे बारा मास या पर्वतशिखरांच्या माथी घालवता आले नि खालच्या जाचातून मुक्त होता आले तर ते कुणासही हवेच आहे. पण ते जमणार कसे?'

अशा या दुर्ग लिंगाणावरील त्या भव्यदिव्य नि सरळसोट उभ्या असलेल्या शिवलिंगापुढं एक दिस सारेच उभे ठाकलो...! हे एक बेजोड आव्हान आहे...! या महादेवाच्या मस्तकावरील गंगेचं दर्शन घेणारा एखादा भगीरथ हे बेजोड आव्हान स्वीकारू शकेल काय...? अशी दवंडी गेली कित्येक वर्षे ऐकत होतो...! अनेक नामवंत गिर्यारोहकांनी कित्येक वेळा हे आव्हान स्वीकारून हाय खाल्लेली... हे त्यांचं अपयश धुऊन काढण्याचं सद्भाग्य विलेपार्ले येथील 'हॉलिडे हायकर्स क्लब'च्या चौदा सदस्यांच्या पदरी पडलं... ही आम्हास अभिमानास्पद गोष्ट...!

या शिवलिंगाच्या नेमक्या मागील बाजूस एकूण आठ गुहा आहेत. गतवर्षी रणवीर सिंग या पट्टीच्या गिर्यारोहकासवे या तपस्व्यास थोडंबहुत चाचपताना या गुहांचा शोध प्रथमच लागलेला... कड्याच्या ऐन गर्भात कोरलेली पाणटाकी नि या गुहांकडं जाण्याचा मार्ग अत्यंत अवघड नि बिकट... चिंचोळ्या अरुंद वाटेनं... कड्याच्या कुशीतून अंग घाशीत... अक्षरशः जीव मुठीत धरून या शिवलिंगास फर्लांगभर लांबीची प्रदक्षिणा घालावी नि शेवटी दोनशे फूट उंचीचा उभार कडा जीवाच्या करारावर चढून जावा तेव्हा कुठं आपण या गुहांपाशी येऊन पोहोचतो...!

दुसऱ्या दिवशी सकाळी भल्या पहाटे भन्नाट वाऱ्याशी झुंज देत... मुंगीपावलानं तसू तसू अंतर कापीत चढतो आहोत... उरी शिवभक्ती दरवळते आहे... पाठी शिवशक्ती उभी आहे... अंग पेलून

तोल सावरता सावरता पावलागणिक आईचं दूध आठवतं आहे... पायांचा थरकाप होतो आहे... चुकून इंचभर जरी पाऊल सरलं तर सरळ दोन हजार फूट खोल काळदरीत अलगद भिरकावले जाऊ... मनाची पाल चुकचुकते... आतला एक ठोका चुकतो...! आणि अशा या कमालीच्या कठीण अवस्थेत दुपारी बाराच्या ठोक्याला आज तब्बल तीनशे वर्षांनंतर प्रथमच मानवाचं पहिलं पाऊल त्या सुळक्याच्या माथी ठेवता क्षणीच पुढं दिसतो दुर्गराज रायगड...! रायगड हा एक प्रचंड लोहचुम्बक आहे...! रायगडदर्शन होताक्षणीच सारा शिणोटा क्षणार्धात विरघळून जातो... एका नव्या पिसाटवाऱ्याची सुसाट झुळूक रायगडावरून येते नि आम्हा सर्वांची शरीरं अलगद मोहरून जाते...!

वीस-एक माणसं ऐसपैस बसू शकतील एवढा याचा माथा... इथून रायगडावरील जगदीश्वर मंदिर, शिवप्रभूंची समाधी नि नगारखाना अगदी स्पष्ट दिसू शकतात. पूर्वेकडील राजगड, त्याच्या त्या दोन आवळ्याजावळ्या माच्या (संजीवनी नि सुवेळा) नि अलिकडचा तोरणा चांगलाच दृष्टिक्षेपात येतो...!

एकही ऐतिहासिक अवशेष शिल्लक नसलेल्या या अजिंक्य शिवलिंगाच्या माथी पहिलावहिला मानवी पदस्पर्श होताच - शिवसमाधीचा भंग करणाऱ्या कामदेवास भस्मसात करणारा तो महामुनी योगीराज आम्हावरदेखील खदिरांगारासारिखा भडकला...! अचानक मशालीची एक ठिणगी त्या भुरट्या वाळीव गवतावर पडली नि नकळत केव्हाची धुमसत राहिली, ते काहीकाळ त्या आनंदाच्या बेहोषीत ध्यानीच आलं नाही...

मी अन् मजसवे असलेले तेरा सवंगडी उभे आहोत तेहतीसशे फूट उंचीवर...! दुर्ग लिंगाणाच्या ऐन माथ्यावर...! आज फारा दिवसांचं स्वप्न साकार झालं आहे...! हा एक अभिमानास्पद अपूर्व विक्रम आहे...! डोयी सूर्य तळपतो आहे... भन्नाट वारा पिसं भरल्यागत चौखूर उधळतो आहे... समोर रायगड उभा आहे... रायगड या नावात एक विलक्षण चैतन्य आहे... त्यावर विराजमान झालेल्या जगदीश्वर मंदिरात साकडं घातलं गेलं आहे...!

आमचं आरोहण यशस्वी होण्यासाठी पूर्वनियोजित कार्यक्रमानुसार आत्ता या क्षणी जगदीश्वरावर सहस्र बिल्वपत्रांची अभिषेकधारा चालू आहे... मंत्रघोष गाभाऱ्यात घुमतो आहे... घंटांचा नि शंखांचा संमिश्र ध्वनी भवतीच्या वातावरणी निनादतो आहे...! आमच्यातर्फे तिथं त्या

गि. आ. --- ५

गाभाऱ्यात उपस्थिती आहे सर्वश्री तुकाराम शेडगे, प्रभाकर भावे नि बाबुराव फणसळकर या त्रयींची...!

शिवलिंगाच्या माथी भगवा जरीपटका फडकवला नि त्यास प्रणाम करता करता अचानक एखादी मुलुखमैदानी तोफ डागल्यागत एक बुलंद भयसूर आवाज कानी आदळताच काळजाचा थरकाप उडाला... सर्वांग थरारलं... सर्वांगी कापरं भरलं... नाडीचा एक ठोका चुकला... भीतीची एक भयकातर संवेदना सर्वांगातून वीजेगत थरारून गेली...! जबरदस्त हबका बसल्यागत सारेच दच्चदिशी थबकलो नि गप्पदिशी खालीच बसलो...! श्वास रोधून किलकिल्या नजरेनं हळूचदिशी आवाजाच्या रोखानं पाहिलं... काहीक्षण काहीच ध्यानी येईना... समोरील डोंगरदाटीच्या एका उत्तुंग बेलाग कड्याचा वरील अर्धाअधिक माथा तुटून सुटतो नि घरंगळत दोन हजार फूट खोल दरीत कोसळतो...! आणि मग त्या काळदरीतून धुळीचा एक महाप्रचंड लोट आकाशावेरी असा काही उसळला नि तो चित्तथरारक आवाज दरीखोऱ्यातून असा काही घुमला की क्षणभर वाटलं - त्या भूकंपाच्या हादऱ्यानं या शिवलिंगासकट आम्ही सारे त्या काळदरीत कोसळतो की काय...!

सारं काही स्थिरस्थावर होताच विजयाच्या अनामिक बेहोषीत गुहेकडे उतरतानाच त्या ठिणगीनं वणव्याचं रौद्रभीषण रूप धारण करून अचानक सुलतानढवा केला नि मग ते महाप्रचंड शिवलिंग चहूअंगी धग्धग् पेटू लागलं...!

कसेबसे गुहेत डेरेदाखल झालो... केशरीया रंगाचं सूर्यबिंब भवानी टोकावर टेकलं नि अल्पावधीत किंचितसं अंडाकृती होत होत दृष्टिआड झालं...! धुरसटलेल्या संधिप्रकाशाच्या झिरझिरीत आवरणातूनच हळूहळू अंधाराच्या साम्राज्याचा अम्मल सुरू झाला... नि दुपारी अभंग वेढा देऊन बसलेल्या वणव्यानं तो वेढा अधिकच बळकट केला... दच्चगच्च आवळला... त्याचं खरंखुरं रौद्रभयाण रूप त्या काळोख भरल्या रात्री अधिकच प्रकर्षानं जाणवू लागलं...!

चिरकाल स्मरणात राहील अशा या ओढवलेल्या प्रसंगातून सहीसलामत सुटका होण्यासाठी काय उपाययोजना करावी याची खलबतं त्या अंधाऱ्या गुहेत चालू आहेत... माझं लक्ष आहे मनगटी घड्याळाकडं... पूर्वनियोजित ठरलेल्या वेळेकडं... साडेसात केव्हा होताहेत याकडं...! सारे सवंगडी त्या खलबतखान्यात माझ्या पाठी उभे आहेत - वाट पाहताहेत त्या अमूल्य क्षणाची...!

आणि - आणि मग तो क्षण जवळ येऊन ठेपला... नि काजळभरल्या त्या घट्टमिट्ट काळोखात, सुदूर रायगडाच्या भवानी टोकावर एक ज्योत हळूवारपणं हेलकावताना दिसली... बंदुकीच्या फैरी झाडाव्यात तशी लागोपाठ तीनचार रॉकेटस् आकाशात उंच उडाली... आकाशात फुटलेल्या फटाक्यांचे ते असंख्य प्रकाशकिरण नि त्याखाली हेलकावणारी ती पेटती मशाल पाहून सर्वांगी एक सुखदशी अनामिक रोमावळी फुलली...! काहीक्षण सारेच इतिहासाच्या त्या खोल गहिऱ्या गर्तेत पुरेपूर बुडून गेलो...!

सायंकाळपासून मोठ्या प्रयासानं झुंज देता देता पार थकून गेलो होतो... टाक्यातलं पाणी उपसून गुहेभोवतीची आग शक्य तेवढी आटोक्यात आणली होती... रसद तुटली होती... परतीचे मार्ग बंद पडले होते... हळूचकन् खिंडीवाटे निसटण्याची एकुलती एक अरुंद चिंचोळी वाट नखशिखांत उभी जळत होती...!

धगीच्या झळांचा निदान गुहेपर्यंत तरी काही उपद्रव होणार नाही याची खातरजमा होताच सर्वानुमते पदरी उरलेलं किडुकमिडुक खाऊन शांत झोपावं असं ठरलं... काहीजण थकलेभागले ढेकर देऊन पडल्यापडल्याच घोरू लागले...! मी, हिरा पंडित, श्रीकांत फणसळकर, संतोष गुजर नि विनय दवे असे नेमकेच शिळोप्याच्या गप्पा मारीत जागे राहिलो...!

रात्री एकदीडचा सुमार...! मी एकटाच गुहेबाहेर उभा आहे... समोर रंगलेला अग्निउत्सव याचि देही याचि डोळा डोळेभरी श्वास रोधून न्याहळतो आहे...!

समोर धगधगत्या अंगारातून डोकावणारा सप्तरंगी नृत्यशृंगार पाहण्यात एक अनोखा आनंद आहे...! तिमिराला गिळणाऱ्या संतप्त ज्वालांचं ते भयानक तांडवनृत्य... जणू शेकोटीला उभे असलेले भवतीचे काळेसावळे प्रचंड डोंगर... काळोखमिश्रित अपुऱ्या उजेडात अर्धवट उजळलेला तो शिंगणापूरचा, सादाला प्रतिसाद देणारा अजस्त्र भीमकायी कडा...! धगीनं होळपणारी झाडंझुडपं... जळता-जळता मुळासवे उन्मळून कोसळणारा एखाद्-दुसरा वठलेला निष्पर्ण वृक्ष...! अग्निनृत्यासवे घुमणारी सुश्राव्य संगीत सुरावट... त्यातच रातकिड्यांचा किर्ऽ किऽन् असा मर्मर ध्वनी... घुबडांचं घुत्कारणं... रानमांजरांचं विचित्र लयीत रडणं... कुत्र्यांचं कर्कश भुंकणं... वानरांचा किचकिचाट... नि त्यातच आकाशाच्या घुमटातून सतत होणारा उल्कापात...! हे सारंच कमालीचं भयकातर... सर्वांगी दरदरून घाम फोडणारं...!

दुसऱ्या दिवशी भल्या पहाटेच गुहेबाहेर डोकावलं... रात्रभर शीतल दवाच्या अविरत अभिषेकानं अग्निनारायण अर्धेअधिक शांत झालेले... मात्र अधूनमधून अर्धवट जळलेले ओंडके चांगले धुवाधार धुमसत असलेले... निसटण्याची वाट चांगली मोकळीचाकळी झालेली... पण पाणटाक्याजवळील त्या अरुंद चिंचोळ्या पावटीवर रात्रीच्या आगटीत एक भलेमोठे नागराज साफ होरपळून नागमोडी पहुडलेले...!

सायंकाळी सातच्या सुमारास लिंगाणामाचीवरील बबन जाधवांच्या अंगणी टेकताच - वारुळातून भराभर मुंग्या बाहेर पडाव्यात तशी घराघरांतून बायाबापडी नि पोरटोरं आमच्या भवती गोळा झाली... सारी विस्मयानं एकटक पाहू लागली. . नखशिखांत डोळेभरी न्याहाळू लागली... घटकाभर सारीच अबोल राहिली...! चौकशीअंती नंतर कळलं - काल रात्रभर सारे गावकरी अंगणात बसलेले... वणव्याचं रौद्रतांडव पाहून भयकातर झालेले... काळजीनं पुरेपूर ग्रासून गेलेले... वणव्यात होरपळून गेलेल्या आम्हा चौदाजणांचे पार्थिव देह खाली कसे आणायचे या एकाच असह्य विचारानं ते रातभर जागत बसलेले...!

त्यांच्या दृष्टीनं हा एक कवतिकाचा विषय होता... कारण या माचीवरील निदान गेल्या साताठ पिढ्याततरी वर कुणी चढल्याचं त्यांच्या ऐकीवात नव्हतं... तशी या इथल्या दप्तरी नोंद आहे...!

हा सारा गलबला ऐकून समोरील खळ्यावाटे, भाताऱ्या उडवीखालून एक नव्वद वर्षांचा जख्खड म्हातारा, खोकलत, हाती खुळखुळी काठी टेकत, आस्ते कदम थरथरत आमच्या रोखानं येत असलेला दिसला... आम्हासमीप येताच उजवा पंजा वर करीत म्हणाला - 'शाब्बास! शाब्बास माझ्या मर्दानो...! आमच्या बापजाद्यांनी जे केलं नाय ते आक्रीत आज तुम्ही करून दाखवलंत...!' नि तद्नंतर हाताचं बोट आकाशावेरी उंचावून सद्गदीत कंठानं नि गहिवरल्या नजरेनं तो काहीसं अस्पष्ट पुटपुटला - 'ही तर मायभवानीची किरपा...!'

तो नव्वद वर्षांचा 'पितामह' अगदी मनस्वी खरं बोलला...!

नकळत माझ्या मनीचं गूज बोलून गेला...!

ही कृपा खरोखरी आई भवानीचीच...!

त्या खवळलेल्या अग्निसंगरातून सहीसलामत सुटका करण्यासाठी आमच्या पाठी उभी होती आदिशक्ती... महामाया... जगन्माता...! कुलस्वामिनी... तुळजाभवानी... रामवरदायिनी...!

शिवरायांच्या पदस्पर्शानं पावन झालेल्या या पहाडी मुलुखात पराक्रम

पेरावा लागत नाही...! आई भवानीच्या कृपेनं तो या मातीत पूर्वीच पेरला गेला आहे... इथल्या मातीच्या प्रत्येक कणात तो मूळतःच साठवला गेला आहे...!

आणि म्हणूनच या इथल्या भूमीवर निर्भयपणं जगण्यात एक अनामिक अशी अवीट गोडी आहे... एक अनोखा अपूर्व असा आनंद आहे...!

आणि म्हणूनच याक्षणी आवर्जून म्हणावंसं वाटतं -


**'या ओठांनी चुंबून घेईन**
**हजारदा ही माती**
**अनंत मरणे झेलून घ्यावी**
**इथल्या जगण्यासाठी...'**

*(नाट्यसंपदाचे मा. श्री. प्रभाकर पणशीकर यांनी या मोहिमेस बहुमोल सहकार्य केले. आम्ही त्यांचे ऋणी आहोत.)*

महाराष्ट्र टाइम्स ७/१/१९७९

● ○ ●

# ७ दुर्ग कर्नाळा



'बेलाग बुधला'

छाया - बाळ राऊळ

रविवार दि. १९ फेब्रुवारीची सकाळ. कडाक्याची थंडी पडली आहे. अंगी हुडहुडी भरली आहे. त्यातच माळरानचं गार गार वारं सर्वांगी झोंबतं आहे. कानपाळ्या बर्फावानी थंडगार पडल्या आहेत. दातांची तडतडी वाजते आहे. अशाही स्थितीत हात छातीशी गच्च बांधून आम्ही चाललो आहोत. चाललो आहोत कर्नाळ्याकडं. कर्नाळ्याची

ओढ आहे... बहुत दिसांची इच्छा फलद्रूप होते आहे.

बरोब्बर आठ वाजता आम्ही अभय अरण्याच्या दारापाशी उभे आहोत. दोन्ही बाजूस गच्च रान. मधून धूळ खात असलेली कच्ची सडक. उजव्या हाती गर्द रानातून डोकावणारा कर्नाळा आणि त्यावर ऐटदारपणं छातीचा कोट करून उभा असलेला सरळसोट बेलाग सुळका इथून अगदी स्पष्ट दिसतो आहे. एश्टीतून येता जाता मात्र तो कुतुबमीनारसारखा किंचित कलता दिसतो. मग आम्ही थोडे पुढे सरकतो. इथं आहे वन्यपक्षी संग्रहालय. कधी न पाहिलेले रंगीबेरंगी पक्षी इथं पाहायला मिळतात. थोडीशी चढण चढलो की लागतात वसतिगृहे. सुट्टीचे दिवशी लोक इथं वनभोजनासाठी येतात. सबंध दिवस खेळतात. भटकतात. फिरतात नि निघून जातात. अगदी शेवटी दोन छानदार टुमदार वसतिगृहांमधून वाट जाते. किल्ल्याकडे एक टेपाड चढलं की लागते पाण्याची टाकी. टाकीसमोर गेट नि मग पुढं लागते खरी चढण कर्नाळ्याची. नागमोडी आडवीतिडवी वळणं घेत थेट दारापर्यंत पोहोचलेली. डोंगरमाथ्यावरची सपाटीवाट सोडल्यास बाकी सारी चढण अति दुर्गम. चढता चढता दम छाटतो. जीव कासावीस होतो. घशाला कोरड पडते. हृदयीच्या ठोक्यांची गती वाढते. नि मग आपोआपच आपली गती मंदावते. मग काहीवेळ बसावंच लागतं. सुंठीचं कुडं असल्यास ते तोंडात टाकून चघळावं लागतं. एखादी लवंग दाढेखाली धरावी लागते. पण यापैकी आम्हाजवळ काहीच नसतं.

मधेच आम्ही एका झाडाखाली विसावलो आहोत. सारेच दमलो आहोत. कमालीचे थकलो आहोत. धाप लागली आहे. वाचा जवळजवळ बंद पडली आहे. अंग घामानं चिम्ब झालं आहे. त्याचा दर्प नाकाला झोंबतो आहे. आठ-वीस झाले आहेत. गडावर किती वाजता पोहोचू याचा अंदाज बांधीत आहोत. आम्ही सारे इथले नवखे आहोत. आजूबाजूला घनदाट रानाशिवाय चिटपाखरूदेखील नाही. उगीचच मनी शंका येते. 'आता इथं एखादं वाघरु आलं तर?' मन एकदमच चरकतं. सर्वांगातून एक भीतीचा काटा वीजेगत थरारून जातो. काही क्षणातच भीतीचं जळमट झुगारून उभे राहतो नि पुन्हा चालू लागतो. चढू लागतो आस्तेकदम.

काही ठिकाणी पायऱ्या खणल्या आहेत. त्यातल्या काही बुजल्या आहेत. त्यांचे चक्क घसारे झाले आहेत. काहींचे दगड ढासळले आहेत. काहींचे घसरले आहेत. काही ठिकाणी तर पायऱ्यांचाच पत्ता

नाही. नुसताच खाली सुटलेला घसारा. तो चढताना चक्क जमिनीला हात टेकूनच वानरासारखं चढावं लागतं. हाताशी लगेच जे काही सापडेल त्याचा आधार घेत. चढत आहोत धापा टाकीत, वळत आहोत दम छाटीत, चाललो आहोत जीव घाटीत. जाळ्यांनी दाटलेलं रान पूर्वीपेक्षा गच्च किर्र्रऽ होत चाललंय्. सायंकाळ झाल्यासारखं वाटतंय.

आत्ताशी कुठं सूर्याची कोवळी किरणं वरच्या हिरव्या छतातून खाली डोकावताना दिसताहेत. एखादी थंडगार झुळूक मधूनच अंगाला चाटून जाते. क्षणभर घामाटलेलं शरीर सुखावते.

एक भलं मोठं टेपडी वळण मोठ्या प्रयासानं वळतो आणि पुढं दिसतो एकदम लख्ख प्रकाशात न्हालेला डोंगरमाथा. त्यापलीकडं निळसर आकाश नि क्षितिजाला टेकलेली, एक भरलेली लांबलचक पर्वतरांग. मग मी सुसाट धावत सुटतो. अंगी वानरबळ आल्यागत. पण मग एकदमच पावलं थबकतात. अगदी अचानक त्या नीरव शांततेत कानी पडतो संथ वाहणाऱ्या नदीचा धीरगंभीर ध्वनी... वाटतं, डोंगराच्या पायथ्याशी एखादी नदी असावी. तसाच धावत सुटतो. नि एकदम शरीराचा तोल सावरीत झटकन् दोन पावलं मागे सरकतो. बापरे! एक प्रचंड खोल दरी. ऐसपैस. अगदी तळापर्यंत जाऊन पोहोचलेली. तळाशी फक्त रानचरान. त्यापुढं गावरान. मग ही नदी कुठं आहे? आजूबाजूस पाहातो नि मग ध्यानी येतं. संथ वाहणाऱ्या सरितेचं ते गीत नव्हतं. आडरानातून घोंघावणाऱ्या पानापानातून सळसळणाऱ्या समीराचं होतं ते कर्णमधुर संगीत...

इथं थोडं विसंबून मग वळतो उजवीकडं. इथून सुरू होते डोंगरमाथ्याची सपाट चाल. अजून रान संपलेलं नाही. लहानमोठ्या काटेरी झुडुपांचं, नानापरीच्या रानवेलींचं नि नानाजातीच्या झाडांचं हे राखीव रान. इथं तऱ्हेतऱ्हेची झाडं. फताड्या खरखरीत पानांचा सरळसोट साग. लांबट पानांचा काळसट आईन. माथी शेंदूर माखलेला पळस. कापसाची शुभ्र बरसात करणारी काटेरी सेवर. हिरव्यागर्द रंगाचा शालू नेसलेली पाईर. पोपटी रंगाची शाल पांघरलेली निंगड. निळसर हिरव्या रंगाची दुलई अंगावर घेतलेली किंजळ, कुंभा, उम्बर, जांभूळ, बोरी, बाभळी-काय नि काय. काही ओळखीचे तर काही एकदमच अनोळखी. चाललो आहोत वृक्षसृष्टी न्याहाळीत, अनोळखी झाडांची जात ओळखीत, कोवळी स्वच्छ किरणं अंगावर झेलीत...

आता सपाटीची वाट संपली आहे. मुरमाट जमिनीची चढण

लागली आहे. पुनश्च तीच चढण. तसलीच वळणं... अर्ध अधिक चढून रस्त्याच्या बाजूला प्रचंड खोल दरीच्या माथ्यावर असलेल्या एका सपाट दगडावर थोडे टेकतो न टेकतो तोच समोरच्या उंच विरळ झाडीतून अस्पष्ट दिसणारा तो सुळका पाहून आनंदानं बेहोष होत ताज्या दमानं उठतो नि भराभर पावलं टाकीत समोरचं टेप चढून एका मोकळ्या पठारावर येऊन पोहोचतो. इथून अगदी स्पष्ट दिसतं किल्ल्याचं दार नि बेलाग कड्याची भयसूर धार. सारा थकवा क्षणात विरघळून जातो. नवीन जोम रोमी रोमी संचारतो नि पठाराचा कोपरान् कोपरा न्याहाळीत आम्ही चालू लागतो.

पठाराच्या मध्यभागी वाटेच्या डाव्या हातास एक प्रचंड मोठा वृक्ष आपल्या अंगावरचा भार झटकून केव्हाचा उभा आहे...? उभा आहे एकटाच. एकाकी. पायाशी पाचोळ्याची रास साठवून... क्षणभर पावलं घुटमळतात... थबकतात... सारे काही हरवतं... सवे असलेल्या साथींचा विसर पडतो... नि एकटक बघत बसतो खुळ्यासारखा त्या निष्पर्ण वृक्षाकडं. आठवतात कुसुमाग्रजांच्या एका कवितेतल्या ओळी...

**आडवाटेला दूर एक माळ**
**तरु त्यावरती एकला विशाळ**
**आणि त्याच्या बिलगोनिया पदास**
**जीर्ण पाचोळा पडे तो उदास**

मग सारी कविता न आठवता आपोआपच आठवते. समोरचं सारं सारं काही धूसर होऊ लागतं. शेवटच्या दोन ओळी तर मनाला कमालीचा चटका लावून जातात.

**-आणि जागा हो मोकळी तळाशी**
**पुन्हा पडण्या वरतून पर्णराशी -**

सर्वांगातून एक शिरशिरी निघून जाते...छातीत दाटलेला उमाळा आतल्या आत फुटतो. कडा पाणावतात. एक दीर्घ उसासा उठतो...नि हवेत विरून जातो...

उजव्या हाताला झाडाच्याबरोबर समोर एका काटेरी जाळीत एक दगडी चौथरा. त्यावर एक भग्न देवतेची मूर्ती. बाजूस एका दगडी तुळईच्या भागाचा फुटलेला फुलोरी अवशेष. कदाचित् कधीकाळी मराठी राजवटीत इथं एक ठेंगणं ठुसकं टुमदार सुबकसं चौकोनी मंदिर असावं. पुढंमागं मोगली सत्तेखाली हे मंदिर मूर्तिभंजकाच्या घणाघातानं मातीला मिळालं असावं. दूर फेकून दिलेली मूर्ती कुण्या भक्तानं नंतर इथं

आणून ठेवली असावी. असेच दोन तीन लहानमोठे दगडी चौथरे आजूबाजूस असलेले. त्यावर उभा दगडी चिरा अर्धवट जमिनीत पुरलेला. कुणा किल्लेदाराची वा रखवालदाराची ही थडगी असावीत किंवा समाध्या तरी. काही-काहीच कळायला मार्ग नाही. काहीही असो.

चौकस दृष्टीनं लहानमोठ्या खाणाखुणा शक्य तितक्या टिपीत आम्ही पुढं सरकलो. समोर एक अतिशय अरुंद चिंचोळी अशा पडक्या पायऱ्यांची वाट किल्ल्याच्या द्वारापाशी जाते. दरवाजा एकदमच लहान, जेमतेम तीनएक फूट रुंदीचा. डोलारा ढासळला आहे. वरची एक दगडी तुळई मधोमध मोडली आहे. खाली केव्हा पडेल याचा नेम नाही. एक तुळई तर चक्क दारातच पडून तिरपी उभी आहे. त्यामुळं मोठाच अडथळा निर्माण झाला आहे. वर दोन बाजूस दगडात कोरलेल्या वाघाच्या वा सिंहाच्या प्रतिमा असाव्यात. हळूच अंग चोरून पायऱ्या चढत वर पोहोचतो. समोर एक चिंचोळी मोकळी जागा. बाजूस खोल दरी. पुन्हा डाव्या बाजूस एक तेवढाच दरवाजा. त्याच्या वरील बाजूस बरोबर मध्यभागी एक उर्दू लिपीतला शिलालेख. चौफेर नजर फिरवीत पायऱ्या चढतो नि किल्ल्याच्या एकदम ऐन माथ्यावर येऊन पोहोचतो. समोरच पठार. डाव्या बाजूस चतुष्कोनाकृती भग्न भिंतींनी वेष्टित असा किल्लेदाराचा वाडा. समोरचं दारू कोठार आणि मग त्यासमोरच चारही बाजवांनी तुटलेला दीडशे फूट उंचीचा सरळ सोट उभा सुळका. एक बेलाग उंच सुळका. एक प्रचंड दुर्गम टेम्बा...भीमकाय शरीराचा काळाकभिन्न कडा...एखादा मोठा ग्लास पालथा घातलेला असावा तसा... त्यावर कुठे खडकांचे खवले, कुठं लहानमोठ्या घबदाडी. काही खोबण्या, काही घळी. मधेच कुठंतरी प्रचंड उंचीची दरड नि अधून मधून पुढं आलेली काळ्याकुट्ट दगडांची भलीमोठी टेंगळं. जवळजवळ शंभर फूट उंचीवर मागील बाजूच्या लवणात कपारीला लटकलेली आग्यामाशांची पोळी. एकेकातून बादली बादली मध मिळू शकेल एवढी मोठ्ठाली. जवळजवळ सुळक्याच्या अगदी पोटातच तिन्ही बाजवांनी टाकी कोरलेली. ती एकदमच पोटात घुसलेली. एखाद्या कांगारूच्या पोटपिशवीसारखी. एकाशी दुसरं जोडलेलं. मधे कुठं कुठं खांब सोडलेले. काही खडबडीत सुकलेली. काही नुसतीच ओलसर. काहींच्या पाण्यावर हिरवीशार शेवाळी साय तर काहीतले पाणी एकदम स्वच्छ नितळ स्फटिकासारखे. तळभाग डोळे मिटून पाहावा एवढा पारदर्शक. काहींच्या पाण्यावर वरतून कोसळलेले पोळ्यांचे तुकडे तरंगत असलेले. पाण्याच्या पृष्ठभागी चकाकणारा मधाचा

तवंग... दातांना शिळीक भरावी एवढं थंडगार पाणी... किंचित गोड, रुचकर, हलकं नि पाचक.

सुळक्याच्या उजव्या बाजूस एका उतरणीवर आणखी एक अशीच माचीवजा मोकळी जागा. चांगली ऐसपैस. मधोमध एक चाफ्याचं झाड. तिकडं जाण्यासाठी सताठ पायऱ्यांचा एक दरवाजा. संपूर्ण किल्ल्यात तटबंदी बुरूज नि मोक्याच्या जागी जंग्या. हेही भाग अधूनमधून ढासळलेले. बाकी पाहण्यासारखं इथं काहीही नाही.

हा किल्ला तसा काही नामांकित लढाऊ नसावा. मात्र पहाऱ्याचं हे एक बुलंद ठिकाण. टेहळणीसाठी हे एक मोक्याचं दुर्लंघ्य स्थळ. यापलीकडं याला विशेष काहीच महत्त्व नसावं. इथून कल्हईखिंडीतून जाणाऱ्या पुणे-पनवेल रस्त्यावर चांगली नजर ठेवता येते. म्हणून खोपोली ते पेण व अलिबाग ते रेवस या मार्गावर चांगला पहारा करता येतो.

सुरुवातीस मुरमाट चिखलमातीच्या भिंती. ओंडके नि फळ्यांचे आडोसे उभे करून महाराजांनी हा किल्ला मोठ्या कौशल्यानं लढून घेतला नि पुन्हा इ.स. १६६५ साली औरंगजेबास दिला. पण लगेच इ.स. १६७० साली तो पुन्हा जिंकून स्वराज्यात सामील केला. पुढं १८१८ साली पेशवाईचा अस्त झाल्यावर तो इंग्रजांनी हस्तगत केला. तोपर्यंत जवळच्याच शिरढोण गावचे श्री. अनंतराव फडके हे या किल्ल्याचे एक प्रमुख अधिकारी होते. आद्यक्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांचे हे आजोबा.

हॉलिडे हायकर्स क्लबचे मजसवे माझे जीवाभावाचे सखेसोबती आज हा उत्तुंग सुळका चढून जाणार आहेत. तसं पाहिलं तर सामाजिक नि शैक्षणिक क्षेत्रात बहुधा सारेच सवंगडी मजपेक्षा वरचढ असलेले. या एवढ्या कंपूत मीच एकटा गांवढळ...कमालीचा भोळाभाबडा. अत्यंत श्रद्धाळू...असो काहीही असो. मात्र या क्षणी

**॥ आम्ही सारे डोंगरभाऊ। चढाईचे गीत चढतां गाऊ ॥**

आता आम्ही १५६० फूट उंचीवर उभे आहोत. दृष्य तर मोठं मनोवेधक आहे...केवढा अफाट प्रदेश पसरला आहे समोर. भन्नाट वारं सुटलं आहे... डोयी सूर्य तळपतो आहे... इथून दूरवर पेठ, मलंगगड, म्हसमाळ नि चांदेरीचे अस्पष्ट सुळके डोकावताना दिसताहेत... तो लांबवर दिसणारा राजमाची... त्याचे ते आवळे जावळे बालेकिल्ले... ते खंडाळ्याचं नागफणी टोक... पूर्वेकडं तो भीमाशंकरचा डोंगर...

त्याअलिकडं हे माथेरान... जवळच पेंब नि प्रबळगडच्या खुणा... नि तो समोर दिसतो आहे ना तो माणिकगड... इथून माणिकगड पहावा पण माणिकगडावरून सायंकाळच्या संधिप्रकाशात दुर्ग कर्नाळ्याचं सुरम्य दर्शन जन्मा येऊन एकवार तरी घ्यावंच...

एका बुरूजापाशी असलेल्या कातळावर चक्क आडवा झालो आहे. दोन्ही हातांची उशी करून दुमडलेल्या पायी पाय रेलून... समोर उभा आहे मला कडे चढण्याचं वेड लावणारा उत्तुंग सुळका... भीमकाय शरीराचा... काळाकभिन्न... नखशिखांत नागवा...! अगदी सुरुवातीलाच हे व्यसन जडण्यापूर्वी यानं मला एकवार आव्हान केलं होतं... आपली तर्जनी उघड्या आकाशी खुपसून अनेकवार येता जाता खुणावलं होतं... त्याचा तो मूळ संकेत मला उमजला होता... मनी म्हटलं- ''रे गड्या! तुझ्या या प्रेमळ आमंत्रणाचा अव्हेर मजकडून होणार नाही. मी अवश्य येईन. एकवार नाही अनेकवार आणि मग-आणि मग तो सुदिन उगवला. अशाच एका सुप्रभाती त्याजसमोरा उभा ठाकलो आणि गिर्यारोहणाच्या साधनांचा अव्हेर करून चक्क अनवाणीच याच्याशी दोन डाव खेळलो नि अखेर जिंकलो...जिंकलो? छे छे...! तो विजय माझा नव्हता. खरा विजय याचाच होता तो. अखेरपर्यंत प्रतिकारशून्य राहोन यानं मला आपल्या माथी मोठ्या प्रेमानं चढो दिलं होतं...त्या दिसापासोन आजतागायत याचाच आदर्श मनी पूजोन चढतो आहे...कुठलाही कडा चढता उतरता याचं विस्मरण झालं नाही नि पुढं होणे नाही...त्याला तसं कारणही वेगळं आहे. कुणीतरी म्हटलं आहे.

**॥ टेक टाईम टू थिंक ॥ ॥ इट इज दी सोर्स ऑफ पॉवर ॥**

बालपणी फडक्यांच्या वासुदेवांच्या मनी क्रांतीची फुंकर यानंच घातली नि पारतंत्र्याच्या अंधःकारानं ग्रासलेल्या या देशीं सर्वप्रथम देशप्रेमाची एक प्रज्वलित ठिणगी पडली...त्या ठिणगीनं यज्ञकुंड धगधगलं...नि तिमिराचा नाश होईपावेतो धगधगत राहिलं...अस्तु!

असा हा सुळका...केव्हाचा याचा जन्मकाल? काय याचं वय? अजून किती वर्षे ताठ मानेनं उभा राहणार हा? काय काय पाहिलं असेल यानं? किती किती अनुभवलं असेल यानं? कसा कशाचा साक्षीदार असेल हा? जन्मापासूनची पर्वतमय स्थित्यंतरं...उलाढाली...उलथापालथी...कधी हिंसा... कधी अहिंसा... केव्हा युद्ध... किती आक्रमणं... किती विक्रमणं... किती जय...किती पराजय... किती उत्थानं... किती पतनं... किती लढाया... किती चढाया... किती

बढाया... काय नि काय...! याची सहनशक्तीच अमर्याद...किती उन्हाळे यावर आग ओकले असतील...किती पावसाळे याच्या माथ्यावर कोसळले असतील... किती जनलोक याच्या अंगाखांद्यावर चढले असतील... कित्येक तोफगोळे यानं छातीवर झेलले असतील... कित्येक पेटते बाण याच्या अंगाखांद्यावर पडले असतील... कित्येक फैरी याच्या अंगाला चाटून गेल्या असतील... कित्येक अपमान यानं गिळले असतील... कित्येक अपराध यांनं पोटात घातले असतील... कित्येक चुका यानं पदरात घेतल्या असतील... कित्येक घाव यानं पाठीशी बांधले असतील... काळाच्या सामर्थ्यापुढं नि निर्घृण झंझावातापुढं कधी हा तुकला नसेल की झुकला नसेल... कलला नसेल की चळला नसेल.. गळला नसेल की ढळला नसेल... अक्षय याची चिकाटी... अतुल याची सहनशक्ती... अतुट याचा संयम-अभंग याची साधना... अतर्क्य याचं साहस... म्हणूनच हा एक तपस्वी...योगी...स्थितप्रज्ञ...मुक्तीचं ध्येय उरीपोटी बाळगून डोळे मिटून समाधिस्थ बसलेला...

**"योगीपावन मनाचा। साही अपराध जनांचा।"**

**हेच याच्याविषयी म्हणावंसं वाटतं.**

पर्यटन - फेब्रुवारी १९७७

● ○ ●

# ८ किल्ले माणिकगडावरील रात्र!



'दुर्गप्रेमी मावळे'

छाया - व्ही. पी. गोखले

आम्ही सगळे मिळून नऊजण. त्यातले सातजण पार्ल्याच्या हॉलिडे हायकर्स क्लबचे सभासद. श्रीकांत फणसळकर गुबगुबीत बाळसेदार! सुरेश कुलकर्णी दणकट प्रकृतीचा! सूत्रधारही तोच! बाकीचे उमद्या दिलाचे. तरुण रक्ताचे. अनेक डोंगर ओलांडून गेलेले. बेलाग कडे चढून आलेले. कित्येक अडचणी पार केलेले. मी आठवा. तसा किरकोळ पण काटक. नि नववे गिरगावातले श्रोत्री. बहुत बहुत हिंडलेले. दोनवेळा भारतभ्रमण केलेले. हिमालय भटकून आलेले. गंगोत्री पर्यंत चढून गेलेले. आमच्यात वयोवृद्ध, वय वर्ष सत्तर. असे हे आम्ही नऊजण! भिन्न व्यवसायातले. पण एकच आस ऊरापोटी बांधलेले! पाताळगंगेकिनारी असलेल्या एका वटवृक्षाखाली विसावलो आहोत. समोर दूरवर दिसणाऱ्या धुराच्या धुरकटी आवरणातून काहीसा अस्पष्ट डोकावणारा माणिकगड

आम्हास खुणावतो आहे. तिथं किती वाजता पोहोचू याचा अंदाज बांधीत आहोत, वाटाड्या मिळेल की नाही या विवंचनेत आहोत.

नदीत मनमुराद डुंबून येतो. घास घास खावून घेतो नि माणिकगडाचे दिशेने कूच करतो.

रणरणीत उन्हाची टळटळीत दुपार...दुपार वयात आली आहे. ती पराकाष्ठेची तापू लागली आहे. अंगाला चटचटू लागली आहे. सर्वांगाची लाहीलाही होते आहे. मधूनच एखादी वाऱ्याची झुळूक आपला सहानुभूतीचा हात सर्वांगी फिरवते. तेवढ्यापुरतंच बरं वाटतं.

दुतर्फा वासोट्या नि फड्या निवडुंगाच्या काटेरी शेतकुंपणातून धूळ खात पळत सुटलेली वाट...वाटेवरची धूळ उन्हाच्या धगीनं मनस्वी तापली आहे...पाऊल टेकताक्षणीच घोट्यापर्यंत बुडतं आहे...आगीत पडावं तसं भाजून निघतं आहे. बाजूच्या शेतवाडीतून मशागत चालू आहे...मुळापासून जमिनीचा कस काढला जातो आहे... पोटाचं चिपाट पाठीला टेकलं आहे... हे एक यज्ञकर्म आहे. ते प्रत्येकास करावं लागणार आहे. त्या भूमिपुत्रांचं हे सुरुवातीचं भूमिपूजन आहे...घामाच्या अभिषेकाने अन्नदात्री प्रसन्न होईल... उसळत्या ढेकळातून कोवळा लुसलुशीत कोंब अंकुरला जाईल... स्वेदगंगेची अन्नगंगा होईल...

गप्पांच्या पुरात वाहता वाहता 'चावणं' मागं पडतं नि नदी नाले ओलांडून 'सावण्या'स येऊन थडकतो. गाव केवढं? तर, तळहाती घेऊन सहज निरखता येईल एवढं. पंधरावीस उंबऱ्यांचं. एवढ्या आडरानात एकटंच वसलेलं. अशा या लहानुकल्या गावात आतिथ्यशील असलेल्या राजाराम देशमुखांच्या घरी मोठ्या अगत्यानं नि आदरानं आमचा पाहुणचार केला जातो.

ठाकरवाडीपासून एकदोन फर्लांगावर लागते चढण. वाट जाते वळणावळणानं रानातून. दोन्ही बाजूस गच्च रान. दुतर्फा नाना जातीची रानवेलींनी कवटाळलेली झाडं आपल्या फांदोऱ्याचे हात पसरून वाटेवर सावली धरून उभी असलेली. काहींनी तर आपल्या शरीरावरचा भार झटकून हलका केलेला. वाटेवर एक एक वीत जाडीचा पाचोळ्याचा थर साठवलेला. त्यातून ही ढोरवाट. मुख्य वाटेला लक्षलक्ष वाटा फुटलेल्या. त्या कुठंतरी जाऊन आडरानात घुसलेल्या... ऱ्हाटांच्या रुरवाळीत हरवून गेलेल्या... खरी वाट कुठली हे उमजेनासं होतं पण, 'जान्ता बाप्या' 'रामू ठाकर' 'म्होरं' आहे. त्या म्होरक्याचं मार्गदर्शन अचूक आहे. आम्हाला यत्किंचितही चिंता करण्याचं कारण नाही.

चढतो आहोत. चढताना धाप लागते आहे. ती लागणारच. जीव कंठाशी घुटमळतो आहे... पाणपिशव्यातलं पाणी संपलं आहे. पाठीवरच्या 'हॅवरसॅक्स' अवजड झाल्या आहेत. त्या फेकून द्याव्याशा वाटतात. शिरी शीतल छायेचं छत्र असूनदेखील नखशिखांत न्हाऊन निघालो आहोत.

पाचोळा तुडवीत ही दुर्घट चढण कशीबशी चढतो नि समोरचं टेप चढून वर येतो तोच पुढं उभा ठाकतो गडाचा पश्चिम कडा. नखशिखांत नागवा. काळाकभिन्न, अदमासे पाचशे फूट उंचीचा, भीमकाय शरीराचा. छातीचा कोट करून सरळसोट उभा असलेला. वरपासून खालपावेतो तुटलेला.

समोरची सपाटी ओलांडली की लागते खरी अवघड चढण. वाट पूर्वीसारखीच पण अवखळ दगडधोंडींनी खडबडलेली. एका आडरानात घुसलेली. गुराढोरांच्या पदाघातानं फुटलेली. पावसाळ्यातल्या पाणलोटानं खोलगट झालेली. दुतर्फा करवंदीच्या जाळ्यांचं जंजाळ आपले काटेरी बाहू पसरून वाट अडवून उभं असलेलं. भले थोरले दगड ऐन वाटेवरंच ऐसपैस ठाण मांडून बसलेले. मुळातच वाटेवरच्या धोंडी नीट बसलेल्या नाहीत. पाय टेकताक्षणीच डुगुडुगु हलताहेत. हरघडी तोल जातो आहे. आधार म्हणून एखादी रानवेल धरून जावं तर ती दुर्दैवाने सुकलेली असते. कटदिशी मोडून पडते. पावलागणिक पाठीवरचं ओझं सांभाळावं, अंग पेलून तोल सावरावा, ओरखडणाऱ्या काट्यांकडं दुर्लक्ष करावं, मध्येच चेहऱ्यावरला डवरलेला घाम हातानं पुसावा नि त्याच हातानं वाटेवरचं हे काटेरी जंजाळ बाजूला सारीत असल्या या अडगळ वाटेनं, मोठ्या प्रयासानं काठीचा आधार घेत वर चढावं. चढताना एखादा जरी धोंडा बसणीतून निसटला तर जबड्याचं चक्कं बोळकं व्हायचं नि मग घरी गेल्यावर फारच मोठी 'पंचाईत' व्हायची. ते तसलं चोरपावलांनी येणारं अकाली वार्धक्य टाळण्यासाठी की काय कोण जाणे अनिल पटवर्धन मला सारखा सारखा म्हणतो आहे.

"तुक्या जपून, तू जपून टाक पाऊल जरा, जीवनातल्या मुशाफिरा" मी लागलीच उत्तरतो आहे "वाचे विठ्ठल वदावे। पुढे पाऊल टाकावे।"

अर्धाधिक चढ चढतो नि मग एकदमच कड्याच्या पोटाखालून चालू लागतो, पुढं एका पाणथळ नाळीतून साठलेले दगडधोंडे ओलांडून वर येतो नि समोरचं एक निसरतं टेपाड चढून ऐन माथ्यावर येऊन पोहोचतो. पाठीवरच्या पाठपिशव्या एका चौथऱ्यावर फेकून देतो. पिसं

भरल्यागत धावत सुटतो. मावळतीकडच्या एका बुरूजावर जाऊन उभा राहतो. नि समोरचं डोळे खिळवून ठेवणारे दृश्य पाहून काहीक्षण भारावून जातो...हरवून जातो... हरखून जातो... समोर दूरवर डोंगराच्या एका शिखरावर अलगद टेकलेलं सूर्यबिंब. संपूर्ण पश्चिम दिशेवर पसरलेली संधिप्रकाशाची झिरझिरीत आवरणं... त्या काहीशा मुलायम रेशमी अवगुंठनाखालून झिरपणारी केशरमिश्रित सोनेरी किरणं... नि या बेहोषीत दुर्ग कर्नाळ्यावरील शिवलिंगासारख्या दिसणाऱ्या या बेलाग सुळक्याचं नयनरम्य दर्शन... हे दृष्य नेहमीचंच. सर्वांच्याच परिचयाचं. पण एवढ्या ह्या दोन हजार फूट उंचावरून काहीसं अधिकच लोभसवाणं दिसणारं... हे सौंदर्याचं साम्राज्य... श्वास रोखून पहात रहावं नि निसर्गानं मुक्त हस्तानं उधळलेले हे रंगवैभव डोळियांनी टिपून घ्यावं... ही नीरव शांतता... हा निखळ एकांत... ही श्यामल संध्याबेला... ही वेळच मोठी विचित्र... एक अनामिक हुरहुर लावणारी... प्रतिक्षेच्या अपेक्षेने व्याकुळ करणारी... काळजाला बेचैन करणारी... उरीच्या जखमेला हलकेच झोंबणारी...

ढासळलेले बुरूज, अगदी जुजबी तटबंदी, बांधकामाकरिता चुना मळण्याची घाणी, चोरवाट, मुख्य दरवाजा, त्याकडे जाणाऱ्या पायऱ्या बहुतांशी ढासळलेल्या, उघड्यावर पडलेली दोन शिवलिंगे. तडा गेलेला नंदी, मंदिराचा उखळलेला घरटा, जागोजागी शिबंदीच्या घरट्यांचे चौथरे, पाण्याची टाकी, एक भला मोठा हौद, मधोमध खासा किल्लेदाराचा वाडा, नि त्यास खेटूनच असलेली छोटेखानी सदर. या सर्व वास्तूंवर सर्वभक्षक काळानं आपला सर्वनाशी हात अगदी निर्घृणपणे फिरवलेला.

वाड्याशेजारीच आमचा तळ पडला आहे, सायकलच्या टायर्सचे तुकडे जागोजागी मशालीगत पेटलेले आहेत. त्या अपुऱ्या उजेडात भात पिठल्याची मेजवानी झडते. शतपावली होते. शिळोप्याच्या गप्पाटप्पा होतात. नि सारेजण उघड्या आकाशाखाली झोपी जातात.

अचानक जाग येते. मध्यरात्र उलटून गेली असावी. भराट वारा सुटला आहे. सारे सखेसोबती डाराडूर झोपले आहेत. दोघेजण तालासुरात घोरताहेत. एकाने तर चक्क खर्जच लावला आहे. बहुधा श्रोत्री असावेत. काहींना तर पिठलंभात मानवलेलं दिसत नाही.

आज शुद्ध चतुर्दशी आहे. आज शुक्रशनीची युती पुनर्वसूजवळ होणार आहे. त्यांच्यातले अंतर हळूहळू उणावेल. दोघेजण परस्पर सामोरे येतील. रामशाम होईल. दोघांची गळामिठी होईल. क्षेमकुशल विचारलं

गि. आ. --- ६

जाईल. लगेच गतिमान शुक्र आपला निरोप घेऊन आपला पुढचा मार्ग आक्रमू लागेल.

एका बुरूजावर उभा आहे. चांदणं शिंपलेली रात्र... किंचित भयाण... काहीशी गंभीर... चहूबाजूंचे डोंगर ब्रह्मानंदी टाळी लावल्यागत ध्यानस्थ बसले आहेत. समोर लख्ख प्रकाशात न्हालेलं दुर्ग कर्नाळ्यावरील संन्यस्त लिंग पाहून क्षणभर हरवल्यासारखं होतं... दूरवर रासायनीतील विजेच्या दिव्यांची टिंब तारकांशी स्पर्धा करताहेत. गच्च रानातील दच्च काळोखात काजव्यांची रोषणाईही उठून दिसते आहे... सावण्याच्या हनुमान मंदिरातून गंदधुंद समीरासवे येणारी टाळमृदंगाची धून... नि या अशा भयमिश्रित आनंदाच्या बेहोशीत अधून मधून होणारा उल्कापात!


वीतभर पोटाची टीचभर खळगी भरण्यासाठी धावपळीचं हे मानवी जीवन... या असल्या धकाधकीच्या जीवनात कधीकाळी हे असले आनंदाचे क्षण येतात नि सारं जीवनच कसं मंत्रागत भारून जातात. या असल्या क्षणांची चव चाखण्यात जी एक अवीट गोडी असते ती सांगून कळायची नाही. ती प्रत्यक्ष अनुभवावी लागेल.

हा गड तसा काही नामांकित लढाव नसावा. हे पहाऱ्याचं एक बुलंद ठिकाण. इथून अगदी दूरवर नजर ठेवता येते. तर मग कोणे काळी गनिमाची चाहूल सर्वप्रथम याच बुरूजावरील पहारेकऱ्याला लागली असेल. डोळ्यात तेल घालून नंग्या तलवारीनिशी खडा पहारा करणारे नि हाती चूड घेऊन गस्त घालणारे मऱ्हाठे...! या इथंच. या मातीवर याच आकाशाखाली हाच भराट वारा पिऊन त्याची छाती कशी अभिमानानं फुगली असेल. याच भराट वाऱ्यानं मला पुरतं झपाटलं आहे. वर्तमानापासून फार दूर मागं फेकलं आहे.... भूतकाळाच्या गहिऱ्या गंभीर गर्तेत लोटलं आहे.... माझी मलाच विस्मृती झाली आहे... की कुणास ठाऊक पण अचानक ऊर भरून येतो. हुंदका गळ्याशी दाटतो. यवनांच्या अमानुष जुलमी राजवटीखाली चिरडलेल्या, पाशवी अत्याचारांच्या टाचेखाली तुडवलेल्या, उन्मत्त राजसत्तेच्या जबरदस्तीमुळं गांजलेल्या नि निर्दय आक्रमणाखाली भरडून निघालेल्या या अफाट 'मऱ्हाठा' देशास ज्यांनी पारतंत्र्याच्या जखडलेल्या लोहशृंखलांतून मुक्त केलं त्या महान कार्यात असल्या मराठी रांगड्या गड्यांचा सिंहाचा वाटा होता. त्या अज्ञात शक्तिपुत्रांना हा माझा पहिला वहिला मानाचा मुजरा...!

'पर्यटन' जुलै १९७७

● ○ ●

# ९ भवानी कडा : ७०० फूट उंचीचे आव्हान



'उत्ताल कडा भवानीचा'

छाया - प्रजापती बोधणे

'महादरवाजा नि वाघदरवाजाखेरीज जो कोणी तिसऱ्या वाटेनं रायगडावर चढून येईल त्यास एक काठेवाडी घोडा नि एक शेर वजनी सोन्याचा तोडा इनाम दिला जाईल' - असा पण छत्रपतींनी लावल्याची नि तो एका तरुण डोंबाऱ्यानं जिंकल्याची आख्यायिका सर्वश्रुत आहेच. गेली चार पाच वर्षे रायगडच्या परिसरातून कित्येक वेळा भटकताना बहुतांच्या तोंडून ही दंतकथा अनेकवार ऐकली होती. ही वाट नेमकी हेरून काढण्यासाठी एकवार तळातून गडास संपूर्ण प्रदक्षिणाही घातली होती. ''चहू अंगी धोंडा ताशीव एकच आहे... पर्जन्यकाली कडियावर गवत उगवत नाही. दीडगाव उंच... गड बहुतच चखोट...'' हे सारं काही त्यावेळी प्रत्यक्ष पाहिल्यानं प्रत्ययास आलं होतं.

## तो दिवस उजाडला

आणि अखेर तो दिवस उजाडला. श्रीशिवराज्य शके ३०५, फाल्गुन शु. १२ शनिवार...! सकाळच्या कोवळ्या सोनेरी रविकिरणात रायगड चहूअंगी न्हाऊन निघतो आहे नि या शुभमंगल घटिकेला आम्ही उभे आहोत टकमकाच्या पायथ्याशी.

टकमकच्या नेमक्या पायथ्याशी आहे रायनाक महाराचं थडगं. टकमकाचं खरंखुरं रौद्र रूप वरून नेटकं ध्यानी येत नाही. ते कळतं या इथूनच. जवळजवळ दोन हजार फूट उंचीचा सरळ उभा कडा इथं उभं राहताक्षणीच अंगावर आल्यासारखा भासतो. किंचित झुकलेल्या माथ्याचा हा कडेलोट खालून एखाद्या प्रचंड नागफण्यासारखा दिसतो. या इथूनच एक रानवाट कड्याच्या अंगाअंगानं गच्च रानातून रायगडास वळसा घेत थेट भवानीकड्याच्या पायथ्याशी येऊन थडकली आहे.

भवानी टोकासमोरील डोंगराची सोंड जिथं भवानीकड्याला येऊन भिडली आहे, तिथं आहे एक मेटं. मेट म्हणजे गडाखालील पहाऱ्याचं ठिकाण. अशी ही पहाऱ्याची ठिकाणं शिवकालात रायगडच्या चहूअंगी अगदी मोक्याच्या ठिकाणी असत. त्यातलंच हे एक. या मेटेपर्यन्त यायचं म्हणजे हजार फूट निसरती घसरंड, काटेरी झा ावळीतून घुसारा करीत ढिले झालेले पायाचे टाके मोठ्या प्रयासानं घट्ट करीत करीत, आस्ते कदम वाघोलीच्या खिंडीवाटे चढून जायचं.

## थक्क करणारा कडा

कडा तसा सरळ सातशे फूट उंच आहे. इथून तसा बेलाग दिसतो आहे. पाहताक्षणीच दातातळी अंगुली जावी असा चक्क-थक्क करणारा आहे.

कड्याचा अर्धाअधिक भाग गांडूळ मातीच्या भुसभुशीत खड्यांनी झाकला गेला आहे. खाचा, खोबण्या नि कंगोरे पार बुजून गेले आहेत. पाय टेकताक्षणीच घसरतो आहे. अंग पेलून तोल सावरता सावरता कसरतीचे नानाविध प्रकार शिकण्याची ही एक नामी संधी आहे.

दुपार ऐन जवानीत आली आहे. ती मनस्वी रसरसू लागली आहे. सर्वांगी झोंबू लागली आहे. डोई सूर्य तळपतो आहे. कडा कमालीचा तापला आहे... झळांचा स्पर्श असह्य होतो आहे... चेहरे घामानं उबरले आहेत... ते उन्हामुळे तकाकत आहेत... तोंडातली लाळ तहानेनं चिकट झाली आहे... जीभ टाळ्याला चिकटते आहे... धाप

लागली आहे... जीव कासावीस झाला आहे... तरीही चढण्याचा कस लागला आहे... एका वेगळ्याच दिव्य संकल्पानं भारावलेले आम्ही कशाचीही तमा न बाळगता तसू तसू अंतर कापीत मुंगी-पावलानं सरकतो आहोत...

वरील अंगास हिरा पंडित वाट चोखाळतो आहे. मी बाजूच्या कपारीला खेटून पूर्वाभिमुख उभा आहे. समोर दुर्ग लिंगाणा ताठ मानेनं उभा आहे. त्यावरील तो सुळका इथून साक्षात शिवलिंगासारखा दिसतो आहे. दोन महिन्यांपूर्वी घडलेला तो अपूर्व विक्रम आठवताच सर्वांगातून एक अनामिक शिरशिरी विजेगत थरारून जाते. दुर्ग लिंगाण्याचं शिखर जिंकल्यावर त्याच दिवशी त्या भयप्रद वणव्याच्या जबड्यातून भवानी टोकावरील सूर्यास्त डोळेभरी पाहिला होता. ते विहंगम दृश्य कॅमेऱ्यात टिपलं नि त्याचक्षणी मनोमन संकल्प सोडला की पुढील खेपेस भवानी कडा चढून जायचा...

**हीच, हीच ती वाट**

कड्याच्या मध्यभागी पन्नास फुटी एक सरळ ताशीव भिंत आहे. त्या भिंतीपाशी जाऊन टेकताच आनंदानं बेभान झालेला हिरा - 'पायऱ्या... पायऱ्या... अरे पायऱ्या... तुकाशेठ, अरे इथं पायऱ्या आहेत...' असं ओरडतो. हे ऐकताच वारं प्यालेल्या वासरागत माझी स्थिती होते... चौखूर उधळावं नि प्रथम पायऱ्या न्याहाळाव्यात असं दाटून येतं खरं, पण अपुऱ्या जागेमुळं इंचभर हलतादेखील येत नाही. तरीपण तशाही अवस्थेत कपारीला छातीपोट भिडवून दोन्ही हातांवर नेट देऊन सारं शरीर वर उचलतो नि पुढं एखाद्या अधाशासारखा ओढाळ मनानं सरपटत सरपटत पायऱ्यांपाशी येऊन थडकतो... न्याहाळतो... खातरजमा करून घेतो... नि हिरास सांगतो - "हिरा, हीच-हीच ती वाट..."

छाती रुंदावून, तिरप्या मानेनं गुर्मीत पाहणाऱ्या एखाद्या पोलादी मर्दासारखी दिसणारी ही भिंत मोठ्या दिमाखानं साऱ्या देहाचा कोट करून वाट अडवून उभी आहे. सहजासहजी हिच्या माथी चढण्याची कुणाची छाती होणार नाही हे पाहताक्षणीच ध्यानी येतं. भिंतीच्या पायथ्यालगत कातळात कोरलेली आहेत सहा इंच व्यासाची दोन गोलाकार छिद्रे. केवळ अनुमानच काढायचं झालं तर लाकडी शिडीचे दोन पाय या छिद्रात घट्ट रोवून पूर्वी या वाटेनं माणसं चढली उतरली असली पाहिजेत. तर मग 'शेलारखिंडीतील' ती कथा दंतकथा कशी म्हणावी... ती सत्यकथा असली पाहिजे. वाघाच्या काळजाचा तो

तरणाबांड गडी हा कडा मोठ्या हिंमतीनं नि जिद्दीनं चढून गेल्यानंतर दूरदृष्टीच्या त्या दुर्गप्रेमी नृपाळानं आवश्यक त्या ठिकाणी डागडुजी करवून ही गुप्त वाट म्हणून गुप्तच राखली असली पाहिजे. असो.

### कल्पनेनंच काटा

टळटळीत दुपार टळून गेली आहे. वाऱ्याची एखाददुसरी थंडगार झुळूक घामाटलेल्या अंगाला चाटून जाते आहे. उंच आकाशात घिरट्या घालणाऱ्या एकदोन घारी होडीसारख्या तरंगताना दिसताहेत. असाच एकदा दुर्ग कर्नाळ्याचा टेम्भा चढताना घारीनं झडप घातली होती. नि क्षणार्धात चपळाईनं तीरासारखी सूयूऽऽदिशी निघून गेली होती. डोळ्यापुढील चमूचम् चमकणारे काजवे थांबताक्षणी ध्यानी आलं होतं की ज्या खोबणीचा मी हातानं आधार घेतला आहे, त्या खोबणीत घारीची अंडी आहेत म्हणून...! जिथं माणूस सहजासहजी पोचू शकत नाही अशा या अडचणीच्या जागी घारी अंडी घालतात. ती खाण्यासाठी तिथं साप येतात... मनी येतं, इथं अशाच एखाद्या कपारीत घारीची अंडी असली तर...? नेमका त्याच जागी चुकून हात लागला तर...? नुसत्या कल्पनेनं अंगावर काटा उभा राहतो.

भिंतीच्या डाव्या अंगी धारदार कपारीला अंग घाशीत हिरा पंधरा एक फूट वर चढला आहे. डाव्या मनगटावर नेट देऊन सारं शरीर त्यानं पेलून धरलं आहे. उजव्या हाताच्या पंज्यानं तो वरील आधार चाचपडतो आहे. संतोष त्याला आधार देतो आहे. तो ज्या टीचभर जागी उभा आहे त्या जागेखालचा कडा सरळ पाताळावेरी तुटत तुटत गेला आहे. दोन्ही पायांच्या मागील खोटा कड्याच्या धारेच्या किंचित बाहेर सरकल्या आहेत... अवजड सॅक हेलकावते आहे... हिराच्या भारानं तो लपकतो आहे... कड्याला चिकटून राहण्याचा थरथरत्या पावलांनी तो कसाबसा प्रयत्न करतो आहे... इंचभर जरी गफलत झाली तर मरण अगदी अटळ... तिथं दयाक्षमा नाही.

वर तटबंदीजवळ उदय साळवी, बाळ फडणीस, मधुकर केळुस्कर, मूर्ती, बाळ भावे, अविनाश शहापूरकर आणि दादरच्या 'पाठारे जिमको' चे चालक चंद्रकांत पाठारे उभे आहेत. तटबंदीपासून शंभर फूट खाली उभा आहे अनिल पटवर्धन. त्यांची तारांबळ उडाली आहे. गंभीर चेहऱ्यानं तो हात देण्याचा प्रयत्न करतो आहे. पण पुढं येऊ शकत नाही. साऱ्या युक्त्याप्रयुक्त्यांनी चक्क पाठ फिरवली आहे.

हे सारं काळजाचा थरकाप उडवणारं दृष्य मी श्वास रोधून

पाहतो आहे...!

पंधरावीस मिनिटांच्या जीवघेण्या झटापटीनंतर शेवटी अनिलनं वरून सोडलेल्या दोरखंडाचं टोक हिराच्या हाती लागणार तोच आई भवानीनं हात दिला... बुडत्यास आधार पावला... तो त्या पोटशी कपारीला पालीसारखा चिकटला... श्वास रोधला... साऱ्या ताकदीनिशी शरीराला एक जोराचा नेट दिला... गर्रकन् फिरला... नि क्षणार्धात डोळ्याचं पातं लवण्याआधीच त्या कपारीच्या माथी लवंडला...! संतोषच्या खांद्यावरचा भार उणावला... हिराचा जोष दुणावला... नि पळभरातच गिरकी घेऊन तो उभारला... त्या काळ्याकभिन्न कातळखाणीत हिरा हिऱ्यासारखा चमकला...! हिरा जिंकला... विजयी झाला... भवानी कड्याचा सर्वप्रथम मानकरी ठरला... त्याच्या डोयी मोतियांनी लगडलेला रत्नखचित मानाचा तुरा झळकला... विजयी मुद्रेनं प्रसन्न स्मित करीत तो त्या उत्ताल कड्याच्या माथी सिंहाच्या पावित्र्यात उभा राहिला...!

गिर्यारोहणाच्या एकाही साधनाला चुकूनही स्पर्श न करता सातशे फूट उंचीचा बेलाग कडा तो येंगला त्या डोंबाऱ्यागत... धन्य तो सह्याद्रीपुत्र...!

तद्नंतर या देशीच्या शिवभक्तांनी आम्हास गौरविले... शिवशाहिरांनी कवतिकाचा लखोटा मोहरबंद करून सांगावा धाडला... 'तर 'गोनीदां' नी भूर्जपत्रावर दिलगिरी व्यक्त केली... लिहिलं- 'भले! भले! शक्य असते तर पायी सोन्याचा तोडा लेवविला असता...!'

सुमित्राराजे भोसले-आऊसाहेबांनी मनीची एक फार मोठी महत्त्वाकांक्षा पूर्ण केली... तर हडपगुरुजींनी, प्रतापगडावरील आईच्या सदरेवर आम्हा सर्वांनाच शिवमुद्रांकित केलं...!


आज... आज छत्रपती शिवराय असते तर...?

*(या भवानी कड्याच्या संदर्भात बाबासाहेब पुरंदरे यांनी लिहिलेल्या 'शेलारखिंड' या रंगीत सचित्र कादंबरीवरून, आमचे सुप्रसिद्ध अभिनेते मा. श्री. रमेश देव यांनी 'सर्जा' नावाचा एक मराठी चित्रपट काढला. या देशी तो खूपच गाजला.)*

महाराष्ट्र टाइम्स - दि. १।४।१९७९

●○●

# १० पाचूच्या हिरव्या माहेरी...



शिवतीर्थ किल्ले रायगड नि
बरखंदाज दुर्ग लिंगाणा

छाया - 'नेचर लव्हर्स'

चौफेर चौखूर उधळणारा वारा येऊन थडकतो. निरभ्र आकाशाच्या मैदानात चौतर्फानं ढगांची शिबंदी तळ ठोकून उभी राहते. लांब पल्ल्याच्या मुलुखमैदानी तोफांची मोर्चेबंदी होते. इशारत दिली जाते. विजेची बत्ती लागते. गगनभेदी गंभीर नादलहरी चराचर व्यापून टाकतात. कृष्णवर्णी मेघांचे बुलंद डेरे फुटतात. सतत चार महिने लूटमार केलेल्या दौलतीचा खजिना टपोऱ्या पाणीदार मोत्यांच्या रूपाने भूतलावर बरसतो... मातीचा कण नि कण थरथरतो. प्रत्येक क्षण नि क्षण गरगरतो. काळोख भिजल्या सुगंधी सुप्त तृप्त उसाशानं सारा आसमंत भारून जातो.

आणि मग ओला मुसमुशीत सुखद स्पर्श होताच सर्वांगी अंगार झालेल्या धरणीच्या गर्भातून हिरव्या लुसलुशीत कोंबांचा शृंगार डोकावतो. अनिवार संतापाने तापलेल्या सह्याद्रीवरून वरुणाची कृपादृष्टी फिरते. होरपळलेल्या रानावनांतून जादूईमंत्राची हिरवी प्राणफुंकर घातली जाते. निष्प्राण पहुडलेल्या रुक्ष नद्यानाल्यांवरून संजीवनी उदक शिंपडताच त्यांच्या सर्वांगातून नवचैतन्य खळखळत वाहू लागते!

काळ्याकभिन्न बेलाग कड्यांवरून उड्या घेणाऱ्या *जलप्रपातांना* मध्येच फोडून - त्या पाणझोतांना झुंजून पिंजणारा अवखळ खट्याळ वारा.. पांढऱ्या शुभ्र धुक्याच्या झिरझिरीत आवरणातून दिसणारं रेशीमधारांचं मुलायम वस्त्र... त्यावर तरंगणारे सूक्ष्म जलतुषार... त्यातून फुलून खुलून दिसणारी सप्तरंगी मोरपिसारी धुंद छटा!

हिरवीकंच झाडावळ. त्यात मुसमुसणारी पोपटी पाणावळ. तीवर टप्टप् टपकणारी मोतियांची थेंबावळ. टपोऱ्या पाणीदार मोत्यांची अर्घ्य अर्पिणारी रानतेऱ्याची हिरवी ओंजळ. रंगीबेरंगी पानांफुलांवर तरंगणारी रंगीबेरंगी फुलपाखरं. ही स्वच्छंदी हळवी फुलपाखरं -- कोमल फुलांच्या नाजुक हृदयींचं कोवळं गुपित चोरताना... घमघमलेला मदिर ओला गंध. या भिजल्या रानफुलांच्या मदिर ओल्या गंधानं धुंद होऊन माळ गुंफणारी शुभ्र बगळ्यांची लक्षवेधी रांग, काळ्यासावळ्या मेघमालिकांवर तरंगताना मोठी खुलून फुलून दिसते!

मोकळ्याचाकळ्या माळावर पसरलेले - हिरवे हिरवेगार गालीचे - हरित तृणांच्या मखमालीचे...!' त्यामधून नागमोडी धावत गेलेल्या ओढाळ वाटा... त्यावर हळदीच्या पावलांचे ठसे उमटवीत लपंडाव खेळणारी श्रावणी उन्हं!

सुस्नात झालेल्या सह्याद्रीच्या अंगाखांद्यावरून उड्या घेत दरीतल्या साकळलेल्या हिरव्या चिंब उबदार अंधाराखालून खळखळत धावणारे फेसाळ पाणलोट. सह्याद्री एका वेगळ्याच अनामिक बेहोषीत जणू खळखळून हसत असतो. कुणीतरी म्हटलंय्. 'टेक टाइम टू लाफ, इट् इज द म्युझिक ऑफ द सोल!' या त्याच्या अमर संगीतानं अवघी दऱ्याखोरी सतत चार महिने अखंडपणे दुमदुमून गेलेली असतात...!

ही सारी सृष्टिशोभा पाहून समर्थांच्या चित्तवृत्ती वोळल्या. सदैव जागृत असलेलं कवित्व मोहरलं. टप्टप् टपकणाऱ्या प्राजक्ताच्या फुलांसारखे शब्द भिजल्यामनी भिंगुरले. नि खळखळत खळाळणाऱ्या खळाळासारखी ती अंतरीची शब्दगंगा मुखावाटे खळखळत वाहू लागली-

गिरीचे मस्तकी गंगा। तेथुनी चालली बळे॥
धबाबा लोटल्या धारा। धबाबा तोय आदळे॥
गर्जतो मेघ तो सिंधु। ध्वनिकल्लोळ उठिला॥
कड्यासी आदळे धारा। वात आवर्त होतसे॥
तुषार उठती रेणू। सीत मिश्रित धुकटे॥
दराच तुटला मोठा। झाडखंड परोपरी॥

## स्वप्नील सप्तरंगी साम्राज्य

भरपावसात दुर्गयात्रा म्हणजे एक अनुपम्य सुखसोहळा.. या सौन्दर्याच्या सोहळ्यात नाना रंगांची उधळण करणारी सृष्टी, दृष्टीने टिपून घेण्यात अनोखा आनंद असतो. रिमझिमत्या सोनवेळेला रेशीमधारांचा अभिषेक होताना नि रंगीबेरंगी रानफुले ल्यालेल्या हिरव्या वाटेनं चालताना आपण नुकतेच पन्नाशीतून पंचविशीच्या घरात जात आहोत असं वाटतं. पैलतीरी लागलेल्या नेत्रांसमोर स्वप्नील सप्तरंगी साम्राज्याचे आपण अनभिषिक्त सम्राट आहोत असं भासतं!

गतवर्षी याच मोसमात राजगडावर गेलो होतो. शिवाजीराजांच्या जीवनातील अनेक हर्ष-विषादाच्या स्मृती या गडाशी निगडीत. झडप घालण्याचे नि विळख्यातून सुटण्याचे शक्तियुक्तीचे मनसुबे रचले गेले ते याच गडावर. पुरंदरच्या तहाने मातीला मिळालेलं स्वराज्य पुन्हा उमेदीनं उभं करण्याची मुंहूर्तमेढ रोवली गेली ती याच गडावर. वेळोवेळी फत्ते झाल्याची खबर घेऊन येणाऱ्या सांडणीस्वाराला पाहून विजयी मुद्रेनं प्रसन्न स्मित केलं ते याच गडाने. असल्या अनेक विचारांच्या हलकल्लोळात राजगड चढून गेलो नि बालेकिल्ल्यावर त्याच विचारात पुनश्च गढून गेलो.

## इथली चुंबिन'मी माती

वर आभाळाच्या घुमटात असंख्य मेघांची दाटी. चहूअंगी धुक्याचा अभेद्य वेढा... वरून कोसळणाऱ्या पाणभुश्याचा झिमझिम् अभिषेक... त्या अभिषेकाखाली न्हाऊन निघालेला उध्वस्त माथा. त्यावर पिवळ्याधमक सोनफुलांची पखरण. चंदेरी तलावातील काचेसारख्या निळ्याशार पाण्यावरील असंख्य लहरी. त्यावर चाललेलं धारानृत्य. छत्रपतींच्या राहत्या वाड्याची दुर्दशा. पडक्या भिंतींच्या फुटक्या चिऱ्यांतून थरथरणारी हिरवी पाती. विस्मृतीच्या गहिऱ्या खोल गर्तेत बुडालेली हिरवी माती. इथली भिजली माती माथी लावताना भरून येणारी छाती डोळियातल्या वाती लावते नि मग नकळत भिजल्या मनी शब्द घुमतात-

"धिक् तुमचे स्वर्गहि साती
इथली चुंबिन मी माती
या मातीचे कण लोहाचे
तृणपात्यांना खड्गकळा
कृष्णेच्या पाण्यातुनी अजुनी
वाहतसे लाव्हा सगळा... !"

इतक्यात भन्नाट वाऱ्याची पिसाटभरी फुंकर घातली जाते. तळ्यातलं पाणी डहुळतं. धुक्याचा शुभ्र भंडारा आकाशावेरी उधळतो. धारांची टिपरी तडतडते. ढगांची संबळ कडकडते. विजेचा पाजळलेला पोत आकाशभर फरफटतो. जल्लोषात सारा आसमंत दुमदुमून जातो... !

देहदंडाची सजा झालेल्या अट्टल गुन्हेगाराच्या काळजाचाही थरकाप उडेल असा विराट ताशीव कडा म्हणजे रायगडावरील टकमक टोक. निसर्गाच्या या अद्वितीय आविष्काराच्या मनमुराद दर्शनाने आपण भारावून जातो. ग्रीष्माच्या अंगारात सर्वांगाची काहिली होत असता इथं उभं राहून उत्तरेकडं पसरलेलं काळ नदीचं खोरं निरखावं. आत्ता याक्षणी सर्पाकृती पहुडलेली शुष्क काळनदी. पावसाळ्यात दुथडी तुडुंब भरून खळखळत फेसाळत वाहणारी. एखाद्या नागिणीप्रमाणं सळसळत धावणारी दुतर्फा जमीन सुपीक करणारी... रौद्ररूपधारिणी.. जीवनसुखदायिनी... !

वर्षाऋतूत इथून दिसणारं हे विराट दर्शन तर मोठं रौद्ररम्य असतं... भवतालचं पोपटी लावण्य पाहून काळ्याकभिन्न पत्थरालाही अशावेळी पाझर फुटलेला असतो !

इथं घटकाभर बसावं. समोर पसरलेलं हिरवंशार सौंदर्य न्याहाळावं. कधी धुक्याचा अथांग सागर पाहावा. त्याचं साम्राज्य अवलोकावं. कधी उसळणाऱ्या बुलंद फेसाळ लाटांचं आक्रमण बघावं. कधी पिसाट वाऱ्याच्या सुसाटगिरीचं तांडव डोळियात साठवावं. कधी निळसर हिरवं अघरीय परिधान करून स्कंधावरून पांढरंशुभ्र उत्तरीय रुळणाऱ्या दूरवरच्या पर्वतराजांचा दिमाख. जणू रायगडाचे मांडलिक वाटावेत असा त्यांचा तो थाट ध्यानी घ्यावा. तर कधी उन्हापावसाचा लपंडाव निरखावा. नि मग पाचूच्या हिरव्या माहेरी आलेल्या हळदीच्या उन्हात अगदी मनमुराद न्हाऊन घ्यावं...

### झिंगलेली वनश्री

अंगात आल्यागत झिंगून पिंगणारी नि वारं गेल्यावर भोवळ आल्यागत वाऱ्यासवे डुलणारी वनश्री. सारी बंधने झुगारून पिसं भरल्यागत

बेभान धावणारी काळनदी... नि अधूनमधून विरल होणाऱ्या धुक्याच्या झिरझिरीत ओढणीतून अस्पष्ट डोकावणारी वाडीतल्या सती गोदावरीची समाधी पाहून आत खोल कुठेतरी दडलेलं शल्य भिजल्या मनी सलतं. झुळझुळ वाहणारं गाणं भैरवीच्या सुरानं मधेच संपावं. एखाद्या उदास सायंकाळी केशर भिजल्या पाणियात सूर्यबिंब ओलंचिम्ब होताना एका अनामिक हुरहुरीनं मोरपिसी दिसांची एखादी दर्दभरी आठवण भिजल्या मनी नकळत शब्दांकित व्हावी, तसं याक्षणी वाटतं आहे. अथांग सागराच्या अतुल शौर्यावर जीवापाड प्रेम करणाऱ्या एखाद्या नदीच्या प्राक्तनी नियतीने काय वाढून ठेवलंय् हे त्या भाबडीला काय ठावे... ?

**'सर्व बंध तोडून जेव्हा नदी धुंद धावे**
**मीलन वा मरण पुढे तिला नसे ठावे।।'**

महाराष्ट्र टाईम्स - दि. १०।७।१९७९

● ○ ●



'बुलंद वाघ दरवाजा'

छाया - तु. वि. जाधव

# ११ वाघ दरवाजा

*दि. २६ जानेवारी १९७६ रोजी शिवतीर्थ किल्ले रायगडावरील सुप्रसिद्ध वाघदरवाजा उतरण्याचं चित्तथरारक साहस विलेपार्ले हॉलिडे हायकर्स क्लबच्या बारा निवडक सभासदांनी केलं. त्या चित्तथरारक नि इतिहासप्रेमी धाडसाचं हे एक रसीलं प्रवासवर्णन वाचून ते साहस करण्याची स्फूर्ती अनेकांना व्हावी.*

किल्ले रायगडावरील वाघदरवाजा म्हणजे महाद्वाराची लहानगी प्रतिकृतीच. कुशावर्त तलाव ओलांडून एका अडगळ निसणीच्या वळणवाटेनं तीनशेएक फूट खाली उतरलं की कोंडेखळीच्या खळग्यात अगदी तळाला एका बेचक्यात हा सुप्रसिद्ध वाघदरवाजा आज जवळजवळ तीनशेएक वर्षे थंडीवाऱ्याचे नि उन्हापावसाचे तडाखे खात ठोकताठपणं उभा असलेला दिसतो.

बाजूनंच एक प्रचंड पाणलोट वरील लवणांतून खाली उतरला नि ऐन कड्याच्या माथ्यावर खडक फोडून त्यानं एक लहानशी सपाटी बनविली. तद्नंतर तो सपाटीचा टप्पा ओलांडून त्या जलप्रपातानं सरळसोट दोनशे फूट तुटलेल्या कड्यावरून खाली उडी घेतली.

कोवळी उन्हं अंगावर झेलीत वाघदरवाज्याच्या पायठणीपाशी बसलो आहोत. तीनशे वर्षांपूर्वीचा इतिहास आठवतो आहोत. १६८९ साल आहे. संकटांचे कृष्णवर्णी मेघ चहूबाजूंनी धावताहेत... स्वराज्यावर पारतंत्र्याचं सावट पसरलं आहे... सिंहाचा छावा धर्मांध औरंगजेबाच्या साम्राज्यलालसेला बळी पडला आहे... त्याच्या निर्घृण हत्येनं सर्वत्र हलकल्लोळ उडाला आहे. आकाश फाटलं आहे... दुर्दैव कोसळलं आहे... काळजाच्या चिंधड्या झाल्या आहेत... मंत्री मुत्सद्दी किंकर्तव्यमूढ बनले आहेत... सारा 'म्हरास्ट' देश शोकसागरात बुडून गेला आहे... कुणी कुणाचं सांत्वन करावं हे समजेनासं झालं आहे... त्यातच जुल्फीकारखानानं रायगडास वेढा घातला आहे... रक्तपिपासू यवनांनी फास टाकला आहे... तो करकचून आवळला गेला आहे... छावण्यांनी सारा परिसर गजबजून

गेला आहे... रायगड आतून त्वेषानं उसळला असला तरी बाह्यांगी स्थितप्रज्ञासारखा अचल दिसतो आहे... गडावर आहे महाराष्ट्राची लाडकी राणी...! संयमाची मूर्तिमंत देवता...! ती धीरोदात्त आहे... निर्लोभी आहे... नि:स्वार्थी आहे... भविष्यदृष्टीची आहे... तिच्याभोवती सर्वच थोर व उदार मनाची माणसं एकत्र जमली आहेत. सर्वांची दृष्टी एक! सर्वांचा विचार एक! सर्वांचं ध्येय एक! तरी यावेळी कुठल्या क्षणी काय घडेल याची निश्चित शाश्वती नाही. शेवटी निरुपाय होतो नि अखेर राणी येसूबाईसाहेबांची आज्ञा शिरसावंद्य मानून रामचंद्रपंत अमात्य, संताजी घोरपडे, स्वत: राजाराममहाराज नि त्यांच्या दोन भार्या इत्यादी ठराविक, निवडक नि जाणकार मंडळी याच वाघदरवाजानं खाली उतरतात...! तारीख आहे चैत्र वद्य १०, शुक्रवार दि. ५।४।१६८९.

याला पुरावा एकच. इथल्या या दरवाजातले चिरे...! मनी सहजच एक कल्पना चमकून जाते. आता याक्षणी इथल्या एखाददुसऱ्या पत्थराला जर जीभ फुटली तर...? निमूटपणं पायठणीला हात स्पर्शून भाळी टेकवतो नि मुकाटपणं भरल्या डोळ्यांनी उतरू लागतो.

बाराजणांची निवडक तुकडी! सारेच तरुण रक्ताचे, उमद्या दिलाचे नि निधड्या छातीचे! पायात मजबूत बळ नि छातीत पुरती हिंमत! मनी भय असं नाहीच. त्यातून मनी शिवभक्ती नि पाठी शिवशक्ती.

समोर पन्नासएक फूट खालच्या सपाटीवर उतरणं तितकंसं कठीण नाही. पण सोपंही नाही हेही तितकंच खरं. बुरूजाला खेटतखेटत अंग घाशीत अरुंद, चिंचोळ्या वाटेनं शरीर पेलीत नि तोल सावरीत कसेबसे खाली उतरतो नि सपाटीवर जाऊन थडकतो.

आता पुढं दोनशे फूट उंचीचा उभार कडा उतरणं आहे. कुठलाही कडा चढून जाणं सोपं असतं, पण तो उतरणं महाकर्मकठीण! चढणं सोपं असतं. चढायचा ठाव दृष्टीसमोर दिसत असतो. तो हेरता येतो. अंदाज बांधता येतो, पण उतरताना मात्र सारंच याउलट. म्हणूनच तर इथं जिद्दीची कसोटी आहे... हिंमतीची परीक्षा आहे... ही एक तारेवरची कसरत आहे... साहस, ताकद, कणखरपणा, सहनशक्ती, चिकाटी, बळ, कौशल्य, संयम, आत्मविश्वास, इच्छाशक्ती इत्यादी इत्यादी सारं सारं काही इथं पणाला लावणं आहे हे निर्विवाद.

सुरुवातीला सूत्रधार हिरा पंडित कमरेला दोरी बांधून चक्क लटकत लटकत पंधराएक फूट उंचीची उभी दरड उतरतो नि पायथ्याशी पुढे आलेल्या एका भल्यामोठ्या दगडावर जाऊन स्थिरस्थावर होतो. तदनंतर

मी-मी उलटा-सुलटा लोंबकळत, घसरत, खरचटत कसाबसा हिराच्या समीप जाऊन पोहचताच- "तुक्या, तू पुढची वाट शोध तोवर बाकीच्यांना मी उतरवतो-" हे सूत्रधाराचे लाख मोलाचे शब्द मी पट्टदिशी प्राजक्ताच्या फुलासारखे झेलतो नि मग वखवखलेली नजर शोधू लागते-आपले भक्ष्य, एखाद्या भिरभिरणाऱ्या घारीच्या तीक्ष्ण दृष्टीसारखं.

वाट अशी नाहीच. ती शोधावी लागणार आहे. टप्पे हेरावे लागणार आहेत. आधार बांधावे लागणार आहेत.

कडा तसा काही एकदम ताशीव नाही. जागोजागी उगवलेल्या गवताचे भुरकट झुंबे... त्यात एखाददुसरं साप-सरडं असण्याची शक्यता अधिक. अधूनमधून पुढं आलेली मोठमोठ्या दगडांची काळीकभिन्न टेंगळं नि पायथ्याशी कारवीचं गच्च रान!

पायातले हंटरबूट काढून खाली खोलवर असलेल्या कारवीच्या रानात फेकून देतो नि अनवाणीच मुंगीपावलानं उतरू लागतो.

पायाखालची माती एकदमच भुसभुशीत आहे. सारेच आधार ठिसूळ आहेत. एखादी कारवीची काठी हाती धरू जावं तर ती कुट्टदिशी मोडून पडते. टिचभर मातीचा आधार घेऊन उभ्या असलेल्या गवताचे काटेरी झुंबे मुळासकट सप्पदिशी हातीच येतात- नि मग अंग पेलीत तोल सावरता सावरता कुठंतरी खरचटतं, लचकतं, एखाददुसरा काट्यांचा झुंबका अंगाखांद्यावर छानपैकी चुरचुरीत तांबड्या रेघोट्या ओढून नामानिराळा होतो. असं हे सारंच बेभरवशाचं प्रकरण अधिकच चिघळत चाललं आहे.

कधी कगारीच्या अरुंद कुशीतून अंग घाशीत, कधी दरडीच्या चिंचोळ्या पोटघळीतून अंग चोरीत तर कधी एखाद्या कपारीला छाती-पोट भिडवीत तसू तसू पुढं सरकावं नि पुढची वाट मोठ्या सावधपणं चोखळावी. त्यातच वरून उतरणाऱ्या तुकडीच्या पदाघातानं ढासळलेल्या मातीतून खाली घरंगळत येणाऱ्या दगडी धोंड्यांना तोंड देणं मोठं मुष्किल होऊन बसावं.

तब्बल दोन तास झाले आहेत. अर्धाधिक कडा उतरून आलो आहे. आता शेवटचा एकच टप्पा मोठा जीवघेणा आहे. ही एक पन्नास फूट लांबीची खरखरीत कातळी घसरंड आहे. यावरून चक्क घसरत जावं लागणार आहे. वेळ फार थोडा आहे. प्रत्येक क्षण मोलाचा आहे.

काम पुरतं फत्ते झालं आहे. कित्येक वर्षांचं स्वप्न साकार

•

झालं आहे... खरचटत-घसरत खाली आलो आहे. एका झाडावळीच्या थंडगार सावलीत माऊलीची माया आठवतो आहे. सहजच डोळ्यात गेलेलं गवताचं कूस काढण्यासाठी म्हणून उजवा हात डोळ्यांसमोर आणतो तो काय? मधल्या बोटांतून टप् टप् टपकणारे रक्ताचे थेंब अभिषेकासारखे खाली तापलेल्या भूमीवर गळताना दिसतात. क्षणभर पाहातच राहतो नि तेच बोट घामानं डंवरलेल्या भाळी टेकवतो. एखादं मनाजोगं साहस करताना असं थोडं रक्त सांडलं तर केलेल्या श्रमाचे सार्थक झाल्याचा आनंद द्विगुणित होतो.

रोजच्या धकाधकीच्या जीवनात चाकोरीबाहेरचं थोडसं वेगळं जगता यावं म्हणून अधूनमधून सवडीनुसार शहरी वस्तीपासून दूर एखाद्या गडावर जावं. अवघड वाटेनं चढावं. निसणीच्या वाटेनं उतरावं. एक दोन दिस गडावरी मुक्काम ठोकावा. तिथला भराट वारा अंगावर घ्यावा. गड चहूअंगी न्याहाळावा. तिथल्या वास्तूंशी एकरूप व्हावं. एकजीव व्हावं. त्यांच्याशी बोलावं... म्हणजे आपोआपच इतिहासाची आवड जागी होते... कोवळी उन्हं अंगावर घेत निसर्गसौंदर्य निरखावं... एखादं लेणं अभ्यासावं. घटकाभर चांदण्यारात्रीत भटकावं... मूकयात्रा करावी... गच्च दच्च रानातून हिंडावं... बख्खळ दगड धोंडींनी खडबडलेल्या काटेरी ढोरवाटेनं चालावं. एखादा मनाजोगा कडा चढून जावा. रणरणत्या उन्हातून हुंदडावं. कुडकुडणाऱ्या थंडीतून हिंडावं... मोठेपण विसरून मुसळधार पावसात चिंब भिजावं... असं केल्यानं अंगी निर्भयपण येते. हिम्मत पक्की होते. हे सारं करीत असता कुठंतरी खरचटावं. कधी पायी काटा बोचावा. कधी सर्वांगी ओरखडे निघावे. कधी पाय मुरगळावा. कधी ठेच लागावी. कधी तहानेनं घसा कोरडा पडावा. कधी कडाडून भूक लागावी. कधी घामानं डवरून निघावं. कधी दमछाक व्हावी नि मग थोडा वेळ कुणा एका तरुतळी हातांची उशी करून चक्क ताणून द्यावी. असं घडलं की या वेगळ्या जीवनाला थोडंसं वेगळेपण प्राप्त होतं... त्याला अद्भुततेची एक धार चढते... एक अनोखा आनंद उरीपोटी साठविता येतो... नि मग त्या आनंदाचा सुगंध भवती दरवळत राहतो... आयुष्यभर दु:खात साथ देतो...

पाणढाळीच्या खड्ड्यात एका भल्या मोठ्या दगडावर उभा राहून उतरणाऱ्या भिडूंचं साहस मोठ्या कौतुकानं न्याहळतो आहे. यंत्रणा बरोबर जमली आहे. ती निर्दोष आहे... सूत्रधारणेची गिरमिटं वेळेवर फिरताहेत... त्यात काडीचाही दोष नाही. धागेदोरे नीट जुळले आहेत...

ते तुटण्याची भीती नाही... तारा योग्य वेळी छेडल्या जात आहेत... त्यात तिळमात्र कसूर नाही...

उतरण्याचा अगदी कस लागला आहे. भरल्या उन्हात कडा तसा लख्ख चक्क न्हाऊन निघाला आहे... कांत्या फणसळकर वचवचतो आहे... करमरकर मध्येच पचपचतो आहे... "हळू! तू पुढे हो-! अरं तसं नव्हे! ये हिरा! अरे मरशील! छे छे! आपण नाही बुवा! शाब्बास! वारे मेरे शेर! वारे मेरे गब्रू, जीते रहो पठ्ठे!"

असा संमिश्र कालवा झाला आहे. इतक्यात पंधरावीस माकडांचा एक कळप उजव्या बाजूच्या आडरानातून वर येतो नि पटापट उड्या मारीत बाजूच्या कड्यावरून क्षणार्धात दृष्टिआड होतो. सर्वच हबकतात. एक जबरदस्त भीतीची संवेदना सर्वांगातून विजेगत थरारून जाते.

शेवटी सारेजण तळाशी एकत्र जमतात. गळामिठी होते. क्षेमकुशल विचारलं जातं. आणि मग समोरच्या दरीतून एका अनुपम्य विजयी घोषणेचा बुलंद प्रतिध्वनी उमटतो- 'प्रौढप्रतापी पुरंदरऽऽ क्षत्रियकुलावतंसऽऽ सिंहासनाधीश्वर'.....

पाणढाळीनं साठलेले दगडधोंडे ओलांडीत पाचशेएक फूट वळणावळणानं खाली उतरतो. नि एकदमच हबका बसल्यागत दच्चदिशी थबकतो. बापरे! सहाशे फूट उंचीचा उभा तांशीव कडा पूर्वपश्चिम वेढलेला. इथून तिथून एका सरळ रेषेत तुटलेला. पावसाळ्यात वरून खळखळत येणारा पाणलोट या इथं किंचितसा रेंगाळतो नि थेट सहाशे फूट खोलीत बेधडक उडी घेतो.

पण इतक्यात समोरचा विलोभनीय देखावा पाहून सारेच सुखावतात. हे विहंगम दृश्य इथून ज्यानं एकदा पाहिलं तो धन्य! पायथ्याशी गच्च दुर्गम रान! पुढं पसरलेला अफाट प्रदेश! गावातली इवली इवली घरं! बोटाच्या पेराएवढाली माणसं! दूरवर दिसणारी गिरीशृंग आणि-आणि तो जवळ दिसतो आहे ना तो रायगडचा कर्दनकाळ! काळकाईच्या डोंगरातलं पोटल्याचं टोक! १८१८ साली कर्नल प्रॉथरने मोठ्या हिंमतीनं नि कौशल्यानं पोटल्याच्या डोंगरावर तोफा चढविल्या नि तिथून रायगडावर डागल्या.

इतक्यात खालच्या रानातून हरळ्या ऐकू येतात. गावारानात लाकूडफाट्यासाठी आलेली माणसं बेंबीच्या देठापासून आम्हास ओरडून सांगताहेत - "अरं बाबानू, थतं कशापायी आलाव? मरायचंय् काय? थतून वाट न्हाय! वाईच उजव्या अंगासनी म्होरं व्हा नि वर जावा!


तथून उतरायचा आक्रीत करू नगा!-"

उजव्या बाजूस वळून कारवीच्या गच्च रानात मुसंडी मारतो नि उभं रान तुडवीत एका निसणीच्या ढोरवाटेनं कड्याच्या पोटाखालून वाळसुऱ्याच्या खिंडीजवळ येऊन पोहोचतो. १६८९ साली वाघदरवाजातून उतरलेली मंडळी याच खिंडीवाटे वाळसुरे गावातून प्रतापगडाकडं कूच झाली. पुढच्या खेपेस या खिंडीवाटे उतरून पोटल्योच्या डोंगरावर जाण्याचा, रायगडास पायथ्यापासून संपूर्ण प्रदक्षिणा घालून प्रतापगडी कूच करण्याचा संकल्प सोडतो. आजच्या साहस यात्रेचा सांगतासमारंभ आम्ही आनंदयात्री या इथंच मोठ्या उत्साहानं साजरा करतो. आनंदाला भरतं येतं. नि पुनश्च एकवार त्या अनुपम्य विजयी घोषणेनं सारं आकाश दुमदुमून जातं.

'पर्यटन'
मार्च १९७८

● ○ ●

# १२ दुर्गत्रिकूट



सुमारगड

छाया - तु. वि. जाधव

तात सह्याद्रीनं अनेक किल्ले आपल्या शिरी मिरविले आहेत नि त्यांनी घालून दिलेले धडे त्यानं आपल्या उरी मिरविले आहेत. अशा ह्या सह्यगिरीच्या मुख्य रांगेची लांबी आठशे मैलांवर असली तरी तीस जागोजागी अनेक फाटे फुटलेले आहेत. त्यास शाखा आहेत. उपशाखा आहेत. अशा ह्या आपुल्या शाखा उपशाखांचे बाहू अस्ताव्यस्त पसरून, पश्चिम किनाऱ्यापासून कमीजास्त अंतर राखून तो दक्षिणोत्तर असा इथून तिथून दूरवर पसरला आहे. मुंबई-गोवामार्गे चिपळूणकडं जाताना असाच एक फाटा पोलादपुरापासून चिपळूणच्या दिशेनं धावत गेला आहे. त्यास फुटलेल्या एका शाखेवर ठोकताळपणं उभे आहेत महिपतगड, सुमारगड नि रसाळगड! अशा ह्या अंतर्भागात अगदी अडगळीच्या स्थळी दडून बसलेल्या दुर्लक्षित गडांकडे सहसा कुणाचं लक्ष जात

नाही. सहजासहजी इकडं कुणी जायला धजत नाही. ज्यांच्या पायात मजबूत बळ नि छातीत पुरती हिंमत असेल त्यांनीच यांच्या वाटेला जावं. एरव्ही परीटघडीची काळजी घेणाऱ्या गुलहौशी पर्यटकांनी दुरूनच दर्शन घेऊन मनी संतोषावं हेच सर्वोत्तम!

काय असतं, की काही ठिकाणी ह्या शाखाउपशाखांचं असं काही जाळं पसरलेलं असतं की त्यातून वाट शोधीत घटनास्थळी पोहोचणं मोठं अवघड होऊन जातं. ह्या डोंगरांचं काही खरं नाही. सारेच भूलभूलवयै. एक डोंगर मोठ्या प्रयासानं चढून नि निथळलेल्या घामानिशी धापा टाकीत त्याच्या माथी जाऊन उभं रहावं तो समोरच दुसरा डोंगर हात पसरून वाट अडवून उभा असलेला दिसतो. नि मग हे असले डोंगर चढता उतरता दमछाट होते... पायांचे टाके ढिले होतात... जीव अगदी मेटाकुटीस येतो... नि संकेतस्थळी पोहोचेपर्यंत सारा उत्साह मावळून जातो.

दिवस कललेला असतो... सावल्या लांबलेल्या असतात... पाखरं घरट्याकडं झेपावत असतात... गुरंढोरं राहुट्यांकडं दौडत असतात... बायामाणसं घरांकडं परतत असतात... नि एव्हाना आपण मात्र गडावरचा भन्नाट वारा पिऊन ताजेतवाने झालेले असतो... अस्तु!

बोरघर हे तसं काही उल्लेखनीय एस. टी. स्थानक नव्हे. हा एक 'रिक्वेस्ट स्टॉप' मुंबई-गोवामार्गी धावणाऱ्या गाड्यांपैकी क्वचितच एखाददुसरी गाडी किंचित् का होईना इथं आपली पायधूळ झाडतेच. तर काय, एका सुप्रभाती पायउतार होतो नि समोरची कोरडी नदी ओलांडून महिपतगडाच्या दिशेनं चालू लागतो.

बोरघरपासून महिपतगड अवघा सोळा मैलांवर. पण हे सोळा मैल तसे काही सरळ नाहीत. अवघड चढउतारांचे व जीवघेण्या वळणा-वळणांचे... त्यातून दिवस भर उन्हाचे... ग्रीष्मातल्या काहिलीचे... नद्यानाले साफ आटलेले... चक्क कोरडे पडलेले... आसमंत पेटून उठलेला, आगडोंब उसळलेला... रानातला पर्णभार करपलेला... भर पावसात आलो असतो तर हिरव्यागार वृक्षसृष्टीनं दिठी सुखावली असती... खळखळत झुळझुळणाऱ्या कर्णमधुर संगीतानं कोरडलेला जीव पाणावला असता.

आम्ही एकूण अकराजण. सारेच 'हॉलिडे हायकर्स क्लब' चे सभासद. राजश्री हिरा पंडित नि विवेक गोऱ्हे हे मित्रद्वय नुकतेच गिर्यारोहणाचं प्राथमिक शिक्षण संपवून हिमालयातून सुखरूप मायदेशी

परतलेले, प्रा. चांदेकर तर ह्या क्षेत्रातले आघाडीचे अनुभवी. बाकीचे तरुण रक्ताचे... उमद्या दिलाचे... अनेक अडचणी पार केलेले... शेकडो मैलांचे दौरे करून आलेले! राहता राहिलो मी, मी ह्या भटकंतीचा सूत्रधार. ह्या राहळातली थोडीफार माहिती असलेला. ह्या पंचक्रोशीत बालपणी हिंडलेला.

नुकतीच शेतभाजणीची कामं आटोपली आहेत. क्वचित कुठं 'साकूळ' (न भाजलेला राब) जमविण्याचं काम तसंच राहून गेलं आहे. आता फक्त पाऊस येण्याचा अवकाश! पहिलेवहिले पावसाळी ढग जमतील... अग्निदिव्यातून तावून-सुलाखून निघालेल्या धरणीवर ते अमृतवर्षाव करतील... पहिल्या-वहिल्या सुखद स्पर्शानं तृप्त उसासे फुटतील... मातीच्या घमघमाटानं आसमंत भरून जाईल... बियाणी पेरली जातील... बीजं अंकुरतील... रोपं वाढतील... ती वाऱ्यासवे डोलू लागतील... हिरव्यागार पाचूंचं सोनं होईल... सोनियाच्या ताटाला मोतियाचे घोस लटकतील... आणि मग ही धरतीमातेची दौलत अहर्निश काबाडकष्ट करणाऱ्या भूमिपुत्रांच्या घरी भरून भरून वाहू लागेल...

गप्पांच्या ओघात 'चांदिवली' मागं पडतं, पुऱ्याचे फौजदार श्री. पवार यांचं मार्गदर्शन होतं. शिंगऱ्याचे पोलिसपाटील श्री. कदम यांचं सहकार्य लाभतं. अशी ही गावोगावी थोडीफार विश्रांती घेत, कूच दरकूच करीत, मजल दरमजल गाठीत, नद्यानाले ओलांडीत, दऱ्याखोरी तुडवीत 'दिस मावळतीच्या वकुताला' महिपतगडाच्या पायथ्याशी असलेल्या बेलदारवाडीपाशी येऊन थडकतो. भूमीला टेकताक्षणीच, वर एका बुरूजावर उभ्या असलेल्या मधुकर मोरे नि रसाळगडाच्या पेठेतला तात्याबा सावंत यांच्या हाकारण्यानं मी तर अगदी मनोमन सुखावतो. मनी म्हणतो, "अखेर मोरे-सावंत दिलेल्या शब्दाला जागले म्हणायचे तर!"

आता फार वेळ बसून जमायचं नाही. दिवसाउजेडी गडावर पोहोचलं पाहिजे. उघड्यावरच तळ दिला पाहिजे. चांगली मोकळी चाकळी जागा शोधून काढली पाहिजे. ती साफ केली पाहिजे नि अन्नब्रह्माची काहीतरी सोय केली पाहिजे. पण ह्या एका गोष्टीविषयी मी मात्र अगदी निश्चिंत आहे. कारण 'मुदपाकखान्याचा खासा अधिकारी' (अर्थात भटारी) म्हणून श्री. विनय दवे यांची अगोदरच बिनविरोध निवड झाली आहे. मधे कुठूनही 'कुमक' येण्याची शक्यता नसल्यामुळे तीनचार दिवस पुरेल तितकी 'रसद' त्यांनी आरंभीच सवे घेतली आहे.

तडातडा पावलं टाकीत उभा गड चढून जातो नि मग धुरकट

भरल्या संधिप्रकाशात नेमून दिलेल्या चाकरीवर जो तो इमानेइतबारे रुजू होतो.

टिमटिमत्या चिमणीच्या मंद प्रकाशात घासचुटका खातो पितो नि उघड्या आकाशाखाली झोपी जातो. इटकल्या मिटुकल्या चांदण्या डोळे मिचकावीत आमचेवरी पहारा देत राहतात, रात्रभर जागत बसतात.

कुणा महिपत नावाच्या बेलदारानं हा गड अल्पावधीत बांधून पुरा केला म्हणून त्यास महिपतगड हे नाव ठेवलं गेलं असं ह्या राहाळातले वयोवृद्ध सांगतात. गडाची उंची आहे एकशेतीस फूट. माथी आहे माथेरान. याचा वरील विस्तारच आहे मुळी दोनशे एकर एकोणतीस गुंठे. खाचखळग्यांनी युक्त असलेला हा पठारी प्रदेश घनदाट झाडावळीनं व्यापला आहे. दाटीवाटीनं उभी असलेली नानापरीची रायवळी झाडं अशी फोफावलेली! तळाशी काटेरी झुडपांचं जंजाळ पसरलेलं! त्यातच शेकडो ढोरवाटा, सगळ्या- 'न्हाट' भर अशा काडी वळणावळणानं धावत गेलेल्या की अशा ह्या बंबाळात शिरून गडाचा कानाकोपरा न्याहळणं म्हणजे विनाकारण चक्रव्यूहाचा भेद करून आत अडकून पडण्यासारखं आहे. -गडावर असणाऱ्या ह्या असल्या झाडावळीविषयी म्हटलं आहे. "-गडावरी झाडे जी असतील ती राखावी. याविरहीत जी जी झाडे आहेत ती फणस, चिंचा, वड, पिंपळ आदिकरून थोर वृक्ष, निंबे, नारिंगे आदिकरून लहान वृक्ष तसेच पुष्पवृक्ष वल्ली किंबहुना प्रयोजक अप्रयोजक जे झाड होत असेल ते गडावर लावावे; जतन करावे. समयी तितकेही लाकडाचे तरी प्रयोजनास येतील-"

कोंबडसादी उठतो. झुंजूमुंजू लागतं. पूर्वेला चांगलं फटफटतं. तांबडं फुटतं. राबता सुरू होतो. नि लगेच इशाऱ्याची नौबत झडते... अखेरचा मुजरा ठोकून सज्जड तयारीनिशी बेलदारवाडीच्या दिशेनं गड उतरू लागतो.

आजचा दिवस फार महत्त्वाचा. एकेकाच्या जिद्दीचा. प्रत्येकाच्या धाडसाचा. आजच्या दिवसात मधला अवघड सुमारगड करून निदान दिवेलागणीपर्यंत तरी रसाळगडी पोहचणं आहे. आता चालण्याचा झपाटा वाढवला पाहिजे. विश्रांतीला खो दिला पाहिजे. सतत चालत राहिलं पाहिजे. म्हणूनच या दुर्गत्रयींची यात्रा तशी अवघड...! मधला सुमारगड तर अति दुर्गम...! एखाद्या पारशाच्या डोयीवरील लांबुडक्या टोपीसारखा याचा आकार...! सर्वांगी तेल माखून उभ्या असलेल्या एखाद्या पोलादी रामोशासारखं याचं रूप...! याला वाट अशी नाहीच... दुर्गम वाटा

असलेल्या दुर्घट किल्ल्यांच्या पंक्तीत सुमारगडची गणना केली जाते.

बखरीत सुमारगडास 'सुमारूगड' असं म्हटलं आहे. ज्याच्या माथ्यावरून चारीही दिशांचं सुमारक्षेम कळतं तो सुमारगड. सुमारगडास जवळून पाहिलं की चांदेरीच्या 'पिनॅकल' ची स्मृती जागृत होते. चांदेरीचा पिनॅकल चहूबाजूंनी उभार तुटलेला आहे. वरती जाण्यास फक्त एकच वाट पण तीही अवघड. वाट कसली ती. एक अति दुर्गम जीवघेणी घळच! दंड थोपटून उभ्या असलेल्या चांदेरीशी आम्ही दोन डाव खेळलो होतो. आता या घडीला सुमारगडचं आव्हान आहे. तेही आम्ही बिनबोभाट स्वीकारलं आहे.

'गाडी घोड्यातून फिरणाऱ्या नि ऐषआरामात राहणाऱ्या तुम्हा मुंबईकरांना सुमारगड व्हायचा नाही. ते मध्यम वर्गीयांचं काम नोहे' असं बहुतांनी नानापरीनं बहुत बहुत हिणवलं होतं. देवघरचे यशवंतराव मोरेदेखील म्हणाले -'इतर किल्ल्यांप्रमाणे हा गड आता वहिवाटीत नाही. राबता तुटला आहे. फार दिवसात आपल्यापैकी कुणी वर चढल्याचं निदान माझ्या तरी ऐकिवात नाही. महिपतगड करून तुम्ही सरळ रसाळगडावर या. सुमारच्या भानगडीत पडू नका-'

गालातल्या गालात हसत नुसत्या मानेनंच होकार दिला खरा. पण तत्क्षणी मनी संकल्प सोडला की, खऱ्या पौरुषत्वाचं लक्षण सुमारगड चढण्यात आहे. स्वत:च्या लेकरांना अंगाखांद्यावर खेळविताना पित्याला नाही का धन्यता वाटत? मग आम्ही तर त्यात सह्याद्रीची लेकरं. त्याच्या अंगाखांद्यावर असे खेळलो, बागडलो, उनाडलो तर तो काही रागे भरणार थोडाच? हूं की चूं देखील करणार नाही. हां, चढताना एखाद्वेळ चुकून आपलं पाऊल सरकेल पण कडा काही जागचा सरकणार नाही.

उगवतीच्या बाजूस कड्याच्या ऐन कपारीत एक वारसाचं झाड आहे. त्या झाडाखालूनच फक्त वर चढता येतं असं तात्याबा सावंत सकाळपासूनच म्हणत होता. अरुंद चिंचोळ्या वाटेनं कड्याचा आधार घेत वारसाच्या झाडापर्यंत पोहचतो. पिसं भरल्यागत तात्याबाच्या मागोमाग तो उभा शंभर फुटी कडा हा हा म्हणता चढून जातो नि अंगी वारं भरल्या वासरागत गड्भर सुसाट दौडत सुटतो.

आजचा दिवस सोनियाचा... **'आजि सोनियाचा दिनु। वर्षे अमृताचा धनु।'** दृश्य तर मोठं विहंगम. केवढा अफाट प्रदेश पसरला आहे समोर... दुर्लक्ष्य पर्वतश्रेणी... बेलाग कडे... बुलंद ठाणी... दुर्गम

वनं... पाताळावेरी गेलेल्या दुर्घट दऱ्या... आकाशावेरी गेलेले दुर्धर सुळके... छे! छे! सारंच अलौकिक... सारंच अपूर्व... खरंच, - 'संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग. दुर्ग नसता मोकळा देश परचक्र येताच निराश्रय, प्रजा भग्न होऊन देश उद्ध्वंस होतो-' या असल्या अफाट प्रदेशावर नजर ठेवण्यास हे असले बुलंद खणखणीत किल्लेच हवेत.

जिद्द पुरी केली खरी पण आमच्या ह्या यशस्वी गिर्यारोहणाला शेवटी अपघाताचं गालबोट लागलंच. अर्धामुर्धा कडा चढून आलेल्या शाम जांबोटकरांना अपघात होतो. आधार म्हणून एका डगमगत्या धोंडीला हात घातला नि अखेर त्या आधारानंच त्यास दगा दिला. ती धोंड आपल्या बसणीतून जी निखळली ती शामच्या पायाचं चांगलं खरपूस सालटं खरचटवून घंघाळत खाली गेली. खाली उभा असलेला जोशी थोडक्यासाठी वाचला नाहीतर जोशीबुवांचा कपाळमोक्षच व्हायचा. जीवावर बेतलेलं अखेर पायावर निभावलं.

दोन एक फर्लांग लांबीरुंदीचा सुमारगड तसा काही नामांकित लढाव नव्हे. एक पहाऱ्याचं बुलंद ठिकाण. पाण्यानं तुडुंब भरलेलं एक भलमोठं जोड टाकं. गुहेतलं शिवलिंग नि बांधकामाचा चुना साठविण्यासाठी बांधलेली एक चतुष्कोनी कोठीवजा विहीर पाहिली की आटोपलं.

पूर्वी सुमारगडी जत्रा भरत असे. पण एका जत्रेत 'ढालकाठी' नाचविताना चुकून तोल गेल्यानं दोन सख्खे भाऊ ढालकाठीसकट हजार एक फूट खाली कोसळले. तेव्हापासून ती जागा रसाळगडी हलविण्यात आली. आजतागायत तीन वर्षानं एकदा या गडी जत्रा भरते. जत्रेचं स्वरूप मोठं देखणं असतं. बालपणी मी ते एकदा पाहिलं आहे. अनुभवलं आहे.

सुमारगडच्या मावळतीकडून उतरणं म्हणजे एक परीक्षाच. ती अवघड अशी एक कसरतच. चुकून जरी तोल गेला तरी सरळ हजार एक फूट खाली कोसळल्याविना दुसरा पर्यायच नाही. मात्र पायथ्यापासून पुढं गेलेली वाट मोठी नयनरम्य आहे... वाट जाते वळणावळणानं, डोंगराच्या ऐन कुशीतून. ना उतार ना चढ. समोर दिसतो रसाळगड. रसाळगडचा पश्चिम कडा. छाती रुंदावून ताठ मानेनं खडा... ही पायवाट चिरकाल स्मरणात राहील अशी...! अशी ही वाट कधी जाळीमंदल्या पिकल्या करवंदांचा आस्वाद घेत... कधी करवंदी गंधधुंद फुलोऱ्याचा वास घेत... कधी रानफुलं डोयीत खोचीत... कधी पाणलोट

ओलांडीत... कधी आईनसागांना अंग घाशीत... कधी फणसराईतून... कधी आंबराईतून... कधी जांभूळवनातून.... कधी पलाशवृक्षांच्या लालभडक अंगारातून तर कधी हिरव्याकंच झाडावळीच्या गच्चदच्च पोपटी शृंगारातून अशी लाजतमुरडत, डोळे मोडीत थेट रसाळगडाच्या पायी वसलेल्या पेठेतील तात्याबा सावंतांच्या अंगणापावेतो जाऊन थडकली आहे...!

रणरणीत उन्हाची टळटळीत दुपार... उन सपाटून तापलं आहे... अंगाला चटचटू लागलं आहे... पायाखालची धूळ मनस्वी तापली आहे... वरून सूर्य आग पाखडतो आहे... सारा आसमंत पेटून उठला आहे... आगडोंब उसळला आहे... अंगाची लाही लाही, काहिली होते आहे... जीभ वळवळत सुकल्या ओठांवरून फिरते आहे... तोंडातली लाळ चिकट झाली आहे... तहानेनं घसा कोरडा पडला आहे... खरंच, 'नको ते गड पाहणं' असं मनोमन वाटू लागलं आहे.

मधूनच एखाद् दुसरी वाऱ्याची थंडगार झुळूक येते नि सर्वांगाला एक सुखद स्पर्श करून निघून जाते. तेवढ्यापुरतं बरं वाटतं. काळसर हिरव्या रानातला फुललेला पळस चट्टदिशी लक्ष वेधून घेतो. क्षणभर सारं काही विसरायला लावतो... सह्याद्रीत पलाशवृक्ष भरपूर. वसंतात त्यांना हिरवीशार कोवळी पालवी फुटते नि उन्हाळ्यात लालभडक फुले... गोरे लोक यास 'फ्लेम ऑफ दी फॉरेस्ट' म्हणतात तर आम्ही 'बौद्ध भिक्षुकांचा थवा' म्हणून. एकेकाची कविकल्पना! दुसरं काय!

पिछाडीच्या राखीव शिबंदीच्या नेतृत्वाची सारी सूत्रं मोऱ्यांच्या हाती सोपवून आम्ही काहीजण भराभरा पावलं टाकीत तात्याबांच्या अंगणी येऊन थोडावेळ विसावतो नि तद्नंतर टुण्णदिशी गडावर येऊन थडकतो. तासाभरात चुकलं माकलेलं पिछाडीचं सैन्य हजर होतं. नि मग मुळातच तापट असलेले विनय दवे हे असलं कोकणातलं वैशाखी ऊन खाऊन अधिकच तापतात नि गुंजासारखे लालभडक डोळे वटारून आतल्या आत धुमसत राहतात. अशावेळी फक्त 'बत्ती' लावली की दव्यांचा बुलंद तोफखाना एकदमच धुडऽऽम् दिशी थाऽड थाऽड गरजत काही वेळ आग पाखडीत बसतो. अहर्निश बाजारभावांचे चढ उतार करणारा हा प्लायवुडचा गुजराती [illegible] या असल्या दोन गडांचे चढउतार एका दिवसात करून उशीरा का होईना पण रसाळगडाशी सुखरूप पोचला हे ध्यानी येताच मी त्याजवर राजी होतो. तबियत निहायत खूष होते नि तुरंत क्षणाचाही विलंब न लावता - सोन्याचं कडं नि एक उमदं घोडं - त्यांना नजर करून 'राय-अि-रायान' हा सर्वोत्कृष्ट

किताब त्यांना बहाल करण्यात येतो. (मनातल्या मनात).

तसं पाहिलं तर रसाळगड त्रिकोनी. दोन टोकं दक्षिणोत्तर तर तिसरं टोक निमुळतं होत पूर्वेला एका टेकडीवजा पर्वतराईत घुसलेलं. गडाच्या पोटाशी कड्याच्या ऐन गर्भातच कोरलेली दिसतात पाण्याची टाकी. पैकी दक्षिणेस असलेलं सुप्रसिद्ध खांबटाकं आकारानं चांगलं ऐसपैस, चाळीस फूट लांबीरुंदीचं. मधे चार खांब सोडलेले. वर्षाचे बारा महिने स्वच्छ नि नितळ पाण्याने तुडुंब भरलेले. कुण्या डोंगराच्या कुहरात ही असली टाकी दिसली की समजावं तो किल्ला जुना. ज्या दुर्गाजवळ गुहा नि विहार आहेत ते दुर्ग प्राचीन हे अगदी नि:संशय. ही अशी डोंगरांच्या कुशीत शिरून कोरलेली लेणी पाहिली की त्या त्या किल्ल्याचं प्राचीनत्व चट्टदिशी ध्यानी येतं. त्याचा निर्मितीकाल ठरविता येतो. उदाहरणच द्यायचं झालं तर राजमाची, लोहगड, विसापूर, शिवनेरी नि रायगडादी किल्ल्यांचं देता येईल.

गडाला पोषक नि अत्यावश्यक असलेली बहुधा सारी लक्षणं याही गडावर मोठ्या दिमाखानं विराजत असलेली. तट, बुरूज, दरवाजे, शिबंदीचे घरटे, हवालदार कारखानवीसांचे वाडे, बालेकिल्ला. बालेकिल्ल्यात खासा किल्लेदाराचं मकान, मधोमध आई वाघाईचं मंदिर, मंदिरासमोर दीपमाळ, बाजूला मुबलक पाण्याचे दोन हौद नि याहून महत्त्वाचं म्हणजे लहान-मोठ्या मिळून चौदा तोफा नि त्यांचेसाठी असलेलं एक बुलंद दारूकोठार. दारूकोठारात असलेलं तळघर नि जागोजागी असलेली लहानमोठी पाण्याची टाकी व तळी चक्क दगडधोंडींनी बुजून गेलेली. खडखडीत कोरडी पडलेली. ह्या असल्या दुर्लक्षित जागा पाहिल्या ना की हुकमतपन्हा रामचंद्रपंत अमात्य यांचं आज्ञापत्र आठवतं -'दारूखाना घराजवळ घराचे परिघाखाली नसावा. सदरपासून सुमारास जागा बांधून त्यास तळघर करावे. तळघरात गच्च करावा. त्यात माल घालोन त्यावरचे दारूचे बस्ते मडकी ठेवावी. बाण होके आदिकरून मध्य घरात ठेवावे. सर्दी पावों न द्यावी. आठपंधरा दिवसात हवालदाराने येऊन दारू, बाण, होके, आदिकरून बाहेर काढून उष्म देऊन मागुती मुद्रा करोन ठेवीत जावे. तसेच गडावर आधी उदक पाहोन किल्ला बांधावा. पाणी नाही आणि ते स्थळ तो आवश्यक बांधणे प्राप्त झाले तरी आधी खडक फोडून तळीटाकी पर्जन्यकालपर्यंत संपूर्ण गडास पाणी पुरेल अशी मजबूत बांधावी, गडावर झराही आहे. जसे तसे पाणीही पुरते, म्हणोन तितकियावरी निश्चिंती न मानावी. किंनिमित्य

की झुंजामध्ये भांडियाचे आवाजाखाली झरे स्वल्प होतात आणि पाणी याचा खर्च विशेष लागतो तेव्हा संकट पडते. याकरिता तसे जागी जखिरीयाचे (साठवलेले) पाणी म्हणून दोनचार टाकी तळी बांधावी-'

राजधुरंधर छत्रपतींनी आज्ञापत्रात आज्ञापिलेली ही युक्ती खरोखरीच चिंतनीय आहे यात तिळमात्र शंका नाही... !

रसाळगडाच्या उत्तर टोकावर कुणा खाशाची मशीद आहे. त्या मशिदीपाशी वा दक्षिण टोकावर असलेल्या टेहळणी बुरूजापाशी उभं राहिलं की उत्तरेकडील दूरवर असलेले पालगड नि वासोटा हे दोन किल्ले दिसू शकतात. मात्र महिपतगडावरून प्रतापगड नि मकरंदगड या द्वयींचं होणारं सुरम्य दर्शन... ह्या सुरम्य दर्शनाला जोड नाही हे तितकंच खरं.

वर आकाशाचं घुमट पसरलं आहे... त्यात लक्ष चांदण्यांचे दिवे लागले आहेत... आसमंत शांत आहे... निखळ एकांत आहे... भन्नाट वारा भळभळतो आहे... अशावेळी आपण आपले नसतो... खोल कुठंतरी हरवलेले असतो...

सखेसोबती कलंडले आहेत. काहीजण डाराडूर झोपले आहेत. मी मात्र एकटाच समोरच्या दीपमाळेशी बसलो आहे. मनी असंख्य विचारांचं काहूर माजलं आहे. एक चिंता बोचते आहे. एक खंत टोचते आहे. एक शल्य कोचते आहे. वीसएक वर्षांपूर्वी जिथं वीस-बावीस तोफा होत्या आता उण्यापुऱ्या फक्त चौदा उरल्या आहेत. बाकीच्या कुठं गेल्या? कुणाच्या भक्षस्थानी पडल्या? यांचे भक्षक कोण? या गोष्टीला निदान आता तरी वेळीच आळा घातला पाहिजे. त्याकडे लक्ष पुरवले पाहिजे. असं न झाले तर अजून काही वर्षांनी एकही तोफ तिथं दिसणार नाही. अन् दुर्दैवाने असे झालेच तर मग ह्या दुर्गांचं दुर्गपणच नाहिसे होईल, आंगठीतला खडा निखळून पडल्यानंतर नुसत्या कोंदणाला ते काय महत्त्व? अशा असंख्य विचारांच्या झुंजात नकळत पापण्या मिटतात नि दुसऱ्या दिवशी सकाळी गडाचा जीवलावणा निरोप घेताना नकळतच पावलं घुटमळतात... मनी एक अनामिक काहूर माजतं... उरी कालवाकालव होते... साहजिकच आहे. गेले दोन दिवस गड आमचे होते... आम्ही गडाचे होतो... मागचे पुढचे सारे काही विसरून आम्ही एकरूप झालो होतो... एकजीव झालो होतो... ही ओढ रक्ताची आहे... हे प्रेम भक्ताचं आहे... हे नातं जोडलेले नाही जडलेले आहे...

कित्येक ज्ञात अज्ञात पूर्वजांच्या पदस्पर्शानं पावन झालेल्या ह्या भूमीला हात स्पर्शून तो भाळी टेकवतो नि विषण्ण मनानं गड उतरू लागतो.

त्या दिवशी, रसाळगडावर जीवापाड प्रेम करणाऱ्या नि आतिथ्यशील असलेल्या देवघरच्या यशवंतराव मोऱ्यांकडे मुक्काम नि दुसऱ्या दिवशी एस. टी. पकडून मुंबई.

'पर्यटन' मार्च १९७६

● ○ ●

दा. क्र. ७४६
२६७५१

# १३ हिरकणी कडा : एक बेभान उतरणे...।



'हिरकणी कडा

छाया - तु. वि जाधव

एकवार भरपावसात सिद्धगड चढत होतो... चढत होतो डेऱ्याच्या वाटेनं...। खळाळणारा खळाळ ओलांडून त्या धुवांधार पावसात शेवाळ्यानं माखलेला तो उभा कडा मोठ्या प्रयासानं चढनू कसाबसा त्या डेऱ्याच्या पायथ्याशी थडकलो नि क्षणभर हबकलोच...। डेऱ्याला लावलेली लाकडी शिडी नि वरील कड्याच्या काटकोनात उभा असलेला डगडगीत वासा...। त्या जीवघेण्या उभ्या कड्यावरून गवती चुंबळीवर ठेवलेला दुधाचा माठ अलगद सावरीत मांडेकास नेसलेली एक धनगरीण वरच्या गळगळीत वाशावरून त्या झिम्मड पावसात भरभर उतरताना गाणं गुणगुणतेय्! काया रोमांकित झाली... त्या तसल्या हुडहुडणाऱ्या गारव्यातही सर्वांगातून एक अनामिक संवेदना विजेगत चमकून गेली...! विस्मयानं थक्क

होऊन गेलो होतो. नि अंग पेलून तोल सावरीत खोबणी कोरल्या त्या उभ्या मेढीवरून चढताना मनस्वी भयानं दरदरून गेलो होतो...!

आमच्या रसाळगडावरील टेहळणी बुरूजातून उभा कडा चिरीत खाली धनगरवाड्यापाशी उतरलेल्या चोरवाटेनं आमचा बाबू धनगर अवसीपुनवेस केव्हाही चढउतार करी, प्रतिदिनी सांजसकाळी त्याच्या लेकीसुना गडावरील हौदातलं पाणी याच वाटेनं घरी वाहून आणीत नि त्यांची पोरंटोरं खांबटाक्यापाशी उतरणाऱ्या अवघड वाटेनं सहज चढून गडावर हुंदडायला जात.

सह्याद्रीच्या कुशीत जन्मलेल्या या वनवासियांना डोंगर चढण्या-उतरण्याचं बाळकडू बालपणीच पाजलं जात असावं... गर्भातच हे कसब त्यांच्या अंगी बाणलं जात असावं... उरीचं उदरी उतरत असावं... चक्रव्यूहाची भेदनीती गर्भावस्थेत जाणणाऱ्या वीर अभिमन्यूसारखं...!

ताकाचे डेरे, गवताच्या वरणी, फाट्याचे गोयले, पातेरीची डालगी नि कवलाचे भारे अलगद डोईवर घेऊन अरुंद चिंचोळ्या निसणीवाटेनं अजूनही ही वनवासी बायाबापडी उतरताना दिसतात. त्यास स्थळकाळाचं बंधन नाही की मनी कसलंही भय नाही.

तर मग पुराव्याअभावी इतिहासमान्य झालेली हिरकणी-कथा खरोखरीच खरी असली पाहिजे.

शिवकालात एका पौर्णिमेच्या रात्री हिरकणी नावाची एक गौळण उत्तरकाळात तिच्याच नावानं प्रसिद्धीस पावलेला हा उत्तुंग कडा उतरल्याची नि शिवरायांनी तिला कौतुकभरी गौरविल्याची आख्यायिका अजूनही रायगड खोऱ्यात रूढ आहे.

सूर्यास्ताबरोबर गडाचे दरवाजे बंद झाल्यावर दूध विकण्यासाठी म्हणून गडावर आलेली हिरकणी बाजारहाट करता करता वेळेचं भान न राहिल्यानं गडावरच अडकून पडली. अंगावर पितं लेकरू...! लेकरू भुकेनं कासावीस होईल या विचारानं ती कावरीबावरी झाली... वावटळीसारखी गडभर भ्रमू लागली...! नि तान्हा आठवताच पान्हा फुटलेली ती माऊली शेवटी हा अवघड कडा जीवाच्या धडाडीनं उतरली.

तद् पश्चात शिवरायांनी या हजारफूटी उंचीच्या कड्याचा माथा अर्धगोलाकार छिनून काढला नि त्याचं नामानिधान केलं हिरकणी बुरूज...!

हिरकणी या नावानं साकार झालेली नि शब्दाविना आकारलेली ही भावस्पर्शी गाथा मातृहृदयाची महती गात आज कित्येक वर्षे वाहते आहे...!

गेल्या चैत्रपुनवेस रात्री रायगडास तळातून प्रदक्षिणा घालताना सकाळी चार वाजता हिरकणीच्या पायाशी संकल्प सोडला होता. त्यास मनोमन म्हटलं होतं- 'रे मर्दा! आजतागायत तीनएक वेळा सांजसकाळी तुझ्या अंगाखांद्यावरून चढलो उतरलो आहे. पुढील खेपेस एका चांदण्यारात्री तुझ्या या दोन हजार फूट उंचीच्या माथ्यावरून अवरोहण करीन म्हणतोय्! करून दिलंस तर...! सांभाळून घे...!

शुक्रवार दि. तेरा एप्रिलची रात्र...! रात्री साडेदहाचा सुमार...! मी व माझा मित्र प्रजापती बोधणे असे दोघेच हिरकणी बुरूजावर उभे आहोत. खाली गडाच्या पायथ्याशी वाळसुरे खिंडीपाशी माझे स्नेही रवीन्द्र भावे, संजय रांगणेकर नि नाबर कुटुंबिय आमची वाट पाहताहेत... वाट पाहताहेत इशाऱ्याची...! परस्परांस विजेरीचे संकेत दिसताच आम्ही उतरणे सुरू करायचे असे ठरले आहे.

हिरकणीचा तीसएक फूट कडा छिन्नी लावून राजांनी उभा तोडवून काढला आहे. बुरूजाच्या तळाशी दहाबारा हाताची एक मोकळी जागा आहे. घळघळणारा शंभरफुटी उतार उतरून नि कड्याशी खेटून आडवी घातलेली भिंत ओलांडली की या टप्प्यापर्यंत पोहचता येतं.

बुरूजावर असलेल्या दोन तोफांपैकी एक तोफ कुणा विद्वानानं स्वत:च्या मौजेखातर खाली ढकलून दिली आहे. शत्रूंवर आग ओकणाऱ्या या तोफांची ज्यानं जिवापलीकडं जतन करून निगा राखली त्या तोफांची आपल्याच देशबांधवांकडून अशी ही दुर्दशा...! असा आहे आमच्या मनी शिवरायांविषयीचा आदर...!

इथून पुढं ऐन कड्याच्या बगलेतून पाचशे फूट जाणारी जीवघेणी अरुंद निसणीची वाट...! वाटेवर उंची गवताचा गालीचा... त्यावर किंचित पुढं डोकावलेल्या वरील कड्याचं सावट... वर ढगाळलेलं आकाश... भवती किंचित धूसर वातावरण... आदल्या रात्री कोसळलेल्या मुसळधार पावसानं ओलसरलेलं गवत....त्या खाली, रात्री गारव्यासाठी बाहेर पडलेले जीवजीवाणू कुठल्या क्षणी नेमके कुठं असतील याचा काही नेम नाही. त्यातून मी अनवाणी...! प्रत्येक पाऊल उचलण्यापूर्वी दहादा विचार करावा.. विजेरीनं पुढचा मार्ग नीट डोळे विस्फारून न्याहाळावा... हातातील काठीचा पाय कड्यावर आपटावा... नि अंग पेलून तोल सावरीत एकेक पाऊल असं दक्षतेनं, सावधगिरीनं नि मोठ्या प्रयासानं पुढं टेकावं...! गवताखाली पडलेल्या एखाद्या जीवाणूवर चुकून जरी पाऊल पडलं तर...?

मनी या एकाच विचारानं घर करून राहिलेल्या तंद्रीत आस्ते कदम चालता चालता एकदमच थबकलो... पायाखालची वाट आडव्या उभ्या कड्याशी एकरूप झालेली. ध्यानी येताच हबकलोच...! काहीतरी चुकलं. कुठंतरी गफलत झाली. मनानं फसवलं. नजरेनं दगा दिला. चुकलो आहोत. फार फार पुढं आलो आहोत. आता आल्या पावली तीनएकशे फूट मागं फिरणंच क्रमप्राप्त आहे. दुसरा तरणोपाय नाही.

तसेच पाऊणशे फूट माघारी वळलो. डाव्या हातास एक झुडुप दिसलं. झुडपाखाली वीसएक फूट घळघळीत उतार नि त्याखाली एक ऐसपैस कातळ...! प्रजापतीस म्हटलं- 'प्रजा, या झुडपाचा आधार घेऊन त्या कातळावर उतरू. थोडा वेळ विसावू नि मग नंतर मार्ग काढू..' प्रजानं मान्य केलं. झुडपाचा नि त्या घळाळ घळघळीतून पुढं आलेल्या दगडी टेंगळांचा आधार घेत उतरलो. त्या कातळावर मी तर चक्क थपकल मारली नि डावीकडील जाळीतून मार्ग काढीत प्रजा उतरू लागला.

आता पुढं चारशे फूट उंचीचा उभार कडा उतरणं आहे. कुठलाही मनाजोगा कडा चढून जाणं सोपं असतं, पण तो उतरणं महाकर्मकठीण...! चढणं सोपं असतं. चढायचा ठाव दृष्टीसमोर दिसत असतो. तो हेरता येतो. अंदाज बांधता येतो. पण उतरताना मात्र सारंच याउलट. त्यातून रात्रीची वेळ...!

अशी ही रात्र...! नीरव शांततेची...! निख्खळ एकांताची...! वरून चांदणं शिंतडतं आहे... त्रयोदशीचा चंद्र कड्यावर उतरला आहे... वारा ठप्प झाला आहे... रातकिड्यांचं किरकिरणं नाही की पानांची सळसळ नाही...! अशी ही विचित्र भयाण गूढ स्मशान शांतता...! मनाला नकोशी वाटणारी...! सर्वांगावर भयाची रोमावळी फुलविणारी...! अशा या जीवघेण्या गूढतेनं मी पुरता हबकलो आहे. अंतर्बाह्य थरारलो आहे... मनावर कमालीचा दाब पडला आहे... खग्रास सूर्यग्रहणासारखं या भयाण शांततेनं मनाला पुरतं ग्रासून टाकलं आहे...!

इतक्यात नाळीतून शेसव्वाशे फूट खाली उतरलेला प्रजापती एकदमच हबका बसल्यागत दचकून मागं सरकलेला पाहताच मी थरारून उठलो. काय घडलं कळेना. तो भराभर पावलं टाकीत वर येताना दिसताच मी ताडलं, की पावसाळ्यात या नाळीतून खळाळत धावणारा खळाळ जिथून दोनशे फूट खाली उडी घेतो, त्या कड्याच्या ऐन माथ्यावर पाऊल टेकताच प्रजापती दचकून मागं सरला होता...!

वीसएक मिनिटांच्या धडपडीनंतर मार्ग दिसला. कड्याची उजवी बाजू पकडून तशा त्या स्मशानशांततेत आम्ही दोघे भुतासारखे उतरू लागलो.

पायाखालचा दगडी मुरूम एकदम भुसभुशीत आहे. त्यात असंख्य टोकेरी बोचके खडे आहेत. आधार ठिसूळ झाले आहेत. एखादी कारवीची काठी हाती धरू जाता कुट्टदिशी मोडून पडते. टिचभर मातीचा आधार घेऊन तगलेले काटेरी गवती झुंबे मुळासकट सप्पदिशी हातीच येतात. नि मग अवसान सांभाळीत नि तोल सावरीत कधी कगारीच्या अरुंद कुशीतून, अंग घाशीत, कधी दरडीच्या चिंचोळ्या पोटघळीतून अंग चोरीत, तर कधी एखाद्या भल्या मोठ्या कपारीस छातीपोट भिडवीत मुंगीपावलानं तसूतसू खाली सरकावं नि खालचे आधार पायाच्या बोटांनीच मोठ्या सावधपणं चोखळावे... असा हा जीवघेणा प्रवास, तळातून दूरदर्शिकेतून पाहणारांच्या काळजाचं पाणी पाणी करणारा...!

अर्धाधिक कडा उतरलो आहोत. आता शेवटचा एकच टप्पा मोठा जीवघेणा आहे. ही एक पन्नास फुटी उतरती खरखरीत कातळी घसरंड आहे. घसरंडीच्या पायाशी एकमेव उंबराचे झुडुप. बाजूला दगडांची टेंगळं नि त्या खाली उभा ताशीव कडा...!

इथं नराचा वानर होतो. घोरपडीच्या चिकाटीनं तसूतसू उतरू लागतो. उंबराचा आधार घेतो. टेंगळांना डावी घालतो नि दोन भल्या मोठ्या दगडांच्या खिंडीतून खालच्या झाडावळीत सुखरूपपणं उतरतो.

काम पुरतं फत्ते झालं आहे. गिर्यारोहणाचं एकही साधन न वापरता अनवाणीच उतरण्याचं कित्येक वर्षांचं स्वप्न आज साकार झालं आहे. **स्वप्नी जे देखिलें रात्री। ते ते तैसेचि होतसे॥**

शेवटच्या टप्प्यावर उतरताच सहज मागं वळून पाहिलं. वाटलं, हिरकणीचा कडा म्हणजे वात्सल्यानं पान्हावलेला... ममतेनं ओथंबलेला... नि माऊलीच्या शीतल साऊलीनं सुखावलेला...! ऐन मध्यरात्री एक माता मातृत्वाची भावना उरीपोटी कवटाळून या अवघड कड्याशी जीवघेणा खेळ खेळते आहे हे पाहून वारा क्षणभर थबकला असेल... झाडाझुडपांची कुजबुज नि लतावेलींचं हितगुज क्षणभर थांबलं असेल... साक्षात यमराजानं दातातली अंगुली धरून नि श्वास रोधून या जगावेगळ्या धाडसाचं कौतुक केलं असेल नि या पायाखालच्या पाषाणहृदयी पत्थरालाही त्यावेळी दयेचा पाझर फुटला असेल...! हा पाषाण उतरताना प्रसंग पडला तर जन्मदात्री आपल्या लेकरासाठी काय दिव्य करू शकते

याची प्रचीती आल्याविना रहात नाही.

दुसऱ्या दिवशी शेपाऊणशे प्रदक्षिणार्थींबरोबर रायगड प्रदक्षिणा घालून गडावर पोहोचलो नि रात्री बाराचे सुमारास अवघे होळीच्या माळावर एकत्र जमलो.

शेसव्वाशे पार्लेकरांसमवेत गो. नी. दांडेकर आज राजगडावर आहेत. आता याक्षणी ते सारे राजगडाच्या बालेकिल्ल्यावर उभे आहेत. हिरकणी कड्यावरून अवरोहण केल्याची ही विजयवार्ता इथून समोर वीस मैलावर दिसणाऱ्या राजगडावर पोहोचविणे आहे. मोठ्या उत्सुकतेनं ते माझी वाट पाहताहेत... तत्संबंधी पूर्वनियोजित संकेत ठरलेले आहेत.

मशाल पाजळली जाते. अनारातून फुलांचे कारंजे उडते... गवताची आगटी मनाजोगी धगधगते... तरी राजगडावरून प्रतिसाद नाही.

घटिका टळून गेली आहे. उत्सुकता शिगेला पोचली आहे. दीडदोनशे शिवप्रेमिकांची दृष्टी राजगडावर खिळली आहे तरी प्रतिसाद नाही.

घरी परतल्यावर समजलं की आम्ही दिलेले इशारे त्यास स्पष्ट दिसले; पण वीस मैलांवर दिसण्याइतपत त्यांची मशाल आवश्यक तेवढी पाजळली गेली नाही...!

माळावरील शिवरायांच्या पुतळ्यास चंदनाचा हार घालतो नि अवघे ठाण्याच्या साबीर शेख यांनी काढलेल्या मूकयात्रेत सामील होतो. राजसिंहासन ते श्रींची समाधी...!

चैत्र शुद्ध चतुर्दशीची रात्र...! चांदणं भुईवर सांडलं आहे... भवताल लख्ख प्रकाशात सचैल न्हाऊन निघतो आहे.. भवतीचे डोंगर एखाद्या तपस्व्यासारखे निश्चल दिसताहेत... वर अधांतरी पसरलेलं आकाश एखाद्या प्रचंड घुमटासारखं दिसतं आहे... ते तारकापुंजांनी गच्च भरलं आहे. घुमटाभर ओळखीचे तारे इथं तिथं लुकलुकताना दिसताहेत... मनी असंख्य विचारांचं काहूर उठलं आहे. वर्षे गेली, तपे गेली, शतकं उलटली तरी अमरत्वाचं वरदान लाभलेल्या या राजाचा महिमा प्रतिपच्चंद्रलेखेव वृद्धिंगतच होतो आहे. शौर्य, धैर्य, औदार्य नि चातुर्य यांच्या मूर्तिमंत संगमी देवत्वाची नि दिव्यत्वाची प्रचीती येते आहे. मनी येतं, आज कित्येक वर्षे रायगडी येतो आहे तरी याचं आकर्षण काही केल्या कमी होत नाही. उलट ते दिवसेंदिवस वाढतच चाललं आहे. रायगड हा एक लोहचुंबक आहे. याला एक अनामिक असा सुगंध आहे... हा सुगंधच मला इथं खेचून आणतो... मी केवळ गुंजारवी भ्रमर...! उरी दडलेला हा अनामिक परिमल त्याला तरी

ठाऊकी असावा का..? आमचे तुकारामबाबा म्हणतात तेच खरे...

**कमोदिनी काय जाणे तो परिमल**

**भ्रमर सकळ भोगीतसे!**

अवघे राजांच्या समाधीभवती बसतो. नि:शब्द शांतता...! मनाजोगा एकांत...! 'शिवकल्याणराजा'ची ध्वनिफित लावली जाते. 'तीनशे वर्षे...! तीनशे वर्षे महाराष्ट्र पारतंत्र्याच्या अंध:कारात चाचपडत होता...!' त्या प्रतिभेला झालेला तो शिवस्पर्श...! त्या शिवस्पर्शानं तब्बल पाऊणतास अवघे भारावून जातो...! सचैल न्हाऊन निघतो...!

'श्री' दि. २४।११।१९८४

● ○ ●

# १४ शिखरसम्राज्ञी कळसूबाई



'कळसूबाईचं मंदिर'

छाया - सुरेश परांजपे

कळसूबाई म्हणजे महाराष्ट्राचं 'एव्हरेस्ट...'! महाराष्ट्राचं सर्वोच्च शिखर..! सह्याद्रीचा उत्तुंग कळस...! उंची पाच हजार चारशे सत्तावीस

फूट...!

ह्या डोंगराला कळसूबाई हे नाव कसं पडलं! इथल्या परिसरातील स्थानिक दंतकथा अशी-

कळसूबाई ही एक गरीब कोळ्याची मुलगी. तिला डोंगरदऱ्या नि रानंवनं भटकण्याची फारच मोठी हौस. हा तिला जडलेला एक छंदच..... अशीच एकदा ती हिंडतफिरत ह्या डोंगराच्या पायथ्याशी आली नि तिथं इंदूर नावाच्या गावी 'भांडी घासणार नाही नि झाडलोट करणार नाही' ह्या दोन अटींवर एका घरंदाज कोळ्याच्या कुटुंबी घरकामास राहिली. कालांतराने त्याच घरी एका लग्नकार्यात हा नियम यजमानाकडून मोडला गेला. आज्ञेप्रमाणं तिनं दोन्हीही कामं पुरी केली नि तिथं एक क्षणभरही न थांबता तिनं इंदूर सोडलं. सर्वसंगपरित्याग करून ती हा दुर्गम डोंगर चढली नि ऐन माथ्यावर जाऊन तपस्विनीचं जीवन जगू लागली. मग वरचं शिखर तिचं झालं... ती त्या शिखराची झाली... दिसाउजेडी तरुतळी बसावं मिळतील ती कंदमुळं खावी..... निसर्गाचा मनमुराद आस्वाद घ्यावा. रात्र झाली की काळ्याकभिन्न कातळाची शय्या करावी... नि निवांतपणं उघड्या आकाशाखाली झोपी जावं... असा हा एकूण तिचा जीवनक्रम पाहून तेथील कोळी व ठाकरी जमात तिला देवीचा अवतार समजू लागली... त्यांनी तिला शिरी मिरवलं. उरी गिरवलं... नि ती त्याचं कुलदैवत झालं...! तिच्या मागं त्यांनी एक टुमदारसं ठेंगणठुसकं देऊळ बांधलं. तेव्हापासून ते एक यात्रास्थान बनलं...! एका गरीब कोळी कुळात जन्माला आलेली कळसू आपल्या भाग्यानं सह्याद्रीचा कळस झाली... अमर होऊनी राहिली... कीर्तीरूपे मागे उरली...

प्रतिवर्षी चैत्रपुनवेला इथं यात्रा भरते. बहुतेक यात्रेकरू साखळीच्या वाटेनं वर चढतात. पूर्वी ह्या वाटेनं चढून जाणं म्हणजे एक दिव्यच समजलं जात असे पण आता मात्र खडकात लोखंडी कांबी रोवून, त्यांना साखळी बांधून नि खडकात पायऱ्या खणून एकूण सगळा मार्ग काहीसा सोपा केला आहे.

एकूण वाटा तीन. पैकी दोन घळीच्या. पहिली घळ तर अति दुर्गम. दो बाजूस दो ताशीव उभार कडे. मधून जेमतेम एकदीड फूट रुंदी मुरमाटी वाट. ह्या अरुंद चिंचोळ्या वाटेनं अंग चोरीत खरचटत वर चढणं म्हणजे एक कसरतच... ती एक परीक्षाच. ते येरागबाळांचे काम नोहे.. तेथे पाहिजे जातीचे...! दुसरी घळ मात्र अति अवघड

नसली तरी तितकीशी सोपीदेखील नाही हे अगदी निर्विवाद. तर सांगण्याचं तात्पर्य काय, की एका सुप्रभाती पायथ्याशी असलेलं बारी गाव ओलांडतो नि ह्या घळीच्या वाटेनं चढू लागतो! बारा ते चाळीस वयोगटातील आम्ही एकूण सोळा वाटसरू. पैकी तीन मुली. सुलभा, सुचिता नि छाया व्यास. पैकी छाया व्यास उमरीनं लहान पण हिंमत सिंहिणीची... चिकाटी घोरपडीची...! सूत्रधार हिरा पंडित म्हणजे आमच्या 'हॉलिडे हायकर्स क्लब'ला लाभलेली ईश्वरी देणगी... अशक्य हा शब्द त्याच्या शब्दकोशात सापडायचा नाही... बोकडछाप काळीशार दाढी, बारीक लुकलुकणारे डोळे, घारीसारखी तीक्ष्ण नजर, दांडगा आत्मविश्वास, जबर इच्छाशक्ती नि कमालीचा संयमी... सह्याद्रीचा खडानूखडा माहिती असलेला... तीन वेळा सह्याद्रीमंडळ भटकलेला...

ह्या घळीतून पावसाळ्यात उड्या घेत धावत असतात पाणलोट. पाण्याच्या वाहवानं अखंड खडक मधेच तासले जातात. त्या तासल्या भागाला म्हणतात नाळ. अशाच एका नाळीतून वर चढतो आहोत. पानीफुली साठलेलं दहीवर अंगाखांद्यावर शिडकतं आहे... वाऱ्याच्या झोताबरोबर वाहणारा कढिलिंबाचा वास घमघमला आहे... त्यातच रानफुलांचा गंध दरवळला आहे... त्या संमिश्र सुगंधानं चित्तवृत्ती वोळल्या आहेत. इतक्यात सूत्रधारच एका दरडीवरून घसरतो. सारेच धबधब्यासारखे हसतात. पण रमेश कुलकर्णी मात्र गंभीर. तो साऱ्यांनाच उद्देशून म्हणतो, 'My friends, take time to laugh, it is the music of the soul.'

दुतर्फा नाना जातीची अनोळखी झाडंझुडपं, जवळजवळ सगळीच औषधी. कळसूबाईच्या डोंगरात औषधी वनस्पती फार. आयुर्वेद हा तर औषधी वनस्पतींनी भरलेलं रत्नभांडार. आयुर्वेदाचा अर्थच मुळी आयुष्याचा वेद. त्यात अशा असंख्य अद्भुत वनस्पतींचं वर्णन केलं आहे. क्षुधा शमविणाऱ्या, तृषा भागविणाऱ्या, दाह कमी करणाऱ्या, शीण, थकवा घालविणाऱ्या, पोटसूळ कमी करणाऱ्या, विष उतरविणाऱ्या, तसेच गडद अंधारी वाट दाखविणाऱ्या, अंधास दृष्टी देणाऱ्या, बहिऱ्यास श्रुत करणाऱ्या, जिच्या अर्काच्या प्राशनानं 'मूकं करोति वाचालम्.' 'पंगुं लंघयते गिरीम्' अशादेखील. इतकेच काय पण जिच्या पथ्यकर सेवनानं जराजर्जर वार्धक्यदेखील पुनश्च तारुण्यात प्रवेश करते होईल अशाही काही दैवीगुण असलेल्या अद्भुत दिव्य वनस्पती कळसूबाईच्या डोंगरात आहेत असं जाणकार म्हणतात. अशा काही वनस्पतींची नावं तरी कशी ती पहा-शिलाजित, सर्पगंधा, सोमवल्ली, काश्चनार, गोरक्षी,

इंद्रावणी, ईश्वरमूळ, गेळफळ, ब्रह्मदंडी, चित्रक किती नि काय? समर्थांनीदेखील अशा काही वृक्षवल्लींची नावं सांगितली आहेत.

**पांढरफळी, करवंदी ताटी।**
**आळवी तोरणी चिंचोरटी।**
**सिकेकाई वाकेरी घोटी।**
**करंज विळस समुद्रशोक॥**
**अव्हाटी बोराटी हिंगणबेटी।**
**बेकळी टाकळी वाघाटी।**
**शेर निवडुंग कारवेटी।**
**खरमाडी कारमाटी सागरगोटी॥**

पण त्यांची परीक्षा कुणास? ह्या अद्‌भुत वृक्षवल्लरींचं अनोळखी दालन उघडं करण्यासाठी एखादा 'सुश्रूत' वा 'वाग्भटा'सारखा सर्वश्रेष्ठ धन्वंतरीच हवा.

बख्खल दगडगोट्यांनी खडबडलेले ढिगारे ओलांडीत, खाजेरीच्या जंजाळातून मार्ग काढीत, मध्येच एखाद्या कपारीला छातीपोट भिडवीत खोबणी नि कंगोऱ्यांच्या आधारानं वर चढतो नि समोरचं एक भलंमोठं लांबलचक टेप ओलांडून कुण्या उदारानं बांधलेल्या छोटेखानी विहीरीजवळ येथून थडकतो. घासघुटका खातो पितो, किंचितसं विसावतो. नि शेवटचं एक घसरतं टेपाड चढून मुख्य शिखराच्या पायथ्याशी जाऊन पोहोचतो. पाच पन्नास फूट उंच उभं असलेलं हे शिखर म्हणजे अगदी दाटीवाटीनं घट्ट बिलगून बसलेल्या अवाढव्य शिलाखंडांचा एक प्रचंड समूहच. त्यामधून नागमोडी वळणानं येंगत वर गेलेली अरुंद चिंचोळी अशी एक खिंडीवजा नाळ... वर थोडीशी सपाटी... नि मधोमध कळसूबाईचं देऊळ.

त्या चिंचोळ्या अरुंद वाटेनं वर येतो नि एका सुळकेदार पाषाणावर उभा राहतो.

१८६० साली आर्चडीकन गेल यानं रात्री प्रवास करून या शिखरावर आरोहण केलं. सकाळी उजाडताच त्यानं चौफेर पाहिलं नि त्याच्या तोंडून सहजोद्गार निघाले - "खरोखर, हा दक्षिणेतील पर्वतांचा राजा आहे!"

आ:! तो निसर्ग...! ते चित्र...!! ते ईश्वरनिर्मित सौंदर्य...!!! त्याचं वर्णन करणं शब्दातीत... क्षणभर श्वास थांबला... बुबुळं स्थिरावली... पापण्या विसावल्या... नि अचेतन पुतळ्यासारखा उभाच राहिलो...

खिळल्यागत... भारल्यागत... मंत्रमुग्ध... त्या दिव्यभव्य विराट निसर्गाच्या तेजापुढं मी म्हणजे एक लहानशी ज्योत... एक मातीचा कण... एक किटाणू... नुसतं निरखावं भान हरपून... नुसतं पाहात रहावं श्वास रोखून... चौबाजूस दृष्टी वळवावी नि दिसणारी सृष्टी दिठीत साठवावी... आपण जिंकलो, आपली जीत झाली ह्या आनंदाने बेहोषीत एकवार त्या चित्रकाराला त्रिवार मुजरा करावा... घटकाभर स्वतःला हरवावं विसरावं... अंतर्मुख व्हावं... डोळे मिटून स्वस्थ बसावं नि मग त्या नीरव शांततेत फक्त रुणुझुणू वाहणाऱ्या वाऱ्याचं झुळझुळणारं कर्णमधुर संगीत ऐकता ऐकता आनंदाचे डोही आनंद तरंग उठणाऱ्या स्वर्गीय आनंदाचा उपभोग अगदी मनमुराद घ्यावा.

आता मी साडेपाच हजार फूट उंचीवर उभा आहे. सह्यगिरीच्या अत्युच्च शिखरावर... शिखर सम्राज्ञीच्या ऐन माथ्यावर. केवढा प्रचंड मुलूख पसरला आहे समोर... पाऊस सरता सरता आलो असतो तर एखादा प्रचंड हिरवा गालीचाच डोळे भरून पाहता आला असता.

त्या लांबलचक उभ्या असलेल्या असंख्य पर्वतराजी... दूरवर दिसणाऱ्या एकामागून एक डोकावणाऱ्या... अस्पष्ट होत-धुरकट होत शेवटी निळसर क्षितिजरेषेला टेकणाऱ्या... भवताली उंच उंच सुळक्यांचं साम्राज्य मांडलेलं, जणू उभार व्याप्त वारुळच... बुद्धिबळाच्या पटावर मांडलेल्या सोंगट्यांसारखे दिसणारे हे लहानमोठे सुळके मात्र वेगवेगळ्या आकाराचे. कुणी मान उंचावलेली तर कुणी मुडपलेली... कुणी एखाद्या मर्दासारखा छातीचा कोट करून ताठ मानेनं उभा असलेला तर कुणी मान तुकवून एखाद्या अपराध्यासारखा शरणागती पत्करलेला... कुणी नारदाच्या शेंडीसारखा सरळसोट आकाशावेरी गेलेला तर कुणी एखाद्या अजाण बालकासारखा फक्त 'करांगुळीच' दाखवीत असलेला... कुणी आकाशात आपली तर्जनीच खुपसलेली तर कुणी वार्धक्यानं वाकलेल्या वृद्धासारखा, निकट असलेल्या सुळक्याचा आधार घेत उभा असलेला. कधी या सुळक्यावरून धावतात ढग तर कधी पिसाटवाऱ्याची सुसाटगिरी... कधी कोसळतो मुसळधार पाऊस तर कधी उतरतात स्वच्छ कोवळी उन्हं... कधी कधी मात्र ते धुक्याच्या पांढऱ्या स्वच्छ दुलईत अंग लपेटून गाढ झोपी गेलेले दिसतात.

वर निळसर पांढुरकं आकाश... लख्ख मोकळं... एखाद्या घुमटासारखं... त्यातून खाली उतरलेलं स्वच्छ कोवळं उन... गंधधुंद समिरासवे मधूनच येणारा कढिलिंबाचा वास... खालच्या बारी गावातील इवली इवली


कौलारू घरं... इटुकल्या पेंढ्यांच्या उडव्या... चिटुकल्या गवताच्या गंज्या... मिटुकली शेतं, मळी, खळी, नद्या, नाले... बोटाच्या पेराएवढी दिसणारी माणसं... जणू वळवळणारे किडेच... जणू मांडलेलं प्रदर्शन... एखादा आंथरलेला नकाशाच...!

पूर्वेकडं ऐसपैस हातपाय पसरलेलं भंडारदरा, दूरवर दिसणारे आवंढापट्टा, महांगवाळेश्वर, बितंग्या नि पंधाऱ्या डोंगर... दक्षिणेकडे रतनगड, अलंग, कुलंग, मंढणगड, बेलगाडा, किरडा, साकिरा, नवरानवरी नि आजोबा. उत्तरेकडे बितनगड, बहुली, रायगडडोंगर, घरगड, डांग्या, सुळका, अंजनेर, ब्रह्मगिरी, हरिहर, फणी डोंगर, वटवड, भाचेगड, कवनाई आणि नैऋत्येकडचा भयाण कड्यांनी वेढलेला हरिश्चंद्र गड... कसे ते बुलंद अभेद्य किल्ले... कसे ते ताशीव बेलाग कडे... कशी ती हिरवीगच्च दुर्गम वनं... कशा या पाताळावेरी गेलेल्या आक्राळविक्राळ दुर्घट दऱ्या... छे छे! सारेच अपूर्व...! सारेच अलौकिक...! सारेच अतुलनीय... सारेच एक अनोखा आनंद देणारे...!

'पर्यटन' मे १९७७

● ○ ●

# १५ रायगडी चढावे पाच वाटांनी...



**'संकलित नकाशा'**

**प्रा. प्र. के. घाणेकर यांच्या सौजन्याने**

हुकुमतपन्हा रामचंद्रपंत अमात्य यांनी आपल्या आज्ञापत्रात श्रीशिवछत्रपतींचं अनुशासन लिहून ठेवलं आहे. दुर्गद्वारांविषयी ते त्यात लिहितात- 'किल्ल्यास एक दरवाजा अयब (दोष) आहे, याकरिता गड पाहोन एक दोन तीन दरवाजे, तशाच चोरदिंड्या करोन ठेवाव्या... त्यामध्ये हमेशा राबत्यास पाहिजे तितक्या ठेवोन वरकड दरवाजे व दिंड्या चिणोन टाकाव्या...!'

आजही हे - कुठलाही गड चहूअंगी डोळसपणे पाहताक्षणीच चट्टदिशी ध्यानी येतं... गडावर युद्धोपयोगी आवश्यक असणाऱ्या अनेक वास्तू नि वस्तूंपैकी गडास एकदोन चोरवाटा असणं ही युद्धशास्त्राच्या दृष्टीनं एक अत्यावश्यक बाब...!

रायगड हा अवघ्या गडांचा धनी... स्वराज्याचा कंठमणी.... नि मराठी साम्राज्याची पहिली राजधानी....! तशी अभेद्य, अजिंक्य नि दुर्गम....! अशा या राजधानीस वाटा आहेत तीन.... पैकी पहिली महाद्वारातून वर गडापावेतो पोहोचविणारी सध्याची वाहती, सुगम नि दुसरी वाघदरवाज्यातून वर चढणारी बख्खळ धोंडींनी युक्त अशी नाहती दुर्गम....! राहती राहिली तिसरी चोरवाट.... टकमकीच्या नजिकची .... चोरदिंडीतून उतरून टकमकीच्या पोटघळीतून, हजार फुटी कड्यावरून झिरमत नि रेंगाळत खाली वाडीत उतरणारी....!

तसा ऐन गडावर प्रवेश करता येतो एकूण पाच वाटांनी.... पैकी राजमार्गाची वाट वगळता उरलेल्या चार वाटा उपरोक्त सुरुवातीच्या विधानाची सत्यता पटवून देतात.

या वाटांवर इतिहास घडला आहे... साहसं केली गेली आहेत.... बऱ्यावाईट संमिश्र भावभावनांचा स्पर्श यांनी अनुभवला आहे...! भारावलेल्या या वाटांचा इतिहास वेगळा... पण जात मात्र एकच....! या वाटांचा गंध मनसोक्त हुंगण्यासाठी मकरंद व्हावं नि धुंद होऊन वर चढावं तेव्हाच कुठं स्वर्गीय सुखाच्या आनंदाची महती पटेल....!

भवानी टोकाच्या तटबंदीपासून सातशे फूट उंचीच्या उभार नि उत्ताल कड्यावरून उडी घेणाऱ्या गुप्त वाटेनं चढताना जिद्दीची कसोटी नि हिम्मतीची परीक्षा पावलोपावली प्रत्ययास येते... शिवकालात हा उभा कडा प्राणांची बाजी लावून चढून जाणाऱ्या त्या अज्ञात मर्द मावळ्यास इनाम देऊन शिवप्रभूंनी गौरविलं होतं अशी एक आख्यायिका अजूनही रायगड खोऱ्यात रूढ आहे. नि तदनंतर हा कडा तीनशे वर्षांनंतर प्रथमच चढून जाण्याचा मान आमचा आहे हे विशेष....!

अशीच एक दंतकथा आहे हिरकणी कड्याविषयी.... हिरकणीचा कडा म्हणजे वात्सल्यानं पान्हावलेला.... ममतेनं ओथंबलेला... नि माऊलीच्या शीतल साऊलीनं सुखावलेला...!

कोजागरी पौर्णिमेच्या रात्री स्वर्गातून शुभ्रधवल दुधाच्या शतसहस्र धारांचा अभिषेक या अवघ्या अवनीतलावर होत असताना या शुभमंगल प्रसंगी ऐन मध्यरात्री एक माता [illegible] कवटाळून या अवघड कड्याशी जीवघेणा खेळ खेळते आहे हे पाहून वारा क्षणभर थबकला असेल.... झाडाझुडपांची कुजबूज नि लतावेलींचं हितगुज पळभर थांबलं असेल.... साक्षात यमराजानं दाताखाली अंगुली धरून नि श्वास रोधून या जगावेगळ्या साहसाचं कवतिक केलं असेल....

आणि - आणि पायाखालच्या पाषाणहृदयी कड्यालादेखील त्यावेळी दयेचा पाझर फुटला असेल....!

'हिरकणी बुरूज' या नामकरणानं साकार झालेली ही भावस्पर्शी गाथा मातृहृदयाची महती गात आज कित्येक वर्षे वाहते आहे...! हिरकणीचा पाषाण चढता उतरता प्रसंग पडला तर जन्मदात्री आपल्या लेकरासाठी काय दिव्य करू शकते या पुण्यस्मरणानं जो मन्मनी गहिवरत नाही तो खरोखरीच पाषाणहृदयी...! असा हा हिरकणीचा कडा त्या माऊलीनंतर प्रथमच एका पौर्णिमेच्या रात्री उतरणारे आम्ही... मी व प्रजापती बोधणे...! या साहसाचं तोंडभरे कौतुक करून मा. बाळासाहेब ठाकरे यांनी मला 'हिरकणीवीर' हा किताब देऊन गौरविले आहे...!

नाना दरवाज्यातून वर चढून महाद्वारातून प्रवेश करताना क्षणभर नतमस्तक व्हावे... लवून मुजरा करावा... पायठणीला स्पर्श करून तो भाळी लावावा... असंच पावित्र्य आहे या वाटेचं... असंच महात्म्य आहे या द्वाराचं...! शिवरायांच्या पदस्पर्शानं पावन झालेली ही वाट आज कित्येक वर्षे अनेकांना अनेकवेळा नवोदित स्फूर्ती देऊन गेली आहे... इथं थांबताक्षणीच मनी येतं - कोण कोण चढले असतील या पायऱ्यांवरून.? कोण कोण उतरले असतील या दारातून ...? काय काय पाहिलं असेल या दरवाजानं...? किती किती अनुभवलं असेल या प्रवेशानं...? कधी छाती रूंदावून ताठ मानेनं विजयाच्या धुंदीत चढणारे जेते तर कधी गर्दन झुकवून नि हात बांधून उतरणारे हाय खाल्लेले खासे...! कधी शीर तळहाती घेऊन झुंजणारे नि:स्वार्थी शिलेदार.. तर कधी फंदफितुरी करणारे अक्षम्य स्वार्थी गुन्हेगार...! किती नि काय...? छत्रपतींवर प्रसन्न होऊन त्यांच्या मागोमाग चालत आलेली सुरतेची लक्ष्मी... कुबेराची संपत्ती भाग्य उजळीत मोठ्या दिमाखानं वैभव पाजळीत ऐन गडावर चढली ती याच वाटेनं... नि शेवटी महाराष्ट्राची भाग्यलक्ष्मी खाली मानेनं रिक्त हस्ते गड सोडून विषण्णतेनं अश्रू ढाळीत खाली उतरली तीही याच वाटेनं...!

हृदय हेलावणारी अशीच एक दुसरी वाट उतरते वाघ दरवाजातून...! ऐन मध्यान्ही स्वातंत्र्यसूर्य मावळला... त्या सूर्यपुत्राची निर्घृण हत्या केली गेली ती देखील मध्यान्हीच...! महाराष्ट्रावर अक्षरश: दुर्दैव कोसळलं... आकाश फाटलं... हलक्कलोळ उडाला... कल्पांताचा आकांत झाला... नि या प्रचंड आघातानं उभा महाराष्ट्र सूडभावनेनं पेटून उठला...! स्वराज्याच्या नरडीचा घोट घेऊ पाहणारा नरराक्षस धर्मांध औरंग्या आपल्या

प्रचंड सैन्यबळासह या भूमीत जातीनिशी ठाण मांडून बसलेला... रायगडास वेढा पडलेला... फास करकचून आवळला गेलेला... आचके देत पण ताठ मानेनं उभा असलेला रायरी कुणाची तरी वाट पाहत असलेला... काळ्याभोर अंध:कारातून आशेचा एक तेजस्वी किरण डोकावताना त्यानं पाहिला मात्र... नि मग त्याही स्थितीत तो किंचितसा का होईना पण हसला...! जुल्फीकारखानाच्या वेढ्यातून सहिसलामत सुटण्यासाठी राजाराम महाराजांनी वाट धरली ती वाघदरवाजाची...! महाराज या वाटेनं कसे उतरले असतील हे वाघ दरवाजा उतरल्याखेरीज ध्यानी यायचं नाही. त्यावेळी त्यांच्या मनी उठलेलं काहूर अजूनही वाघदरवाजा उतरताना मनाला कमालीचा चटका लावून गेल्याशिवाय राहत नाही...!

राहती राहिली चोरवाट... तटबंदीच्या चोरदिंडीतून उतरणारी...! ही तटबंदी महाद्वाराच्या उजव्या बुलंद बुरूजाला घट्ट पकडून अनेक लहानमोठ्या बुरूजांना आपल्या कवेत घेत नि सर्पाकृती वळवळत शेवटी ऐन टकमकीच्या कड्याला जाऊन भिडली आहे...! टकमकीच्या खळग्यातून येणाऱ्या पाणलोटानं या तटबंदीचा काही भाग कोसळला आहे. त्या कोसळलेल्या भागाच्या जवळच एकमेकास खेटून बसलेल्या दोन बुरूजांमधून ही वाट चोवीस पायऱ्यांचा जिना उतरत एका लहानग्या चोरदिंडीतून शंभर फुटी कड्यावरून सरपटत समोरच्या मेटांना ओलांडून कडेलोटाचं पोट चिरीत शेवटी हजारएक फूट खाली वाडीपावतो घसरली आहे...! या वाटेविषयी शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे म्हणतात - "ही वाट इतकी भयंकर अवघड नि जिवावरची आहे की अजूनपर्यंत कोणाच्याही बापाने, कोणत्याही लेकाने वा कोणीही स्वत:च्याने इथून जायची यायची हिम्मत केलेली ऐकिवात नाही... कोण जाईल यमराजाच्या गालावर टिचकी मारायला..? जीव द्यायला निघालेला इथून घाबरून परतेल...!"

ही वाट एकवार मी, डॉ. दिनेश रांगणेकर नि इतर सहाजण चढून गेलो होतो.

टकमक कड्याच्या पायथ्याशी असलेल्या रायनाक स्मारकापाशी उभं राहिलं की समुद्रात फोफावत उसळणाऱ्या एखाद्या अजस्त्र काळलाटेसारखा दिसणारा टकमकीचा तो उत्ताल कडा अंगावर आल्यासारखा वाटतो... इथून बावीसशे फूट उंच असलेल्या नि छाती दडपून टाकणाऱ्या या कड्याच्या ऐन गर्भातून त्या चोरवाटेनं चालणं म्हणजे भक्ष्य गिळताच 'आ' वासून नक्राश्रू ढाळणाऱ्या एखाद्या मगरीच्या जबड्यात स्वत:हून उतरण्यासारखं आहे. हे ज्ञात असूनदेखील त्या मगरीच्या जबड्यात

उतरून नि यमराजाच्या गालावर टिचकी मारून न घाबरता तिथून सहिसलामत सुटलो होतो...!

सुरुवातीचा हजार फुटी चढ चढून गेल्यावर डाव्या अंगानं एका दरडीखालून वळताच समोर दिसतं अदमासे तीनशे फूट उंचीचं नि रुंदीचं टकमकाचं ओटीपोट... या ओटीपोटावरून चालत जाणं म्हणजे झोपलेल्या वाघाला उगीचच डिवचण्यासारखं आहे... स्वत:हून मृत्यूला उरीपोटी कवटाळण्यासारखं आहे... हे जरी खरं असलं तरी या वाटेनं चालताना या काळपुरुषाचं रौद्ररम्य रंगरूप अगदी जवळून निरखण्यात एक वेगळाच अनोखा आनंद असतो हे सांगून कळायचं नाही हेही तितकंच खरं...! हा कडेलोट म्हणजे साक्षात् काळपुरुष...! स्वराज्यापुढं नतमस्तक झालेला हा बलदंड लोहपुरुष थंडीवाऱ्याचे नि उन्हापावसाचे बेजरब तडाखे खात आज कित्येक वर्षे इथं उभा आहे...! याचा वरील माथा किंचित पुढं झुकलेला... उजवा हात छत्रीनिजामपूरच्या बाजूनं सरळ खाली उतरलेला... तर डावा हात महाद्वारापर्यंत सरळ आडवा धरलेला...! याच्या कंठमण्याखाली असलेला कंगोरा हा त्याचा कंठाखालील खोलगट भाग तर त्या खालचा पाचशे फुटी ताशीव कडा ही रुंदावलेली नि उंचावलेली काळीकभिन्न बुलंद छाती... त्याखाली घसरतं पोट.. पोटाच्या मध्यावर असलेला खळगा ही नाभी नि त्याखाली - कभिन्न काळ्या मांड्या जैशा पोलादाचे चिरले साग...!'

तात सह्याद्रीच्या या बलदंड भीमकाय लोहपुरुषाच्या डाव्या पोटघडीत बांधलेल्या मेटावरून- खुणावणारी चोरदिंडी फक्त या इथल्या मेटचौथऱ्यावरूनच दिसू शकेल असा संकेत दिठीसमोर ठेवून केलेलं हे बांधकाम केवळ कौतुकास पात्र...!

इथं उभं रहावं... पुनश्च एकवार कड्याचं रांगडेपण निरखावं... एकवार खाली बघावं... एकवार वर पहावं... पहात रहावं भान हरखून... निरखत रहावं श्वास रोधून...! दिठी मिटावी... त्या छत्रधारी मावळ्याची ती लोकविलक्षण लोककथा एकवार आठवावी... आदरानं मान तुकवावी... नि मिटल्या डोळ्यांनी पहावं अंत:चक्षूंसमोर तरळणारं त्या देहांत प्रायश्चिताचं भयानक चित्रण...!

टकमक टोक म्हणजे कडेलोटाची जागा... राजद्रोही नि फंदफितुरादी अक्षम्य अपराध्यांचा डोळ्यांवर पट्टी बांधून इथून चक्क कडेलोट होत असे... ते चित्तथरारक दृश्य जीव मुठीत धरून पाहणारे एकटक टकमक पहात असत म्हणूनच तर त्याचं नाव टकमक टोक...!


वरून सुटलेला गुन्हेगार प्रथमदर्शनी पहिल्या टप्प्यावर आदळत असे... शरीराच्या खोळीतील हाडं सांधे सोडून चांगली खिळखिळी झाल्यावर त्वरित डोळ्याचं पातं लवतं न लवतं तोच पुनश्च हजारएक फूट या इथं ओटीपोटीवर अलगद येऊन कोसळत असे... नि तदूनंतर चेंदामेंदा झालेलं ते पार्थिव कलेवर क्षणाचाही विलंब न लावता पुन्हा हजार फूट आडवं तिडवं घरंगळत तळाशी असलेल्या धोंडीच्या राशीवर छिन्नविछिन्नावस्थेत रक्ताच्या थारोळ्यात वेडंवाकुडं पडलेलं दिसत असे...! छे छे! महाभयंकरच!

असं हे जबर महाभयंकर देहांत प्रायश्चित प्रत्यक्ष जातीनं पाहणाऱ्याच्याच काय पण कर्णोपकर्णी ऐकणाऱ्यांच्यादेखील छातीत धस्स होई नि एखादा लहानगा गुन्हादेखील करण्यास ते धजत नसत...! अशी ती जरब...! असा तो वचक...! असं ते शासन...

नि म्हणूनच ते सुराज्य...! रामराज्य...!!

मार्मिक २०।३।८८.

● ○ ●



'कोतळीगडाचे सुंदर सुरम्य दर्शन'

छाया - राजेन्द्र बोरसे

# १६ वर्षाधारांतून गिरीदुर्गदर्शन

*भर पावसात दुर्गयात्रा म्हणजे एक अनोखा आनंद... या आनंदयात्रेचे दिवस म्हणजे बकुलफुलांचा ठेवा... एकेक दिवस 'बकुळीच्या फुलापरी मनी जपलेला असतो... त्याचा सुगंध मनींच्या गाभाऱ्यात कित्येक वर्षे दरवळत राहतो...*

वसंताच्या चैत्रपालवीपासून शिशिरातल्या पतझडीपर्यंतच्या ऋतुचक्रात 'वर्षाऋतू'चे आकर्षण उजवे आहे. ग्रीष्मात कळाकळा आग ओकणाऱ्या डोंगरकड्यांच्या रंध्रारंध्रातून यावेळी शीतल मायेचा पाझर फुटलेला असतो. पाणढाळ आलेल्या शुष्क बोडक्या वनश्रीच्या अंगप्रत्यंगातून यावेळी पोपटी मोरपिसाऱ्याचा साज डोलत असलेला दिसतो. ग्रीष्माच्या शापित वाणीनं पत्थरात गोठलेल्या नद्यांना यावेळी वरुणाचा पदस्पर्श झालेला असतो... तळपाय पोळून काढणाऱ्या रानवाटेवर यावेळी रंगीबेरंगी रानफुलांचा मऊमऊ गालीचा आंथरलेला असतो... भेगाळलेल्या धरिणीच्या गर्भातून यावेळी हिरवेगार लुसलुशीत प्राण डोकावत असताना दिसतात. सर्वांगातून आगडोंब उसळलेल्या अवघ्या भुईवर पहिला वहिला शिडकाव होताच मातीच्या कणाकणातून घमघमणारा दरवळ, आपणास ऐन पंचविशीतल्या झुळझुळणाऱ्या मोरपिसी दिवसांची आठवण करून देतो. मातृत्वाची चाहूल लागलेल्या एखाद्या नवपरिणीत वधूच्या मुखावरील शब्दातीत आनंद यावेळी या वसुंधरेच्या रंध्रारंध्रातून ओसंडत असलेला दिसतो.

अशाच एका रिमझिमत्या सोनवेळी धुक्याच्या अभेद्य वेढ्यातून रायगड चढून गेलो होतो. नगरखान्याच्या माथी उभा होतो. अवघं आकाशमण्डल चहूबाजूंनी आक्रमिलेले... कृष्णवर्णी मेघ खालपावेतो ओथंबलेले... त्यातून बरसत असलेली बरसात वरच्या मेघडंबरीतून जणू मोतियांचा अभिषेक करते आहे... भवतीच्या हिरव्यागर्द झाडावळीतून शुभ्रधवल धुक्याचा भंडारा उधळतो आहे... या उधळलेल्या भंडाऱ्यातून मधूनच अस्पष्ट डोकावणारा पूर्वेकडचा लिंगाणा मला खुणावतो आहे... त्या तीनशे फूट उंचीच्या शिवलिंगाच्या ऐन गर्भात अशीच एक भिजली

रात्र जागली होती... वैशाख वणव्याची काहिली सरता सरता एकदा सांजच्या प्रहरी गडावर थडकलो होतो. केशर भिजली सांज असते... भवतीच्या गिरीशृंगावर संध्यारंग शिंपडलेले असतात... नी ध्यानीमनी नसता अचानक 'सुलतानढवा' व्हावा तैसी चौतर्फा मेघांची एकच दाटी होते. चहूदिशी अंधारून येते. त्या काळ्यासावळ्या मेघमंडलावरून श्वेतांबरी बगळ्यांची एक माला दिसता दिसता अस्पष्ट होत ढगांआड अदृश्य होते. यापूर्वी कधीही न देखियली ऐसी लांबसडक नागमोडी नागिण पूर्वपश्चिम सळसळत क्षणार्धात लख्खदिशी कडाडून जाते. एखादी लांब पल्ल्याची मुलूखमैदानी तोफ डागताच कानठळ्या बसविणारा गगनभेदी गडगडाट, दऱ्याखोरी घुमवित समोरच्या शिंगणापूर कड्याच्या छाताडावर आदळताच ऐकू येणारा तो धीरगंभीर प्रतिध्वनी छाती दडपून टाकतो. उन्मत्त खट्याळ वारा घुसमटत अवघे रान पिळवटून काढतो. मागोमाग चौखूर उधळणाऱ्या बेभान मुसळधारा आडव्या तिडव्या झोडपून काढतात. मातीतून उठलेले सुगंधाचे लोट 'आकाशाचा गाभारा' भरून आसमंत भारून टाकतात...

झड उणावते. मेघमंडळ विरळ होते. इंद्रधनुच्या सप्तरंगी कमानीखाली रिमझिमत्या रेशीमधारांच्या झिरझिरीत ओढणीतून केशरमिश्रित गुलाबी सूर्यबिंब ओलंचिंब झालेलं दिसतं... मनी येतं, ते लाजरंबुजरं सूर्यफूल अलगद उचलून हलकेच ओंजळीत घ्यावं... डोळेभरी निरखावं... मनमुराद हुंगावं नि आकंठ चुंबावं...

निसर्गाचं हे रौद्ररम्य तांडव भर मुसळधार पावसात राजगडाची अवघड चोरवाट चढताना पाहिलं होतं. समर्थांच्या युद्धवर्णनातील ते शब्दचित्र येथे समर्पक ठरते.

**कडाडिले, खडाडिले**
**गडाडिले, धडाडिले**
**तडाडिले, धडाडिले**
**दडाडिले, धडाडिले**

समर्थ रामदास दऱ्यादरकुट्यातून नि घळीडोंगरातून फिरणारे होते. रौद्रनिसर्गवर्णनातून त्यांच्या ठोसर शब्दकळेची इथं प्रचीती येते.

**गिरीशृंग, पठार, दारी, कपाटे।**
**शिळा शिखरे, वृक्षपाषाण थाटे।।**
**दरेदर्कुटे घोर भ्यासुरवाणी।**
**बहुतांपरीचे तरु ते पुराणे।।**

धबाबा नद्या लोटल्या व्योमपंथे।
भूमी तुटल्या थोर घाते निघाते॥
कडे कापले तोय नेटे भडाडी।
गिरीकंदरी घोष तेणे धडाडी॥

भन्नाट वारा पिसं भरल्यागत उधळला आहे. वाऱ्याच्या बेफाम वारुवर आरूढ झालेलं धुकं गोरंमोरं पडलं आहे. अवघं ग्हाळ आभाळ झोडपून काढतं आहे. आधाराविना उभं राहणं अशक्य झालं आहे. एका पडक्या भिंतीचा आधार घेऊन बालेकिल्ल्याच्या ऐन माथ्यावर उभा आहे. उध्वस्त सदरेच्या भग्न चिऱ्यातून भरभरणारी हिरवी धारदार पाती नि नाजुक हृदयाची सुकुमार कोवळी गवतीफुले... त्या काळ्याकभिन्न पत्थराच्या ऐन गर्भातून फुललेली. त्या कर्मकठोर पाषाणाच्या हृदयाचं गुपित सांगणारी... '**मऊ मेणाहुनी आम्ही विष्णुदास, कठीण वज्रासी भेदू ऐसे**'...! त्या सेनाधुरंधर शिवपुत्राच्या निर्घृण हत्येनंतर याच गवताच्या पात्यांना भाले फुटले... स्वराज्याच्या नरडीचा घोट घेऊ इच्छिणाऱ्या कुटिल नीतीच्या पाताळयंत्री दिल्लीपतीला याच भाल्यांनी 'दे माय धरणी ठाय' करून सोडलं... या मातीनं जोडलेली नाती, हाती दुधारी पाती घेऊन छातीवर वार झेलीत अखेर अटकेपार जाऊन पोहोचली... धन्य ती माती नि धन्य ती नाती...!

भिजलेल्या गहिऱ्या अंधारानं वेढलेला परिसर... किंचित् भयाण, काहीसा गंभीर... पद्मावती राऊळातील रात्र... समोर देवीच्या गाभाऱ्यात एक दिवटी टिमटिमते आहे. बाहेर पाऊस झरझरतो आहे. रानफुलांच्या मदिर गंधानं वारा धुंद झाला आहे. धुक्याचे लोट दाराच्या घबदाडी-फटीतून आत घुसताहेत... थकले भागले सहयात्री मुरकुंडी मारून डाराडूर झोपले आहेत. मी एकटाच जागा आहे. सोबतीला आई पद्मावती आहे. अशा रात्री झोपण्यासाठी नसतात' याची कुणाही भिडूला खंत नाही. मनी येतं, या असल्या गंधधुंद भिजल्या रात्री अशाच एखाददुसऱ्या नामवंत गडावर दिवटीच्या अंधुकल्या उजेडात भीमसेनची 'संतवाणी' फुलावी. कुमारची मैफिल रंगावी. वा एखादी रागमाला गुंफली जावी. गोरज मुहूर्तापासून गोपालमुहूर्तापर्यंतची! मुलतानी ते भैरवी...!

## लोहगडाचे सौंदर्य

पाऊस सरता सरता लोहगडावर गेलो होतो. विंचूकाटा टोकापाशी एका बुरूजावर बसलो होतो. किंचित् कुंद वातावरण... पूर्वेला सप्तरंगी इंद्रधनुष्य... त्याखालती धुक्याची रेशीमदुलई पांघरलेले डोंगर... ते इंद्रायणीचं

खोरं... अलिकडं पसरलेलं हिरवं गर्द रान... त्या हिरव्या रंगाच्या विविध छटा... त्यावर शिंपडलेला पोपटी शिडकाव... मधूनच कुण्या एका वृक्षानं आपल्या सळसळणाऱ्या तांबूस पताकांचा हात वर उंचावलेला... तर कुण्या दुसऱ्यानं पांढुरके तुरे आपल्या शिरी खोचलेले... अवघ्या या हिरवळीवर मेघांची अंधुकशी छाया पसरलेली... त्या छायेतून पाझरलेलं हळदीचं सोनेरी ऊन... जणू हिरवा शालू परिधान केलेली एखादी नववधू आपल्या हळदीच्या पावलानं समोर उभी ठाकली आहे... भान हरखून त्या नववधूचं ते लाजरंमुजरं पोपटी लावण्य डोळेभरी न्याहाळतो आहे. खबरगीर वाऱ्याची खबर मिळताच सारा पक्षीगण सावध झाला आहे. पूर्वेकडून येणारा पोपटांचा एक थवा खालच्या रानात उतरतो आहे. रानभर पाखरांचा चिवचिवाट ऐकू येतो आहे. इतक्यात किंचितसं गरजतं. मग गरजत बरसत बरसणारा पाऊस सरसर सरसरत अवघं रान झोडपून काढतो. मन मन्मनी गुणगुणतं...!

**ओल्या पानातल्या रेषा वाचतात ओले पक्षी।**
**आणि पोपटी रंगाची रान दाखविते नक्षी।।**

## निसर्गरम्य कोथळीगड

कर्जतच्या ईशान्येस चौदा मैलांवर असलेल्या कोथळीगडाचं एक वैशिष्ट्य आहे. हा गड एका सुळक्यावर उभारला आहे. सुळका चहूअंगी तुटलेला आहे. या गडाचा कोथळा छिनून याच्या ऐन गर्भातून प्रशस्त पायऱ्यांचा एक उभा भुयारी मार्ग माथ्यापावेतो मूळ पाषाणातून कोरून काढला आहे. साकळलेल्या धुक्यातून हा भुयारी मार्ग चढताना प्रतापगडावरील एक आठवण जागी झाली होती. प्रतापगडावरून गोठलेल्या धुक्याचं जिवंत सागरचित्र पाहून काहीक्षण भान हरपलं होतं. तांबडफुटींची सुप्रभात... पूर्वदिशा फाकलेली... समोरच्या निळसर डोंगररांगेमागून रक्तवर्णी गुलालाची उधळण झालेली... खालचं कोयनेचं खोरं धुक्यानं तुडुंब भरलेलं... पुरुष पुरुष उंचीच्या कर्पूरगौरी सागर लाटांनी फेसाळलेलं हे जिवंत सागरचित्र त्या सर्वश्रेष्ठ चित्रकारानं आपल्या प्रभावी कुंचल्यातून रेखाटलेलं...!

कोथळीगडाचा माथा तसा मर्यादित आकाराचा! माथी तृणांकुरांची पोपटी शाल... त्यावर पैशाएवढुल्या सोनफुलांचे ठिपके... मधोमध घडीव दगडांचा एक बांधीव हौद... तो निळ्याशार पाण्यानं तुडुंब भरलेला... त्याच्या चौतर्फा जांभूळपर्णावळीची ठेंगणीठुसकी झुडपं... त्यावर नारिंगी कळ्यांची लगड... काठी उभं असलेलं एक झाड हौदात झेपावलेलं. ते इवलुशा शुभ्र फुलांनी डंवरलेलं. खालच्या निळाईवर त्या फुलांचा

अविरत होत असलेला वर्षाव... त्यांनी आंथरलेला सडा... त्या मखमली धवल पुष्पशय्येवर तरंगणाऱ्या त्या लालबुंद जास्वंदी फुलपाखरांच्या लाटा... नि टपोऱ्या जांभळी भ्रमरांचा गुंजारव...! इंद्रधनुचे सप्तरंग इथं या दृश्यात एकवटलेले...!

हौदाच्या अर्ध्याअधिक भागावर अविरत होणारा तो भिरभिरी पुष्पाभिषेक नि उरल्या भागी काचेसारख्या नितळ पाण्यावर अलगद तरंगणाऱ्या असंख्य पाणनिवळ्या... त्या संथगती जललहरींवर लयबद्ध थुयथुयणारी धारानृत्ये. त्यांच्या नुपुरांचा तो नाजुकसा मंद झंकार... ते रेशमी भिजले तरंग नि ते इंद्रधनूचे मुलायम सप्तरंग पाहून निसर्गाच्या या अद्भुत किमयेनं मन केवळ विस्मयानं भरून येतं.

## सुगंधी राजमाची

अवसेची रात्र..! अवघं रान दरादरा झोडपून काढणाऱ्या पावसानं हैदोस मांडलेला...! अशा या धुमश्चक्रीत आम्ही साताठ निशाचर, स्वत:च्या देहाची पालखी मोठ्या मुष्किलीनं सावरीत, खंडाळा ते राजमाचीपर्यंत सकाळच्या झुंजुमुंजू प्रहरी, बहिरोबाच्या राऊळी डेरेदाखल झालो होतो... पाठीवरची ओझी हलकी करून ओल्याचं सुकं करतो नि समोरच्या दीपमाळेशी जाऊन बसतो.

रात्रभर धबाधबा कोसळणारा पाऊस आता पूर्ण उणावला आहे. समोर फोफावलेलं गच्चदच्च रान... त्यात साकळलेला हिरवा अंधार... त्यातून डोकावणारा विविध पक्ष्यांचा रंगीबेरंगी शृंगार... त्या नानापरीच्या वृक्षांना आलिंगलेल्या कोमलांगी वेलींच्या सर्वांगावर फुललेला तो गुंजवर्णीपर्णाचा लालभडक अंगार... वाऱ्यानं छेडलेली धुन... ती थरथरती लाजरी झाडावळ... त्या पर्णावळीच्या सर्वांगी फुललेली ती गोड रोमावळ. त्यावरून त्या खालच्या भूमीवर घरंगळणारी ती मोतियांची थेंबावळ... वेलींची कुजबूज नि पर्णांचे हितगुज ऐकून त्या पाखरांनी केलेली ती चित्रविचित्र किलबिल अजूनही माझ्या कानात घुमते आहे.

या निसर्गसौंदर्याच्या दालनातून बाहेर पडताना निसर्गावर नितांत प्रेम करणाऱ्या समर्थांच्या ओळी आठवतात.

**द्रुमलता संमता गुणमातले।**
**सुख मनी सुमनी मन रातले॥**
**परम सुंदर ते खग बोलती।**
**गमतसे वसती कमलापती॥**

निसर्गाचं हे मार्दवयुक्त वर्णन तितकंच मनोवेधक आहे.

या इथल्या दगडधोंड्यांची एक मोठी गम्मत आहे. उन्हाळ्यात संतप्त होऊन आग पाखडणारे हे पत्थर, या दिवसात हिरव्या गर्द मऊ शेवाळ्याचे मखमली पांघरुण घेतलेले पाहिले की मोठी मौज वाटते.

## सिद्धगड : एक आव्हान

या मखमली दिवसात डेऱ्याच्या वाटेनं सिद्धगडाचा उभा दुर्गम चढ चढणं म्हणजे गिर्यारोहकाला एक आव्हानच आहे. एका रामप्रहरी हे आव्हान आम्ही स्वीकारलं नि मखमली कातळावरून आस्ते कदम, वरच्या पाण्याच्या प्रवाहाबरोबर घरंगळत येणाऱ्या लहान सहान दगडी खड्यांना चुकवीत नराचा वानर होऊन चढू लागलो.

डेऱ्याला लावलेली लाकडी शिडी नि वरील कड्याच्या काटकोनात उभा ठेवलेला वासा शेवाळ्यानं माखून गळगळीत झालेला ! अशीच एक शिडीची वाट खांडसवरून भीमाशंकराचा डोंगर चढताना लागली होती.

कसाबसा शिडीच्या पायाशी थडकलो नि क्षणभर हबकलोच ! डोईवरील चुंबळीवर ठेवलेला दुधाचा माठ अलगद सावरीत, मांडेकास नेसलेली एक धनगरीण वरच्या वाश्यावरून, त्या झिम्मड पावसात भरभर उतरताना गाणं गुणगुणतेय्... ! एकदोन क्षणाची अनुभूती असेल. सर्वांगी रोमावळी फुलली नि त्या हुडहुडणाऱ्या गारव्यातही सर्वांगातून एक अनामिक संवेदना विजेगत चमकून गेली... आम्ही कसले गिर्यारोहक. क्षणोक्षणी 'तोल' जाणारे आम्ही सर्वसामान्य ! जन्मत:च गिर्यारोहणाचं अमर वरदान लाभलेली खरीखुरी गिर्यारोहक ही धनगरंच... !

सिद्धगडाच्या माथी उभा आहे. चौतर्फा धुक्याचा अथांग महासागर पसरला आहे. वर घन:श्यामी घनांची घनदाटी झाली आहे... एखाद्या सिद्धराज पक्षावर आरूढ होऊन अंतराळ भ्रमण केल्याचा आनंद होतो आहे...

या इथं एवढ्या उंचावर उभं राहून निसर्गासमोर नतमस्तक व्हावं. तो सौंदर्यसोहळा पंचेंद्रियांनी भरभरून घ्यावा... तो मदिर रानदर्प हुंगावा... तो धीरगंभीर घंटानाद ऐकावा... तो सप्तरंगी साज शृंगार बघावा... त्या कोमलांगी रेशीमधारांना स्पर्शावं, आलिंगावं... चुंबावं नि आकंठ पिऊन घ्यावं ! किती प्यावं... ?

**आला आषाढ श्रावण आल्या पावसाच्या सरी।**
**किती चातक चोचीने प्यावा वर्षा ऋतू तरी॥**


सहसा चाकोरीबाहेर न डोकावता खिडकीच्या मर्यादित चौकटीतून निसर्गशोभा पाहणारांनी या अशा एकांती एकाग्रतेनी निसर्ग सान्निध्यात यावं. त्याशी जवळीक साधावी. चार घटका बोलावं. त्याची भाषा समजून घेण्याचा प्रयत्न करावा. म्हणजे मग आपण 'आपले' रहात नाही... आपोआपच आपण त्या भव्यदिव्य दृष्याचा एक भाग बनून जातो. अशी लय एकवार जमली की तो आपला सखा होतो...!

सुंदर, सात्विक नि सुगंधी फुलांतून...
रंगीबेरंगी स्वच्छंदी पाखरांच्या मधुर कूजनातून...
नानाविध झाडांच्या सळसळणाऱ्या हिरव्या मोरपंखांतून..
दरवळणाऱ्या मातीच्या घमघमीत सुगंधातून..
खळखळणाऱ्या झऱ्यांच्या निरागस हास्यातून...
झुळझुळणाऱ्या वाऱ्याच्या प्राणफुंकल्या धुनीतून...
ओथंबलेल्या घन:श्यामी मेघांच्या धीरगंभीर गर्जनेतून...
झिम्मड पावसाच्या रेशीमधारांतून...
केशरभिजल्या सोनेरी पिवळ्याधम्म किरणातून...
निसर्ग आपणाशी बोलत असतो...
त्याची ही गूढ नि सांकेतिक भाषा ज्याला उमजली, त्या ठायी
'मी पण ज्यांचे पक्व फळापरी,
सहजपणाने गळले हो...!
असं हे नकळत घडून जातं...

मुंबई सकाळ, ८/९/१९८५

● ○ ●

## १७ उत्ताल कड्याच्या गर्भांतून...



'प्रदक्षिणार्थी'

छाया - प्रजापती बोधणे

*शिवतीर्थ किल्ले रायगडच्या चहूअंगी दोन हजार फूट उंचीचे ताशीव.. बेलाग कडे... छातीचा कोट करून खडे आहेत...! या कड्यांच्यामधून - ऐन गर्भातून... अवघड वाटेनं रायगड प्रदक्षिणेचा नवा विक्रम प्रस्थापित करणारे सर्वप्रथम मानकरी आहेत विलेपार्ल्यातील आठ तरुण गिर्यारोहक...! या चित्तथरारक...रोमहर्षक... नि अभिनव प्रदक्षिणेचं शब्दांकन...!*

एक जानेवारीची ती पहाट... झुंजूमुंजूचा सुमार... किंचित बोचणारी थंडी... नीरव शांतता... निखळ एकांत... दिशा फाकताहेत... पूर्वेला तांबडं फुटत आहे. कर्पूरगौरी धुक्याच्या झिरझिरीत आवरणातून समोर

सुंदर दिसणाऱ्या डोंगर रांगांपलीकडे रक्तवर्ण गुलालाची उधळण होते आहे... पूर्वकडा हळुवार उजळते आहे... उषादेवीच्या आगमनाची ही पूर्वसूचना आहे...! असं हे एकूण प्रसन्न वातावरण...! अशा या शुभमंगल घटिकेला मी नगारखान्याच्या महिरपीखाली उभा आहे...!

रायगडाच्या चहूअंगी ताठ मानेनं उभ्या असलेल्या उत्ताल कड्याच्या ऐन गर्भातून ही दुर्गम प्रदक्षिणा घालणं ही कल्पनाच मोठी अभिनव नि रोमहर्षक... सात-आठ वर्षांपूर्वी माझ्याच मनी अंकुरलेली ही नवलाई आता या डोंगरउतारवयातदेखील गोचडीसारखी मनी चिकटलेली...! इतक्या दिसांनी या जीवघेण्या धाडसाचा क्षण समीप येऊन ठेपताच नाही म्हटलं तरी मन धास्तावलं... नि सुसाटलं... अजून शरीर साथ देत असलं तरी बेगुमान चौखूर उधळणाऱ्या या वारूला काबूत आणण्यासाठी आपल्या पूर्वजांनी उच्चरवानं गायिलेल्या प्रार्थनेचे शब्द नकळत माझ्या ओठातून स्फुरले...

**सुगोत् ते सुपथा पर्वतेष्ववाते अपस्तरसि स्वभानो।**
**सा न आ वह पृथुयामन्नृष्वे रयिं दिवो दुहितरिषयध्यै।**

(हे भगवतीदेवी उषे! तुझ्या कृपेने दुर्गम पर्वत वा गुंफा-गुहा या सहज मार्गक्रमण करता येतात. हे स्वयंप्रकाशी उषे, तू जलावरून सहजच जातेस. हे अंतरिक्षकन्ये! प्रियदर्शनी तेजस्वी उषे, तू आम्हास समृद्ध कर.)

नतमस्तक होऊन लगबगीनं राहुटीच्या दिशेनं परतलो. प्रस्थानाची पूर्वतयारी होऊन सर्व तयारीनिशी सुसज्ज असे माझे सात स्नेही घाईघाईनं गड उतरू लागले. मदारीमेहेतरची समाधी ते मशीदमोर्चा हा हजारएक फूटी उतार - भराभर पायऱ्या उतरलो की वीसएक मिनिटात सहज गाठता येण्यासारखा आहे.

मशीद मोर्चासमोरील सध्याच्या वाहत्या वाटेवर एका जलकुंभापाशी सूर्योदयापूर्वीच नारळ फोडला जातो नि जयजयकाराच्या स्फूर्तिदायी घोषणेनं या एका आगळ्यावेगळ्या साहसी वाटचालीस प्रारंभ होतो.

रायगडच्या दुर्गमतेविषयी लिहिताना सभासद कृष्णाजी अनंत आपल्या बखरीत म्हणतो - 'राजा खासा जाऊन पाहता गड बहूत चखोट... चौतर्फा गडाचे कडे तासल्याप्रमाणे दीड गाव उंच... पर्जन्यकाली कडियावरी गवत उगवत नाही आणि धोंडा तासीव एकच आहे...!' आज या उक्तीची प्रचिती अजूनही या गडास तळातून प्रदक्षिणा घालताना मन्मनी पटते.

अशा या दीड गाव उंचीच्या ताशीव धोंड्याच्या अगदी मधून पोटघळीतून जाणं - याच वाटेनं गडास पूर्ण प्रदक्षिणा घालणं म्हणजे एक साहसी विक्रमच...! इथून जाणं म्हणजे जिभल्या चाटणाऱ्या क्रूर मृत्यूच्या कराल दाढेखालून चालण्यासारखं आहे... आ वासून निपचित पडलेल्या एखाद्या मगरीच्या जबड्यात स्वत:हून उतरण्यासारखं आहे...!

आखाड्यात छाती रुंदावून नि शड्डू ठोकून कुस्तीच्या पवित्र्यात उभ्या असलेल्या या बलदंड लोहपुरुषाचं आव्हान स्वीकारावं की नाही... याच्या कडसरीला सहजासहजी हात घालावा की नाही या चिंतनात गेली तीन वर्षे गेली. या कालावधीत गडाच्या तळातून सातआठ वेळा प्रदक्षिणा घालताना प्रत्येक खेपेस यास दूरदर्शिकेतून अनेकवार डोळेभरी न्याहळले होते... काही अनुत्तरीत बारकावे डोळसपणे निरखले होते... ते कागदोपत्री नीट टिपून ठेवले होते... पूर्वायुष्याच्या कित्येक धाडसांनी साहस दुणावले होते. काही संकेत कळले होते. उणीवा ध्यानी आल्या होत्या. गेले सहा महिने श्याम जांबोटकर नि प्रजापती बोधणे या माझ्या दोन तरुण मित्रांनी यास सावधपणं जागोजागी चाचपून पाहिलं होतं नि अखेर संरक्षणाची मनस्वी खातरजमा पटल्यानंतर ठरलं की या गिर्यारोहण वर्षारंभी हा साहसी विक्रम हाती घ्यावा.

महाद्वाराच्या तटबंदीतील चोरदिंडीतून उतरलेली चोरवाट टकमक कड्याच्या ऐन गर्भातून पायी असलेल्या रायनाक स्मारकापाशी जाऊन थांबली आहे. या निसरड्या कारवीच्या ठिसूळ खडकाळ वाटेनं टकमकीच्या उत्तरधारेपाशी पोहचताच वरच्या आठशे फुटी उंचीच्या टोकावरून खालच्या एका निसरड्या दरडीत कोसळून रुतलेला तो लोखंडी कठडा पाहताक्षणीच मनी धस्स झालं. बापरे...! नको ती जीवघेणी आठवण...! तीनएक वर्षांपूर्वी टकमकीचा हा बेलाग कडा चढण्याचा प्रयत्न करताना आमचा हिरा पंडित पाऊणशे फुटावरून कोसळून वरील टप्प्यावर आदळताच चेंडूसारखा उंच उडाला होता नि दोरखंडात गुंतून रक्ताळलेल्या बेशुद्धावस्थेत या कठड्याला आडवातिडवा लोंबकळत राहिला होता...! आपला फडा उभारून खडा असलेला तो कडा... त्याचा तो जहरी फुत्कार नि तो जीवघेणा प्रसंग मला अजूनही केव्हा केव्हा झोपेतून जाग आणतो...!

तीनेकवेळा हटकूनदेखील मशीदमोर्चापासून आम्हासवे आलेला कुत्रा आमच्या पुढे चाललेला पाहून मनी असंख्य विचारांचं काहूर माजलं... आम्हापाशी सलगीलगट करून आलेलं हे श्वान आम्हासवे कुठपर्यंत येणार...? आम्ही गिर्यारोहण करणार नसून स्वर्गारोहण करणार आहोत

अशी या इमानी मूक जीवाची समजूत तर झाली नसावी ना...!

टकमकीची उत्तरधार ते पूर्वेकडील भवानीकडा या पाच कि.मी.च्या वाटेनं हजार फुटी कड्याच्या बगलेतून उजवी घालणं जितकं धोकादायक तितकंच सुखकारक...! या कड्यातून सरळ सलग अशी एकच वाट नाही. वरखाली टप्प्याटप्प्यान असलेल्या तीनेक वाटा आहेत. पण प्रत्येक वाट शेदीडशे फूट धावून मधेच तुटली आहे. त्यामुळे खालीवर असा चढउतार करताना अंग पेलून तोल सावरीत नि प्रसंगी छातीपोट कड्याला भिडवीत चक्क तसूतसू मुंगीपावलानं सरकावं लागतं. कधी खांद्यावरून... कधी छातीवरून... कधी बगलेतून.. कधी कुशीतून... तर कधी चक्क ऐन गर्भातून मार्ग काढावा लागतो. या कड्याच्या नाभिकमलाजवळील कडसरीच्या निसरड्या वाटेवर गच्चदच्च झाडावळ... रानडुकरं या वाटेपर्यंत येतात नि एखाददुसऱ्या ऐसपैस मोकळ्याचाकळ्या घळीत दबा धरून बसतात. भवानी कड्यापाशी असलेल्या भुयारी टाक्यात पाण्यासाठी सरपटत जाण्याआधी बाहेरून आत दगड मारून मोठमोठ्यानं हाकारा द्यावा लागतो, तो याचसाठी.

अशाच एका घळीला वळसा घालून पाणढाळीनं चिरलेल्या पाणझोताखालून जाताना आमच्या राजन रणदिवेला दोन सशांनी नि एका रानमांजरानं दर्शन दिलं. रानडुकरांनी घातलेल्या धुमाकुळीत बचावलेले हे दुबळे नि बुजरे जीव अशा या लहानग्या घळींचा आधार घेतात नि विनासायास एखाद्या कातवड्याच्या तीरकामठ्यास बळी पडतात.

या बाजूस रानडुकरांचा सुळसुळाट फार! कळपानं राहणारी जखमी डुकरं एखादा नि:शस्त्र गावकरी आडवळणी दिसताच त्याचा फडशा पाडायला कमी करणार नाहीत. आपल्या धारदार सुळ्यांनी मुळासकट उपटलेली, दगडी मुरुमाच्या दरडीत खणलेले खड्डे नि झाड्यांच्या सोललेल्या जाड साली पाहिल्या की पिसाळलेल्या डुकरांचा धुमाकूळ चट्टदिशी ध्यानी येतो.

वरील सातवणीच्या नि निवडुंगीच्या खळग्यातून पावसाळ्यात खाली उडी घेणाऱ्या पाणलोटानं हा कडा बहुतेक ठिकाणी असा हा मधोमध चिरला जाऊन ठिसूळ केला आहे. या नाळीतून वर चढणं नि काळ्याकभिन्न पत्थराच्या ऐन गर्भातून नुकतेच उमललेल्या त्या नाजुक नि सुकुमार दगडीफुलांचा स्वाद घेणं केवढं सुखकारक! जांभूळवर्णी फिक्कट झाक असलेली ती इवली इवली फुलं हलकेच तोडून ओंजळीत घ्यावी नि त्यांचा सुगंध अगदी मनमुराद हुंगावा! साऱ्या साऱ्या प्रवासाचा

शिणोटा असा हा क्षणार्धात विरघळून जातो...!

हा सुगंधी कैफ.. ते कड्याचं रांगडेपण.. एखाद्या अंथरलेल्या नकाशासारखं डावीकडे दिसणारं ते काळनदीचं खोरं.. त्या जीवनसुखदायिनीच्या पात्रातील डोहात चकाकणारी ती चमकेली कलाबूत... ती समोरची उत्तुंग डोंगरावळी... नि डोयी ढगांची पांढरी टोपी घातलेला तो कोपऱ्यातला दुर्गलिंगाणा... हे सारं लोहचुंबी आकर्षण जीवाला कमालीची भुरळ पाडतं...! या धुंद बेहोषीत असतानाच श्यामनं माझ्या नावी मारलेल्या हाळीनं स्थलकालाची बंधनं पाळावी लागली.

कड्यावर पसरलेल्या जाळीदार मुळ्यांचा जुजबी आधार घेत वर्षानुवर्षे झिजून ठिसूळ झालेले नि मूळ कड्यापासून सुटलेले प्रचंड मोठ्ठाले शिलाखंड ठाऊक नसलेल्या मुळाधारास चुकून धक्का लागताच कोणत्याक्षणी धाऽऽऽडऽऽ दिशी खाली कोसळतील याचा नेम नाही...! या मधल्या सुट्ट्या जागी निर्माण झालेल्या पोकळीत गिधाडघारींची घरटी नि वाटेवरील आडोशाला उभारलेली रांजणाएवढाली वारुळं...! या वारुळात नागदेवांचं वास्तव्य...! घारीची अंडी यांना मनस्वी प्रिय..! पायाखालच्या निमुळत्या अरुंद वाटेकडं - वरून झेपावणाऱ्या घारीकडं - उजवीकडच्या बेभरवशी कड्याकडं - नि पाठीमागं धुऽस्ऽपुऽस् होणाऱ्या खस्स् आवाजाकडं -- असं चहूबाजूस एकाचवेळी बारकाईनं लक्ष ठेवीत मार्गक्रमणा करणं मनस्वी अवघड होऊन बसतं...!

अशा या अवघडलेल्या स्थितीत राबता नसलेली ही बिकट वाट वहिवाटीत आणीत असता जागोजागी दगडी मुरुमातून तगलेल्या झिपऱ्या झुडपांचा जुजबी आधार घेत तब्बल तीन तासांनी आम्ही भवानीच्या कुशीत येऊन विसावतो.

इथं एका तरुतळी असलेल्या भुयारी टाक्यात 'सुवरकी अवलाद' नसल्याची खातरजमा होताच शिदोरी सोडली जाते नि भडकलेल्या जठराग्नीला शांत करण्यासाठी कांदापोह्यांची यथाविधी आहुती दिली जाते...!

या आहुतीवरून एक आठवण झाली. समोरील कारवीच्या सळसळत्या पानांमधून डोकावणाऱ्या त्या दुर्गलिंगाणाच्या मस्तकी तो सकाळचा पांढुरका ढग अजून तसाच रेंगाळतो आहे. अठ्ठ्याहत्तर साली तीनशे वर्षांनंतर प्रथमच आम्ही याच्या माथी पहिलंवहिलं पाऊल रोवताच इतकी वर्षे ध्यानस्थ बसलेला तो रुद्रावतार खदिरांगारासारखा उसळला होता...! त्या रात्री त्याच्या चहूअंगी लागलेल्या वणव्याच्या चक्रव्यूहात आम्ही चौदाजण अडकून पडलो होतो नि आहुती न देता तब्बल चौदा

तांनी आम्ही सारेच त्या अग्निदिव्यातून सहीसलामत सुटलो होतो...! हा जीवघेणा प्रसंग घरच्यांना समजताच काहींची दारं कायमची बंद केली गेली होती. काहींनी आणाभाका घेतल्या होत्या. काहींनी मोठ्या कौशल्यानं स्वत:ची सुटका करून घेतली होती नि माझ्या गृहमंत्र्यांनी तर चक्क आणीबाणीच जाहीर करून टाकली होती...!

भवानी ते हिरकणी टोकांमधील प्रचंड शिलाखंडांचे थरावर थर असलेला हा सरळसोट तुटलेला उत्ताल कडा नखशिखांत नागवा आहे... टळटळीत दुपारच्या रणरणीत उन्हानं तो तापला आहे... एखाद्या काळ्याकभिन्न उघड्या रामोशासारखा हाती कुऱ्हाड घेऊन अंगावर आला आहे... याच्या अंगाखांद्यावर चढताना तो मनी आणील तर आम्हास झुरळासारखं झटकूनदेखील देईल...! पण तसे होणे नाही. कारण एखाद्या गुळाच्या ढेपीला चिकटून बसणाऱ्या मुंगळ्यांची आमची जातकुळी... त्यातून स्वत:च्या अंगाखांद्यावर बागडताना मुलांच्या पदधुळीनं माखलेल्या शरीराचा जन्मदात्याला नेहमी अभिमानच वाटत असतो...! आमुचा तात सह्याद्री असा हा एकाएकी निष्ठूरपणं कधीच वागणार नाही...!

याच्या भरदार मर्दानी छातीवर वाघदरा-वाघदरवाजा नि वाघजबडा हे वाघत्रय मोठ्या दिमाखानं आरूढ झालेले दिसतात...! 'या भव्यदिव्य अवाढव्य पहाडाचा खांदाबांधा जसा विशाल तितकाच तो आवळ नि रेखीव आहे...! भयाण घळी... भीषण नि अवघड वळणे... घातकी नि दुर्गम कपाऱ्या... आधारशून्य निसरडे... काळ्याकभिन्न दरडी... नि मृत्यूच्या जबड्यासारख्या गुहा...!' हे याचं वैशिष्ठ्य आहे.

सह्याद्री हा ज्वालामुखीचा उद्रेक आहे...! धरणीमातेच्या गर्भातून - तिला दुभंगून - उसळी घेत आकाशावेरी झेपावलेला आहे...! अमुचे शिवशाहीर पुरंदरे याचं मोठं रसभरीत वर्णन करतात. ते म्हणतात - 'अग्नी आणि पृथ्वी यांच्या धुंद प्रणयातून सह्याद्री जन्मास आला. अग्नीच्या धगधगत्या उग्रवीर्याचा हा आविष्कारही तितकाच उग्र आहे...! पौरुषाचा मूर्तिमंत साक्षात्कार म्हणजेच सह्याद्री...! आडदांड सामर्थ्य हेच याचं सौंदर्य...! अशा या सह्याद्रीच्या कुशीखांद्यावर राहायची हिम्मत फक्त मराठ्यात आहे. तशी ती वाघातही आहे... कारण तेही मराठ्यांइतके शूर आहेत...!'

वाघदरा नि माडाचा खळगा याखालील कडा जागोजागी तुटून बेलाग बनला आहे. वाघदरवाजापर्यंतचा अधिकाधिक भाग मधेच कुठं पोटासारखा डेरा पुढं आला आहे. त्यामुळं पुढचा ठाव दिसत नाही...

मागची धाव कळत नाही... पायाखालचा घाव उमजत नाही... नि कड्याचा डाव समजत नाही... अशा या कमालीच्या कठीण अवस्थेत घारींच्या तीक्ष्ण नजरेनं बारीकसारीक बारकावे निरखीत सुकलेल्या गुळगुळीत गवताचा मऊ मऊ गालिचा अंथरलेल्या वीतभर रुंदीच्या निसऱ्या वाटेवरून कड्याला अंग घाशीत... कंगोरे नि खोबण्यांचा आधार घेत... पायाखालचा सरकता गालिचा पावलांनीच चाचपीत आस्ते कदम सरकताना मोठ्या प्रयासानं अंग पेलून तोल सावरीत... तसूतसू अंतर कापताना मधेच कुठं भोवळ आल्यागत नाडीचा एकेक ठोका चुकतो आहे...! तापलेला कडा... सोसाट्याचा वारा... मधेच पायात रेंगाळणारा तो इमानी कुत्रा... सरकणारे गवती झुबके... त्याखालचे घरंगळणारे अणकुचीदार असंख्य खडे... नि त्यातच वरून घिरट्या घालणाऱ्या घारी नि ससाण्यांचं मनस्वी भय...! दुर्दैवानं आमच्यापैकी चुकून जरी एखाददुसरा इथून सटकलाच तर तो चेंडूसारखा टप्प्याटप्प्यानं आदळत शेवटी आठशे फूट खाली तळाशी असलेल्या दगडांच्या राशीवर कोसळून अक्षरशः छिन्नविछिन्न... छे! छे! नकोच तो अशुभ विचार...!

अशा या जीवघेण्या कठिणात कठिण अवस्थेत सतत दीड तास तारेवरची कसरत संपते न संपते तोच सारेजण अचानक धप्पदिशी थबकतो... नाडीचा ठोका चुकतो... श्वास रोखला जातो... पोटात भीतीचा गोळा उठतो... नि सारेच डोळे विस्फारून नि कान टवकारून जैसे थे उभे राहतो. शेखर ताम्हणकरची दणदणीत आपटी... पुढची वाट तुटल्याचा इशारा... नि गडावरून समोरील कड्यावर आदळून प्रतिध्वनीत घुमत येणाऱ्या हाका... या त्रयींचा एकाच स्थळी वेळी विचित्र संगम झालेला पाहून क्षणभर सारेच हबकतो...! शेखर ताम्हणकर थोडक्यात बचावला आहे... वाघजबड्यातील कड्याच्या माथी एका झाडाखाली उभे राहून हाकारणारे सोमनाथ समेळ नि विठ्ठल अवकीरकर इथून बोटाच्या पेराएवढाले दिसताहेत... वाटेच्या शेंडीपर्यंत गेलेला, प्रजापती तसाच मोठ्या मुष्किलीनं पाठमोराच मागं मागं सरकतो आहे... पायाखालची निमुळती वाट पुढच्या कड्याशी एकरूप झाली आहे... मार्ग खुंटला आहे... मागचे दोर तुटले आहेत... कडा माथ्यापासून पायथ्यापर्यंत एका सरळ दोरीत तुटला आहे... इथून दिलासा देणारी केवळ एकमेव मनाजोगी वाट शेदीडशे फूट खोलीवर आहे...! आमच्या डावीकडं एक दरड आहे. ती गवतानं मुळातच झाकली आहे. तिच्या माथी एक ठेंगणं ठुसकं झाड आहे. या झाडाचा आधार घेऊन दोरीच्या

सहाय्यानं ती उतरणं आता या क्षणी क्रमप्राप्त आहे. दुसरा तरणोपाय नाही.

मजसवे आलेले माझे डोंगर भाऊ निगीच्या आसपासचे आहेत. सारेच तरुण! उमद्या मनाचे - तरुण रक्ताचे - नाना अडचणी पार केलेले - अनेक डोंगर ओलांडून आलेले...! वासरात लंगडी गाय शहाणी... असा मी एकमेव चाळीशी ओलांडलेला..! गिर्यारोहणाचं एकही साधन न वापरता स्वच्छंदी वृत्तीनं मनमोकळं मनमुराद हिंडावं.. या माझ्या मताला इथं मात्र मुरड घालावी लागली. दोरीला धरून ही काटकोनी दर उतरताना हिमालयाचं पाणी जोखलेल्या या माझ्या संघीसाथींनी माझं पाणी मात्र क्षणार्धात जोखलं!

आम्हासवे असलेल्या या कुत्र्यानं आमचं हे जगावेगळं उतरण्याचं तंत्र पाहिलं नि ते कसब वापरून नखाग्रांच्या सहाय्याने कातळाचा आधार घेत नि जबड्यात गवताचे झुबके पकडून सरपटत ती दीडशे फुटी दरड उतरताना - त्या सामान्य मूक जनावराचं ते असामान्य कर्तृत्व पाहून आम्ही सारेच विस्मयानं थक्क होऊन गेलो.

उन्हाच्या कडाक्यातून... सर्वांगावर छानपैकी ओरखडे काढणाऱ्या करवंदी जाळीच्या जंजाळातून... वाट अडविलेल्या खाजकुयलीच्या पांढुरक्या शेंगांना चकवीत पाण्याअभावी व्याकुळलेले आम्ही आठजण कसेबसे साडेचारच्या सुमारास वाघदरवाजाखाली येऊन थडकतो.

सारेच थकलो आहोत. सर्वांचाच अवतार बघण्याजोगा आहे. सारेच भुईसपाट झालो आहोत. तहानभूकेची व्याकुळता अवघ्यांच्या चेहऱ्यावर एकवटली आहे. त्यावरील करवंदी ओरखडे शोभून दिसताहेत. सकाळी मशीदमोर्चापाशी पाहिलेला रुबाब नि तरतरी आता या क्षणी शंभर टक्के विरघळून गेली आहे. हंटरशूजचे तळवे दुभंगले आहेत. काहींच्या किंमती विजारी नको त्या जागी टरकल्या आहेत. सदऱ्यांची लक्तरं झाली आहेत... खाज हा प्रकार किती भयंकर असतो त्याचा प्रत्येक जण स्वानुभव घेतो आहे नि मी-मी अनवाणीच चालत आल्यामुळं रक्ताळून सुजलेल्या तळपायांचं काही खरं नाही...!

वरच्या कोंडेखळीच्या बेचकात उभा असलेला वाघदरवाजा नि त्याच्या बाजूच्या लवणातून खाली उडी घेणारा दोनशे फुटी पाणलोट...! पाणढाळीनं कातळ फोडलेला.. बखखळ दगडधोंडींनी अवघा ओढा खडबडलेला... नि या ओढ्याच्या एका खड्ड्यात एक अप्रुप दडलेलं...! आतल्या रेताडीत रुतून बसलेला एक गोल गरगरीत दगड दिसताच

सारेच धावलो... पाहतो तो काय? आठ इंच व्यासाचा नि अदमासे पंचवीस किलो वजनाचा एक भरीव पोलादी तोफगोळा...!

मी सर्वांस म्हटलं- "मित्रहो...! ते समोर दिसतंय् ना- ते काळकाईच्या डोंगरातले पोटल्याचे टोक...! १८१८ साली कर्नल प्रॉथरनं मोठ्या हिंमतीनं नि कौशल्यानं त्या पोटल्याच्या डोंगरी तोफा चढवल्या नि तिथून त्या रायगडावर डागल्या... त्या तोफांचाच हा एक गोळा असणार... आपणास केवढा मोठा ऐतिहासिक ऐवज सापडला पाहा... या गोळ्याच्या प्राप्तीनं आपल्या प्रदक्षिणेचं सार्थकच झाल्यासारखं आहे."

वाघजबड्यातून हिरकणीला वळसा घालून सूर्यास्तानंतर तब्बल अकरा तासांनी आम्ही हिरा गौळणीच्या खोपटापाशी येऊन थांबताच लगबगीनं ताकाचा डेरा घेऊन बाहेर आलेल्या त्या माऊलीनं आम्हा साऱ्यांचेच तोंडभरून कौतुक केलं... नि ताकाचं मडकं पुढ्यात ठेवलं...!

एकेक पायरी चढताना मनी येत होतं... चहूअंगी ताठ मानेनं उभ्या असलेल्या किल्ले रायगडाच्या उत्ताल कड्यांच्या ऐन गर्भातून ही दुर्गम प्रदक्षिणा घालणं ही कल्पनाच मोठी अभिनव नि रोमहर्षक खरी...! पण शेवटी एवढ्या जीवघेण्या साहसांचा उद्देश्य काय...? यामुळं फलप्राप्ती काय...? हा सर्वसामान्य जनमानसी नेहमीच पुसला जाणारा प्रश्न शेवटी उरतोच...! त्याचं सरळ, सोपं नि साधं उत्तर फक्त एकच...! 'सह्याद्रीच्या विविध शक्तींचे पूजन, चिंतन, ध्यान व आराधना केल्यानं फलप्राप्ती होतेच होते हे अगदी निर्विवाद...! शरीर कणखर होते... कणा ताठ होतो... छाती रुंदावते... मन प्रसन्न होते... चित्त शुद्ध होते... दृष्टीक्षेत्र विस्तारते... आकांक्षा उंचावतात... शौर्य धैर्य प्राप्त होते... निष्ठा दृढ होते... कर्तव्य प्रखर होते... श्रमशक्ती वृद्धिंगत होते... प्रतिकारशक्ती प्रज्वलित होते... दारिद्र्याची कदर नि संकटांची डर नष्ट होते... स्वार्थत्यागाची नि अंगीकृत कार्यावर लक्ष केंद्रित करण्याची प्रेरणा होते... थोडक्यात- या व्रतामुळं अंगी मराठी बाणा येतो... आणि हा ज्याच्या अंगी असेल त्याच्याजवळ नाही असं जगात काय आहे?'

'मार्मिक' १२/४/१९८७



छाया - बाळ नामजोशी

रायगडचा दक्षिणकडा. उंची २००० फूट. दोन उंचवट्यांच्या बेचक्यात दिसतोय तो वाघ- दरवाजा. कड्याच्या मधोमध आडवी पांढरी रेषा दिसतेय तोच प्रदक्षिणा मार्ग.

रायगड प्रदक्षिणेत गुंतलेले प्रजापती बोधणे, तुकाराम जाधव, विश्वास ताम्हणकर, राजन रणदिवे.

वीस किलो वजनाचा आठ इंची पोलादी गोळा बहुधा तोफगोळा.

● ○ ●

# १८ पावनयात्रा पावनखिंडीची...!



'बाजीप्रभूंची समाधी'

छाया - सुरेश परांजपे

गुरुवार दिनांक बारा जुलै सोळाशे साठ...! आषाढ पौर्णिमेची रात्र...! रात्रीचा पहिला प्रहर...!

चहूअंगी काळ्याकभिन्न काळोखाचं साम्राज्य...! मुसळधार पावसाचं राक्षसी थैमान...! भन्नाट वादळीवाऱ्याचा जीवघेणा हैदोस...! कडाडणारे तळपत्या वीजांचे आसूड... गडाडणारी गगनभेदी मेघगर्जना...! नि त्यातच डोंगरमाथ्यावरून कोसळणाऱ्या जलप्रपातांचा दऱ्याखोरी घुमविणारा धीरगंभीर ध्वनी...!

असं हे एकूण निसर्गाचं रौद्रभयाण तांडव...! पुढं होणाऱ्या महाप्रलयाची ही जणू नांदीच...!

तरीही अशा या शुभमंगल घटिकेला गनिमांवर गनिमीकाव्याची मोहिनी घालून, करवीर प्रांतीच्या पर्णालदुर्गाभवती पसरलेल्या चिरेबंदी

चक्रव्यूहाचा भेद करून, अस्मानी सुलतानढव्याशी कमालीची झुंज देत नि मोजक्या सहाशे नागव्या समशेरीनिशी ओला गड्डद अंधार पोखरीत महाराष्ट्राचं सौभाग्य ज्या वाटेनं विशाळगडी कूच झालं त्या वाटेचा मागोवा घेण्यासाठी निघालेले आम्ही दोघेच दुपारी बारा वाजता पन्हाळ्यावर गुळवणी गुरूजींच्या घरी थडकलो.

अतिथ्यशील असलेल्या या इतिहास संशोधकाशी अर्धाअधिक तास मार्गदर्शनपर बातचीत झाल्यावर उठता उठता ते म्हणाले, "माझ्या हयातीत आजतागायत या वाटेनं जाणाऱ्या संघसंख्येत तुम्ही पंचाहत्तरावे नि संख्याबळाने पहिलेच आहात म्हणून सांगतो, जाताच आहात तर गडावरचा थोडकासा वारा पिऊन निघा म्हणजे मनी कुठलंही भय उरणार नाही... !"

## सज्जाकोठीचा वारा

आशीर्वाद घेऊन बाहेर पडलो नि मनी म्हटलं, "जर वारा पिऊनच निघायचं आहे तर मग तो सज्जाकोठीत उभं राहून का पिऊ नये... ? महाराजांच्या वास्तव्यानं पावन झालेल्या या वास्तूचा स्पर्श नि गंध विशाळगडापर्यंतच काय पण आयुष्याच्या अंतापर्यंत अखंड साथ देईल यात तीळमात्र शंका नाही... !"

सज्जाकोठीला मुजरा करून दुपारी एक वाजता पुसाटी बुरूजाच्या अलिकडून उतरणाऱ्या दुर्गम वाटेनं उतरू लागलो... !

दिवस पावसाचे असले तरी या घडीला तो अजिबात बरसत नव्हता. मात्र काल कोसळलेल्या धुंवाधार पावसानं पायाखालची मूरमाती चिकचिकीत झालेली नि दगडधोंडे गळगळीत झालेले... ! मनीची मरगळ झटकणारी भवतीची वनश्री. हिरवीगार दिसत असली तरी वातावरण कुंद असलेले... ! वर कृष्णवर्णी मेघांची एकच दाटी झालेली... ! या घटकेला गरजेल तोच बरसेल या एकाच चिंतेनं चालण्याचा झपाटा वाढविला पाहिजे. चिखलाची रबडी होण्याआधी निदान मसाईचं पठार तरी गाठलं पाहिजे.

गडाखालची तुरूकवाडी ओलांडून समोरचं टेपाड चढतो नि महाळुंगे मागं टाकून झपाझप पावलं टाकीत मसाईचं पठार जवळ करू लागतो.

## मसाईचं पठार

मसाईच्या पठाराचं एक अप्रूप आहे. चारपाच कि.मी. लांबीरुंदीचं हे पठार तांबूस जांभ्या दगडाचं बनलेलं आहे. छिन्नी लावून तासल्यागत चांगलं मोकळंचाकळं... ! त्यावर अधून मधून खुरट्या हिरव्यागार गवताचे

ऐसपैस गालिचे पसरलेले...! त्यावर पांढुरक्या रानफुलांचे ठिपके शिंपडलेले...! त्यावर विरल झिरझिरीत धुक्याचं महावस्त्र बांधलेले...! नि त्यावर उनपावसाचा मजेदार पाठशिवणीचा खेळ रंगलेला...! या रंगेल नि रंगेल खेळाचा विस्फोट करणारा अवखळ खट्याळ वारा...! वारं भरल्यागत चौखूर उधळणारी गुरंढोरं नि हुंदडणारी पोरंटोरं...! हे असं अद्भुत दृष्य डोळेभरी न्याहाळीत पठाराच्या पश्चिम धारेवर केव्हा उभे राहिलो हे ध्यानीच आलं नाही.

आम्हाला पाहताच धनगरांची पोरंटोरं आम्हाभवती जमा झाली. कुतुहलानं पाहू लागली. कायबाय विचारू लागली. प्रत्येकाच्या हातावर एकेक लाडू टेकीत सहज कुतुहल म्हणून विचारलं.

"काय रे मुलांनो! या रानात वाघरू बिघरू येतं का कधीमधी?"

"व्हय तर! रोजच्याला येल्ती!"

"केव्हा आलं होतं?"

"काल सांच्याला आल्ती नि योक वासरू न्येल्ती!"

"कुठं आलं होतं?"

"त्यो समूर भुंडा डोंगुर दिसती न्हवं... तिथून आल्ती नि ग्येल्ती...!" काळजात धस्स झालं! म्हटलं - "अरे! आम्हाला तिथूनच तर जायचंय!"

"तुमी जावा! घाबरू नगा! दिवसाउजेडी भय नाय!" वाघाच्या छाव्यांनी निर्भय सल्ला दिला.

## सावधगिरीने वाटचाल

हाती नागवी गुप्ती धरून, भिरभिरत्या नजरेनं, धास्तावत, सावधगिरीनं पण भराभर उतरू लागलो.

दुपारचे चार वाजून गेले आहेत. दिसाउजेडी मसाईच्या पायथ्याशी असलेल्या कुंभारवाडीतून पुढची चाफेवाडी गाठणं मुक्कामाच्या दृष्टीनं सोयीचं होईल असं गुळवणी म्हणाले होते. चाफेवाडीत पोचलो तेव्हा कळलं की इथून पुढं मोंडलाईवाडी नि तिथून एका हाकेवर वसलेल्या करपेवाडीत वस्ती करणं साऱ्याच बाबतीत सुखसोयीचं होईल.

वाडीच्या माळावरच अप्पा बहिरू कोळपटे नावाचा धनगर भेटला. आग्रहानं घरी घेऊन गेला नि म्हणाला- "म्हाराज ज्या व्हाटेनं इशाळगडावर ग्येल्ती त्या व्हाटेनं तुमी जाताव जनु...! तर मग, आजची रात हथं ऱ्हावा, घासघास भाकरतुकडा खावा नि सकाली कोपकोप गुळाची कोरी चाय पिऊन शान जावा...!"

अप्पाच्या पडवीत ओल्याचं सुकं केलं. आदरानं आंथरलेल्या

घोंगडीवर बसून घासघास खाऊन घेतलं नि घोंगडीवरच आडवे झालो.

माझा सोबती सदानंद आगाशे पडल्या पडल्या घोरू लागला. त्यामुळं मला मात्र काही केल्या झोप येईना! उठलो, हाती विजेरी घेऊन अंगणात आलो. पागोळ्यांच्या आत भिंतीला टेकून उभा राहिलो.

ठप्प झालेला वारा... चिडीचीप मिट्ट काळोख. .! झिमझिम पाऊस...! झाडावळींच्या पर्णावळींवर टपटपणारी थेंबावली...! हिरव्यागर्द ओल्या झाडावळीत चमचमणारी काजव्यांची रोषणाई...! रातकिड्यांचा कर्णकर्कश आवाज...! घुबडाचं घुत्कारणं...! कुत्र्याचं भुत्कारणं...! नि डोंगरमाथ्यावरून खळखळणाऱ्या खळाळांचा खळखळाट...! असं हे मिश्रसंमिश्र ध्वनीप्रतिध्वनींनी भरलेलं भयाण वातावरण...! मनी म्हटलं, असल्या या मिट्ट काळोखातून ती सहाशे धारकऱ्यांची दिंडी धावली असेल, केवळ श्रद्धेच्या बळावर...! कुठून धावली असेल...? कशी धावली असेल...? कवी भूषण म्हणतो- "हे शिवराय! तुझे मावळे इतके दक्ष आहेत की श्रावण भाद्रपदातील अवसेच्या काळ्याकुट्ट अंधाऱ्या रात्री देखील दुर्गम किल्ले आडवाटेनं चढून जातात. मी जेव्हा या गोष्टीचा विचार केला तेव्हा मला प्रतीत झाले की, हे तुझे मावळे तुझ्या प्रतापसूर्याच्या प्रकाशामुळेच हे असलं धाडस करू शकतात...!"

## वाटाड्या हवाच

सकाळी सात वाजता अप्पाचा धाकला लेक आम्हांसवे पाटेवाडीपर्यंत येण्याचं कबूल करून तयारीस लागला. या दिवसात घरी रिकामटेकडा गडीमाणूस मिळणं जसं कर्मकठीण तसं अशा रानातून नेमकी वाहती वाट अचून शोधून काढणं त्याहूनही महाकठिण...! कुंभारवाडीपासून पांढरपाण्यापर्यंत डाव्या हातानं धावलेल्या डोंगररांगेच्या सोबतीने खालीवर न जाता सरळ चालत राहिलात तर वाटाड्याची गरज भासणार नाही असं गुळवणींनी सांगून ठेवलं होतं खरं...! पण काय असतं, या दिवसात वाटा बुजलेल्या असतात, माळरानातून धावलेल्या पाऊलवाटा मधेच कुठंतरी शेतवाडीत हरवलेल्या असतात. त्या नवख्या वाटसरूंना चक्रावून सोडतात. असल्या या असंख्य ढोरवाटांच्या गुंत्यातून नेमकी वाहती वाट शोधून काढण्याचं कसब इथल्या या वसाडगावच्या धनगरांना पुरेपूर ठाऊकी असतं.

चहूअंगी अंधारून आलं आहे...! आभाळ दाटून आलं आहे. ते अधून मधून हुंकारते आहे...! हुंदका केव्हा फुटेल याचा नेम नाही...! आभाळाकडे डोळे लावून चिंताग्रस्त चेहऱ्यानं काबाडकष्ट करणारे

भूमिपुत्र...! त्यांच्या कामाची ती टिप्परघाई...! वर्षभर घाम गाळणारी ही भूमीची लेकरं अन्नब्रह्मासाठी स्वेदगंगेच्या काठावर उभी असतात वाट पहात त्या दयाघनाची...! शेवटी तो दयाघन घन होऊन बरसतो...! आणि मग, धरती न्हातीधुती होते... तृप्तीचे सुप्त उसासे सोडते... कस्तुरीचा गंध उधळते... तिला मातृत्वाचे डोहाळे लागतात. लुसलुशीत हिरवी स्वप्ने पडतात... नि गर्भातून पाचूचे हिरवे प्राण डोलू लागतात...! त्यावर मोत्याचे पिवळेधमक सोने पिकते...! सोन्यातून मोती हसतात...! मोतियांचे दाणे होतात...! घामाचे मोती होतात...!

## आली पाटेवाडी

'जिथे भूमीचा पुत्र गाळील घाम! तिथे अन्न होऊनि ठाकेल श्याम...' असं हे गीत गुणगुणत होतो. त्याच तंद्रीत चालत होतो. इतक्यात 'दादानु! आली पाटेवाडी' हे शब्द कानी पडताच भानावर आलो नि अमृतराव खोतांच्या दारी उभे ठाकलो. खोत दारापाशी उकिडवे बसून तुकोबाचे अभंग वाचीत होते. रामराम शामशाम झालं. 'कोण गाव पावणं?' विचारणं झालं. आणि मग आमच्या येण्याचं प्रयोजन कळताच नव्वद वर्षांचा तो जख्खड म्हातारा ताडकन उठून उभा राहिला. वाटाड्या मिळेना म्हणून हळहळला. चार पावलं आम्हासवे चालत आला नि दूरवर गर्द रानावळीतून डोकावणाऱ्या कौलारू घरांकडे बोट दाखवित म्हणाला- 'तोऽऽ धनगरवाडा, निऽऽ उजव्या अंगास त्यापुढं तीऽऽ डोंगरधार दिसते ना तिथं म्हसवडं...! तिथं तुम्हास एकाददुसरा गडीमाणूस मिळेल नि तो पांढरपाण्यापर्यंत येईल.' गुबुगुबु नंदीबैलापरी माना डोलावल्या नि मुकाटपणं चालू लागलो.

पाटेवाडी ते पांढरपाणी हा पल्ला तसा अडीचतीन तासांचा...! दाटीवाटीच्या रानावनाचा...! वहिवाटीत नसलेल्या बिकट वाटेचा...! त्यातच चहूअंगी डोंगरदाटी...! भवती गर्द रानावळ...! त्यातून धावणारं धुकं...! वरून रिपरिप पावसाची संतत धार...! पायाखाली चिखलाची रबडी...! नेमकी वाट माहीत नाही. अनोळखी मुलूख. चुकून जरी आडरानात घुसलो तर भलतीकडेच भरकटत जाऊ ही भीती...! चिंतावलो आहोत. काही सुचेनासं झालं आहे. काय करावं ते कळेनासं झालं आहे.

## देवासारखे भेटलात!

पाटेवाडीच्या ओढ्यापाशी येऊन हातपाय धुतले. चुळा भरल्या. जवळ असलेलं किडूकमिडूक खाऊन घेतलं नि झुळझुळणारं पाणी ओंजळीनं

पित असता नशिबानं साथ दिली. समोरच्या झाडाझुडपातून नकळत बंडू पांडू सूर्यवंशी नावाचा उमदा गडी आम्हासमोर देवासारखा उभा राहिला. तो पांढरपाण्यापर्यंत यायला कबूल झाला. म्हणाला, "बाकीचे सर्वजण वीस रुपये घेतात. मी पण तेवढेच घेईन. मुलांची वह्यापुस्तकं घ्यायची आहेत. अगदी वेळेवर आलात. देवासारखे भेटलात.' शेवटच्या वाक्याला मनापासून दाद दिली मात्र-वीस हा फुगलेला आकडा ऐकून सदानंद आगाशे काहीबाही बोलण्याआधीच या व्यवहारात एका पैचीही घासाघीस न करता मी 'एकदम कबूल' असं पटकन बोलून त्यावर शिक्कामोर्तब करून टाकलं.

झिम्‌झिम् रेशीमधारा अंगावर झेलीत ही बिकट वाट चालतो आहोत. चालतो आहोत. कधी शेवाळं माखलेल्या बख्खळ दगडधोंडीतून तर कधी रबडी झालेल्या रबरबीत चिखलातून...! कधी निसरड्या टेपावरून तर कधी दुर्घट निसरणीवरून...! कधी काटेरी जाळ्यांच्या जंजाळातून तर कधी आडवळणाच्या आडरानातून... जागोजागी तुडुंब भरून दुथडी वाहणारे झरे, नाले नि ओढे ओलांडित...!

सकाळपासून वीसेक मैलांची वाट चालून आलो आहोत. अजून दहाबारा मैलाचा टापू तुडवावा लागणार आहे. पाठीवरच्या ओझ्यामुळं नि अंतर्बाह्य चिखल माखलेल्या बुटांमुळं गती मंदावली आहे. भिजलेल्या कपड्यांमुळं शरीर थंडावलं आहे. पाऊस उणावला आहे. प्रकाशून आलं आहे. समोरच्या डोंगरधारेवर वरून पिवळंधमक ऊन सांडत आहे. डोंगरमाथ्यावरून धुक्याच्या कर्पुरगौरी लाटा वाटा शोधत खाली झेपावत आहेत. अस्पष्ट दिसणारा निळसर हिरवा डोंगर हरवला आहे. अधून मधून धुक्यातून डोकावतो आहे. दृष्य तर मोठं विलोभनीय आहे. टिपून ठेवण्यासारखं आहे. असली ही निसर्गचित्रं पाहिली की मी वेडावून जातो. हरखतो. हरवतो. स्वत:ला विसरून जातो.

ही निसर्गशोभा दृष्टिआड होईतो सारखं वळून पहात होतो. चालता चालता या निसर्गकाव्याच्या सुखावळीत उरलेलं दोनेक मैल अंतर कापून शेवटी एकदाचं पांढरपाण्याशी येऊन पोचलो. अगदी ऐतिहासिक वास्तूजवळ येऊन थडकलो.

### इतिहासाची पाऊलवाट

'पांढरपाण्यापाशी झुंजास तोंड लागले' असं बखरीत वाचलेलं आठवलं. मनी म्हटलं - 'काय काय पाहिलं असेल या वाटेनं? याच वाटेनं इतिहास धावला...! याच वाटेनं गेली धारकऱ्यांची दिंडी...!

नागव्या समशेरी, तळपते भाले, नि पाठीवर ढाली बांधलेले पगडबंद, बाराबंदी, नि मांडचोळणा घातलेल्या सहाशे मावळ्यांसमवेत निघालेली महाराष्ट्राच्या दौलतीची नि मराठ्यांच्या दैवताची पालखी...! आणि-आणि शौर्य-धैर्य-चातुर्य याचा त्रिवेणी संगम पाहिला तोही याच वाटेनं...! खाली वाकलो. वाटेला स्पर्श केला. माती मस्तकी लावली. नि कच्च्या सडकेनं भराभर चालू लागलो.

धनगरवाड्यापुढं पायाखालची सडक सोडून उजव्या हाती आडवाटेनं पुढं गेलो नि नाकासमोरचं टेप उतरताच ...खिंड दिसली...! पावलं थबकली...! घोडखिंड...! पावनखिंड...! एका थरारक भावावेशात शिरलो... एका क्षणाची अनुभूती असेल, सर्वांगातून एक अनामिक संवेदना वीजेगत थरारून गेली...!

पाठपिशवी बाजूला भिरकावली नि धावतच खिंडीच्या तोंडाशी जाऊन उभा राहिलो. खोलावलेल्या वाटेनं मूळीचा आधार घेत वीसेक फूट तळात उतरलो नि बाजूच्या दरडीला टेकून उभा राहिलो. भिरभिर नजर सैरभैर निरखू लागली. मती गुंग झाली नि एकेक निकष लढू लागली.

आज शुक्रवार... दुपारी दोनचा सुमार... हाच तो दिवस... हीच ती वेळ...! महाराजांची पालखी खिंड ओलांडून पुढं गेली ती हीच का खिंड...? खदिरांगारासारखा उसळलेला नि सर्वांगी अंगार पेटलेला तो रणझुंजार योद्धा आपल्या छातीचा कोट करून खिंड अडवून उभा राहिला ती हीच का खिंड? विषारी अजगराच्या जबरदस्त विळख्यातून आपल्या पंचप्राणांची आहुती देऊन स्वराज्याचे प्राण वाचविले ती हीच का खिंड...? हिरडस मावळखोऱ्यातील गरीब मावळ्यांनी आपल्या रक्ताचा सडा शिंपून पावन केलेली ती हीच का खिंड...? तो रणझुंजार नेमका कुठं उभा असेल? त्यास वीरगती लाभली ती नेमकी जागा कोणती? असल्या असंख्य विचारांचं मनी मोहळ उठलेलं...!

## धारातीर्थ-तीर्थक्षेत्र

स्वातंत्र्याचा सूर्य प्रसन्न होण्यासाठी ज्यांनी धगधगत्या यज्ञकुंडात आपल्या सर्वस्वाचं हवन केलं... ज्यांनी आपल्या आसुदाचं अर्घ्य अर्पिलं... जे चंदनासारखे झिजले नि कापरासारखे जळून गेले... या शिवाला त्या शिवाचा अवतार मानून स्वराज्यप्राप्तीसाठी ज्यांनी स्वतःच्या रक्ताचा अभिषेक केला... नि प्राणांची बिल्वपत्रं वाहिली त्या नरवीरांच्या मालिकेतील एक अमोल रत्न या इथं झुंजता झुंजता धारातीर्थी पडलं... हे धारातीर्थ

आहे... हे तीर्थक्षेत्र आहे... चंद्रभागेतीरी भावभक्तीचे मळे फुलले... या इथं, स्वराज्याचा कल्पवृक्ष फुलण्यासाठी मराठ्यांनी आपले प्राण फुंकले...! शिवशाहीत प्रथमदर्शनी मृत्यू ओशाळला तो इथंच...! बाजीच्या निधड्या छातीची ढाल पाहून शरमेनं मान खाली घातली असेल इथल्या या काळ्याकभिन्न पत्थरानं नि इथल्या या पाषाणहृदयी कातळाच्या काळजातून कारुण्य पाझरलं असेल या कासारी नदीच्या रूपानं...! इथली मूठभर माती मस्तकी धरा. सर्वांगी रोमावली फुलेल ती बाजीच्या पावन स्मृतीची...! आज सव्वातीनशे वर्षे उलटली तरी अजूनही इथल्या लवलवत्या तृणपात्यांना धार दिसते दुधारी पात्याची नि इथल्या मातीतून सुगंध दरवळतो आहे बाजीच्या असीम त्यागाचा नि तिस रंग चढला आहे बाजीच्या इमानी रक्ताचा...! इथल्या खळाळणाऱ्या खळाळातून पोवाडा ऐकू येतो आहे बाजीच्या अतुल शौर्याचा नि इथल्या दऱ्याखोऱ्यातून वाहणाऱ्या वाऱ्यातून मंत्रघोष घुमतो आहे महाराष्ट्राच्या महामंत्राचा...!

**'कडाडणारा बोल खडा जो दरीदरीतुनी घुमघुमला!**
**उघडुनी माझ्या हृदय कवाडा तोच पवाडा दुमदुमला!**

या थरारक बेहोषीत गजापूरची घाटी उतरून सायंकाळी सहा वाजता विशाळगडाच्या पायथ्याशी पोचलो. गडाच्या पायऱ्या चढताना डाव्या बाजूच्या वाघदरीनं लक्ष वेधून घेतलं. दो बाजूस दोन उत्तुंग बेलागकडे नि मधोमध एखाद्या महाप्रचंड मगरीप्रमाणं आ वासून पहुडलेली ती रूद्रभयाण काळदरी...! या अरुंद चिंचोळ्या दरीतून घोंघावणारा वारा... खिदळणारा पाणलोट... नि साकळलेलं धुकं जेवढं भयप्रद तेवढंच किंबहुना त्यापेक्षाही जास्त भयप्रद खाली पसरलेलं निबिड अरण्य...! सूर्याचा कवडसाही तळापावेतो पोचणार नाही एवढं गच्च...! अस्वलाच्या केसाप्रमाणं घनदाट...! एकवेळ अस्वलाच्या केसात घुसलेली उ सापडेल पण या जंगलात हरवलेला हत्ती काही केल्या शोधून सापडायचा नाही असं म्हटलं तर ती अतिशयोक्ती होणार नाही. आज या विज्ञानयुगात हे जर असं दिसतं तर तीनचारशे वर्षांपूर्वी हे कसं दिसत असेल? त्यावेळी म्हणे, उडत्या पाखराच्या पंखावर शेवाळं उगवेल... एवढी पर्जन्यवृष्टी व्हायची.

## यवन भ्याले थकले

सह्याद्रीच्या या बेलाग बुलंद गिरिमंडळातून नि गच्चदच्च दुर्गम रानावनातून अष्टौप्रहर घोडदौड करणारी तात सह्याद्रीची लेकरं अगदी सहजपणे सराईतपणे वावरत असत. पण हा अनोळखी दुर्गम मुलुख

जिंकण्यासाठी प्रथमच येणाऱ्या यावनी सेनेचं काय झालं असेल? विशाळगड जिंकण्यासाठी इ.स. १४५० च्या सुमारास जेव्हा मलिकुत्तजार नावाचा मोगल सेनापती प्रचंड फौजफाटा घेऊन आला तेव्हा या मुलुखात त्याच्या सैन्याची झालेली वाताहत...! इतिहासकार फरिस्ता लिहितो -'इथल्या या वाकड्या तिकड्या घाटवाटांनी चढता उतरता नि या दुर्घट रानावनातून जातायेता मुसलमान सैन्य अगदी भिऊन नि थकून गेलं...!'

तिन्हीसांजेप्रहरी बाजीच्या समाधीपाशी उभा राहिलो. मनी म्हटलं, 'रे वीरा! आज तुझा तीनशेपंचवीसावा स्मृतीदिन...! सव्वातीनशे वर्षांपूर्वी गजापूरच्या 'घोडखिंडीत यावनी सेनेचा उन्मत्त लोंढा रोखलास नि अवघ्या महाराष्ट्राला आपल्या स्वामीनिष्ठेचा धडा शिकवलास...! स्वामींच्या चरणी आपली सेवा रूजू केलीस नि शेवटी या इथं येऊन कायमची चिरनिद्रा घेतलीस...! महाराष्ट्राचं सौभाग्य आपल्या पंचप्राणांच्या ओंजळीत घेऊन ज्या आडवाटेनं तू धावलास त्या अडगळ वाटेनं केवळ तुझ्या स्मृतीच्या बळावर पंचेचाळीस मैलाचा टापू अवघ्या पंधरा तासात पायी आलेल्या आम्हा दोन शिलेदारांचा तुला त्रिवार मुजरा...!

भवती काळ्याकभिन्न काळोखाचा पसरत चाललेला अभेद्य वेढा नि त्यातून उसळणारा धुक्याचा शुभ्रधवल भंडारा पाहून विषण्ण मनानं भोसल्यांच्या निवासस्थानी परतलो. त्या माउलीनं मराठमोळ्या पद्धतीनं शिजवलेलं घास घास खाल्लं नि भुईवर लवंडतो न लवंडतो तोच बाहेर धारांची टिपरी तडतडली... ढगांची संबळ कडकडली... नि एकच गगनभेदी गोंधळ सुरू झाला... चौखूर उधळणाऱ्या अवखळ खट्याळ वाऱ्याशी मैतरकी जोडून महामूर पाऊस रातभर अवघं रान दरादरा झोडपून काढीत होता...!

रातभर जागाच होतो. इतकी वर्षे उरीपोटी कवटाळून धरलेलं स्वप्न आज साकार झालं तरी सकाळच्या साखरझोपेत पावनखिंडीची पावन स्वप्ने पडतच होती...!

'मार्मिक' - २७ जुलै १९८६

● ○ ●

संग्रहालय ... प्रास ... ७४६

# १९ सती गोदावरी



गोदावरीची समाधी (वृंदावन)

छाया - बाळ राऊळ

*- आणि मग गोदावरीनं शिक्षा फर्मावली. जबर शिक्षा. आजतागायत जगाच्या इतिहासात कुणीही कुणाला दिली नसेल अशी शिक्षा. तोफेच्या तोंडी देणाऱ्या, हत्तीच्या पायी घालणाऱ्या, हात-पाय कलमणाऱ्या नि कडेलोट करणाऱ्या शिक्षेपेक्षाही जबर शिक्षा. कोणती असेल ती शिक्षा? जी ऐकताच महाराजांच्या मनात थरार उठला. त्यांच्या सर्वांगातून एक अनामिक संवेदना विजेगत थरारून गेली... सारी आमतमाम न्यायसभा थरारली. इतिहासकाळातील तो प्रसंग त्या काळाला अनुरूप अशा भाषेत कथन केल्याने आजच्या वाचकांच्या डोळ्यांसमोरही साक्षात उभा राहतो.*

श्रावणी सोनहळदीचे दिवस... पाचूचा मखमली साज ल्यालेली सृष्टी... पावसावळ उणावलेली... गर्द गहिरी झाडावळ दुणावलेली...

धूसर भवताल... कुंद वातावरण... नि गहिवरून आलेल्या आकाशाच्या घुमटातून खाली अलगद भिरभिरणारं झिमझिम भुसं...! अशा या शुभमंगलसमयी असाच एकवार रायगड चढत होतो. मजसवे होते पाचाडचे तुकाराम शेडगे...! या दिवसात गडावर येण्याचं प्रयोजन तसं वेगळं नि तितकंच महत्त्वाचं होतं. इथून सरळ नजरेसमोर दिसणाऱ्या टकमक टोकावर उभं राहून सहा ऋतूंचे सहा अनुपम्य सुखसोहळे मी अनेकवार डोळेभरी न्याहळले होते... पण पाऊस उणावता उणावता तिथून दिसणारं सृष्टीचं पोपटी लावण्य मोठं मनोवेधक असतं... या दिवसात ऊनपावसाच्या मनहारी लपंडावात हरखून-साजशिनगार करून रूपगर्वितेपरी दिसणारी भवतीची लाजरीबावरी सृष्टी या दृष्टीनं हळुवारपणं अलगद टिपून घेण्यात एक अनोखा आनंद असतो... असं एकवार मध्यंतरी शेडगे बोलून गेले होते... नि आता याक्षणी त्याच विषयावर बोलत गडाच्या अवघड पायऱ्या चढत होतो.

## नकळत पावलं थबकली

खूबलढा बुरूजापाशी आलो नि बोलता-बोलता मधेच अचानक नकळत पावलं थबकली.. पावलं थबकली एका अनामिक सुरावटीनं... त्या सुरावटीसवे ते दृश्य सामोरं साकार होताच सर्वांगी रोमावळी फुलली...! दृश्य तर मोठं नामांकित आहे... विलोभनीय आहे... नजरेच्या ओंजळीनं भरभरून पिण्याजोगं आहे... डोळियांच्या शिंपल्यात साठवून ठेवण्याजोगं आहे...!

खालच्या काळ नदीच्या खोऱ्यातून उसळलेला शुभ्रधवल धुक्याचा एक महाप्रचंड लोट छत्रीनिजामपूरमार्गे हिरव्याकंच रानशिवारातून, पाझरणाऱ्या कडेकपारीवरून नि खळाळणाऱ्या खळाळांवरून सुलतानढव्यागत घोंघावत आक्रमक पावलांनी वाडीच्या दिशेनं झेपावत होता...! हिरवाकंच शालू परिधान केलेली रायगडवाडी... तीवर पसरलेलं हळदीचं कोवळं उन... नि त्यावर वरून झिमझिमणाऱ्या हलक्याफुलक्या रेशीमधारांचा हलकासा शिडकावा...! पाचूच्या रत्नमयी हिरवेपणावर झिमझिममिश्रित कोवळ्या हळदीच्या नाजुक उन्हाची सोनेरी तकाकी अधिकच खुलून दिसत होती...!

आणि-आणि मग थोड्याच वेळात ती महाकाय शरीराची भली मोठी अजस्त्र लाट एखाद्या खडकावर धाडकन् आदळून फुटावी तशी फुटली नि पिंजारलेल्या कापसागत अवघ्या वाडीभर पसरली...! त्या कर्पुरगौर धुक्याच्या झिरझिरीत मुलायम आवरणातून हळुवारपणं डोकावणारी वाडी नि वाडीच्या वरील अंगी एका मोकळ्याचाकळ्या दरडीवजा जागेवर

अस्पष्ट दिसणारी सती गोदावरीची समाधी एखाद्या नववधूप्रमाणं भासली...!

## दर्दभरी कहाणी

सती गोदावरी...! गोदावरी म्हणजे, शुद्ध प्रेमासाठी केलेल्या एका जगावेगळ्या आत्मसमर्पणाची एक दर्दभरी कहाणी...! छत्रपती शंभूराजे यांच्या सैल वर्तनाची एक कथा... या द्वयीची एक मुलखावेगळी प्रेमगाथा...!

ही एक लोककथा...! तशी ती अगदीच नवीन नाही. तीन शतकांपूर्वी घडलेली...! गेली तीनशे वर्षे रायगडच्या परिसरात प्रचलित असलेली...! काळगंगेच्या खोऱ्यानं पाहिलेली ही घटना पुढं लोकगंगेच्या रूपानं सर्वतोमुखी झाली. कर्णोपकर्णी पसरली...! आजही ती रानीमनी प्रवाही आहे... जनमानसी जिवंत आहे... शुद्ध प्रेमाचे पोवाडे गाते आहे...! ही लोककथा एका जीर्ण वास्तूलाच बिलगलेली... ती जीर्ण वास्तू म्हणजेच रायगडवाडीत असलेली सती गोदावरीची पाषाणसमाधी...! हे सतीचं वृंदावन म्हणजे पाचाड मुक्कामी असलेल्या राजमाता जिजाऊसाहेबांच्या वृंदावनाची छोटीशी प्रतिकृतीच...!

प्रत्यक्षात काहीना काहीतरी घडल्याखेरीज तशी लोककथाही जन्माला येत नसते. फार वर्षांपासून लोकवाणीच्या अखंड प्रवाहासवे संथ गतीनं वाहात आलेली एखादी लोककथा लोकसाहित्यात अजरामर ठरते... तद्वत ही लोककथा म्हणजे लोकमानस मंदिराच्या सुगंधी स्मरण गाभाऱ्यातील चंदनी देव्हाऱ्यात लोकस्मृतीनं बांधलेलं एक शब्दवृंदावनच...! शतकानुशतकं सर्वनाशी संहारक काळाच्या ओघात जनमानसीच्या श्रद्धासमजुतींनी जीवापाड जपून ठेवलेली ही एक अक्षरस्मृतीच...!

रायगडाच्या इतिहासाशी निगडित असलेल्या तशा पुष्कळशा लोककथा आहेत. एका पौर्णिमेच्या मध्यरात्री उत्तुंग कडा उतरणाऱ्या हिरकणीची कथा... उत्ताल भवानीकडा चढून गेलेल्या डोंबाऱ्याची कथा... टकमकावरून छत्रीसवे उडालेल्या एका मावळ्याची कथा... टकमकाच्या पायी बांधलेल्या रायनाकसमाधीची कथा... नि शिवरायांच्या चितेत उडी घेणाऱ्या वाघ्या कुत्र्याची कथा...! अशा कितीतरी लहानमोठ्या लोककथा आजही रायगड खोऱ्यात रूढ आहेत. तस्संच हे गोदाख्यानदेखील...! हे गोदाख्यान, महाद्वाराच्या एका पायठणीवर बसून तुकाराम शेडग्यांनी त्यांच्या रायरीच्या रायवळी गावरान बोलीभाषेत मला सांगितलं... कानी जीव एकवटून ते मी ऐकलं... अंतर्मनात ते जसंच्या तसं साठवलं... त्यावर मनन केलं... चिंतन केलं... नि तदनंतर त्याचं मंथन करून जसं दिसलं तसं लिहिलं...!

महाराजांच्या मंत्रिमंडळातील अण्णाजी दत्तो यांच्या नात्यातील गोदावरी ही एक विवाहित तरुणी...! आत्तासारख्याच पूर्वीदेखील सणासुदीला लेकी-सुना माहेरी यायच्या... आठ-पंधरा दिस सुखासमाधानानं राहायच्या नि शेवटी पाणावलेल्या डोळ्यांनी जडपावली सासरी निघून जायच्या...! अशाच एका होलिकोत्सवाला गोदावरी माहेरपणाला रायगडी आली...!

**लक्ष गेलं, मन जडलं.**

मुळातच आमचे शंभूराजे बेगुमान नि बेलगाम... तसे ते देखणे.. तरुण... सुविद्य नि धाडसी...! तशी गोदावरीदेखील केतकगौर कांतीची... नाकीडोळी नक्षत्रापरी देखणी... तरुण.. सुविद्य... नि तसं पाहिलं तर एका अर्थी धाडसीदेखील...! समवयी, समगुणी दोन तरुण मने जवळ आली आणि-आणि तिजवर शंभूराजांचं लक्ष गेलं... ते लक्ष्य बनलं... नि मन जडलं...! सादाला प्रतिसाद मिळताच त्यांनी एक दिवस तीस गुमान पळविले नि एका अज्ञात स्थळी नेऊन ठेवून दिले...! ठेवून दिले, ते देखील मर्यादा राखून... मोठ्या अदबीनं... जुलूमजबरीनं नव्हे...!

शिवराज्य म्हणजे रामराज्य... स्त्री प्रतिष्ठेला पूजनीय मानणारं... तिचा मानमरातब राखणारं... तिच्या अब्रूचं रक्षण करणारं... तिला मातेसमान लेखणारं...! स्त्री ही मराठ्यांच्या देव्हाऱ्यातील देवता... ती इथं निर्भय होती... बिनघोर होती... मग ती कुठल्याही जातीधर्माची असो... तिच्या चारित्र्याला लागणारा कलंक राजांना खपत नसे...! एका स्त्रीच्या प्रतिष्ठेकरिता सोन्याची लंका भस्मसात झाली... चौदा-चौकड्यांची दौलत गारद झाली...! एका स्त्रीची भरसभेत निरी ओढली गेली म्हणून अठरा अक्षौहिणी सैन्याचा रणयज्ञ झाला... त्या यज्ञात पिढ्यानूपिढ्यांची आहुती पडली...! हा गतेतिहास राजियांस पुरेपूर ठाऊकी होता...!

तकलादू त्यागाचा सुतकी मुखवटा पांघरणारे... अहर्निश सत्याचा डांगोरा पिटवून सत्तेच्या बळावर, स्वार्थापायी स्वतःची तुंबडी भरण्यासाठी न्यायअन्यायाचे सोयीस्कर अर्थ लावणारे- महाराज म्हणजे कुणी, कुटिल नीतीचे कपटी, पाताळयंत्री, निर्दयी, जुलमी, बेशरम नि ढोंगी सत्ताधीश नव्हते...! तो एक लोकाभिमुख लोककल्याण जाणता राजा होता...! श्रीमंत योगी होता... खऱ्या अर्थानं जगाचा उपभोगशून्य स्वामी होता...!

**राजाला रक्ताची नाती नसतात.**

बदफैली वर्तन केलेल्या दुराचारी शंभूराजांची ही खबर महाराजांच्या कानी पडली मात्र...! पित्याच्या जिव्हाळ्याने रावणशाही गुन्हा करणाऱ्या आपल्या मुलाला पाठीशी घालावं की न्यायनिष्ठुरतेनं त्यास जबर शासन

करावं हे वैचारिक द्वंद्वदेखील त्याक्षणी त्यांच्या मनी शिवलं नाही... महाराज-शंभूराजांच्या वयाचे असताना, वयाच्या सोळाव्या वर्षी रांझ्याच्या पाटलाला कठोर शासन करणारा हा नरशार्दूल नखशिखांत खदिरांगारासारिखा भडकला नि बेमुलाहिजा शंभूराजांना कठोर शिक्षा व्हावी म्हणून त्यांनी त्वरित न्यायसभा बोलावली...! राजांना रक्ताची नाती नसतात... न्यायदेवतेला साक्ष ठेवून राजआसंदी चढतानाच त्यांना ती मोहोरबंद करून ठेवावी लागतात...!

- तक्रार गंभीर आहे... कसूर जबर आहे...! न्यायाधीश प्रल्हादपंतांनी आरोपपत्र दरबारी पेश केलं... सुनावणी झाली... गुन्ह्याची रीतसर चौकशी झाली... गुन्हा शाबीत झाला...!

महाराज, शंभूराजांस कोणती शिक्षा फर्मावताहेत याकडं अवघ्या न्यायसभेचं लक्ष केंद्रित झालं... साऱ्यांचे जीव कानी एकवट झाले... उभा दरबार तीरकामठ्याची कमान ताणली जावी तसा ताणावर पडला...!

## विस्मयकारक न्यायदान

कुणाच्याही ध्यानीमनीस्वप्नी नसताना एक अभिनव नि विस्मयकारक न्यायदानाचं व्रत याप्रसंगी महाराजांच्या मनी संकल्पित झालं... त्यांनी त्वरित, - 'या अक्षम्य अपराधाबद्दल तुम्हास काय शिक्षा करावी...' असं शंभूराजास विचारलं... शंभूराजे भयकातर झाले... खाली मान घालून उभे राहिले...! राजांनी नंतर गोदावरीस म्हटलं- 'मुली! शंभूराजे अक्षम्य अपराधी ठरलेत... त्यांच्या या गैरवर्तनाबद्दल तू सांगशील ती शिक्षा त्यास दिली जाईल...!' महाराजांचा न्यायदानाचा हा विस्मयकारक निर्णय ऐकून अवघी राजसभा डोळे विस्फारून अवाक् झाली...!

अधोमुख गोदावरीनं आपला उजवा हात भाळी स्पर्शून मनोमनी मुजरा केला नि किंचित मस्तक उंचावून ती मोठ्या धीरोदात्तपणं म्हणाली- 'महाराज! तशीच जर आपली इच्छा असेल तर... तर तसं मला अभयवचन द्यावं... मी जे काही सांगेन ते ऐकून घ्यावं... नि-नि मी दिलेलं शासन त्वरित अमलात आणावं...' महाराजांनी त्वरित हाताचा गुलाबी पंजा उंचावून ते मान्य केलं...!

## कालत्रयी न बदलणारी प्रतिज्ञा

गोदावरी काय सांगतेय्... कोणती शिक्षा फर्मावतेय्... याकडं पुनश्च अवघ्या न्यायसभेचं लक्ष केंद्रित झालं... एका विस्मयकारक गूढतेनं नि भयकंपित वातावरणानं उभा दरबार थरारला...!

-'महाराज! क्षमा असावी...! लहान तोंडी मोठा घास घेतेय्...

माफी असावी...!' गोदावरी निर्भयपणं धाड्धाड् बोलू लागली... आमसभा अवाक् होऊन पाहू लागली... गोदावरीच्या मुखानं डोळस न्यायदेवता निर्भीडपणं वाहू लागली...!

-'महाराज! मोहात पडणं हा गुन्हा नव्हे - त्या मोहाला बळी पडणं हा गुन्हा ठरतो... परस्त्रीचं केवळ अपहरण करणं हाच जर गुन्हा ठरत असेल तर कल्याणच्या सुभेदाराच्या रूपवती सुनेचं अपहरण करून आपणासमोर तीस उभे करणारे आबाजी सोनदेव हेदेखील तसं पाहता अपराधीच ठरतात... त्यांची शिक्षा न्यायालयाकडून टळली पण नियतीकडून ती त्यास भोगावीच लागली... आंधळ्या न्यायदेवतेच्या साक्षीनं आपण त्यांची निर्दोष मुक्तता केलीत नि समोर अधोमुख भयकातर उभ्या असलेल्या त्या साध्वीला मातृतुल्य मानलीत... तिला अभय दिलंत... तिची पूसतास केलीत... खणानारळानं तिची ओटी भरलीत नि मोठ्या इतमामानं खाशा स्वारांच्या बंदोबस्ती तिची तिच्या स्वगृही पाठवणी केलीत...! तद्वत माझं व्हावं अशी माझी इच्छा आहे... तशी श्रीचरणी अर्जी आहे... मी 'स्वगृही' जाणार आहे... मी सवाष्ण. एक ठाम निर्णय घेतला आहे... एक दृढ निर्धार केला आहे... मनी वसलेल्या अधिष्ठाती जगदंबेला साक्ष ठेवून मी एक भीष्मप्रतिज्ञा घेतली आहे... तीत कालत्रयी बदल होणे नाही... निर्धार तसूभरही ढळणे नाही...! निश्चियी तोल जाणे नाही...! महाराज! राजे-राजे शंभूराजांना शिक्षा एकच... मात्र-मात्र आपण त्या शिक्षेची भिक्षा माझ्या पदरी टाकावी. तशी माझी इच्छा आहे... ही इच्छा शिक्षा म्हणा हवी तर... ती त्यास द्या...! खरंच सांगते महाराज- मी साताजन्माची ऋणी राहीन आपली...!'

आणि-आणि मग गोदावरीनं शिक्षा फर्मावली...! जबर शिक्षा... आजतागायत जगाच्या इतिहासात कुणीही कुणाला दिली नसेल अशी शिक्षा...! तोफेच्या तोंडी देणाऱ्या-हत्तीच्या पायी घालणाऱ्या -हातपाय कलमणाऱ्या नि कडेलोट करणाऱ्या शिक्षेपेक्षाही जबर शिक्षा...! मरण नव्हे; पण जिवंतपणी मरण जगण्याची शिक्षा...!

-क्षणभर गोदावरीने डोळे मिटल्यासारखे केले नि लगेच ती उद्गारली- 'महाराज! महाराज मी सती जाणार आहे... माझ्या चितेला... माझ्या चितेला अग्निसंस्कार व्हावा... तो... तो शंभूराजांच्या हस्ते...!'

### महाराजही थरारले

गोदावरीचा हा शिक्षानिर्णय ऐकताच अंगावर वीज पडल्यागत

सारी आमतमाम न्यायसभा थरारली... महाराजांच्या मनीदेखील थरार उठला.. त्यांच्या सर्वांगातून एक अनामिक संवेदना विजेगत थरारून गेली... क्षणभर नि:शब्द शांतता पसरली... त्या जीवघेण्या असह्य शांततेचा भंग करीत महाराजांचे शब्द उमटले... 'मुली! मी वचनबद्ध आहे... हे त्रिवार सत्य आहे... पण, या तुझ्या अग्निप्रवेशाचं प्रयोजन तरी काय...?' त्यावर गोदावरी नि:संकोचपणं म्हणाली- 'महाराज! महाराज, मी भ्रष्ट नाही... शुद्ध आहे... धुतल्या तांदळासारखी स्वच्छ आहे... गंगेपरी पवित्र आहे... आई जगदंबेशपथ खरं सांगते, महाराज- माझं चारित्र्य निष्कलंकित आहे... पण-पण लौकिक अर्थानं मात्र मी कलंकित ठरणार आहे...! विखारी संशयानं शंकाकुशंकावळीच्या महाविषारी आग्यामाशा, जन्मभर मजवर चहूअंगी जीवघेणा हल्ला करणार... त्यामाजी मी अंतर्बाह्य होरपळली जाणार...! काजळी काळ्या ढगांच्या सावटानं झाकळलेलं पावित्र्य सिद्ध करणं आई सीतामाईलादेखील शक्य झालं नाही महाराज... मग मी तर सर्वसामान्य स्त्री...! आप्तस्वकीयांच्या -सगेसोयऱ्यांच्या नि जनसामान्यांच्या मनी मजविषयी जो गैरसमज निर्माण झालाय्, तो कायमचा पुसणं कुणालाही शक्य नाही...! त्यामुळं मी माझे ऋणानुबंध तोडलेयत्... नव्हे, ते कायमचे तुटलेयत्... सासरमाहेर या द्वयीलाही मी कायमची पारखी झालीय्...! म्हणून-म्हणून मला विझलं पाहिजे महाराज... अलौकिकाच्या होळीत आयुष्यभर जळत राहण्यापेक्षा मला आत्ताच विझायला हवं... वणवा भडकण्यापूर्वी ठिणगीनं विझावं... त्यातच तिचं मोठेपण असतं... जिवंतपणी मरण जगणं मजसारखीला शक्य नाही महाराज... अग्निदिव्य करण्यापेक्षा नि अग्निपरीक्षा घेण्यापेक्षा अग्निप्रवेश हाच एकमेव तोडगा... शेवटचा उपाय... माझं पावित्र्य सिद्ध करण्याचा एकमेव अंतिम मार्ग म्हणजे अग्निकाष्ठं भक्षण करणं... आग्निप्रवेश करणं... नि तोदेखील रायगडाच्या पायथ्याशी... पायाची दासी म्हणून. चरणसेवा म्हणून. रायगडी येता जाता यापुढंही प्रत्येकानं आपल्या न्यायप्रियतेचं... शंभूराजांच्या मर्यादापालनाचं नि माझ्या पावित्र्याचं, स्मरण करावं म्हणून... त्यास स्मरण व्हावं म्हणून...!'

एवढं बोलून गोदावरी नतमस्तक झाली... अधोमुख, मिटल्या डोळी महाराजांचे आशीर्वादपर शब्द ऐकायला उत्सुक झाली.

**समाधी : योग्याप्रमाणे उभी**

-'मुली जशी तुझी इच्छा...!' इतकेच विषण्णपणं बोलून त्वरित सभा बरखास्त झाल्याची इशारत महाराजांनी दिली...! ...नि तद्नंतर...

वर्षे गेली... तपं गेली... शतकं गेली... तरीही काळाच्या संहारक प्रवाहात गोदावरीची समाधी टिकून राहिली... आजही ती रायगडाच्या पायाशी एखाद्या योग्याप्रमाणं ब्रह्मानंदी टाळी लागल्यागत उभी आहे... तिचं हे स्मारक! तिचं हे वृंदावन, शिवप्रभूंच्या शब्दपालनाची, शंभूराजांच्या मर्यादापालनाची नि गोदावरीच्या प्रेमपावित्र्याची विषादपूर्ण - कारुण्यमयी कथा सांगत इथं उभं आहे!

गोदावरीनं ज्या अतुल धैर्यानं शंभूधर्म रक्षणार्थ अग्निप्रवेश केला... अग्निकाष्ठं भक्षण केली... भगव्या- केशरिया अग्निपंखावर अलगद आरूढ होऊन 'स्वगृही' गेली... त्याच अतुल धैर्यानं शंभूराजांनी महाराष्ट्रधर्म रक्षणार्थ वढू-कोरेगावच्या तुळापुरी - भीमाचंद्रा सरिता संगमी... त्या धारातीर्थी - स्वत:च्या अस्थिमांसाच्या समिधांनी एक तेजाळणारं यज्ञकुंड प्रज्वलित केलं... नि स्वत:च्या रुधिराचे हवन करून ते रणकुंड धगधगतं ठेवलं...!

तुकाराम शेडग्यांनी सांगितलेलं हे गोदाख्यान ऐकून बेचैन झालो... पुरता हरखून गेलो... भूतकालाच्या खोल गहिऱ्या गर्तेत पुरता बुडून गेलो... रात्री डोळा लागेना... सारी रात्र जागून काढली...! रात्रीच्या नीरव शांततेत नि निखळ एकान्ती रायगड फार फार अंतर्मनीचं गूढ बोलतो... खोल खोल तळवटीचं बोलतो... ते ऐकावं. जीव कानी एकवटून ऐकावं... मात्र-मात्र हे ऐकायला मनाचे कान हवेत...!

दुसऱ्या दिवशी भल्या पहाटेच गड उतरत होतो... झुंजूमुंजू होताच महाद्वारापाशी येऊन थडकलो. इतक्यात शेडगे म्हणाले : "चला! आज जुन्या वाटेनं उतरू या...!" उतरत होतो शिवकालीन मार्गानं... नाना दरवाजाच्या दुर्गम वाटेनं... घट्ट आवळलेल्या धुक्याच्या अभेद्य वेढ्यातून मार्ग काढीत खाली नाना दरवाज्यापाशी येताच शेडग्यांना म्हटलं- "तुकशेठ! यशटीला अजून बराच वेळ आहे. त्या अवधीत गोदावरीच्या समाधीपाशी जाऊन येता येईल का." त्यावर तुकशेठ उत्तरले - "अहो! या दिवसात समाधीकडं जाणाऱ्या वाटा बुजलेल्या असतात. शेतीभातीमुळं शिवारातून येण्याजाण्याचा मार्ग बंद असतो... नि त्यातच हे कमालीचं धुकं... रानभुलीसारखं... मोहनवेलीसारखं...! या धुक्याच्या चक्रव्यूहात चकव्यागत फसायला होईल. चुकायला होईल... असल्या या धुरटीतून मार्ग शोधणं महाकर्मकठीण होऊन बसेल... वेळ लागेल...! पुढील खेपेस याल तेव्हा जाऊ... तुमची तयारी असेल तर एखादी चांदणीरात्र समाधीपाशीच जागून काढू...! आज या खेपेस चित्तद्वारापासूनच दर्शन

घ्या म्हणजे झालं...!"

चित्तद्वारापाशी आलो... साकळलेल्या गडद धुक्याच्या डोहाखाली गोदावरीच्या समाधीचा सारा परिसर बुडालेला... त्या क्षीरसागरावर रानपाखरांचा एक थवा उदासवाणा भिरभिरत असलेला... पाऊस उणावल्यामुळं भवतीच्या कडेकपारीतून एरवी खळाळांचं खळाळणारं गाणं यावेळी तसं कण्हत असलेलं... अवघ्या रानीवनी दरीदरकुटी मंद धीरगंभीरपणं घुमत असलेलं...! -"*ती पहा. ती पहा समाधीकडं* जाणारी वाट *धुक्यात हरवली* आहे...!" कुळभान शेंडग्यांच्या या वाक्यानं मी भानावर आलो... मनी उमलणारे गोदातरंग नि दिठीसमोर उधळलेले निसर्गरंग... ते रेखाटलेलं निसर्गशिल्प शब्दात पकडणं शक्य नव्हतं...! एक अनामिक काव्यात्म उदासीनता मनी दाटून आली... शब्दसामर्थ्य अपुरं वाटलं... नि मग नकळत भाषाप्रभू कवीश्रेष्ठींचे शब्द आपोआप ओठी आले...

**एक चांदणी कोसळताना**
**गीत म्हणाली**
**गीत म्हणाली आणिक नंतर**
**पत्थर झाली...**
**सरळ भाबडी वाट अचानक**
**वनात वळली**
**वनात वळली अन् नंतर**
**डोहातच बुडाली...**
**सर्वस्वाचे दान उधळण्या**
**कुणी तळमळली**
**तळमळली अन् मिटून डोळे**
**मनात जळली...**
**अजून कधीतरी पत्थरातून**
**कण्हते गाणे**
**डोहाकाठी फिरे पाखरू**
**केविलवाणे...**

- महाराष्ट्र टाईम्स
- रविवार ६ ऑक्टो. १९९१

● ○ ●

# २० चांदणे शिंपलेली रायगड प्रदक्षिणा...



टकमकीचा उत्तुंग कडा

छाया - राजेंद्र बोरसे

चैत्र पुनवेची रात्र... चांदणं भुईवर सांडलं आहे... समोरचा दुर्गाधिपती रायगड लख्ख प्रकाशात सचैल न्हाऊन निघतो आहे... तो एखाद्या तपस्व्यासारखा निश्चल दिसतो आहे... वर अधांतरी पसरलेलं आकाश एखाद्या प्रचंड घुमटासारखं दिसतं आहे... ते तारकापुंजांनी भरगच्च भरलं आहे... आज शनिचंद्राची युती आहे... वर दुधिया रंगाची आकाशगंगा पूर्वपश्चिम वाहते आहे... जणू मोतियांचा चारा वाहून नेते आहे... घुमटभर ओळखीचे तारे इथं तिथं लुकलुकताना दिसताहेत... त्यात पुनर्वसु आहे... मृगादिव्याध आहे... अत्यंत तेजस्वी असा शुक्र आहे... पतंगाकृती सप्तर्षी आहे... नि बाजूलाच अढळपदी विराजमान झालेला ध्रुव आहे... तो बालयोगी अचल आहे... स्थितप्रज्ञासारखा

निश्चल आहे... ज्ञानेश्वर माऊलीनं ज्ञानेश्वरीत एक सुंदर दृष्टांत दिला आहे- 'जातया अभ्रासवे। जैसे आकाश न धावे। भ्रमणचक्री न भवे ध्रुव जैसा॥'...!

अशा या शुभमंगल घटिकेला तरुण रक्ताचे उमद्या दिलाचे शे-पाऊणशे तरुण सर्व तयारीनिशी सज्ज असे चित्तद्वारापाशी उभे आहेत. यात मुंबईहून दोनअडीचशे मैलांची पायपीट करून आलेले सातआठजण कडसरीला बसले आहेत. त्यांच्या पायांना अक्षरशः सुपारीएवढाले फोड आले आहेत. डॉ. म्हात्रे त्यांजकडे जातीनं लक्ष देताहेत. डॉ. माळी काहीशा चिंताग्रस्त चेहऱ्यानं त्यांची देखभाल करताहेत. प्रमुख संचालक पत्रकार सोमनाथ समेळ नि रवींद्र भावे समोरच्या चौथरीवर उभे आहेत. प्रदक्षिणार्थींना काही महत्त्वाच्या अत्यावश्यक सूचना देताहेत...!

या चांदण्यारात्रीची रायगड प्रदक्षिणेची कल्पनाच मोठी अभिनव नि रोमहर्षक... या रात्रीच्या अरण्यप्रवासानं ध्यानी येणार आहे गडाचं दुर्गमत्व नि अभेद्यत्व... मनी ठसणार आहे उत्तुंग बेलाग कड्यांचं रांगडेपण... नि अंतरी स्फुरणार आहे शिवरायांची साहसवृत्ती...!

इशारा होताच इशारतीचा नारळ फुटतो नि एका विजयी घोषणेनं सारं आकाश दुमदुमून जातं...!

वाडीत उतरतो. वाट उतरंडी आहे... दुतर्फा सुरुंची झाडावळ आहे..; त्यातून चंद्रप्रकाश भुईवर झिरपतो आहे... दिसाभराच्या श्रमानं रायगडवाडी शांत पहुडली आहे. वाडीच्या वरच्या अंगानं रवींद्र भावे यांच्या नेतृत्वाखाली शिवनिष्ठांची मांदियाळी मंदगतीनं शिवनामाचा गजर करीत चालते आहे... आघाडीला कुऱ्हाडधारी... मध्यभागी कोयताधारी नि शेवटी पिछाडीचा मी कुकरीधारी सर्वांत वयोवृद्ध आहे... समोरचे मार्गदर्शक गावकरी धारकरी आहेत. मी मात्र 'माळकरी' असून या क्षणी 'वार'करी आहे...!

पिसाळलेल्या रानडुकरांचा सुळसुळाट... एखाद्या वाघराची एखाददुसरी गावफेरी... रात्रीच्या थंडाव्यात आपले भक्ष शोधण्यासाठी बाहेर पडणारी फुरशी... इत्यादींचे भय आहे असं धनगरांशी केलेल्या चौकशीअंती कळलं होतं म्हणूनच केवळ संरक्षणासाठी घेतलेली ही खबरदारी...! तशी मनीं कुठलीही भयभावना नाही... कसलीही अशुभ शंका नाही... कारण 'वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे' आहेत...! **'चित्त शुद्ध तरी शत्रू मित्र होती। व्याघ्रही न खाती सर्प तया॥'** हा तुकयाचा अभंग शैशवातच माझ्या मनीं खोलवर बिंबला आहे...!

समोरचा उत्ताल कडा ताठमानेनं खडा आहे... टकमकीच्या पायी रायनाक स्मारकापाशी एका मोकळ्याचाकळ्या पठारावर उभं राहिलं की छाती दडपून टाकणाऱ्या या कड्याचं रौद्ररम्य रूप दिवसापेक्षा या चांदण्यारात्री अधिकच भयाण दिसतं... धरणीला दुभंगून वर उसळी घेत आपला फणा उभारून नि फुत्कार करीत आकाशावेरी गेलेल्या एखाद्या अजस्त्र काळ्याकुट्ट भुजंगासारिखा दिसणारा हा भीमकाय शरीराचा लोहपुरुष... नव्हे विषपुरुष दंशडंक करण्याच्या पावित्र्यात उभा असल्यासारखा भासतो...!

काल सकाळच्या प्रदक्षिणेत 'छत्रपती शिवाजी महाराज सर्वधर्मसमभाव समिती' च्या महासचिव राजे सुमतिदेवी धनवटे नि सुप्रसिद्ध अभिनेत्री श्रीमती वनमालाबाई आम्हांसवे होत्या. सरळसोट दोन हजार फूट तुटलेला तो टकमक कडा त्यांनी डोळेभरी न्याहळला होता... त्या उत्ताल भुजंगाकडे पाहून किंचितशा भारावून त्या म्हणाल्या होत्या- 'जाधवराव! या असल्या कड्यांची निवड एखादा पक्षिराज गरूडच करू शकतो...!'

रायनाकस्मारकापासून वाघोली खिंडीच्या पायथ्यापर्यंतची वाट चांगल्या मोकळ्या रानातून धावली आहे... या वळणावर एका कातकऱ्याची चंद्रमौळी झोपडी आहे... ती झापांनी शाकारलेली आहे... आता या क्षणीं झोपडीच्या अंगणी कातवड्यांची चांदणीरात्र साजरी होते आहे... त्यांच्या मनी डर नाही... उद्याची चिंता नाही... गरिबीची खंत नाही... अशी ही सह्याद्रीची लेकरं असल्या या निबीड रानावनांत राहून वृक्षवल्लींना सगेसोयरे मानणारी...!

खालच्या छत्रीनिजापुरी प्रचंड गलबला उसळला आहे... देव मस्तकी धरून हलकल्लोळ घुमतो आहे... ग्रामदेवतेच्या राउळीं हरिनाम सप्ताह गरजतो आहे... धुक्याच्या झिरझिरीत आवरणातून अस्पष्ट दिसणारे चहुअंगीचे डोंगरकडे ब्रह्मानंदी टाळी लागल्यागत ध्यानस्थ बसले आहेत... या सह्याद्री मंडळातील पूर्वेकडचा लिंगाणा लक्ष वेधून घेतो आहे... तो साक्षात् शिवलिंगासारखा दिसतो आहे... स्वराज्याचा हा राखणदार चौफेर नजर रोखून आज कित्येक वर्षे तिथं उभा आहे... धवलदुधाच्या धारा अलगद सर्वांगावर झेलीत दुतर्फी वृक्षराजी भुतासारखी उभी आहे... थकलाभागला वारा गाढ झोपी गेला पर्णावलीत एका पानाचीही हालचाल नाही... वेलींची कुजबूज नाही... पर्णांचं हितगूज नाही... अशा या थकलेल्या वातावरणीं मात्र रानफुलांचा नि रानमातीचा संमिश्र

गंध मन मोहरून टाकतो आहे...!

सर्वांनीच गडाच्या कुशीत शिरण्याची घाईगर्दी केली आहे... कुशीत दच्चगच्च झाडावळ आहे... शिवकालात या गडाभवती गस्त घालणारे मेटकरी बहुधा वाघाच्या काळजाचे असावेत... सकल जनांसी आधारू असलेल्या त्या प्रजाहितदक्ष राजाचे ते मावळे असल्या भरगच्च रानात एखाद्या निशाचराप्रमाणं रात्रभर पहारा देत असत ते केवळ श्रद्धेपोटीच...!

गडाविषयी मनी आदर राखून मनस्वी सश्रद्धेनं त्याच्या कुशीत केव्हांही शिरलं की मनींचं भय पार वितळून जातं... वर्तमानाच्या तटबंदीवरून भूतकाळाच्या खोल गहिऱ्या गर्तेत उडी टाकली की पुष्पशय्येवर पहुडल्यागत वाटतं...!

बख्खळ दगडधोंडींनी नि उंचसखल खाचखळग्यांनी खडबडलेले चढउतार पार करीत खिंडीच्या जंगलात प्रवेश होताच पुन:श्च एकवार विजयी घोषणेनं अवघं रान दुमदुमून जातं...! बंबाळ रान... निसरत्या दरडी... पाणढाळ... पदतळी वीतभर जाडीचा पाचोळ्याचा थर... बाजूस झाडावळींचं काटेरी जंजाळ... नि भवतीचा गडद अंधार...! दिवसा आपल्या फांदोऱ्यांचे हात पसरून सावली देणाऱ्या या वृक्षराजीच्या बोटांच्या फटीतून आता चांदण्याची रांगोळी भुईवर सांडते आहे... करवंदीफुलांचा गंध घमघमतो आहे... मनी एक अनामिक सुगंध दरवळतो आहे... चांदण्यात भिजलेला भवतीचा अंधार काहीसा धुंद वाटतो आहे... प्रत्येक पावलागणिक ओठी येतंय्- 'वाचे विठ्ठल वदावे। पुढं पाऊल टाकावे...।'

शिणोटा घालवून ताजेतवाने झालेले उमद्या हिंमतीचे गडी मनाची उभारी कायम राखून खिंडीचा चढ मुंगीपावलानं चढताहेत. खिंड अदमासे हजार फूट उंचीवर आहे. पायाखालची वाट दिसेनाशी झाली आहे. असंख्य ढोरवाटांच्या गुंत्यातून नेमकी वाट हेरणं महाकर्म कठीण होऊन बसलं आहे. 'हरहर महादेव...' पाचोळ्यावर पडणारा पदरव... पक्षांचा किलकिलाट... वानरांचा किचकिचाट... रातकिड्यांचा किर्ऽ किन्ऽ असा मर्मर ध्वनि... घुबडांचं घुत्कारणं... रानमांजरांचं रडणं... डुकरांचं रान हुंदडणं... झाडावळीची सळसळ... अशा संमिश्र चित्रविचित्र आवाजांनी अवघं रान उठलं आहे...! शिवकालात रात्रीच्या समयीं रानावनातून खिंडीवाटे शत्रूंवर अचानक चढलेल्या हल्ल्याची यावेळी पुरेपूर कल्पना आल्याखेरीज रहात नाही...!

खिंडीची घसरगुंडी पार करून अर्धेअधिक तरुण सपाटीला लागले

आहेत... आम्ही केवळ सातआठजण खिंडीच्या माथीं चक्क आडवे झालो आहोत...!

चांदणे शिंपलेली रात्र... किंचित भयाण... काहीशी गंभीर... झाडावळीच्या फांदोऱ्यांतून उठून दिसणारी काजव्यांची दिलखेचक रूपेरी रोषणाई... लिंगाणावाडीतील कुत्र्यांचं कर्कश भुंकणं... पायथ्यापाशी रानींवनीं रानडुकरांवर झाडलेल्या फैरींचे आवाज... पाणेगावातील मंदिरातून येणारी टाळमृदंगाची धून... नि या अशा भयमिश्रित' आनंदाच्या बेहोषीत अधूनमधून होणारा उल्कापात...! वीतभर पोटाची टीचभर खळगी भरण्यासाठी धकाधकीच्या या नागरी जीवनापासून अगदी सुदूर हे असले आनंदाचे क्षण येतात नि सारं जीवनच कसं मंत्रागत भारून जातात...!

मध्यरात्र उलटली आहे... समोरचा पोटल्यात डोंगर एखाद्या नि:संगासारखा मख्खपणं उभा आहे... त्याला खेटून गेलेली कळकाईची खिंड इथून स्पष्ट दिसते आहे... तिथून त्या खिंडीपावेतो जाणारी पायवाट कुड्याच्या शुभ्रधवल फुलांना हुंगीत नीरव शांततेतून नि निखळ एकांतातून धावली आहे... ही शांतता नि एकांत मनस्वी भोगीत उत्तररात्रीच्या या पायपीटीनं मन प्रसन्न होतं... चित्त शुद्ध होतं... अंतरी एकाग्रता येते...! नागरीजीवनात मनीं ध्वनीप्रदूषणाचा चढलेला गंज या असल्या नीरव शांततेनं आपोआप धुतला जातो...!

समोर चांदण्यात भिजलेला रायगडाचा काळाकभिन्न दक्षिणकडा... छाती रुंदावून ताठ मानेनं उभा आहे... त्याच्या स्कंधावर मांड ठोकून बसलेला वाघदरवाजा... नि त्याच्या आक्राळविक्राळ जबड्यातून सुटलेला पाणलोट उभा कडा चिरीत तळापावेतो पोचला आहे... दृश्य तर मोठं नामांकित आहे... डोळीयांत साठवून ठेवण्याजोगं आहे... मनीं बिंबण्याजोगं आहे...!

काळकाईच्या खिंडीत एका आम्रवृक्षाखाली अंधाराच्या सावलीत उभा आहे... दिठीसमोर रायगड आहे... मनीं असंख्य विचारांचं मोहळ उठलं आहे... रायगड हे देखिल एक स्वातंत्र्यमंदिर आहे... कोणे एकेकाळी वैभवानं परिमळलेल्या विजयी जल्लोषात याच मंदिरी एक शिवकल्याण स्वातंत्र्यसूर्य आपल्या अतुल शौर्यानं तळपला... स्वार्थातून नि:स्वार्थ... भिरुतेतून धैर्य... नि शून्यातून स्वराज्य उभं करणारा हा श्रीमानयोगी पुण्यश्लोक राजा... वर्षे गेली, तपे गेली, शतकं उलटली तरी अमरत्वाचं वरदान लाभलेल्या या राजाचा महिमा 'प्रतिपच्चंद्ररेखेव' वृद्धिंगतच होतो आहे...! शौर्य-धैर्य-चातुर्य नि औदार्य याच्या मूर्तिमंत

संगमी देवत्वाची नि दिव्यत्वाची प्रचिती येते आहे...! नकळत हात जोडले जातात नि मग मन्मनीं गुणगुणतं...


**-मध्यरात्री नभघुमटाखाली...**
**शांति शिरी तम चवऱ्या ढाळी...**
**त्यक्त बहिष्कृत मी त्या काळी...**
**एकांती डोळे भरती...**
**तेथे कर माझे जुळती...!**

-"सामना" १९/२/१९८९

● ○ ●

# २१ आनंदाचे डोही आनंद तरंग... !

## रामदास स्वामींच्या निसर्गरम्य घळी




संकलित नकाशा

मनोहर गांगल यांच्या सौजन्याने

'महाराष्ट्र' ही जशी नरशार्दूल शूरवीरांची तशीच ती साक्षात्कारी

संतमहंतांची जन्मभूमी आहे. या संतमहंतांच्या मांदियाळीत समर्थ रामदास स्वामींचं स्थान आगळंवेगळं नि वैशिष्ट्यपूर्ण आहे...!

समर्थ म्हणजे सामर्थ्याचा उपासक... समर्थ म्हणजे सर्वदृष्टीनं समर्थ...! समर्थ रामदास हे एक शूर महंत होते... तो एक योद्धा संन्यासी होता... तो एक विरक्त युगपुरुष होता... तो एक संत महात्मा होता...! संतत्वाचा एक जगावेगळा अनोखा नि अपूर्व असा आदर्श त्यांनी लोकांसमोर ठेवला... परमेश्वरप्राप्तीसाठी प्राणार्पण करण्याची तयारी ठेवा तद्वत मूर्तिभंजक नि विध्वसंक दैत्यांचा प्राणपणानं प्रतिकार करण्यासाठी सदैव सिद्ध व्हा असा त्यांचा उपदेश होता...! प्रभू रामचंद्रांच्या तीक्ष्ण बाणाप्रमाणं कधीमधी समर्थांचाही वाङ्‌बाण सुटे... **'देवद्रोही तितुके कुत्ते। मारोनी घालावे परते।'** अशी तिखट जळजळीत उक्ती निर्भीडपणं उच्चारून **'देव मस्तकी धरावा। अवघा हलकल्लोळ करावा। मुलुख बुडवावा की बडवावा। धर्मस्थापनेसाठी।'** अशा ओजस्वी वाणीनं तेजस्वी नि स्फूर्तीदायक संदेश त्यांनी जनमानसी रुजविला...!

जन्मत:च विवेक नि वैराग्य घेऊन आलेली मनोवृत्ती... जनीमनी मन रमेना म्हणून ते रानीवनी भटकले... टाकळीस पुरश्चरणार्थ बारा वर्षे साधना नि तद्पश्चात बारा वर्षे भारतभ्रमण केलें...! बुद्धी मूळचीच तीव्र असल्यामुळं आता ती परिपक्व बनलेली... मंगलदायिनी झालेली...! आत्मचिंतनाच्या योगे ती व्यापक बनलेली... विश्वाच्या कल्याणाचे चिंतन करणारी झालेली... नि अविरत भ्रमंतीमुळं अवलोकन शक्ती अतिशय मार्मिक नि सूक्ष्म झालेली...!

त्याला स्वत:चा प्रपंच नव्हता... तो अनिकेत होता... मानवी जीवनातील सारं सौंदर्य अचूक हेरणारा... निसर्गसौंदर्यावर नितांत प्रेम करणारा... नि सौंदर्याच्या परिपूर्ण वातावरणाचा हव्यास बाळगणारा तो एक सौंदर्यासक्त वृत्तीचा विरक्त योगी होता...!

समाजापासून पूर्णपणे अलिप्त राहून उन्मनी अवस्थेत वावरणारे विदेही पुरुष प्राचीन भारतात होते... समर्थांची ही स्थिती काहीकाल पुरश्चरणंकाली होती... त्या अवस्थेत एका वर्षाच्या मौनातून मनी 'मनाचिये गुंती' शेले गुंफले जाऊ लागले. कवित्व स्फुरू लागले... एक दिस अंतरात रुणझुणले... अंबरात लखलखले... नि लोचनात गहिवरले...! चैतन्याच्या वीजेचा कडकडाट झाला... त्यातून देव उतरला... सामोरा अवतरला... आणि मग खाणीवाणी अंतरी वसलेली 'तीच' शब्दरूपे मुखातून प्रकटली...!

**कवित्व शब्दसुमनमाळा। अर्थ परिमळ आगळा।**
**तेणे संतषट्पदकुळा। आनंद होये॥**

ईश्वरदत्त प्रतिभेच्या अमृतकुंभातून शतसहस्र अमृतधारा स्रवू लागल्या आणि मग त्या शोकाचे श्लोक झाले... नि वेदनेचे वेद झाले...!

आस्मानी सुलतानीच्या मुलतानढव्यापुढं जनलोक भयकातर झालेले आहेत... रंजले गांजलेले आहेत... दु:खीकष्टी झाले आहेत... भूकेकंगाल झाले आहेत... पीडितशोषित झाले आहेत... स्वत्व विसरले आहेत... स्वधर्मास पारखे झाले आहेत.. निपचीत पहुडले आहेत एखाद्या जिवंत प्रेतावाणी...!

**फिरे दास उदास लोकांस पाहे।**
**मनामाजि थक्कीत होवोनि राहे॥**

- हे अवघे पहावेनासे झाले आहे...

- त्यांस हाकारले पाहिजे... जागविले पाहिजे... उठविले पाहिजे... स्वत:च्या पायी उभे केले पाहिजे... अवघ्यांस मेळविले पाहिजे... शक्तीयुक्तीने पेटविले पाहिजे... त्यांच्या अंतरी झाकोळलेल्या निखाऱ्यावर हळुवारपणे फुंकर घातली पाहिजे... धर्मास सहाय्यभूत झाले पाहिजे...!

- हे सारे कसे व्हावे- त्यासाठी काय करावे... कुठे जावे... कुणास पुसावे..!

- काही सुचेनासे झाले आहे...!

**बोलता चालता ये ना कार्यभाग कळेचिना।**
**बहुत मी पीडिलो लोकीं बुद्धि दे रघुनायका॥**

- मजपाशी जनास समजविण्याची शक्ती नाही... युक्ती नाही... बुद्धी नाही... विद्या नाही...!

**युक्ति नाही बुद्धि नाही विद्या नाही विवंचिता।**
**नेणता भक्त मी तूझा बुद्धि दे रघुनायका॥**

- त्या रामरायास स्मरावे... शरण जावे... विनवावे... आळवावे... साकडे घालावे...! म्हणजे मग तो ही मनोकामना पूर्ण करील...!

- हे कालचक्र बदलणे आपल्या एकट्याच्या ताकदीपलीकडील आहे... हे त्रिवार सत्य आहे... हे जरी खरे असले तरी मनी एक स्वप्न आहे... ते सत्यसृष्टीत उतरायला हवे... साकार व्हायला हवे...!

- मग त्यासाठी रामराज्य हवे... निर्भय रामराज्य... आदर्श रामराज्य... सर्वांगानं परिपूर्ण असं रामराज्य...!

- ते समर्थांनी स्वप्नी देखिले... 'स्वप्नी जे देखिले रात्री'

- कालांतराने ते सत्यात उतरले... 'ते ते तैसेचि होतसे'
- आणि मग 'प्रतिपश्चंद्ररेखेव वर्धिष्णू' होत या आनंदवनभुवनी ते अनुपम्यसुखसोहळ्यासह फळीफुली बहरून आले...!

कधीमधी लोकउपाधींना मनस्वी कंटाळून समर्थ जनान्तातून एकांतात शिरत नि पुनश्च जनकल्याणार्थ एकांतातून जनान्तात येत...! अंतर्मुख होण्यासाठी त्यास घळींचा एकांत प्रिय होता. म्हणूनच समर्थांच्या जीवनात घळींचे महत्त्व अनन्यसाधारण आहे... आजही या घळी समर्थांच्या निसर्गरम्य एकांताची साक्ष देतात... निसर्गचक्रात उन, वारा नि पाऊस या त्रयींनी मिळून गोडी-गुलाबीनं ही निसर्गशिल्प हळूवारपणं कोरलेली आहेत... ती पाहण्याजोगी आहेत...! समर्थांवर संपूर्ण श्रद्धा ठेवून... श्रद्धायुक्त अंत:करणानं ऐतिहासिक घटनांचं स्मरण करीत... डोळसपणं लोकजीवन न्याहळीत... प्रसन्न चित्तानं नि विशाल मनानं निसर्गसौंदर्याचा आस्वाद घेत या घळींचा मागोवा घेणं ही एक रोमांचकारी आनंदयात्रा आहे...!

## जरंडेश्वरची रामघळ

समर्थांचं कृष्णातीरगमन तसं महत्त्वाचं...! १६४५ चा सुमार... त्याकाळी या भागात अरुणोदय झाला होता... नि स्वातंत्र्यसूर्य उदयास येऊ पाहात होता...! यासमयी समर्थ, महाबळेश्वर, वाई, माहुली नि जरंडा या भागात फिरू लागले... तेव्हा ते एकटेच असत...! या प्रांती संचार करीत असता आरंभी आरंभी त्यांचे वागणे मुद्दामच पिसाटासारखे असे म्हणून त्याकाळी ते 'पिसाट रामदास' म्हणून ओळखले जात...! निर्भयपणे एकांती, रानीवनी नि डोंगरकपारीत एकटेच राहत... जरंडेश्वरी त्यांचे अधूनमधून वास्तव्य असे...!

हे भव्य गिरीशिखर जरंडेश्वराचे...! हनुमंताचे ठाण...! कधिकाळापासून तो 'भीमरुपी महारुद्रा वज्रहनुमान' इथं विराजतो आहे...!

**भीमरुपी महारुद्रा वज्रहनुमान मारुती।**
**वनारी अंजनीसूता रामदूता प्रभंजना॥**

अशा या शब्ददुर्गांची अजोड बांधणी पाहून पळभर अंतर्मुख व्हावंसं वाटतं...!

रामायणातील तो हृदयद्रावक प्रसंग...! लक्ष्मणास शक्ती लागली... तेव्हा वनौषधिंनी भरलेला द्रोणाचल उपटून तो हाती उचलीत मारुतराय दक्षिणेकडे झेपावले... त्या द्रोणागिरीतला एक खंड खालती गळाला... तो हा जरंड्या... नानापरीच्या औषधी वनस्पतींनी भरलेला नि भारलेला...

शिखरसम्राज्ञी कळसूबाईच्या डोंगरागत...!

या जरंडेश्वराच्या दर्शनानं स्वामींच्या पूर्वस्मृती जागृत झाल्या...! नि स्मृतीगंध दरवळू लागल्या...!

**ठकारे पर्वता ऐसा नेटका सडपातळू**
**चपळांग पाहता मोठे महाविद्युल्लतेपरी।**
**कोटिच्या कोटि उड्डाणे झेपावे उत्तरेकडे**
**मंदाद्रीसारिखा द्रोणू क्रोधे उत्पाटिला बळे॥**

सातारा-कोरेगाव मार्गावर जांब फाटा - तिथून डावीकडं वळून जरंडेश्वर डोंगराच्या पायथ्यापर्यंत सोळा कि.मी. ची डांबरी सडक! पायथ्यापासून डोंगरी पायवाटेनं एक तास वळणाचा चढ! डोंगरमाथ्यावर जरंडेश्वर मारुतीचं जुनं देवालय...! देवळाच्या मागं एका तरुतळी तीनचार मोठाले शीलाखंड एकमेकावर अडकून, एक माणूस ध्यानाला बसू शकेल अशी एक छोटेखानी घळ तयार झाली आहे... हीच ती जरंडेश्वराची रामघळ...!

या डोंगरमाथी उभं राहिलं की पश्चिमेस कृष्णामाईचा नि वेण्णेचा सुरेख संगम-संगमक्षेत्र माहुली - अजिंक्यतारा, सज्जनगड, नि नांदगिरी उर्फ कल्याणगड असा सुरेख परिसर न्याहाळता येतो...!

हे सारं न्याहाळत असताना, समोर पसरलेल्या त्या अवघ्या भव्य प्रदेशातून, साडेतीनशे वर्षांपूर्वी वणवण भटकणारे रामदास आठवतात... 'बहु मी पीडिलो लोकी... उदास वाटते जीवी... आता जावे कुणीकडे...' असं त्याकाळी त्यांच्या मनी आलं असावं. कदाचित् कोणे एके दिवशी लोकउपाधींना कंटाळून-त्रासून माहुली संगमक्षेत्री उगवत्या दिनकराला अर्घ्य अर्पिताना त्या ओंजळभरल्या पाण्याच्या धारेसारखी शब्दफुलांची धारा ओठातून अलगद् **थेंबुट्यावाणी टप्टप् टपटपली असेल...**

**बहूवीट आला भवाचा न सावे।**
**अटव्यांत देऊनिया हाक जावे॥**
**मनाते दमावे, श्रीरामी रमावे।**
**दिगंती फिरावे, जना न स्मरावे॥**
**मना चाल उठी वनादुर्गमाते।**
**न गुंते भवागार दारादिकांते॥**
**विवेके विचारे विवंचूनि पाही।**
**जनी प्राहता सर्वथा उरी नाही॥**

जाता-जाता, इथल्या एका, अंतर्बाह्य पोखरलेल्या वयोवृद्ध गिरीपंथी

साधूला, 'आपण समर्थांच्या सर्व घळी पाहिल्या आहेत?' असं सहज विचारलं असता तो उत्तरला - 'नाही! तारुण्यात सुचलं नाही... नि आता या म्हातारपणी ते शक्यही नाही...!' असं म्हणून तो काहीसा गहिवरला... भयकातर झाला...! डोंगर उतरत असता मनी म्हटलं- हातपाय चालताहेत... ते धडधाकट आहेत... शरीर सक्षम आहे... ते साथ देते आहे... इंद्रिये सजग आहेत... सादेला दाद-प्रतिसाद देताहेत तोपावेतो हा रोमांचकारी अनुभव घ्यावा... नि निर्भय व्हावं...! एकदा का संध्याछाया भिववू लागल्या की ते भय अंतर्बाह्य ग्रासू लागतं... पोखरू लागतं... कुरतडू लागतं... नि मग उरलंसुरलं आयुष्य भयकातर होऊन जातं...!

### मोरघळ

सातारहून पंचवीस कि. मी. अंतरावर ठोसेघर नामे ग्राम नि गावाच्या उजव्या हाती लांबसडक उभी असलेली सड्याची कातळी भिंत...! भिंतीसमोरील टेप चढून त्या भिंतीवर यॆगावं नि तिथून त्या भव्य अवाढव्य पठारावरून दीडदोन तास रमतगमत पदयात्रा करावी... ही पदयात्रा शेवटी एक आनंदयात्रा ठरते...!

हे मोरघळीचं प्रशस्त पठार अन् पन्हाळ्यासमोरील मसाई पठार, ही दोन जुळी भावंडं...! या ऐसपैस पसरलेल्या मोकळ्याचाकळ्या मोरघळ पठाराचं एक मोठं वैशिष्ठ्य आहे... मळलेल्या पायवाटेचा दुतर्फा, काहीसा कातळी भाग छिन्नी लावून तासल्यागत भासतो तर काही भागी हिरवागार गालिचा आंथरलेला दिसतो... त्या खुरट्या मऊशार गवताच्या पायघड्यांवर सप्तरंगाच्या विविध छटा असलेली लक्षावधी नानाविध आकाराची रानफुलं निसर्गानं अनंत हस्ते उधळलेली... एका हारीनं विणलेली... त्यांची अशी काही कल्पकरित्या नि कलात्मकतेनं पेरणी केलेली की ती रंगसंगती पाहताक्षणीच त्या चित्रकाराविषयी मन केवळ कवतिकानं भरून यावं नि एखाद्या ख्यातकीर्त चित्रकाराच्या कुंचल्याला हे एक आव्हान ठरावं...!

या हरिततृणांच्या मखमाली गालिच्यावर हलक्या नाजुक हातानं काढलेला सुबक पुष्पकशिदा पाहताक्षणी वाटतं, मानपान, प्रतिष्ठा नि वयोमर्यादा विसरून या मृदूमुलायम पुष्पशय्येवर अगदी मनमुराद लोळावं... 'आकाश मंडप पृथ्वी आसन। रमे तेथे मन क्रीडा करी...!' असं हे रम्य सुरम्य सुखानंदी स्थळ...! हातांची उशी करून सैल सुसैलं

इथं पहुडावं नि मिटल्या डोळी निसर्गाशी तादात्म्य पावावं...! पहुडल्या पहुडल्या पंचविशीतले मोरपिसी दिवस स्मरावे नि शेवटी, शेवटच्या गोड दिसाचं सुखस्वप्न अंतरी रंगवावे...! पुष्पशय्येवर एकुलवाणे झोपण्याचा प्रसंग आयुष्यात शेवटी एकदाच येतो... ते सुखसमाधान कसे असेल याचि प्रचिती याचि देही याची डोळा या इथं येऊन एकवार अनुभवावी...!

एका काळ्याकभिन्न निसरड्या खवली कातळाच्या ऐन गर्भांतरी असलेली ही भुयारयुक्त मोरघळ आकारानं तशी सर्व घळींमध्ये मोठी प्रशस्त नि काहीशी गूढगंभीर भासते...! प्रवेश वर्तुळाकार नि समोरच ग्रामदेवतेचं देवायतन... इथलं ग्रामदैवत मोरबागेचा 'मोरोबा' म्हणून या घळीचं नाव मोरघळ असं पडलं असावं...!

घळीच्या वरील अंगास एक छोटेखानी गुहा... तिच्या भांगातून मधोमध खाली झोतणारा एक लहानगा पाणझोत... नि खालती लवलवणाऱ्या हिरव्या झाडोरीतून स्वच्छंदपणे खळाळत पखवाज वाजवीत बागडत वाहणारा निर्झर... बालकवींच्या निर्झराचं स्मरण करून देणारा...!

घळीच्या माथी पैस कातळ...! समर्थांचं वास्तव्य या घळीत असताना कदाचित् एका चांदण्यारात्री ते या कातळी शय्येवर पहुडले असतील... बाजूस धुनी धगत असेल... आगटी पेटली असेल...! शांत प्रशांत... निख्खळ एकांत... अशा या शुभमंगल घटिकेला सुषुप्ती अवस्थेत स्वामींच्या मनी शब्दभ्रमर गुंजारले असतील...

**सुषुप्ती अवस्थेशी भूमी निजावे**
**उसे रामपाद स्मरोनि करावे।**
**दिशांचा महापाट तो पांघरावा**
**सिताकारणे साध्य वन्ही करावा।**

## चंद्रगिरीची घळ

सातारा-कऱ्हाड राजमार्गावर चरेगावपासून दक्षिणेस तीन कि.मी. अंतरावर चंद्रगिरी उर्फ चांदोबाचा डोंगर उभा आहे. अदमासे दोन हजार फूट उंचीच्या या डोंगराचा आकार वसंतगडापासून येथपावेतो काहीसा अर्धचंद्राकृती आहे... या अर्धचंद्राकृती भागाच्या एका टोकालगत, डोंगरमाथ्याखाली, ऐन कड्याशी तिरक्या कोनात, आडोशाला, एका भल्यामोठ्या पाषाणखंडाच्या आड नि त्या भागात असलेल्या एकमेव चिंचेच्या झाडासमोर ही घळ आहे. चरेगावपासून बेलदरे नि 'खंडोबाची पाली' नामे खिंडीवाटे या घळीत जाता येते.

**गि. आ. --- १२**

समर्थांच्या अनेक रामघळींपैकी ही घळ त्यास अत्यंत प्रिय होती असं म्हटलं जातं. त्यांचे कृष्णेकाठी आगमन झाले... तिथं त्यांनी वास्तव्य केले... कृष्णेच्या परिसरात रमले... नि तिथं रामभक्तीचं बीज खोल खोल रुजविले...!

या घळीत येण्यापूर्वी एका वाघराचा मुक्काम इथं सदोदित असे... एक दिस समर्थ इथं आले... घळीच्या बाजूस उभे राहिले... वनराजाच्या दृष्टीला दृष्टी भिडवून अचल झाले...! जनावर थोडंसं गुरगुरलं... शांत झालं... उठलं... नि तिथून निमूटपणं आल्यापावली खाली तळरानी निघून गेलं...!

**सदासर्वदा देव सन्निध आहे।**
**कृपाळूपणे अल्प धारिष्ट पाहे॥**

व्याघ्रराज घळीतून खाली उतरताच वानरांच्या आर्त किचकिचाटानं नि पक्षांच्या भयमिश्रित चिवचिवाटानं तळीमळी चरणाऱ्या मेंढरांना त्याचा सुगावा लागला नि ती सारी वायुगतीनं भराभर पांगली...!

**देखोनी व्याघ्राचा पपेटा**
**मेंढरे पळती बारा वाटा।**

- आणि मग गिरीदुर्गवलयांकित... रानावनांनीयुक्त... नि वन्य श्वापदांच्या भर वस्तीतल्या या निसर्गरम्य घळीत समर्थ निर्भयपणे राहू लागले...!

**बहु झाड खंडे उदंडे अचाटे १**
**गिरी सारिखी थोर थोरे कपाटे।**
**बहु सावजे व्याघ्रसिंहे कलाली।**
**तिथे रामदासें असे गुंफ केली।**

एवढा एकांत कशासाठी...? नि कुणासाठी...?
अंतर्मुख होण्यासाठी... चिंतनद्वारे आत्मपरीक्षण करण्यासाठी... चुका ध्यानी येण्यासाठी... दुर्गुण टाळण्यासाठी... सद्गुण आत्मसात करण्यासाठी... कित्येक प्रश्नांची उकल होण्यासाठी... चांगल्या योजना आखण्यासाठी... सुरक्षित राजकारणाचे आराखडे बांधण्यासाठी... समाधीसुख अनुभविण्यासाठी... ग्रंथरचना करून ती लोकांपावेतो पोचविण्यासाठी... त्यांची चिंता करण्यासाठी... त्यांना शहाणे करून सोडण्यासाठी...!

**खनाळामध्ये जाऊन राहे। तेथे कोणीच न पाहे।**
**सर्वत्रांची चिंता वाहे। सर्वकाळ॥**

या घळीच्या तोंडाशी बसावं... तिथून समोर दिसणारं अफाट

खोरं डोळेभरी न्याहाळावं... नि कऱ्हाडचा नयनरम्य देखावा डोळीयात साठवावा...!

ती सुदूर नागमोडी वळणे घेतलेली कोयना... समोरचा उभा वसंतगड... डोंगरपायथ्याशी वाऱ्यासवे डोलणारी हिरवीगार शिवारं... त्यातून फिरणारी बायाबापडी... उतरणीवर चरणारी गुरंढोरं... बागडणारी गाईवासरं... एकोप्यानं चालणारी खिल्लारं नि बकरी-मेंढरं... आणि-आणि एका सपाटी शिळाखंडावर घोंगडं आंथरून नि भाजली नकसदार काठी एका खांद्यावर तिरपी उभारून उकिडव्या बैठकीत निर्भयपणे अलगूज वाजविणारे गुराखी... त्यांचे ते सूर... ती सुरावली ऐकण्यात मोठी मौज...! लांबुडक्या चिवट गवताच्या पात्यांचा नक्षीदार गोफ विणणारी... रानगीतांतून 'ढो' घालणारी... म्हैसरूडाच्या शेपट्या पिळून त्यावर आरूढ होणारी... म्हशीच्या पाठी बसून तिच्या काळ्याशार पाठीवर पांढऱ्या चिकानं आकडेमोड करणारी... आणि वाटाण्याएवढुल्या आकाराची जांबुर्डीचं फळं बांबूच्या फोकट्यात घालून त्याचा 'फुट्ट' असा आवाज करणारी कित्येक गुराखी पोरं रानीवनी ही असली नानाविध क्रीडा करीत असतात...!

हे असलं सामोरं साकारलेलं विहंगम दृष्य या इथं बसून समर्थांनी अनेकवार पाहिलं असेल नि पाहता पाहता नकळत ती शब्दावली त्यांच्या मुखातून फुलली असेल...!

**चंद्रगिरीचा डोंगर। त्यात गुप्त एक विवर।**
**तेथे राहे योगेश्वर। निरंजन॥**
**जागा सुंदर गहन। तेथे सुखावले मन।**
**वरी पाहता गगन। साटवले॥**
**कृष्णा कोन्या दोन्हीकडे। मध्ये पर्वताचे कडे।**
**मंडल पाहता चहूकडे। समाधान॥**
**तळीं असती शेते भाते। तयां फिरताती आउते।**
**नानापरीची मार्गस्थे। येतिं जातिं॥**
**वरती सरडेमेंढरे। गुरेखी गुरेवासरे।**
**ठायीं ठायीं गुराखी पोरे। क्रीडा करती॥**

### तोंडोशीची रामघळ

चाफळखोऱ्याला लागूनच उत्तरेस तारळखोरं आहे... सातारा-काशिळफाटा - खंडोबाची पाळी - तारळे - मुरुड असा एकूण चाळीस-पंचेचाळीस कि.मी. अंतराचा सडकप्रवास...! तारळी नदी ओलांडून तोंडोशी - तोंडोशी हे डोंगरपायथ्याशी वसलेलं एक लहानसं

खेडं... त्यामागं उभी असलेली भलीमोठी लांबसडक डोंगररांग... या रांगेतील कळंब्याच्या डोंगरात ही रामघळ... आणि म्हणूनच या घळीला एकूण तीन नावं... कळंबेची, तोंडोशीची अगर तारळ्याची घळ...! तारळे हे हरजीराजे महाडिक यांचं गाव... महाडिक हे शिवरायांच्या जामातांचं नाव...!

तोंडोशीपासून ओढ्याच्या काठाकाठानं चढावं नि पाऊण तासात घळीत पोचावं... दोन डोंगरांच्या ऐन बेचकात, अंतर्गोल कड्याच्या पोटाशी वसलेली, पन्नास मी. लांबीची, काहीशी अर्धचंद्राकृती दिसणारी ही घळ फारच सुंदर दिसते...!

घळीच्या माथी गिरीशृंगे... त्या उत्तुंग गिरीशृंगातून उभा कातळ चिरीत खाली कोसळणारा सुरेख जलप्रपात... त्या जलप्रपातानं आपल्या अतुल प्रतापानं आज कित्येक वर्षे त्या डोंगरछाताडावर धडक मारमारून छिन्नविछिन्न केलेली त्याची ती काळीकभिन्न छाती... नि त्या छातीच्या पिंजऱ्यात त्या प्रपाताच्या तांडवनृत्यानं पोखरलेली ती घळ पाहून मन केवळ विस्मयानं भरून येतं...!

गेल्यागेल्या थोडी विश्रांती घ्यावी नि तद्नंतर आज कित्येक वर्षे ध्यानस्थ बसलेल्या त्या डोंगरमाथ्याच्या भव्य जटाभारातून अखंड वाहणाऱ्या त्या गंगामाईच्या कर्पूरगौरी धारेत सचैल स्नानसंध्यादी कर्मे सारून श्री सद्गुरुचरणप्रताप चिंतनात काही काळ कंठावा...!

हिरव्या रंगाच्या विविध छटा ल्यालेली सुरेख रमणीय वनश्री... आपल्या तुषाररेणूंची मुक्तहस्ते उधळण करीत, डोंगरकपारीतून उड्या घेत धावणारे असंख्य बेबंद निर्झर... घणाघातानं दुभंगलेले ते भीमकाय शरीराचे महाप्रचंड शिळाखंड... दुतर्फा भूमीचे खंड बेगुमानपणं पोखरीत, स्वत:च्याच मस्तीत स्वच्छंद धुंद बेबंदपणं धावणाऱ्या तारळनदीचं खोरं डोळेभरी न्याहाळावं नि समर्थांना स्मरून त्यांचं काव्य आळवावं...!

**गिरीशी बळे आदळे तोय राशी।**
**बहुसाल त्या तोडिले पर्वतांशी॥**
**गिरीशृंग पाठार दारी कपाटे।**
**शिळा शिखरे वृक्ष पाषाण थाटे॥**
**धडाडा नद्या लोटल्या व्योमपंथे।**
**भूमी तुटल्या घोर घाते आघाते॥**
**झिरपती झरती झरती झरे।**
**न धरिता धरिता नीर नावरे॥**

सरस रम्य रसाळ वनांतरा।
हरित रंग सुरंग दिसे बरा॥
दिसतसे रमणीय वसुंधरा।
नुतन पल्लव हा तरु साजिरा॥

## चाफळची रामघळ

समर्थस्मृतींच्या सुखद सुगंधानं पावन झालेलं नयनरम्य तीर्थक्षेत्र म्हणजे चाफळ...! अखंड परिभ्रमण करणाऱ्या या विरक्त नि निस्पृह संताच्या जीवनातील उत्तरार्धाचा अधिकांश काल चाफळ मुक्कामीच गेला...! महाराष्ट्राच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिली गेलेली एक क्रांतीकारी घटना या इथं इ. स. १६४८ साली घडली...!

**राजा देवद्रोही झाला। देवस्थळांचा उच्छेद केला।**
**तीर्थक्षेत्रे व्रते उद्यापने। सकलहि उच्छेदिली यवने।**

चहूअंगी अंधारून आलेल्या अशा या प्रतिकूल परिस्थितीत, आदिलशाहीच्या अधिपत्याखाली असलेल्या या अनोळखी मुलुखात, अंगापूर कृष्णामाईच्या डोहात सापडलेल्या श्रीराममूर्तीची स्वहस्ते प्राणप्रतिष्ठा करून समर्थांनी श्रीरामजन्मोत्सव सुरू केला तो याच क्षेत्री...!

**अंतरी कल्पना केली। एकांती बोलिलो बहु।**
**रक्षिता देव देवांचा। त्याचा उत्सव इच्छिला॥**

चाफळ-शिंगणवाडी-बोरगेवाडी असा अंदाजे सातआठ कि.मी. पायी प्रवास... तिथून दीडदोन तास उभा डोंगरचढ... पुढं पठारावर भैरववाडी... वाडीच्या वरील अंगास डेरवणच्या डोंगराचा लांबसडक कडा नि वर दाढोलीचा सडा...! या कड्याच्या ऐन गर्भांतरी ही घळ आहे. ही निसर्गनिर्मित रहस्यमय दुमजली घळ सुरेख रंगाच्या लालसर जांभ्या दगडात कोरली गेली आहे...!

या डोंगरचढणीवर एके ठिकाणी चारपाच मोठ्याल्या शिळा उभ्या आहेत... तिथं थोडावेळ थांबावं नि या इथं या स्थळी घडलेली ती गर्वपरिहाराची घटना आठवावी...! याच स्थळी १६५८ साली भरदुपारी, फाट्यांचा गोयला डोयी वाहून नेणाऱ्या एका महाराकडून, समर्थांनी सदाशिवशास्त्री येवलेकर या विद्वान पंडिताचे गर्वहरण केले होते...! आपल्या विद्वत्तेच्या बळावर हा महामहोपाध्याय रावणापरी मातलेला... जानव्यास सुरी बांधून नि भरदिवसा मशालीचे पोत पाजळवीत, आपल्या पांडित्याच्या जोरावर सामोरे ठाकलेल्या विद्वानांचा पराभव करीत करीत

या चाफळखोरी पदभ्रमण करता झालेला...! वादविवादी पराभवलो तर मशाली विझवीन नि यज्ञोपवितास बांधलेल्या खंजिरीनं स्वतःची जिव्हा छाटून टाकीन अशी भीष्मप्रतिज्ञा त्यानं घेतलेली... स्वाभिमानाची जागा गर्वानं ग्रासलेली...!

त्याची नि समर्थांची गाठ या पाषाणखंडांपाशी पडली... गर्वानं नखशिखांत धगधगलेल्या या शास्त्रीबोवांना, समर्थांना साधा नमस्कार करण्याचंही भान राहिलं नाही... त्यांनी लगेच वादाचं आव्हान केलं... या वादंगापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न झाला... आग्रह धरला गेला... तरी तो शास्त्री ऐकेना... आपला हेका सोडीना...! त्याच समयी समोरून घरी जाणाऱ्या एका मोळीविक्यास समर्थांनी हाकारले... कल्याणस्वामींनी काठीनं वाटेवर आखलेल्या तीन रेघा ओलांडून आलेल्या त्या मोळीवानानं शास्त्रीजींना पराभूत केलं... तो पराभव मान्य झाला... तो त्यांनी मान्य केला... स्वामींनी शास्त्रीजींना त्यांच्या भीष्मप्रतिज्ञेतून मुक्त केलं... योगेश्वर श्रीकृष्णाचा आदर्श त्यांनी त्यास प्रेमभरे समजाविला... संप्रदायाची दीक्षा दिली नि एका मठाचा मठाधिपती केलं...!

वरील अंगी भैरववाडी... या वाडीत घडलेली आणखी एक सत्य घटना...!

एका रात्री समर्थांसाठी विड्याची पाने आणताना या भैरववाडीत कल्याणास सर्पदंश झाला...! समर्थांनी लगेच जखमेवर वनौषधी बांधली...! त्यांचे मन धावले... भैरवास साकडे घातले... नीलकंठचरणी लीन झाले... विष उतरले... नि समस्तांची मुखे गुळखड्यांनी गोडावली...!

या परस्परविरोधी दोन घटना आठवीत घळीच्या दिशेनं चढावं...! नि गर्वानं फोफावलेल्या मनाविरुद्ध लढावं...!

चाफळ मुक्कामी समर्थांचं वास्तव्य असताना ते अनेकवार अधूनमधून या घळीत येत... एकवार इथं छत्रपती शिवराय त्यांच्या दर्शनास आले... राजे दमून आले... तृषाक्रांत झाले... हे जाणताच समर्थांनी बाजूच्या कड्यालगतचा एक दगड कुबडीनं सहज उलथविला नि तिथं पाण्याचा खळाळ खळखळला अशी एक आख्यायिका सर्वश्रुत आहेच...! या स्थळास पुढं कुबडीतीर्थ असं संबोधलं जाऊ लागलं...!

**बहुत तान लागली। तनु विशेष भागली।**
**सुरंग तो विरंगला। प्रसंगरंग भंगला॥**
**कळकळीत हा पळु। कवी बहुत वीवळू।**
**कळकळोनि पोळला। दयाळ राम वोळला॥**

आजही भर चैत्रवैशाखात इथं करांगुली एवढाली गार पाण्याची सततधार चालू असते... धारेखाली स्वाभाविक कुंड बनले आहे...! या कुबडीतीर्थावर यावं... तेथील ते अमृततुल्य जल प्राशन करावं... स्नानसंध्यादी कर्मे उरकावी... रामघळीत काहीकाळ बसावं... तेथील मातीचे कण नकळत आपल्या वस्त्रांवर बसतात... वस्त्रे हुर्मुजी होतात... संप्रदायाची दीक्षा घेण्यास प्रवृत्त करतात...!

इथून दक्षिणेस वसंतगड, दातेगड नि गुणवंतगड या दुर्गत्रयींचं मनहारी दर्शन घडतं... कऱ्हाड-पाटणचा सुदूर प्रदेश नि समोर पसरलेलं चाफळखोरं असा हा भव्यदिव्य सुरेख परिसर दृष्टिक्षेपात येतो...!

**धन्य चाफळ सुग्राम। तेथे नांदतो श्रीराम।।**
**सभोवती गिरिवर। नाना जाती तरुवर।**
**पुष्पवाटिका अपार। मन निवे पाहता।।**

एका रामोत्सव प्रसंगी समर्थ या इथं या घळीच्या तोंडाशी उभे आहेत... समोर सुदूर चाफळचा रामोत्सव साजरा होतो आहे... उदंड यात्रेकरू जमले आहेत... यात्रा फुलली आहे... फळीफुली बहरून आली आहे... तो नव नवल नयनोत्सव पाहून चित्तवृत्ती वोळल्या आहेत... तृप्ततेनं ओतप्रोत भरून, तो प्रज्ञावंत, विवेकी, अंतर्मुख नि विजनवासी महात्मा तदाकार होऊन... उर्ध्वबाहू करोन समोरील शब्दचित्र रेखाटतो आहे...! स्वामींचे ते स्वच्छ, दाणेदार नि धीरगंभीर स्वरयुक्त उच्चार ऐकून आजही सर्वांगी रोमावली फुलते...!

**दमामे चौघडे वाजती। धडाडे भांड्याचे होती।**
**फौजा भक्तांच्या साजती। ठार्यी ठार्यी।।**
**दिवट्या हिलाल चंद्रज्योती। नळे आरडत उठती।**
**बाण हवाया झरकती। गगनामध्ये।।**
**रंगमाला निरांजने। तिथे वस्ती केली मने।**
**दिवस उबावला सुमने। कोमाइली।।**
**दास डोंगरी राहतो। यात्रा देवाची पाहतो।**
**देव भक्तांसवे जातो। ध्यान रूपे।।**

मंत्रोच्चारातलं सामर्थ्य जसं मंत्रमुग्ध करतं तद्वत् समर्थांचं समग्र वाङ्मय वाचताना ओंकारातील आदिम ध्वनी... वाचेतील चिद्शक्ती... नि वाणीतला आर्ष घोष या त्रयींचं एकवटलेलं सामर्थ्य समर्थलिखित प्रत्येक अक्षरात प्रकर्षानं जाणवतं...!

शिवसमर्थांच्या चरणधुळीनं पावन झालेल्या या चाफळ खोऱ्यातील

मला विशेष अप्रूप वाटतं ते शिंगणवाडीचं...! चाफळ क्षेत्र होण्यापूर्वी समर्थांचं वास्तव्य रातदिस या शिंगणवाडीच्या रानीवनी असायचं...! शिवसमर्थाच्या पहिल्यावहिल्या ऐतिहासिक भेटीचं हे एक नयनरम्य पवित्र स्थान...!

एक दिस समर्थ एका चिंचेच्या तरुतळी बसलेले... सुखद साउलीचं छत्र धरून प्रेमस्वरूप माउलीचं चिंतन करीत असलेले... भर दुपारी, एका भाल्याच्या टप्प्यावर राजे पायउतार झाले... मोजड्या काढून सर्वांस इशारत करते झाले... एकुटेच अनवाणी आस्तेकदम चालत राहिले... नि समोर ते ध्यानमग्न शिल्प पाहून थबकले...! एकटक पाहात राहिले... भान हरपले... काया रोमांचित झाली... तनु थरारली... नि एक अनामिक सुखद संवेदना अंतरी वीजेगत चमकून गेली...! समर्थांना चाहूल लागली... सिद्धासनाची मिठी सैल झाली... पापण्यांची कवाडं हळूवारपणं उघडली... ते उठले... उभे राहिले... नि चार पावलं पुढं सरकले...! राजांनी समोर महाबली हनुमंत पाहिला... समर्थांनी सकल जनांसी आधारू असलेला प्रत्यक्ष अयोध्यापती रामराणा देखिला... ! भक्तवत्सल श्रीराम... बलशाली राक्षससेनेसमोर, धनुष्य उचलून एकुटा उभा ठाकलेला कोदंडधारी श्रीराम...! कुणी कुणास वंदावे...? एक दुर्गपिसे भारलेला दुर्गाधिपती तर दुसरा रामपिसे झपाटलेला मठाधिपती...!

दोन झंझावाती वादळे परस्पर सामोरी ठाकली... दृष्टादृष्ट झाली... अविचल नेत्रांनी परस्परास स्थिर मुद्रेनं न्याहळती झाली... ओळख पटली... राजांनी श्रद्धापूर्वक साश्रूपूर्ण नयनांनी समर्थांच्या पायी डोयी ठेविली... समर्थांनी दोन्ही स्कंध हाती धरोन त्यास प्रेमभरे उठविले...! गळामिठी झाली... क्षेमालिंगण झाले... क्षेमकुशल विचारले गेले... आचारविचार तंतोतंत जुळले... ज्योतीवाती एकरूप झाले... अंतरीचे गूज कथिले गेले... सुहास्यवदनातून कौतुकवचन फुलले... नि तदनंतर कृपाळूपणे सानुग्रह उदंड राजकारण उपदेशिले गेले... नि नवनिर्मित रामराज्य उदयास येऊ घातले ते याच स्थळी...!

**वन्हि तो चेतवावा रे।**
**चेतवताचि चेततो॥**

वाडीच्या डाव्याहाती समोर उपड्या कवडीगत दिसणारी एक देखणी टेकडी... त्या टेकडीवर समर्थ स्थापित खडीचा मारुती... त्या छोटेखानी सुबक राऊळासमोर एका भग्न वास्तूचे उध्वस्त अवशेष... त्या भग्नावशेषातून फळीफुली बहरून आलेलं एक ठेंगणंठुसकं सीताफळीचं झाड...! त्या

झाडाखाली बसावं नि समोर दिसणाऱ्या शिंगणवाडीच्या रानांतरी उभं असलेलं ते ऐतिहासिक स्मारक डोळेभरी न्याहाळावं...! स्मरण करावं त्या अवतारी नरशार्दूलांचं... गुणगान गावं त्यांच्या त्या तेजोमयी कर्तृत्वाचं... नि वंदन करावं त्यांच्या त्या अलौकिक नेतृत्वाला... आणि मग अंतर्मुख होऊन त्यांच्या लीला आठवाव्यात... त्या आळवाव्यात...!

**आठवता कंठ दाटे। हृदय उत्तरे फुटे।।**

**नयनी पाझर सुटे। बोलता वचन खुंटे।।**

असं होऊन जातं... यापरतं भाग्य नाही...!

## हेळवाकची रामघळ

कऱ्हाडपासून कोयनानगर पन्नास कि. मी. अंतरावर वसलेलं...! कोयनानदीच्या काठाकाठानं जी सडक धावली आहे, त्या सडकेवर पाटणच्या पलीकडे, कुंभारली घाटाच्या तोंडाशी, कोयनानगरच्या आधी पाच कि.मी.वर हेळवाक नावाचे एक लहानसे गाव आहे. हेळवाकपर्यंत कोयना उत्तरेकडून दक्षिणेस येते व तिथून ती पूर्ववाहिनी होते. हेळवाकच्या दक्षिणेस, नदीच्या पल्याड उजव्या हाती कोंढावळे...! डोंगरपायी वसलेल्या या छोट्याशा खेडेगावातून, वळणावळणानं गर्द झाडावळीच्या शीतल छायेखालून एक तास डोंगरचढाई... वर पठारावर धनगरवाडी... वाडीच्या उजवीकडे वळून, रामओढ्याच्या कडेकडेनं, घनदाट वनराईतून अर्धातास चालणे.... चालताचालता अकस्मात पावलं थबकतात... नि समोरच्या डोंगरालगत, कड्याच्या ऐन अंतर्भागी, १७५ फूट लांबीची, आग्नेयमुखी, अर्धचंद्राकृती पोखरलेली मनोहारी गूढगंभीर रामघळ आपल्या दृष्टीस पडते...!

घळीत बसावं... समोर पहावं... तो मनोरम देखावा पाहून हरखून जावं... नि वरील डोंगरमाथ्यावरून धबाबा उडी घेणारा तो दोदाणा पाहून गंगावतरणाचे स्मरण व्हावं...!

पाणलोटाच्या द्रुतगतीनं तासलेला तो कडा... त्या फेसाळलेल्या खळाळाचा तो खळखळाट... समोर पसरलेल्या त्या गच्चदच्च रानातून... त्या भयसूर दऱ्यादर्कुटातून... त्या गिरीकंदरी घुमणारा त्याचा तो भयकंपित घोष ऐकून नि ते रौद्ररूप अवलोकून समर्थांची वाणी या पोटघळीत घुमली असेल...!

**तरुंची वने लागली ती वितंडे।**

**प्रचंडे उदंडे बहु झाड खंडे।**

**भूमी दाटले वृक्ष वृक्षा मिळाले।**

**तया अंतरी वंश मिश्रित झाले।।**

दरे दर्कुटे थोर भ्यासुरवाणी।
बहुतापरीचे तरु ते पुराणे।
कडे कापले तोय नेटे भडाडी।
गिरीकंदरी घोष तेणे धडाडी।।
दरे दर्कुटे झाड खंडे अनेकी।
कपाटे कडे विवरे आणि टाकी।
वनी पावनी पांडवी वास केला।
गिरी देखिता दास संतुष्ट झाला।।

समर्थांनी वयाच्या सहासष्टाव्या वर्षी, १६७४ साली या रामघळीत चातुर्मास क्रमिला... विठ्ठल गोसावी यांनी लिहिलेल्या पत्रात त्याची नोंद आहे... '... उपरी आनंद संवछरी श्री समर्थ हेळवाकीचे घळीयेस होते... चातुर्मास तेथे क्रमिले... सीतलाई बहुत जाली... म्हणून उष्णदेशी चाफळकडे आले...' थंडीचा त्रास जास्तच जाणवू लागल्यामुळं वेदमूर्ती रघुनाथ भट यांनी समर्थांस येथील कार्यातून मुक्त केले नि चाफळला पाठविले...! चाफळहून समर्थांनी स्वहस्ते रघुनाथास आभाराचे एक गद्यपत्र लिहिले नि पाठविले...! त्या पत्री अत्यंत नम्रभाषेत त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली आहे...!

१६७४ चा चातुर्मास म्हणजे आषाढ ते कार्तिक...! या कालावधीत समर्थांचं वास्तव्य या घळीत होतं... तर मग या वर्षीच्या ज्येष्ठ मासी त्यांचा मुक्काम नेमका कुठं असेल ? या हेळवाकच्या घळीमाजी... ? शिवथरच्या सुंदरमठात... ? चाफळच्या राममंदिरी... ? कि सज्जनगडावर... ? याबाबतीत मतैक्य नाही...!

शिवसमर्थ-स्नेहसंबंध नि तत्कालीन परिस्थितीच्या सखोल अभ्यासांती केवळ तर्कशुद्ध अनुमानच काढायचं झालं तर - निदान ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशीस तरी समर्थ रायगडाच्या परिसरात नक्कीच असावेत. कदाचित् रायगडासमोरील दुर्ग लिंगाणावरील त्या शिवलिंगाच्या पोटगुहेत तर नसतील... ?

आज शनिवार... हनुमंताचा वार... आनंदनाम संवत्सर... शालिवाहन शके १५९६... ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी... पंचपंच उष:काल...!

घटिका समीप ठाकली... मुहुर्तपात्र भरले... आणि प्रचंड वेदघोषीं हाती विष्णुमूर्ती घेऊन... स्कंधी धनुष्यबाण लेवून... कोदंडधारी राजे सिंहासनसमोर अतिशय नम्रतेनं नतमस्तक झाले... नि त्या सुवर्ण सिंहासनास पदस्पर्श होऊ न देता सिंहासनारूढ झाले...! महाराष्ट्राला राजा लाभला...! शिवराय छत्रपती झाले...! साडेतीनशे वर्षांचे गुलामी सुतक फिटले...!

महाराष्ट्रात पुन्हा अयोध्या अवतरली... रामराज्य प्रकटल...! अवघ्या देशास छत्रसिंहासन लाभले...!

राजा... आदर्श राजा... जाणता राजा... शिवकल्याण राजा...!

अवघा आनंदीआनंद झाला...!

सह्याद्रीची काया रोमांचित झाली... थरारली... तो गहिवरला... आनंदला... बेहोष झाला...!

उरीपोटी रंगविलेलं जोपासलेलं स्वप्न मूर्तिमंत साकारलं... आणि- आणि सह्याद्रीच्या कुशीत वसलेल्या एका गुहेतून एक तेजःपुंज महामुनी आनंदानं उसळून गरजला...

**स्वप्नी जे देखिले रात्रीं। तें ते तैसेचि होतसे।**
**हिंडता फिरता गेलो। आनंदवनभुवनी।।**

## सज्जनगडची रामघळ

जांब ही समर्थांची जन्मभूमी... टाकळी ही तपोभूमी... चाफळ ही कर्मभूमी... नि सज्जनगड ही निर्वाणभूमी...!

उतारवयात समर्थांचा मुक्काम बहुतांशी सज्जनगडावरच असे... शिवसमर्थांच्या वारंवार गाठीभेटीचं हे एक प्रमुख केंद्र होतं... त्यांचं ते विश्रांती स्थळ होतं...!

**विश्रांती वाटते तेथे। जावया पुण्य पाहिजे।**
**कथा निरुपणे चर्चा। सार्थके काळ जातसे।।**

रोज कथा-कीर्तनं-निरुपणे गडावर व्हायची... त्याला संगीत गायनाची जोड असायची...! समर्थांसारखा संगीताचा विलक्षण भोक्ता संत दुसरा नाही..! संगीतानं इतका धुंद होणारा... त्यात रंगून जाणारा... तन्मय होणारा हा एकमेव संत...! संगीतकला ही धन्य कला आहे... ती एक दैवी कला आहे... गायन हे एक लोकवशीकरणाचं मोठं अमोघ साधन आहे... अशी त्यांची ठाम समजूत होती. ही कला त्यांनी अवगत केली होती... या कलेची त्यांना अपरिमित गोडी होती... ते स्वतः उत्तम गायक होते... गाणारे होते... त्यास रागरागिणींचे पूर्ण ज्ञान होते... तद्नुरूप ते पद्यरचनाही करीत...!

**संगीत गायनी विद्या। सर्व सद्या मनोरथा।**
**विदेश पाहता नाही। धन्य ते गायनी कळा।।**

सज्जनगडावरून उतरताना परळीकडे उतरणाऱ्या पायऱ्यांच्या वाटेनं खाली उतरावं- मधेच गाय-मारुतीच्या स्थानाशी या घळीकडे जाणारी

वाट फुटते...! गडाच्या उत्तर बुरूजाखाली, या गुहेकडे जाताना कड्यात खोदलेल्या दोनचार पायऱ्या आहेत. अदमासे एक मीटर व्यासाचे नि सहा मीटर लांबीचे वीवर रांगत जावे लागते... तद्नंतर तसेच रांगत उजवीकडे वळून दोन पायऱ्या उतरल्यावर, सहा फूट लांबीरूंदीच्या नि तीन फूट उंचीच्या एका खोलीत आपला प्रवेश होतो...! ही समर्थांची ध्यानगुंफा...! अशीच एक सुंदर नि सुबक चिरेबंदी ध्यानगुंफा आहे. चाफळराममंदिराच्या प्रांगणात... या दोन्ही ध्यानगुंफा रायगडावरील खलबतखान्याचं स्मरण करून देणाऱ्या..!

नीरव शांतता. . निखळ एकांत... नि निर्वात स्थळ...!

**एकांत गुव्हा निर्वात जेथे।**

**चर्चा करावी अद्वैत तेथे।।**

**जनसम्पर्कापासून दूर निरंजन स्थळी... एकांतवासी मनासी संवाद साधता येतो... 'आपुलाचि वाद आपणासी' घालता येतो...!**

**एकांती विवेक करावा। आत्माराम ओळखावा।।**

ही ओळख पटते... नाते जडते... नि पुढं ते कायमचे जडले जाते...!

**मरे एक त्याचा दुजा शोक वाहे।**

**अकस्मात तोही पुढे जात आहे।।**

या त्रिकालाबाधित सत्याचा सदुपदेश देणारे समर्थ, शिवरायांच्या निधनाची खबर येऊन धडकताच काहीसे कष्टी नि अबोल होऊन बसले... पूर्वपिक्षा एकांतप्रिय झाले... जनसंपर्क टाळू लागले...! शक्तीयुक्तीचा इतका एकजीव झालेला... शक्ती गेली आता युक्तीनं मागं राहून काय करायचं...? असं वारंवार मनी येऊ लागलं... समर्थ म्हणजे प्रत्यक्ष परब्रह्म...! शिवरायांनी आपले अवतारकार्य संपविले नि हे परब्रह्म कष्टी झाले...! हा समर्थांच्या जीवनातील केवढा मोठा चमत्कार आहे...!

## शिवथरचा सुंदरमठ

महाड ते शिवथरघळ डांबरी सडकेनं तीस कि. मी. अंतरावर...! इथं यावं... अबोल व्हावं... मौनव्रत धारण करावं... नि दिठीनं भवतीचं सारं रौद्ररम्य सौंदर्य आकंठ पिऊन घ्यावं...!

**गजबज मज आता सर्वथा आवडेना।**

**बहुत बडबडितो त्यास आम्हा पटेना।।**

शिवथर घळ म्हणजे दासबोधाची गंगोत्री...! दासबोध म्हणजे, संसारसिद्धी सोपी करून सांगणारा पाचवा वेद...!

ही घळ चाफळच्या मठाखालोखाल समर्थांचा मठच बनलेली... तिला सुंदरमठ असं नामाभिदान प्राप्त झालेलं...! एका बाजूस घाटमाथा नि दुसऱ्या बाजूस तळकोकण याच्या सरहद्दीवर असलेलं, वसलेलं हे मोक्याचं ठिकाण... असं हे भौगोलिक महत्त्व हेरून समर्थांनी या घळीची निवड केलेली...!

चहूअंगी उत्तुंग डोंगरकड्यांचं अभेद्य कडं... हिरवीशार पसरलेली घनदाट गहन रानंवनं... खोल सखोल दऱ्यादर्कुटं... नानाविध रंगीसुरंगी पक्ष्यांचं सुमधूर कूजन... वर आकाशाचं गोल सुगोल घुमट... त्या प्रचंड घुमटात तरंगणारी चित्रविचित्र आकाराची मेघावली... त्या कृष्णधवल मेघावलीला सुशोभित करणारे पक्ष्यांचे थवे... हे सारेच एकूण नवनवे...! असा हा एकूण रम्य सुरम्य परिसर... निसर्गानं सजवलेला-सजलेला... नि त्यातच या शांत प्रशांत एकांताचा काहीसा गोड प्रेमभंग करणारा त्या महाकाय जलप्रपाताचा, आसमंतात घुमणारा, तो धीरगंभीर ध्वनी-प्रतिध्वनी...!

भर धुंवाधार-महामूर झिम्मड पावसात त्या निसर्गाचं तांडवनृत्य अवलोकून त्या निसर्गशिल्पाचं रौद्ररम्य रूपसंगीत समर्थांनी शब्दांकित केलं...!

**गिरिचे मस्तकी गंगा। तेथूनि चालली बळे।**
**धबाबा लोटल्या धारा। धबाबा तोय आदळे।।**
**गर्जतो मेघ तो सिंधू। ध्वनी कल्लोळ उठीला।**
**कड्यासी आदळे वारा। वात आवर्त होतसे।।**
**तुषार उठती रेणू। सीत मिश्रित धुकटे।**
**दराच तुटला मोठा। झाड खंडे परोपरी।।**
**निबीड दाटती छाया। त्यामध्ये ओघ वाहती।**
**गर्जती श्वापदे पक्षी। नानास्वरें भयंकरे।।**

आणि अवतीभवती पसरलेल्या साऱ्या निसर्गपरिसराचं सर्वांगसुंदर प्रासादिक शब्दचित्र त्यांनी त्याचसमयी रेखाटलेलं...

**पसरले सरले गिरि साजिरे। सुरवटे धुकटे भरती दरे।**
**बहुत वात झडात झडाडितो। वर तरु वरताचि कडाडितो।।**
**द्रुम लता समता तृण मातले। सुख मनी सुमनी मन रातले।**
**परम सुंदर ते खग बोलती। गमतसे वसती कमलापति।।**
**विमल सुसिळ हे स्थळ पाहता। सुख विशेष घडे पळ राहता।**
**वरदराज विराजतसे वनीं। विनटला नटला रत सज्जनी।।**

असं हे विलोभनीय निसर्गसौंदर्य, मी कित्येकवेळा डोळेभरी न्याहळलं आहे... न्याहळतो आहे...! काही वेळा 'अनंत हस्ते कमलाकराने। देता किती घेशील दो कराने॥' अशी अवस्था होऊन जाते.... किती घ्यावं...? किती प्यावं...? किती पाहावं...? किती ऐकावं...? किती स्पर्शावं...? किती हुंगावं...? किती चुंबावं...? कितीही घेतलं तरी समाधान होत नाही... कितीही आकंठ प्यालो तरी तृष्णा भागत नाही... तृषार्त मन सारखं निसर्गाकडं धाव घेतं... एका अनामिक ओढीनं पिसं भरल्यागत निसर्गवेडं होऊन जातं...!

शिवथरच्या समर्थ रामघळीत असाच एकवार भर झिम्मड पावसात उभा होतो.... चाळीस नि पंचवीस मीटर लांबीरूंदीचा हा प्रशस्त सुंदरमठ... समोर कोसळणारा तो महाप्रचंड भीमकाय शरीराचा भव्यदिव्य जलप्रपात... जणू शुभ्रधवल हिमालयाच्या जटाभारातून तुफान वायुवेगानं खळाळत येणारे भगीरथीचे हिमधवल सलील...! ती पिसाटलेली फेसाळती उडी... ती बेफाम गती... वाऱ्याच्या बेगुमान लोटानं त्या दोदाण्याच्या विस्कटलेल्या पिंजरलेल्या झिंज्या... एकाच तालसूरलयीत घुमणारा त्याचा तो धीरगुणगंभीर ध्वनी... त्यातील उधळणाऱ्या असंख्य जलतुषारांनी कलात्मकतेनं विणलेलं ते झिरझिरीत वस्त्रावरण... त्यात मिसळलेल्या धुकट्याच्या लाटा... नि त्यातच हळूवारपणं मिश्रित झालेली सप्तरंगी इंद्रधनुची ती अस्पष्ट कोवळी मुलायम छटा...! धुक्याचे शेले पांघुरलेली भवतीची हिरवीकंच डोंगररांग... त्यावर निळाई शिंपण... त्यातून स्वच्छंदपणे उड्या घेणारे असंख्य लहानमोठे पाणलोट... नि वरून आकाशाच्या घुमटातून झरणारी संततधार...!

एक अनामिक ओढ लावणारी... तृषित करणारी... अतृप्त करणारी...!

**'संतत धार झरे।**
**तरी हे चित्त पिपासित रे॥**

ती अनामिक अवर्णनीय अतृप्ती कमालीची तृषाक्रांत करते...!

......मजसवे असलेला माझा दुर्गबंधू रवीन्द्र भावे याच्या हस्तस्पर्शानं मी भानावर येतो... नि मागं वळून समर्थांच्या मूर्तीसमोर जाऊन बसतो...!

या घळीमाजी समर्थ नेमके कुठे बसत असत हे या चर्मचक्षूंना दिसणार नाही पण अंतर्दृष्टीला ते सारं दिसल्यावाचून राहणार नाही...!

समोर काचेच्या चौकोनी गाभाऱ्यात समर्थ सिद्धासनी बसले आहेत... वर्ण उजळ... धारदार नासिका... तेजस्वी अंतर्मुख डोळे... बांधीव अंगयष्टी... अशा या मनाच्या पावन योग्याची मुद्रा कमालीची प्रसन्न

दिसते आहे... अंगकांती सात्त्विक तेजानं तळपते आहे... अंतरी उमलणाऱ्या शब्दफुलांचा दिव्यानंद चेहऱ्यावर ओसंडतो आहे... दिठीवाटे अनोखा स्नेह पाझरतो आहे... नवनवोन्मेषशालिनी, चातुर्यकलाकामिनी, अभिनववाङ्‌विलासिनी महाराष्ट्रशारदा प्रसन्न झाली आहे... ईश्वरदत्त प्रतिभा प्रफुल्ली आहे... शब्द आकारू लागले आहेत... 'फुलेल' दरवळू लागला आहे...!

डाव्या बाजूस बसलेला शिष्योत्तम-कल्याण उजव्या हाती कलम धरून एकाग्रचित्ते पाहतो आहे... त्या क्षणाची आतुरतेनं प्रतीक्षा करतो आहे... त्याच्या शेजारी समईची अखंड-अचल ज्योत प्राणज्योतीगत तेवते आहे... त्या अंधुकभरल्या मंदगंधधुंद प्रकाशी समर्थांना शब्दसमाधी लागली आहे...!

मनी येतं - याच अवस्थेत ते अविस्मरणीय नि अजरामर पत्र लिहिलं गेलं असावं...! कस्तुरीच्या सुगंधानं परिमळलेलं पत्र... एका विरक्त योग्यानं एका श्रीमंत योग्यास लिहिलेलं एक नितांत सर्वांगसुंदर पत्र... शिवरायांची बांधेसूद ध्येयमूर्ती निर्मळ भावांनी कोरलेलं एक अमोल पत्र... राज्यांच्या कर्तृत्वाचं, नेतृत्वाचं, दातृत्वाचं नि वक्तृत्वाचं कवतिक करणारं एक अनमोल पत्र... त्या पत्रातील प्रत्येक शब्द म्हणजे जणू सह्याद्रीमंडळातील एकेक चिरेबंदी अभेद्य किल्लाच...! त्या किल्ल्याच्या, प्रत्येक शब्ददुर्गाच्या रंध्रारंध्रातून ओसंडणारा एक अनोखा नि अपूर्व सुगंध आजही जनमानसी दरवळतो आहे...!

**निश्चयाचा महामेरू। बहुत जनांसी आधारू।**
**अखंड स्थितीचा निर्धारू। श्रीमंत योगी॥**

हे संपूर्ण पत्र वाचताना आजदेखील सर्वांगी रोमावली फुलते... नि शेवटच्या दोन ओळी ओठी येताच हुंदका अनावर होतो...!

**तुमचे देशी वास्तव्य केले। परंतु वर्तमान नाही घेतले।**
**प्रसंग नसता लिहिले। क्षमा केली पाहिजे॥**

म्हणून विनयपूर्वक क्षमा मागणारा हा निगर्वी योगीराज...!
कोण श्रेष्ठ...? कोण ज्येष्ठ...? कोण कनिष्ठ...?
तुल्यमापन कसे करावे...? शब्दच सापडत नाहीत... केवळ शब्दातीत...!
ही 'ज्योतीनं तेजाची आरती' की तेजानं ज्योतीची आरती...?
इथं बुद्धी विसावते...!
...नि जिथं बुद्धी विसावते तेथे श्रद्धेचा उदय होतो...!
क्षणभराची अनुभूती असेल... मन निर्विचार होतं... निर्विकल्प होतं...

अजपाजप करणारं तदाकार होतं...!

समर्थांच्या अंतरातून ही तेजस्वी विद्युल्लता शब्दरूपे चमकली...! राजकारणातील भीषण कृष्णवर्णी मेघांच्या कडा उजळून टाकणारी ती तेजस्वी विद्युल्लता अशी कधीमधी चमकते नि भवतीचा गडद अंधःकार उजळून टाकते...!

त्यासमोरील समईतील उजळणारी-पाजळणारी ती अखंड-अचल दिव्य प्राणज्योत नकळत मनी ठसते... बिंबते... नि भोळंभाबडं मराठमोळं मन, अंगी बारा वाघांची ताकद संचारल्यागत गरजतं...

**'मात्र भाबड्या हृदयात**
**तेवत आहे ती ज्योत**
**ती विझवाया पाहाल कोणी**
**मुक्त करूनि झंझावात**
**कोटी कोटी छात्यांचा येथे**
**कोट उभारू निमिषात...'**

● ○ ●

REFBK-0026751
REFBK-0026751

ते तुटण्याची भीती नाही... तारा योग्य वेळी छेडल्या जात आहेत... त्यात तिळमात्र कसूर नाही...

उतरण्याचा अगदी कस लागला आहे. भरल्या उन्हात कडा तसा लख्ख चक्क न्हाऊन निघाला आहे... कांत्या फणसळकर वचवचतो आहे... करमरकर मध्येच पचपचतो आहे... "हळू! तू पुढे हो-! अरं तसं नव्हे! ये हिरा! अरे मरशील! छे छे! आपण नाही बुवा! शाब्बास! वारे मेरे शेर! वारे मेरे गब्रू, जीते रहो पठ्ठे!"

असा संमिश्र कालवा झाला आहे. इतक्यात पंधरावीस माकडांचा एक कळप उजव्या बाजूच्या आडरानातून वर येतो नि पटापट उड्या मारीत बाजूच्या कड्यावरून क्षणार्धात दृष्टिआड होतो. सर्वच हबकतात. एक जबरदस्त भीतीची संवेदना सर्वांगातून विजेगत थरारून जाते.

शेवटी सारेजण तळाशी एकत्र जमतात. गळामिठी होते. क्षेमकुशल विचारलं जातं. आणि मग समोरच्या दरीतून एका अनुपम्य विजयी घोषणेचा बुलंद प्रतिध्वनी उमटतो- 'प्रौढप्रतापी पुरंदरऽऽ क्षत्रियकुलावतंसऽऽ सिंहासनाधीश्वर'.....

पाणढाळीनं साठलेले दगडधोंडे ओलांडीत पाचशेएक फूट वळणावळणानं खाली उतरतो. नि एकदमच हबका बसल्यागत दच्चदिशी थबकतो. बापरे! सहाशे फूट उंचीचा उभा ताशीव कडा पूर्वपश्चिम वेढलेला. इथून तिथून एका सरळ रेषेत तुटलेला. पावसाळ्यात वरून खळखळत येणारा पाणलोट या इथं किंचितसा रेंगाळतो नि थेट सहाशे फूट खोलीत बेधडक उडी घेतो.

पण इतक्यात समोरचा विलोभनीय देखावा पाहून सारेच सुखावतात. हे विहंगम दृश्य इथून ज्यानं एकदा पाहिलं तो धन्य! पायथ्याशी गच्च दुर्गम रान! पुढं पसरलेला अफाट प्रदेश! गावातली इवली इवली घरं! बोटाच्या पेराएवढाली माणसं! दूरवर दिसणारी गिरीशृंग आणि-आणि तो जवळ दिसतो आहे ना तो रायगडचा कर्दनकाळ! काळकाईच्या डोंगरातलं पोटल्याचं टोक! १८१८ साली कर्नल प्रॉथरने मोठ्या हिंमतीनं नि कौशल्यानं पोटल्याच्या डोंगरावर तोफा चढविल्या नि तिथून रायगडावर डागल्या.

इतक्यात खालच्या रानातून हरळ्या ऐकू येतात. गावारानात लाकूडफाट्यासाठी आलेली माणसं बेंबीच्या देठापासून आम्हास ओरडून सांगताहेत - "अरं बाबानू, थतं कशापायी आलाव? मरायचंय् काय? थतून वाट न्हाय! वाईच उजव्या अंगासनी म्होरं व्हा नि वर जावा!

तथून उतरायचा आक्रीत करू नगा!-"

उजव्या बाजूस वळून कारवीच्या गच्च रानात मुसंडी मारतो नि उभं रान तुडवीत एका निसणीच्या ढोरवाटेनं कड्याच्या पोटाखालून वाळसुऱ्याच्या खिंडीजवळ येऊन पोहोचतो. १६८९ साली वाघदरवाजातून उतरलेली मंडळी याच खिंडीवाटे वाळसुरे गावातून प्रतापगडाकडं कूच झाली. पुढच्या खेपेस या खिंडीवाटे उतरून पोटल्याच्या डोंगरावर जाण्याचा, रायगडास पायथ्यापासून संपूर्ण प्रदक्षिणा घालून प्रतापगडी कूच करण्याचा संकल्प सोडतो. आजच्या साहस यात्रेचा सांगतासमारंभ आम्ही आनंदयात्री या इथंच मोठ्या उत्साहानं साजरा करतो. आनंदाला भरतं येतं. नि पुनश्च एकवार त्या अनुपम्य विजयी घोषणेनं सारं आकाश दुमदुमून जातं.

'पर्यटन'
मार्च १९७८

● ○ ●